E. Samuels.

Mandalay.

28.9.50.

(68)

THE
DAILY PRAYERS.

TRANSLATED

FROM HEBREW IN MARATHI

BY

The Late Mr. Joseph Ezekiel Rajpurkar,

HEAD MASTER DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION,
SECRETRY TO THE BENE ISRAEL IMPROVEMENT SOCIETY
AND FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY.

AND FIRST EDITION PUBLISHED BY

The Late Mr. Ezekiel Benjamin Penkar,

FOR THE USE OF THE BENE ISRAEL COMMUNITY

PRINTED BY

Aaron Jacob Divekar

AT THE ANGLO-JEWISH AND VERNACULAR PRESS

IN

1889—5649

AND THE SECOND EDITION PUBLISHED BY

Mr. Solomon Joseph Talkar

TO REMOVE THE WANT OF THE ABOVE BOOK FOR

OUR BENE ISRAEL COMMUNITY.

PRINTED BY

Simeon Jacob Kharilker

At The Bombay Hebrew Publishing & Printing Press

1934—5695.

BOMBAY.

Registered under Act XXV of 1867.

Price Rs. 5-8-0.

ספר

תפלת החדש

כמנהג ק׳ ק ספרדים

בלשוננו הקדושה ובלשון מראטי כאשר נדפס

על ידי המגיה והמעתיק המפורסם

כהר״ר **יוסף יחזקאל ראנפורכר נ״ע**

ראש המלמדים בבית הספר של ה׳ ג דוד ששון נ״ע

סופר של חברת תקון בני ישראל

וחבר ליוניוורסטי של בומבאי

כאשר נדפס על ידי המפורסם הגבור והנכבד

יהזקאל בנימן פינכר נ״ע

ועתה נדפס שנית בהוצאות ובתיספות מועילות

מאת

ה״ר **שלמו יוסף טלכר** הי״ו

כדי לזכות בו ק׳ק בני ישראל אשר בערי הודו המזרחית

הכל מסודר על ידי

הצעיר **שמעון יעקב כרילכר** יצ״ו

ברפוס חדש

די בומבאי חיברו פאבלישינג אינד פרינטינג פראס

פה **בומבאי** יע״א

בשנת וליוסף אמר **מברכת ה׳** ארצו לפ׳ ק

इस्राएलांतील सेफारदीम मंडळीच्या संप्रदायाप्रमाणें रचलेली

नित्याची प्रार्थना.

इचें मराठी भाषांतर

स्व. अ. मे. योसेफ येहेज्केल राजपुरकर

दावीद सासून यांच्या शाळेंतील मुख्य गुरु व इस्राएलच्या सद्‌गुण मंडळीचे चिटणीस यांनीं केलें व त्याची

प्रथमावृत्ती

स्व. अ. मे येहेज्केल बिनयामीन पेणकर

यांनीं मुळच्या हिब्रूसहीत आपल्या एस्राएल बांधवांच्या उपयोगांकरितां स्वखर्चानें मुंबईमध्यें इस्राएली सन ५६४९, (इसवी सन १८८९) सालीं

अ. मे. आहारोन याकोब दिवेकर यांजकडून

ॲग्लो–ज्युईश ॲन्ड व्हर्न्याक्युलर छापखान्यामध्यें छापविलें

व त्याची

दुसरी आवृत्ती

मे. सालोमन जोजफ तळकर

यांनीं आज जीं कित्येक वर्षे वरील ग्रंथाची उणीव भासत होती ती दूर करण्याकरितां स्वतःच्या खर्चानें मुंबईमध्यें

मे. शिमओन याआकोब खरीलकर

यांजकडून

धी बॉम्बे हिब्रू पब्लीशींग ॲन्ड प्रिंटिंग प्रेसमध्यें छापविलें.

इस्राएली सन ५६९५ इ. स. १९३४.

(सर्व हक्क प्रथम प्रकाशक स्व. अ. मे. येहेज्केल बिनयामीन पेणकर यांचे चि. मे. हाईम येहेज्केल पेणकर बी. ए. बांद्रा यांनीं आपले स्वाधीन ठेविलें आहेत)

किंमत ५॥ रुपये.

मुद्रकाचे दोन शब्द

सदरील ग्रंथ मागे ता. १५ माहे मे १८८५ सालीं स्व. अ. मे. येहेज्केल बिनयामीन पेणकर यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यांत आला होता. त्यास आज ४५ वर्षें वर होऊन गेल्यामुळें ह्या ग्रंथाची आपल्या ज्ञातींत फारच उणीव भासत होती. ती उणीव मे सालोमन जोजफ तळकर यांच्या खटपटीने दूर होऊन सदरील ग्रंथाची दुसरी आवृत्ती आज ४५ वर्षानंतर प्रसिद्ध होत आहे, व ती प्रसिद्ध करण्यास मे हाईम येहेज्केल पेणकर बी ए., बँड्रा ह्यांनीं परवाणगी दीली म्हणून प्रकाशक त्यांचे फार ऋणी आहेत.

ह्या आवृत्तींत "**पाथा एलियाहू**" व ओमरचा "**लिशीम येहूद**" ह्या प्रार्थनेंचा भाग मराठी अर्थासहित अधिक घेण्यांत आले आहेत. (शाहरीथ) सकाळच्या प्रार्थनेंतील "बारूर शेआमार" दोन तऱ्हेची सोबत न घेतां एक जे थोडक्यांत आहे ते रोजच्या शाहारीथ मध्यें घेतले आहे व पूर्ण बारूख शेआमार शब्बाथ शाहारीथच्या प्रार्थनेंत घेतले आहे. रोजच्या सकाळच्या प्रार्थनेंतील आमीदा नंतर जो विदुय घेतला आहे त्याची रचना पहिल्या आवृत्तींत दिलेली आहे त्या पेक्षां अगदींच फेरफार करून घेतली आहे व ती रीत इस्राएली नियमाप्रमाणें अगदीं बरोबर आहे असें आपल्यांतील बहुतेक विद्वान लोकांच्या मतें ठरल्यामुळें तसें घेण्यांत आलें आहे तरी आपले इस्राएल बांधव त्याच प्रमाणें प्रार्थना करण्याची वहिवाट करून घेतील अशी आशा बाळगितों. तसेंच हिब्रु शब्दांचा बरोबर उच्चार व्हावा ह्मणुन पुष्कळ ठिकाणी गाया व मेथेग वापरण्यांत आले आहेत व पुष्कळ हिब्रुशब्द ह्या आवृत्तींत व्याकरणासरून सुधारून घेण्यांत आले आहेत, तरी वांचकांस वाचतेवेळेस चुकल्या सारखें वाटेल परंतु वांचकांनीं त्या शब्दांची तशी वहीवाट करून घ्यावी ही माझी विनंति आहे. ही वरील सुधारणा व अधिक घेतलेला प्रार्थनेचा भाग एसहाईम प्रार्थनालयाचे हाज्जान आब्राहाम याआकोब भक्शी कोहेन यांनी हिंदी भाषेंत समजावून सांगून ते मराठींत करून सदर ग्रंथांत घेण्यास दिले ह्मणून त्यांचे फार ऋणी आहोंत. हिब्रु तसेंच मराठी शुद्धा शुद्ध करण्याचें काम माझ्या एकट्यावर पडल्यामुळें, नजरचूक होऊन कांहीं चुका राहील्यास त्याकडे सुज्ञजनानी लक्ष न देतां ते सुधारून घेतील अशी अशा करतों. मे. एस्. आय. सालोमन (सानकर) बी. ए. एल् एल्. बी. एडव्होकेट, अमेरीकन मिशनस्कूलचे हिब्रु मास्तर यांनीं आपला स्वतःचा अमूल्यवेळ

घालवून सदरील ग्रंथाची सर्व पृष्ठें छापून झाल्यावर तीं बांधण्यापूर्वी त्याची सर्व पृष्ठें अगदी मेहनत घेऊन व बारकाईने तपासून त्यांत कांहीं चुका राहील्या होत्या त्या सर्व सुधारल्या या त्यांच्या मेहनती बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. त्यांत सुधारण्यास अशक्य असलेल्या कांहीं चुका प्रारंभी शुद्धी पत्रकांत दिल्या आहेत. तेवढ्या प्रथम पाहून नंतर वाचकांनीं हा ग्रंथ वापरण्यास सुरवांत करावी.

शेवटीं ज्या दयावंत प्रभोनें या पवित्र कामांत मला सहाय्य करून हें बिकट काम शेवटास नेले त्याचे अतःकरण पूर्वक आभार मानून माझे दोन शब्द पुरे करतो.

आलाराखीया बिल्डींग,
हेन्स रोड, जेकब सर्कल,
मुंबई नं. ११.
ता. २८ माहे ऑगस्ट १९३७

आपला नम्र सेवक,
शिमओन याआकोब खरीलकर,
मुद्रक
धी बॉम्बे हिब्रु प. ॲन्ड. प्रिं. प्रेस.

Printed by Simeon Jacob Kharilker at the Bombay Hebrew Publishing & Printing Press, Munshi mansion 19, Ripon Road, Jacob Circle Bombay 11.

and

Published by Mr. Soloman Joseph Talkar, Rasool Building New Nagpada Balassis Road, Byculla, Bombay.

शुद्धीपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१०	२०	וְטָבַע	וְטִבַּע
११	१३	בַּיְשִׁימוֹן	בִּישִׁימוֹן
३८	२२	וַאֹמֶר	ויֹאמֶר
५७	२३	בְּסַעֲשָׂיו	בְּמַעֲשָׂיו
९१	१८	הַוֹיִם	הַגּוֹיִם
९६	११	אלֹהֵינוּ	אֱלֹהֵינוּ
११०	२२	שׁכִינַתוּ	וּשְׁכִינַת
११५	२	בּוֹרִת	בּוֹרִית
११७	१	ויחיח	ויהיה
१३०	२१	שְׁכִינתַוּ	וּשְׁכִינַת
१५१	१३	יְשֻׁוֹבוּן	יְשׁוּבוּן
१५५	६	רָחַחְצָה	הָרַחְצָה
२७०	२५	ואָהֹבֵם	וָאֹהֲבֵם
२८३	५	מוֹב	טוֹב
२८५	२४	אֵלְהָוּוֹ	אֵלֶיהוּ
३२४	४	כֶּחְכצוֹ	כְּחֶפְצוֹ

पहिल्या ग्रंथप्रकाशकाची प्रस्तावना.



जरी आपले लोकांत बरेच ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत; तरी त्या सर्वांपेक्षां 'तेफिलाथ हाहोदेश' ह्मणजे नित्याच्या प्रार्थनेचा ग्रंथ ज्यामध्यें प्रतीदिवशीं करायास लागणाऱ्या विधींचे अनेक नियम आहेत, त्याच्या भाषांतरचें अगत्य अधिक होतें. असें वाटल्यावरून तें करण्याविषयीं मी अ० मे० योसेफ येहेजकेल राजपुरकर यांस सूचना केली. ती त्यानीं मान्य केल्यावरून, आणि तें मूळच्या इब्रीसहीत छापण्याचा खर्च मी आपणावर घेतल्यावरून, हा ग्रंथ माझ्या प्रीय बांधवांपुढें सादर करण्यांत आला आहे परंतु काढलेल्या आकारापेक्षां हा ग्रंथ सुमारें २०० पृष्ठें अधिक वाढल्यामुळें, आणि **इंग्री व मराठी अक्षरें जुळण्याचें काम फारच बिकट असल्यामुळें**, हा ग्रंथ तयार होण्यास अधिक दिवस लागले हें कारण सर्वांस मान्य होईल अशी मी आशा करितों. त्याप्रमाणें जरी केलेल्या आकारापेक्षां खर्चहि अधिक वाढला आहे, तरी हा ग्रंथ माझ्या बांधवांस आवडून त्यांकडून त्याचा यथायोग्य उपयोग झाला, ह्मणजे मला अधिक उणा झालेल्या खर्चाचें सार्थक झालें असें मी समजेन.

ईश कृपेनें जर हीं सर्व पुस्तकें संपली तर ह्या आवृत्ती पेक्षां दुसरी आवृत्ती चांगली काढूं.

येहेज्केल बिनयामीन पेणकर

मुंबई ता० १५ माहे मे सन १८८९.

मफ्तहात
अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		דף
सकाळचें वर्तन	१	הנהגות הבקר	א
विनंती	२	בקשות	ב
सकाळचें वर्तन	२७	הנהגות הבקר	כז
कीर्तनाचीं वाक्यें	२९	פסוקי דזמרה	כט
कीर्तन	३०	זמירות	ל
एलीयाहु हन्नाबीने केलेली स्तुती	३३	פתיחת אליהו הנביא	לג
कीर्तन	३८	זמירות	לח
पाहांटेची प्रार्थना	६५	שחרית	סה
तिसऱ्या प्रहरची प्रार्थना ...	११२	תפלת מנחה	קיב
संध्याकाळची प्रार्थना ...	१३२	תפלת ערבית	קלב
निजायास जातांना करायाची प्रार्थना	१४६	סדר קריאת שמע על המטה	קמו
स्वप्न गुणोत्कर्ष	१५०	הטבת חלום	קנ
शाब्बाथाचें आदरातिथ्य ...	१५२	סדר קבלת שבת	קנב
शाब्बाथाच्या संध्याकाळची प्रा०	१६६	ערבית של שבת	קסו
शाब्बाथाचा विधि ...	१७८	תקון שבת	קעה
शाब्बाथाचें पवित्रीकरण ...	१८२	קדוש של שבת	קפב
जेवणानंतरचा धन्यवाद ...	१८५	סדר ברכת המזון	קפה
शाब्बाथाच्या पाहांटेची प्रार्थना	१९४	שחרית של שבת	קצד
शाब्बाथाची अधिक प्रार्थना	२३५	מוסף של שבת	רלה
शाब्बाथाचें पवित्रीकरण ...	२४५	קדוש של שבת	רמה
शाब्बाथाचीं गीतें ...	२४७	פזמונים לשבת	רמז
शाब्बाथाच्या तिसऱ्या प्रहरची प्रार्थना	२५०	תפלת מנחה לשבת	רנ

		पृष्ठ.
	דף	
तिसऱ्या प्रहरीं जेवतांना बोलण्याचे		२६४
शाब्बाथ समाप्त होण्याच्या वेळची प्रार्थना		२६४
पृथक्करण		२८१
शाब्बाथ समाप्त होण्याच्या वेळचीं गीतें		२८४
प्रतिपदेची प्रार्थना ...		२९२
चंद्रावरून धन्यवाद ...		३०७
हानुक्काचा विधी		३०९
तेबेथ महिन्याची प्रतिपदा व्यवहारिक दिवशीं असल्यास प्रार्थना करण्याची रीति ...		३१७
हानुक्कांतील शाब्बाथ दिवशीं प्रार्थना करण्याची रीति ...		३१८
शुक्रवार संध्याकाळीं शाब्बाथ असून प्रतिपदा व हानुक्का असल्यास प्रार्थना करण्याची रीति		३१८
शाब्बाथ असून प्रतिपदा व हानुक्का असल्यास प्रार्थना करण्याची रीति		३१९
शाब्बाथ जाखोर		३१९
पुरीम		३२६
एकट्याचा उपास ...		३३१
मनुष्य जन्माचें कथन ...		३३६
जेष्ठ पुत्र खंडणी भरून सोडविणें		३३८
लग्नाचे व मागणीचे धन्यवाद		३४०
लग्नाचे सप्ताशिर्वाद		३४०

לסעודה שלישית	רסד	
למוצאי שבת	רסד	
סדר הבדלה	רפא	
פזמונים למוצאי שבת	רפד	
לראש חדש	רצב	
ברכת הלבנה	שז	
תקון חנוכה	שט	
ראש חדש טבת שחל בחול	שיז	
לשבת וחנוכה	שיח	
ערב שבת ראש חדש וחנוכה	שיח	
שחרית שבת ראש חדש וחנוכה	שיט	
שבת זכור	שיט	
ליל פורים	שכו	
תענית יחיד	שלא	
ספר תולדות אדם	שלו	
סדר פדיון הבן	שלח	
ברכות קדושין ואירוסין	שמ	
שבעה ברכות לנשואין	שמ	

	דף	पृष्ठ
לשבת חתונה	שמג	लग्नाच्या सप्तकांतील शाब्बाथाचीं गीतें ३४३
תפלת הדרך	שמד	प्रवासास जाण्याकरितां प्रार्थना ३४४
סדר לויה	שמו	पोंचविण्याची रीति... .... ३४६
		समुद्रांतुन जाणें असल्यास करावयाची प्रार्थना ... ३४७
תפלת הים	שמז	
ברכת הגומל	שמח	पूर्ण उपकार झाल्यावरून सुवंदन ३४८
		मरणाचे लागास आलेल्याचें पापाविषयीं कबूल होणें ... ३४८
וידוי לשכיב מרע	שמח	
תפלה לחולים	שנ	रोग्यांसाठीं प्रार्थना ... ३५०
שנוי השם לאיש	שנב	पुरुषाचें नांव पालटणें ... ३५२
שנוי השם לאשה	שנג	स्त्रीचें नांव बदलणें ... ३५३
סדר אבלים	שנד	सुतक्यांची रीति ३५४
רחיצת המת	שנד	प्रेतक्रिया ३५४
צדוק הדין	שסג	ईश्वरी न्यायाची यथार्थता दर्शविणें ३६३
		मरण पावलेल्या पुरुषाकरितां प्रार्थना ३६४
השכבה לאיש	שסד	
השכבה לאשה	שסה	मरण पावलेल्या स्त्रीकरितां प्रार्थना ३६५
		सुतक्यांकरितां जेवणानंतरचा धन्यवाद ३६७
ברכת המזון לאבלים	שסז	
		उपयोगाच्या निरनिराळ्या गोष्टीवरून करावयाचे धन्यवाद ३६९
ברכת הנהנין	שסט	
לזכר הבת	שעג	कन्यारत्न लाभ ३७३
סדר ספירת העומר	שעד	ओमेर मोजण्याची रीति ... ३७४
ברכת החמה	שעה	सूर्यावरून धन्यवाद ... ३७८

בס״ד

הנהגות הבקר

(תכף כשיעור משנתו יאמר אעפ״י שלא נטל ידיו)

מודה אֲנִי לְפָנֶיךָ מֶלֶךְ חַי וְקַיָּם שֶׁהֶחֱזַרְתָּ בִּי נִשְׁמָתִי בְּחֶמְלָה רַבָּה אֱמוּנָתֶךָ: (יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ שֶׁיִּהְיֶה לִבִּי נָכוֹן וּמָסוּר בְּיָדֶיךָ שֶׁלֹּא אֶכְעוֹס וְלֹא אַכְעִיסֶךָ:)

(ואחר כך יטול ידיו וישימם זו אצל זו ויניחם למעלה ויאמר)

שְׂאוּ יְדֵיכֶם קֹדֶשׁ וּבָרְכוּ אֶת יְיָ: וְאֶשָּׂא כַפַּי אֶל מִצְוֹתֶיךָ אֲשֶׁר אָהַבְתִּי:

(יקודם הניגוב תכף אחר הנטילה יתחיל לברך)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר קִדְּשָׁנוּ בְּיִצְוֹתָיו וְצִוָּנוּ עַל נְטִילַת יָדָיִם:

(כל היום כשעושה צרכיו בין גדולים בין קטנים יברך)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר יָצַר אֶת הָאָדָם בְּחָכְמָה · וּבָרָא בוֹ נְקָבִים נְקָבִים · חֲלוּלִים חֲלוּלִים · גָּלוּי וְיָדוּעַ לִפְנֵי כִסֵּא כְבוֹדֶךָ · שֶׁאִם יִפָּתֵם אֶחָד מֵהֶם אוֹ אִם יִפָּתֵחַ אֶחָד מֵהֶם · אִי אֶפְשָׁר לְהִתְקַיֵּם וְלַעֲמוֹד לְפָנֶיךָ אֲפִילוּ שָׁעָה אַחַת · (כִּי אִם עַל יְדֵי נִפְלְאוֹתֶיךָ וּרְפוּאָתֶךָ) בָּרוּךְ אַתָּה יְהוָה רוֹפֵא כָל בָּשָׂר וּמַפְלִיא לַעֲשׂוֹת:

(יש להסמיך לברכת אשר יצר בלי הפסק כלל אלהי נשמה עד ואני אברכם: בדף ל)

ईश्वर प्रसन्न

सकाळचें वर्तन.

(सकाळीं निद्रेंतून जागें होतांच जरी हात धुतलेले नसले तरी हें बोलावें.)

हे जिवंत व स्थापित राजा ! तूंच आपल्या मोठ्या दयेनें माझा आत्मा मजमध्यें परत दिलास हें मी मान्य करून आपला विश्वास तुजवर ठेवितो. मी स्वत: न रागवावें व तुला न रागवावें म्हणून माझें मन स्थीर व माझें स्वाधीन राहावें असी तुझी प्रसन्नता होवो.

(या नंतर लागलेंच हात धुतल्यावर हें बोलावें.)

पवित्र स्थानांत आपले हात उंचावून परमेश्वराचें सुवंदन करा, आणि तुझ्या आज्ञा मला आवडतात त्याविषयीं मीं आपले हात उंचावीन.

(हात धूवून ते पुसल्या अगोदर लागलेच हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगाच्या राजा, आम्हांस हात धुण्याची आज्ञा देऊन आम्हास पवित्र करणारा जो, तूं धन्य आहेस.

(अवघा दिवस प्रत्येक शौचादि विधिनंतर हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मनुष्यास चातुर्यानें घडविणारा जो, तूं धन्य आहेस; तूंच त्यामध्यें निरनिराळ्या प्रकारच्या नलिका, नाडी, शिरा व धमनी उत्पन्न केल्या आहेस. तुझ्या गौरवाच्या आसना पुढें प्रगट व विदित आहे कीं, त्यांतून एकादी बंद पडली, किंवा त्यांतून एकादी फाटली तर (तुझ्या आश्चर्य कृत्यांवांचून व तुझ्या उपचारा वांचून) एक तासहि जिणें अशक्य आहे. हे परमेश्वरा ! सर्व मांसमयांस निरोगी करणाऱ्या व अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[हा वरील धन्यवाद केल्यावर लागलेंच אלהי נשמה पासून ואני אברכם पर्यंत बोलावें. पृ. ३०]

(ברכת טלית קטן)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר קִדְּשָׁנוּ
בְּמִצְוֹתָיו וְצִוָּנוּ עַל מִצְוַת צִיצִית :

(כשיוצא מפתח ביתו יניח יד ימין על המזוזה ויאמר)

יְיָ שׁוֹמְרִי יְיָ צִלִּי עַל יַד יְמִינִי : יְיָ יִשְׁמוֹר צֵאתִי וּבוֹאִי
לְחַיִּים וּלְשָׁלוֹם מֵעַתָּה וְעַד עוֹלָם : שַׁדַּי יִשְׁמְרֵנִי
מִיֶּצֶר הָרַע וּמִכָּל צָרָה וְצוּקָה אָמֵן : (ואומר קריאת שמע
עד ובשעריך) לְיָיְ הַיְשׁוּעָה עַל עַמְּךָ בִּרְכָתֶךָ סֶלָה : (ג״פ)
יְיָ צְבָאוֹת עִמָּנוּ מִשְׂגָּב לָנוּ אֱלֹהֵי יַעֲקֹב סֶלָה : (ג״פ) יְיָ
צְבָאוֹת אַשְׁרֵי אָדָם בּוֹטֵחַ בָּךְ : (ג״פ) יְיָ הוֹשִׁיעָה הַמֶּלֶךְ
יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ : (ג״פ) אָנָּא יְיָ הוֹשִׁיעָה נָּא אָנָּא יְיָ
הַצְלִיחָה נָּא : (ג״פ) מִגְדַּל עוֹ שֵׁם יְיָ בּוֹ רָנִּין צַדִּיק וְנִשְׂגָּב :

(ובשבת לא יאמר כל זה אלא יאמר)

זָכוֹר אֶת יוֹם הַשַּׁבָּת לְקַדְּשׁוֹ :

בקשות

יְ דִיד נֶפֶשׁ אָב הָרַחְמָן · מְשׁוֹךְ עַבְדְּךָ אֶל רְצוֹנֶךָ ·
רָנִּין עַבְדְּךָ כְּמוֹ אַיָּל · יְשְׁתַּחֲוֶה מוּל הֲדָרֶךָ ·
כִּי יֶעֱרַב לוֹ יְדִידוּתֶךָ · מְנֹפֶת צוּף וְכָל טַעַם :
הָ דוּר נָאֶה זִיו הָעוֹלָם · נַפְשִׁי חוֹלַת אַהֲבָתֶךָ ·
אָנָּא אֵל נָא רְפָא נָא לָהּ · בְּהַרְאוֹת לָהּ נוֹעַם זִיוֶךָ ·
אָז תִּתְחַזֵּק וְתִתְרַפֵּא · וְהָיְתָה לָךְ שִׂמְחַת עוֹלָם :
וָ תִיק יֶהֱמוּ רַחֲמֶיךָ · וְחוּסָה נָא עַל עַם אֲהוּבֶךָ ·
כִּי זֶה כַּמֶּה נִכְסוֹף נִכְסַף · לִרְאוֹת בְּתִפְאֶרֶת עֻזֶּךָ ·

(लहान तल्लीथ पांघरतानां हें बोलावें.)

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हांस सीसीथीची आज्ञा देऊन पवित्र करणारा जो, तूं धन्य आहेस.

(घरांतून बाहेर जातानां मेजूजावर उजवा हात ठेवून हें बोलावें.)

माझ्या उजव्या हाताकडे परमेश्वर माझा राखणारा व परमेश्वर माझी छाया आहे. परमेश्वर जीवना करितां व कल्याणा करितां माझें बाहेर जाणें व आंत येणें आतां पासून सर्वकाळ राखील. जो सर्वसमर्थ, तो मला दुष्ट वासनेपासून व सर्व दुःखा पासून व संकटांपासून राखील. आमेन. (या नंतर שמע ישראל पासून ובשעריך पर्यंत म्हणून;) तारण परमेश्वराकडून होतें; तुझ्या लोकांस तुझा आशीर्वाद असावा. सेलाह. (हें तीन वेळ बोलावें.) सैन्याचा परमेश्वर आम्हा बरोबर आहे, याकोबाचा देव आमचा आश्रय आहे. सेलाह. (ती. वे.) हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर भाव ठेवितो तो धन्य आहे. (ती. वे.) हे परमेश्वरा तारण कर, आह्मी हाक मारितों त्या दिवशीं राजा आह्मास उत्तर देईल. (ती. वे.) हे परमेश्वरा, मी विनंती करितों, तारण कर; हे परमेश्वरा मी विनंती करितों, कल्याण होऊं दे. (ती. वे.) परमेश्वराचें नाम बळकट किल्ला आहे, त्यांत न्यायी धाऊन निर्भय राहतो.

(शाब्बाथ असल्यास मात्र हें खालील ह्मणावें.)

शाब्बाथ दिवस पवित्र पाळावा ह्मणून त्याची आठवण कर.

विनंती.

हे प्राण सख्या ! दयाळू बापा ! तूं आपल्या सेवकास आपल्या इच्छेकडे ओढ, ह्मणजे तुझा सेवक हरिणाप्रमाणें धावून तुझ्या गौरवा पुढें नमन करील; कारण तुझी प्रीति त्यास मधीच्या पाझारत्या मोहोळा पेक्षां व सर्व मधूर पदार्थां पेक्षांहि गोड लागते.

हे गौरववान देवा ! जगाचें वैभव तुलाच शोभतें; तुझ्या प्रीतिमुळें माझा जीव रोगी झाला आहे. हे देवा ! मी विनंती करितों कीं, तूं आपलें सुखावह वैभव त्याला दाखविण्या करितां त्यास निरोगी कर, ह्मणजे तो बळकट व निरोगी होऊन तुझा सर्वकाळचा दास होईल.

हे न्यायी देवा ! तुझ्या दयेला द्रव येऊं दे; आणि तूं आपल्या प्रीय लोकांवर कृपा कर. कारण एवढे (दिवस) तुझ्या सामर्थ्याचे सौंदर्याची वाट पाहतां

אָנָּא אֵלִי חֶמְדַּת לִבִּי · וְחוּסָה נָא וְאַל תִּתְעַלָּם :
הָ גָּלֵה נָא וּפְרוֹשׂ חָבִיב · עָלַי אֶת כַּפַּת שְׁלוֹמֶךָ ·
תָּאִיר אֶרֶץ מִכְּבוֹדֶךָ · נָגִילָה וְנִשְׂמְחָה בָּךְ ·
מַהֵר אָהוּב כִּי בָא מוֹעֵד · וְחָנֵּנוּ כִּימֵי עוֹלָם :
יְהוָה חָנֵּנוּ לְךָ קִוִּינוּ הֱיֵה זְרוֹעָם לַבְּקָרִים אַף
יְשׁוּעָתֵנוּ בְּעֵת צָרָה : קוּמִי אוֹרִי כִּי בָא אוֹרֵךְ
וּכְבוֹד יְהוָה עָלַיִךְ זָרַח : כִּי הִנֵּה הַחֹשֶׁךְ יְכַסֶּה אֶרֶץ וַעֲרָפֶל
לְאֻמִּים וְעָלַיִךְ יִזְרַח יְהוָה וּכְבוֹדוֹ עָלַיִךְ יֵרָאֶה :
(בקשה נאה וחשובה לאומרה קודם כל תפלה)
אָנָּא יְהוָה הוֹשִׁיעָה נָּא · אָנָּא יְהוָה הַצְלִיחָה נָּא : אָנָּא
יְהוָה עֲנֵנוּ בְּיוֹם קָרְאֵנוּ : יְהוָה אֱלֹהֵי יִשְׂרָאֵל
שַׁלִּיט בָּעֶלְיוֹנִים וּמוֹשֵׁל בַּתַּחְתּוֹנִים מַצִּיל עָנִי מֵחָזָק
מִמֶּנּוּ וְעָנִי וְאֶבְיוֹן מִגּוֹזְלוֹ : שְׁמַע נָא אֶל תְּפִלַּת עַבְדְּךָ
וְאֶל תַּחֲנוּנָיו וְהָאֵר פָּנֶיךָ עַל מִקְדָּשְׁךָ הַשָּׁמֵם וְהוֹשִׁיעֵנִי
כְּחַסְדֶּךָ וַהֲשִׁלֵּךְ אֵיתָה וַפַּחַד וּמְהוּמָה וַהֲלָהָלָה וַתְּרֵדֵמָה
וְשִׁנָּעוֹן וְעִוָּרוֹן לְכָל מֵזִיק אוֹ שֵׁד אוֹ רוּחַ רָעָה אוֹ כִּשּׁוּף
אוֹ דָּבָר רָע שֶׁאֵנֶּה עָלַי · וּגְעוֹר בֵּיהּ בְּיִצְרָא דַּעֲבִירָה
שֶׁלֹּא יַעֲבִירֵנִי עַל דַּעַת קוֹנִי · וְיִהְיֶה שִׁמְךָ הַגָּדוֹל עִמִּי ·
יֵבשׁוּ הֵמָּה וְלֹא אֲנִי יֵחַתּוּ הֵמָּה וְלֹא אֲנִי וְיָנוּסוּ מְנֻגְּדִי
תָּמִיד כְּדִבְרֵיתִיב קוּמָה יְהוָה וְיָפֻצוּ אוֹיְבֶיךָ וְיָנֻסוּ מְשַׂנְאֶיךָ
מִפָּנֶיךָ · וּבְבַקָּשָׁה מִמְּךָ אֱלֹהַי צוּרִי שֶׁיְּקַדְּמוּנִי מַלְאָכֶיךָ
לְהָיוֹת אִתִּי · וְתִכָּנֵס תְּפִלָּתִי לְפָנֶיךָ וְלִפְנֵי כִּסֵּא כְּבוֹדֶךָ ·
וְתִסְלַח וְתִמְחוֹל וְתְכַפֵּר עַל כָּל חַטֹּאתַי וַעֲוֹנוֹתַי וּפְשָׁעַי

पाहतां ते निस्तेज झाले आहेत. हे माझ्या देवा ! माझ्या प्राण प्रीया ! तूं कृपा कर; गुप्त राहूं नको.

हे प्रीयकरा ! आतां प्रगट हो, आणि तुझा शांतीचा मंडप मजवर पसर; आपल्या गौरवानें पृथ्वी प्रकाशित कर, ह्मणजे आम्हीं तुजमध्यें आनंद व हर्ष मानूं; हे बल्लभा ! त्वरा करून पूर्वीच्या दिवसाप्रमाणे आम्हावर दया कर, कारण नेमिलेली वेळ आली आहे.

हे परमेश्वरा आह्मांवर कृपा कर, आह्मीं तुझी वाट पहात आहों, रोज सकाळीं तूं त्याचा भूज हो, संकट समयीं आमचें तारणहि हो. (हे येरूशालेमे) ऊठ, तेजस्वी हो, कांकीं तुझी प्रभा आली आहे, आणि तुजवर परमेश्वराचें तेज उगवलें आहे. कांकीं पहा, अंधार पृथ्वीला व गाढ अंधकार लोकांस आच्छादील, परंतु तुजवर परमेश्वर उदय पावेल, आणि त्याचें तेज तुजवर दिसेल.

(प्रत्येक प्रार्थनेपूर्वी करण्याजोगी व गुणवंत विनंति.)

हे परमेश्वरा ! मी विनंती करितों तारण कर; हे परमेश्वरा ! मी विनंती करितों कल्याण होऊं दे. हे परमेश्वरा ! मी विनंती करतों कीं आह्मी हाक मारितों त्या दिवशीं आह्मास उत्तर दे. हे इस्राएलाच्या परमेश्वर देवा, वर राज्य करणाऱ्या, व खालीं अधिकार चालविणाऱ्या, दीना पेक्षां जो शक्तिमान त्यापासून; आणि दीनाला व दरिद्र्याला त्याच्या लुटणाऱ्या पासून सोडविणाऱ्या तूं आपल्या दासाची प्रार्थना व त्याची विनंति ऐक; आणि आपल्या मुखाचें तेज नाश पावलेल्या पवित्र मंदिरावर प्रकाशित कर, आणि आपल्या दयेनें आम्हास तार, आणि जीं सर्व विघ्नें किंवा भुतें, किंवा वाईट आत्मे, किंवा जी जादू, किंवा वाईट गोष्ट मला पिडा करणारी असेल, त्या सर्वांवर तूं भय, त्रास, संताप, थरथराट, गाढ झोंप, वेडेपणा व अंधत्व पाड, आणि पापवासनेनें मी आपल्या धन्याच्या इच्छेविरुद्ध वर्तूं नये म्हणून तूं तिला धमकाव. तुझे मोठें नाम मजसंगति असो. त्यानी लज्जीत व्हावें व मी लज्जीत होऊं नये; त्यांनीं भ्यावें व मी भिऊं नये; आणि हे परमेश्वरा ऊठ; आणि तुझ्या शत्रूची दाणादाण होवो आणि तुझे द्वेषी तुझ्या पुढून पळोत, या लिहिण्याप्रमाणें ते मज समोरून पळोत. हे देवा ! माझ्या खडकरूप आश्रया ! मी विनंति करितो कीं, तुझ्या दुतांनीं मज संगें असावें, म्हणून त्यांस मज पुढें पाठीव; आणि माझी प्रार्थना तुज पुढें व तुझ्या गौरवाच्या आसना पुढें येऊं दे.

שֶׁחָטָאתִי וְשֶׁעָוִיתִי וְשֶׁפָּשַׁעְתִּי לְפָנֶיךָ בֵּין בְּכַוָּנָה בֵּין
שֶׁלֹּא בְכַוָּנָה · וְתִפְתַּח נָא לִי שַׁעֲרֵי וּפִתְחֵי הַחָכְמָה וְהַבִּינָה
וְהַתּוֹרָה וְהַמִּצְוָה שַׁעֲרֵי הַחֵן וְהַחֶסֶד וְהָרַחֲמִים וְהַשָּׁלוֹם
וְהַבְּרִיאוּת וְהָעֹשֶׁר וְהַשְׂכָּלָה וְהַצְלָחָה וְהַטַּהֲרָה וּפְרִישׁוּת
וּנְקִיּוּת וְרֶוַח וּרְחָבָה וַהֲנָחָה וְשַׁלְוָה וְיִהְיוּ עֲסָקַי
מְבוֹרָכִים וּדְרָכַי מוּצְלָחִים וּדְבָרַי נִשְׁמָעִים וְאֶמְצָא חֵן
וְשֵׂכֶל טוֹב בְּעֵינֵי אֱלֹהִים וְאָדָם וְיִהְיוּ הַכֹּל מְאַמְּצִים כֹּחִי
וְלֹא יִהְיוּ לִי צָרִים וְיוּסָרוּ מִמֶּנּוּ כָּל הַמְּעִיקִים הַמְּעַכְּבִים
וּמַטְרִידִים אוֹתִי מֵעֲבוֹדַת יְהוָה · וַעֲנִיּוּת וְחוֹלִי פַּחַד דְּאָגָה
וְסַכָּנָה כָּל נֶגַע כָּל מַחֲלָה · אָמְנָם אֲנִי מִתְפַּלֵּל בִּתְחִנָּה
וּבַקָּשָׁה שֶׁיֻּתַּן לִי וּלְזַרְעִי חָכְמָה גְּבוּרָה עֹשֶׁר וְכָבוֹד וְחַיִּים
כְּדֵי שֶׁנְּקַיֵּים עַצְמֵנוּ בְּמַעֲשִׂים טוֹבִים אָמֵן · וְעוֹד אֲנִי
מִתְפַּלֵּל לִפְנֵי כִסֵּא כְבוֹדֶךָ לְמַלֹּאת חֶפְצִי וּלְהַצִּילֵנִי מִיֵּצֶר
הָרָע וּמֵעַיִן הָרָע וּמִפֶּגַע רָע וּמֵעֵת רָע וּמִלָּשׁוֹן הָרָע
מִדֶּבֶר מֵחֶרֶב מֵחַיָּה רָעָה וּמֵרָעָב וּמִמִּיתָה מְשֻׁנָּה
וּמִמִּיתָה רָעָה מֵעוֹנְשֵׁי גֵיהִנָּם וּמִבּוּשָׁה וְחֶרְפָּה
וּכְלִמָּה · וְיִהְיוּ פָנַי צְהוּבוֹת בַּהֲלָכוֹת וּמַצְהִילוֹת
בְּחָכְמוֹת וְאֵימָתִי מוּטֶלֶת עַל הַבְּרִיּוֹת וְשֵׁם טוֹב יִכָּנֵס
וְיֵצֵא עִמִּי וְתוֹרָתִי תִּהְיֶה מִשְׁתַּמֶּרֶת בְּלִבִּי וּמִתְקַיֶּמֶת בְּיָדִי
וּשְׁגוּרָה בְּפִי · וְהַכְשִׁירֵנִי בָּעוֹלָם הַזֶּה וְתַקְּנֵנִי לְעוֹלָם
הַבָּא וְהָכֵן כִּלְיוֹתַי כִּשְׁתֵּי מַעְיָנוֹת הַנּוֹבְעוֹת דִּבְרֵי
תּוֹרָה וּפְקַח עֵין שִׂכְלִי לִרְאוֹת סוֹדוֹת צְפוּנוֹת · וְסַיְּעֵנִי
לְסַדֵּר תַּלְמוּדִי וּלְהָפִיק רְצוֹנִי בְּתַלְמוּד תּוֹרָה וְהוֹרֵנִי אֶת
אֲשֶׁר אֶעֱשֶׂה לְמַעַן אֶמְצָא דֶרֶךְ הַחַיִּים וְהַצִּילֵנִי מִשְּׁגִיאוֹת

आणि जे अपराध, जीं उल्लंघनें व जीं पापें मी तुज पुढें जाणून किंवा न जाणून केलीं असतील, ते अपराध, तीं उल्लंघनें, तीं पापें तूं क्षमा व माफ कर व त्यांची सुटका कर. आणि आतां मज करितां ज्ञान, बुद्धि, शास्त्र व तुझ्या आज्ञा पाळण्याची व दया, कृपा, अनुग्रह, शांति, आरोग्यता, संपत्ति, हुन्नर, सफलता, शुद्धता, दुर्गुणापासून दूर राहाणे, स्वच्छपणा, लाभ, विस्तार, विसावा व कल्याण यांचीं द्वारें व कवाडें उघड. माझ्या कामांवर आशीर्वाद असो; माझें मार्ग सफल होवोत व माझीं वचनें ऐकिलीं जावोत. आणि हे देवा ! तुझ्या व मनुष्य मात्रांच्या दिसण्यांत मला कृपा व मान्यता मिळो. आणि त्या सर्वांनीं माझे सामर्थ्य दृढ करावें, परंतु दुःख देऊं नये; आणि परमेश्वराची सेवा करण्यांत जें कांहीं मला आड येणारें, आटकावणारें व त्रास देणारें असेल, तें सर्व व दारिद्र्य, रोग, भय, खेद, विघ्न, सर्व प्रकारची पटकी, व दुखणीं मज पासून दूर होवोत. खरोखर मी विनंति व काकळूत करून प्रार्थना करितों कीं, मी व माझ्या संतानानें सत्कर्में करण्यांत दृढ राहावें म्हणून आम्हास ज्ञान, सामर्थ्य, द्रव्य, सन्मान व जीवन दिलें जावो. आमेन. आणि मी तुझ्या गौरवाच्या आसना पुढें प्रार्थना करितों कीं, तूं माझी आवड पूर्ण होऊं दे; आणि दुष्ट वासना, अनर्थक दृष्टी, अरिष्ट, वाईट वेळ, वाईट जिव्हा, पटकी, तरवार, वाईट पशु, दुष्काळ, अपघात, वाईट मृत्यु, नर्काची शिक्षा, अनादर, लज्जा व त्रपा यांपासून मला सोडीव; माझें मुख नीतीनें तेजस्वी, आणि ज्ञानानें लखलखीत होवो; माझें भय प्राणिमात्रावर असो; (जेथें मी जाईन तेथें) आंत जातानां व बाहेर येतानां सुकीर्ति मज बरोबर असो; शास्त्र माझ्या मनापासून पाळिलें जावो, माझ्या हातून स्थापित होवो, व माझ्या मुखीं पाठ असो. आणि या जगीं मला निर्दोष करून पुढल्या जगा करितां माझ्या गुणांची सुधारणा कर. शास्त्राच्या विषयांमध्यें माझ्या गुर्द कमळांस दोन वाहात्या झऱ्या सारखे कर; गूढ मर्में जाणण्यास माझे डोळे व माझी बुद्धि प्रकाशित कर. माझा अभ्यास चालविण्यांत व शास्त्राभ्यास माझ्या इच्छे प्रमाणें व्हावा ह्मणून मला सहाय्य कर. मला जीवनाचा मार्ग सांपडावा म्हणून मी काय करावें हें मला शिकीव. मला चूका, अडथळे आणि खोट्या गोष्टी यां पासून सोडीव; आणि माझ्या हातून सरळपणा, सत्यता व खरे-

וּמְמַכְשׁוֹל וּמִדָּבָר שֶׁקֶר וְתָבִיא עַל יָדֵי וְשֶׁר אֱמֶת וּנְכוֹנָה׃
וְתַאֲרִיךְ יָמַי בְּטוּב הַתּוֹרָה׃ וּשְׁנוֹרַנִי בַּנְּעִימִים לִשְׁמוֹר
וְלַעֲשׂוֹת מִצְוֹת וְחֻקִּים ׃ גַּם בָּנִים יֵלְכוּ לְאוֹר חַי הָעוֹלָמִים ׃
וּמַהֵר קֵץ הַגְּאוּלָה לְמַעַן כְּבוֹד שִׁמְךָ הַגָּדוֹל הַגִּבּוֹר
וְהַנּוֹרָא ׃ אָמֵן נֶצַח סֶלָה וָעֶד ׃

פתיחה

שְׂעָרֶיךָ בְּדָפְקִי יָהּ פְּתָחָה ׃ וּלְדַל שׁוֹאֵל לְפָנֶיךָ יָהּ
סְלָחָה ׃
לְךָ תָּבוֹא תְּפִלָּתִי וַשַּׁוְעִי ׃ מְקוֹם כֶּבֶשׁ וְעִשָּׂרוֹן וּמִנְחָה ׃
מְאוֹר עֵינִי רְצֵה וּשְׁמוֹר לְשׁוֹנִי ׃ וְאִם אֶשְׁגֶּה לְפָנֶיךָ יָהּ
סְלָחָה ׃
חֲרִימוֹתִי לְךָ לִבִּי וְעֵינַי ׃ נְמֵה אָזֶן וְנַם עַיִן פְּקָחָה ׃
שְׁמַע קוֹלִי וְשַׁוְעָתִי הַקְשִׁיבָה ׃ וּתְפִלָּתִי מְקוֹם קָרְבָּן
לָקָחָה ׃
עֲנֵה קוֹלִי וְשַׁוְעָתִי וְנִיבִי ׃ וְעֵינֶיךָ עַל עַם נִבְאֶה פְּקָחָה ׃
רְאֵה כִּי נִכְנְעָה רוּחִי בְקִרְבִּי ׃ וְנִשְׁמָתִי מִאֹד דָּלָה וְשָׁחָה ׃
רַחוּם וְחַנּוּן לְפָנֶיךָ חָטָאנוּ ׃ סְלַח לָנוּ וּשְׁלַח לָנוּ הַרְוָחָה ׃
חוּם וְרַחֵם עַל פְּלֵיטַת אֲרִיאֵל ׃ וְהוֹצִיאֵם מִצָּרָה לִרְוָחָה ׃
מְקוֹם מִקְדָּשׁ מְכוֹן מֵאָז עוֹלָמִים ׃ וְשָׁם נַעֲלֶה וְנֵרָאֶה
בְּשִׁמְחָה ׃
הֲשִׁיבֵם יָהּ עַל אַדְמָתָם וּמְכוֹנָם ׃ וְהַשְׁפִּיבֵם בְּהַשְׁקֵט
וּבְבִטְחָה ׃

पणा घडूं दे; आणि शास्त्रांतील आज्ञा व नेम पाळण्या करितां व आचरण्या करितां तूं माझे दिवस सुखांत व माझीं वर्षें आनंदांत वाढीव. माझ्या लेकरांनींहि सर्व काळच्या जीवंत देवाच्या प्रकाशांत चालावें (असें तूं कर). आणि तुझ्या मोठ्या, थोर व भयंकर नामाच्या गौरवासाठीं आमच्या उद्धाराचा वेळ लवकर जवळ आण. सर्वकाळ, तथास्तु. सेलाह.

उपोद्घात.

हे अनंता ! मी तुझा दरवाजा ठोकितों; तेव्हां तो उघड; आणि हे अनंता; तुजपुढें मागणाऱ्या दरिद्र्यास क्षमा कर.

माझी प्रार्थना व माझें ओरडणें तुज पुढें येऊन नित्याच्या होमांतील मेंढा एफाचा एक दशमांश सपीठ व पेयार्पण * यां बद्दल मान्य होवो.

माझे डोळे प्रकाशित कर, मला प्रसन्न हो, आणि माझी जिव्हा सांभाळ; आणि जर मी तुजपुढें चूक केली, तर हे अनंता ! मला क्षमा कर.

मीं आपलें हृदय व आपले डोळे तुजकडे उंचावितों, म्हणून तूंही आपला कान लाऊन माझें ऐक व डोळे उघडून मजकडे पाहा.

माझी वाणी ऐक, आणि माझ्या ओरडण्याकडे कान लाव; आणि माझी प्रार्थना अर्पणाबद्दल मान्य करून घे.

माझ्या वाणीचें, ओरडण्याचें व माझ्या म्हणण्याचें उत्तर दे; आणि दुःखांत पडलेल्या लोकांकडे आपले डोळे उघड.

पाहा, माझा आत्मा मजमध्यें खेदित झाला आहे; आणि माझा जीव फार क्षीण होऊन नमला आहे.

हे दयावंता व कृपावंता ! तुज पुढें आह्मी पाप केलें आहे; आम्हास क्षमा कर आणि आम्हा करितां मुक्ती पाठीव.

आरीएलाच्या † निभावलेल्यांवर दया व कृपा कर, आणि त्यांस सकटांतून काढून सुखांत आण.

मग पूर्वकाळा पासून नेमून ठेविलेल्या पवित्र मंदिराच्या ठिकाणीं आम्ही जाऊन तें आनंदानें पाहूं.

हे अनंता ! त्यांस त्यांच्या देशांत व त्यांच्या वस्तिस्थानांत वसीव व त्यांस शांतपणें व निर्भयपणें तेथें पडून राहूं दे.

---

*गणना अ० २८ ओ० १–८. † येरूशालेमेच्या.

מְחֵה עָוֹן וָפֶשַׁע וְגַם חַטָּאָה · וּזְדוֹנֵנוּ בְּרַחֲמֶיךָ יָהּ סְלָחָה :

לְךָ עֵינַי וְתַחֲנוּנַי יְהוָה · הוֹצִיאֵנוּ מִצָּרָה לֶרְוָחָה :

אֵרוֹן עוֹלָם לְךָ תָּמִיד אֶקְוֶה · וְשׁוּעָתְךָ לְעַם עָנִי שְׁלָחָה :

בְּנֵה אוּלָם וּמְלוֹךְ לָעַד לְעוֹלָם · וְאוֹרְךָ עַל הַר צִיּוֹן זָרָחָה :

יַרְנְנוּ שׁוֹכְנֵי אֶרֶץ וְעֶרֶץ · וְיֹאמְרוּ לְךָ יְהוָה הַמַּמְלָכָה :

פְּתַח שַׁעַר לְקַבֵּל הַתְּחִנָּה · וְהַשְׁמִיעֵנוּ קוֹל שָׂשׂוֹן וְשִׂמְחָה :

זֶה־הַשַּׁעַר לַיהוָה צַדִּיקִים יָבֹאוּ בוֹ : אוֹדְךָ כִּי עֲנִיתָנִי וַתְּהִי לִי לִישׁוּעָה : אֶבֶן מָאֲסוּ הַבּוֹנִים הָיְתָה לְרֹאשׁ פִּנָּה : מֵאֵת יְהוָה הָיְתָה זֹאת הִיא נִפְלָאת בְּעֵינֵינוּ : זֶה־הַיּוֹם עָשָׂה יְהוָה נָגִילָה וְנִשְׂמְחָה בוֹ :

כָּל בְּרוּאֵי מַעְלָה וּמַטָּה · יְעִירוּן נַגִּיוּן כֻּלָּם כְּאֶחָד · יְהוָה אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד : יעידון

שְׁלֹשִׁים וּשְׁתַּיִם נְתִיבוֹת שְׁבִילָךְ · וְכָל מֵבִין סוֹדָם יְסַפְּרוּ אֶת גָּדְלָךְ · וְהֵם יַגִּידוּ כִּי הַכֹּל שֶׁלָּךְ · וַאֲתָּה הָאֵל הַמֶּלֶךְ הַמְיוּחָד : יעידון

לְבָבוֹת בְּחָשְׁבָם עוֹלָם בָּנוּי · יִמְצְאוּ כָל יֵשׁ בִּלְתְּךָ שָׁנוּי · בְּמִסְפָּר בְּמִשְׁקָל הַכֹּל מָנוּי · כֻּלָּם נִתְּנוּ מֵרֹעֶה אֶחָד : יעידון

מֵרֹאשׁ וְעַד סוֹף יֵשׁ לָךְ סִימָן · צָפוֹן וָיָם וָקֶדֶם וְתֵימָן · שָׂחַק וְתֵבֵל לְהּ עֵד נֶאֱמָן · מִזֶּה אֶחָד וּמִזֶּה אֶחָד :

आमचे अपराध, आमचीं उल्लंघनें व पापेंहि पुसून टाक; आणि हे अनंता ! तूं आपल्या दयेनें आमचा गर्व क्षमा कर.

हे परमेश्वरा ! माझे डोळे व माझी याचना तुजकडे आहेत; आम्हांस दुःखांतून काढून सुखांत आण.

हे जगताच्या स्वामी, मी सर्वदा तुझीच आशा करितों; तुझ्या गरीब लोकांकरितां तुझें तारण पाठीव.

मंदीर बांध, आणि सदा सर्वकाळ राज्य कर; आणि तुझा प्रकाश सीयोन डोंगरावर प्रकाशित कर.

मग भुमीवरचे व धोक्यांत निजणारे स्तवन करितील; आणि म्हणतील हे परमेश्वरा ! राज्याधिकार तुझाच आहे.

आमची विनंति मान्य करण्याकरितां द्वार उघड; आणि आम्हास हर्षाचा व आनंदाचा स्वर ऐकीव.

हें परमेश्वराचें द्वार आहे, यांतून नीतिमान आंत जातील. त्वां मला उत्तर दिलें आहे, तूं माझें तारणहि झाला आहेस, म्हणून मी तुला स्तवीन. जो दगड बांधणारांनीं अव्हेरिला, तो कोपऱ्याचा मुख्य झाला आहे. हें परमेश्वराकडूनच घडलें आहे, तें आमच्या दिसण्यांत आश्चर्य कर्मच आहे. जो दिवस परमेश्वरानें नेमिला आहे तो हाच आहे, त्यांत आम्ही हर्ष व आनंद करूं.

सर्व वरील (आकाशांतील) व खालील (पृथ्विवरील) उत्पन्न केलेले पदार्थ एकत्र साक्ष देऊन कळवितात कीं, परमेश्वर एक आहे व त्याचें नामहि एकच आहे.

तुझ्या क्रमणाचे बत्तीस मार्ग आहेत, त्यांचें मर्म ज्यांस समजतें, ते तुझ्या गौरवाचें वर्णन करितात व ते जाणितात कीं सर्व तुझेंच आहे, आणि तूं एकटाच मात्र देव राजा आहेस.

सृष्टीच्या रचनेविषयीं मन जेव्हां विचार करितें, तेव्हां त्यास कळून येतें कीं तुजवांचून सर्व शुन्य आहे; सर्व तुजपाशीं गणलेलें, व मापिलेलें आहे; तें सर्व आम्हास एकाच मेंढपाळानें दिलेलें आहे.

प्रारंभापासून शेवट पर्यंत तुझाच शिक्का आहे; उत्तर, पश्चिम, पूर्व व दक्षिण आणि आकाश व पृथ्वि हीं सर्व एक एके कडून व दुसरें दुसरे कडून तुजविषयीं साक्ष देणारे तुझे विश्वासू साक्षदार आहेत.

הַכֹּל מִמְּךָ נִזְבַּד זָבוּד · אַתָּה תַּעֲמֹד וְהֵם יֹאבְדוּ אָבוּד ·
לָבֶן כָּל יְצוּר לְךָ יִתֵּן כָּבוּד · כִּי מֵרֹאשׁ וְעַד סוֹף
הֲלֹא אָב אֶחָד : יעידון

וּבְתוֹרָתְךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ כָּתוּב לֵאמֹר שְׁמַע יִשְׂרָאֵל
יְהוָה אֱלֹהֵינוּ יְהוָה אֶחָד : וְיָדַעְתָּ הַיּוֹם
וַהֲשֵׁבוֹתָ אֶל לְבָבֶךָ כִּי יְהוָה הוּא הָאֱלֹהִים בַּשָּׁמַיִם מִמַּעַל
וְעַל הָאָרֶץ מִתָּחַת אֵין עוֹד :

שִׁיר לַמַּעֲלוֹת אֶשָּׂא עֵינַי אֶל־הֶהָרִים מֵאַיִן יָבֹא עֶזְרִי :
עֶזְרִי מֵעִם יְהוָה עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ : אַל־יִתֵּן לַמּוֹט
רַגְלֶךָ אַל־יָנוּם שֹׁמְרֶךָ : הִנֵּה לֹא־יָנוּם וְלֹא יִישָׁן שֹׁמֵר
יִשְׂרָאֵל : יְהוָה שֹׁמְרֶךָ יְהוָה צִלְּךָ עַל־יַד יְמִינֶךָ : יוֹמָם
הַשֶּׁמֶשׁ לֹא־יַכֶּכָּה וְיָרֵחַ בַּלָּיְלָה : יְהוָה יִשְׁמָרְךָ מִכָּל־רָע
יִשְׁמֹר אֶת־נַפְשֶׁךָ: יְהוָה יִשְׁמָר־צֵאתְךָ וּבוֹאֶךָ מֵעַתָּה וְעַד־
עוֹלָם :

אֲדוֹן עוֹלָם אֲשֶׁר מָלָךְ · בְּטֶרֶם כָּל־יְצִיר נִבְרָא :
לְעֵת נַעֲשָׂה בְחֶפְצוֹ כֹּל · אֲזַי מֶלֶךְ שְׁמוֹ נִקְרָא :
וְאַחֲרֵי כִּכְלוֹת הַכֹּל · לְבַדּוֹ יִמְלוֹךְ נוֹרָא :
וְהוּא הָיָה וְהוּא הֹוֶה · וְהוּא יִהְיֶה בְּתִפְאָרָה :
וְהוּא אֶחָד וְאֵין שֵׁנִי · לְהַמְשִׁיל לוֹ לְהַחְבִּירָה :
וְהוּא רֹאשׁוֹן וְהוּא אַחֲרוֹן · לְבַל־חוֹמֶר וּלְכַל־צוּרָה :
בְּלִי רֵאשִׁית בְּלִי תַכְלִית · וְלוֹ הָעוֹז וְהַמִּשְׂרָה :
בְּלִי עֵרֶךְ בְּלִי דִמְיוֹן · בְּלִי שִׁנּוּי וּתְמוּרָה :
בְּלִי חִבּוּר בְּלִי פִּרּוּד · גְּדוֹל כֹּחַ וּגְבוּרָה :

सर्व तुजपासूनच निघालें आहे, तूं (सर्व काळ) राहशील, परंतु तें सर्व लयास जाईल; यास्तव प्रत्येक घडविलेला पदार्थ तुला गौरवितो; कारण पहिल्या पासून शेवट पर्यंत तूं एकटाच त्यांचा बाप नव्हेस काय ?

आणि हे परमेश्वरा आमच्या देवा ! तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे ; परमेश्वर एकच आहे. तर आज जाण आणि आपले हृदयांत ठसून घे कीं, वरती आकाशांत व खालती पृथ्वी वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

पर्वतांकडे मी आपली दृष्टि लाविते; माझें साह्य कोठून येतें ? परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता, त्याकडूनच माझें साह्य येतें. तो माझा पाय सरकूं देणार नाहीं; तुझा राखणारा निजत नाहीं. पाहा जो इस्राएलास राखितो, तो निजत नाहीं व झोंप घेत नाहीं. परमेश्वर तुझा राखणारा आहे, तुझ्या उजव्या हाताकडे परमेश्वर तुझी छाया आहे. दिवसां सूर्य व रात्रीं चंद्र तुला बाधणार नाहीं. परमेश्वर तुला सर्व आरिष्टां पासून राखील, तो तुझे जिवास राखील. आतां पासून सर्वकाळ पर्यंत परमेश्वर तुझें बाहेर जाणें व तुझें आंत येणें राखील.

जो जगताचा स्वामि, त्याने कोणताहि घडविलेला पदार्थ उत्पन्न होण्यापूर्वी राज्य केलें; ज्यावेळीं सर्व त्याच्या इच्छेप्रमाणें झालें, तेव्हां त्याचें नाम राजा असें म्हटलें गेलें. आणि सर्व संपल्यावरहि तो भयंकर (राजा) राज्य करीतच होता, करीत आहे व तोच सर्वकाळ गौरवानें राहील. तो एक आहे आणि त्याची बरोबरी व त्याची संगत करणारा दुसरा कोणी नाहीं. तो आरंभावांचून व अंतावांचून आहे; आणि सामर्थ्य व अधिकार (सर्व) त्याचाच आहे. त्यास उपमा नाहीं व तुलना नाहीं, तो बदलत नाहीं व पालटत नाहीं. त्यामध्यें संयोग नाहीं व वियोग नाहीं, त्याचें सामर्थ्य व त्याचा पराक्रम मोठा आहे. तो माझा देव व माझा जीवंत उद्धारक आहे, आणि संकटाच्या दिवशीं माझ्या विभागाचा खडकरूप आश्रय आहे. तो माझा झेंडा व माझा आश्रय आहे. मी हाक मारितों त्या दिवशीं तोच माझ्या प्याल्याचा वांटा आहे. तोच निरोगी

וְהוּא אֵלִי וְחַי גּוֹאֲלִי · וְצוּר חֶבְלִי בְּיוֹם צָרָה :
וְהוּא נִסִּי וּמָנוֹס לִי · מְנַת כּוֹסִי בְּיוֹם אֶקְרָא :
וְהוּא רוֹפֵא וְהוּא מַרְפֵּא · וְהוּא צוֹפֶה וְהוּא עֶזְרָה :
בְּיָדוֹ אַפְקִיד רוּחִי · בְּעֵת אִישַׁן וְאָעִירָה :
וְעִם־רוּחִי גְּוִיָּתִי · אֲדֹנָי לִי וְלֹא אִירָא :
בְּמִקְדָּשׁוֹ תָּגֵל נַפְשִׁי · מְשִׁיחֵנוּ יִשְׁלַח מְהֵרָה :
וְאָז נָשִׁיר בְּבֵית קָדְשִׁי · אָמֵן אָמֵן שֵׁם הַנּוֹרָא :

אַשֶּׁר בְּיָדוֹ נֶפֶשׁ כָּל־חַי וְרוּחַ כָּל־בְּשַׂר אִישׁ: בְּיָדְךָ אַפְקִיד

רוּחִי פָּדִיתָה אוֹתִי יְהוָה אֵל אֱמֶת: יְהוָה לִי לֹא אִירָא מַה־
יַּעֲשֶׂה לִי אָדָם: יְהוָה לִי בְּעֹזְרָי וַאֲנִי אֶרְאֶה בְשָׂנְאָי:
טוֹב לַחֲסוֹת בַּיהוָה מִבְּטֹחַ בָּאָדָם: טוֹב לַחֲסוֹת בַּיהוָה
מִבְּטֹחַ בִּנְדִיבִים: כָּל־גּוֹיִם סְבָבוּנִי בְּשֵׁם יְהוָה כִּי אַמִּילָם:
סַבּוּנִי גַם־סְבָבוּנִי בְּשֵׁם יְהוָה כִּי אַמִּילָם: סַבּוּנִי כִּדְבֹרִים
דֹּעֲכוּ כְּאֵשׁ קוֹצִים בְּשֵׁם יְהוָה כִּי אַמִּילָם: דָּחֹה דְחִיתַנִי
לִנְפֹּל וַיהוָה עֲזָרָנִי: עָזִּי וְזִמְרָת יָהּ וַיְהִי לִי לִישׁוּעָה:
קוֹל רִנָּה וִישׁוּעָה בְּאָהֳלֵי צַדִּיקִים יְמִין יְהוָה עֹשָׂה חָיִל:
יְמִין יְהוָה רוֹמֵמָה יְמִין יְהוָה עֹשָׂה חָיִל: לֹא אָמוּת כִּי
אֶחְיֶה וַאֲסַפֵּר מַעֲשֵׂי יָהּ:

אַבְרֵךְ אֶת שֵׁם יְהוָה · הַנֶּעְלָם מִכָּל נִמְצָא :

וַאֲקַוֶּה חַסְדּוֹ כָּל יָמַי. עַל כָּל טוּב אֲשֶׁר עָשָׂה :
נָתַן לָנוּ אֶת הַתּוֹרָה · לְזַכּוֹתֵינוּ (נ״א לְהַחֲיוֹתֵנוּ) רָצָה :
(בשבת יאמר) נָתַן לָנוּ אֶת הַשַּׁבָּת · לְהִתְעַנֵּג בּוֹ וּלְרַצֹּתָה :
יְמִינְךָ נָבַר עָלֵינוּ. תַּצִּילֵנוּ מִכָּל צָרָה :

करणारा व उपचार करणारा आहे व तोच मजवर पाहारा करणारा व मला साह्य करणारा आहे. ज्यावेळीं मी निजतों व जागृत होतों, तेव्हां मी आपला जीव त्याच्याच हातीं सोंपवितों, आणि माझा आत्मा व माझें शरिरही. देव माझा आहे, मी भिणार नाहीं. त्याच्या पवित्र मंदिराविषयीं माझा जीव हर्षित होईल; तो आमचा माशीयाह लवकर पाठवील. मग आम्ही आपल्या पवित्र मंदिरीं त्याच्या भयंकर नामानें गायन करूं. आमेन, आमेन.

ज्याच्या हातीं सर्व प्राण्यांचा जीव व सर्व मांसमय मनुष्याचा आत्मा आहे असा जो तूं, त्या तुझ्या हातीं मी आपला आत्मा सोंपवितों. हे परमेश्वरा सत्य देवा! त्वां मला उद्धारिलें आहे. परमेश्वर मजकडे आहे, मी भिणार नाहीं, मनुष्य माझें काय करील? परमेश्वर माझ्या साह्याकरितां मजकडे आहे, म्हणून मी आपल्या वैऱ्यांस पाहीन. मनुष्यावर विश्वास ठेवण्यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे. अधिपतींवर विश्वास ठेवणें यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे. सर्व लोकांनीं मला वेढिलें. परंतु परमेश्वराचे नामानें मी त्यांस छेदून टाकीन. त्यांनीं मला वेढिलें, होय मला वेढिलें, परंतु परमेश्वराच्या नामानें मी त्यांस छेदून टाकीन. त्यांनीं मधमाशांप्रमाणें मला वेढिलें, ते काटवणाच्या अग्नीप्रमाणें विझून गेले आहेत, कां तर परमेश्वराच्या नामानें मीं त्यांस छेदून टाकीन. म्यां पडावें म्हणून त्वां मला फार ढोसलें, परंतु परमेश्वरानें माझें पाठबळ केलें. परमेश्वर माझें सामर्थ्य व माझें गीत आहे, तो माझें तारणहि झाला आहे. हर्षाचा व तारणाचा शब्द नीतिमानांच्या वस्त्यांत आहे, परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. परमेश्वराचा उजवा हात उंचावलेला आहे; परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. मी मरणार नाहीं, परंतु वाचेन; आणि परमेश्वराचीं कर्में वर्णीन.

परमेश्वराचें नाम जें सर्व पदार्थां पेक्षां गुप्त आहे, त्यास मी धन्य म्हणेन; आणि जें सर्व त्यानें चांगलें केलें आहे, त्यावरून मी आपल्या सर्व दिवसांत त्याची आशा धरीन. त्यानें आह्मांस शास्त्र दिले; आम्हास पुण्यवान करण्या करितां त्याची अशी इच्छा झाली. (शाब्बाथ दिवशीं हें बोलावें—आम्ही शाब्बाथ दिवशीं हर्ष व आनंद करावा म्हणून त्यानें तो आम्हांस दिला आहे.

שִׁמְךָ יְגַדֵּל לְעֵינֵינוּ · עַל כָּל מֶלֶךְ רָם וְנִשָּׂא :
וּמֵרוֹב כָּל חַטֹּאתֵינוּ · נִתָּנוּ לִמְשִׁסָּה :
מָשְׁלוּ בָּנוּ אוֹיְבֵינוּ · הֵן לְרִיב הֵן לְמַצָּה :
שִׁבְּרוּ כָל עַצְמוֹתֵינוּ · כְּקֶנֶה הָרְצוּצָה :
וְהָאֵל בְּרוֹב חֲסָדָיו · פָּנָיו לְעָמּוֹ נָשָׂא :
וּבְטוּבוֹ יִשְׁלַח לָנוּ · מְשִׁיחֵנוּ בְּמְרוּצָה :
עִמּוֹ אֵלִיָּהוּ הַנָּבִיא · לְקַיֵּם אֶת הַמַּשָּׂא :

אַבְרֵךְ אֶת־יְיָ אֲשֶׁר יְעָצָנִי אַף־לֵילוֹת יִסְּרוּנִי כִלְיוֹתָי :
שִׁוִּיתִי יְיָ לְנֶגְדִּי תָּמִיד כִּי מִימִינִי בַּל־אֶמּוֹט :
לָכֵן שָׂמַח לִבִּי וַיָּגֶל כְּבוֹדִי אַף־בְּשָׂרִי יִשְׁכֹּן לָבֶטַח : כִּי
לֹא־תַעֲזוֹב נַפְשִׁי לִשְׁאוֹל לֹא־תִתֵּן חַסִידְךָ לִרְאוֹת
שָׁחַת : תּוֹדִיעֵנִי אֹרַח חַיִּים שְׂבַע שְׂמָחוֹת אֶת־פָּנֶיךָ
נְעִימוֹת בִּימִינְךָ נֶצַח : מִי יִתֵּן מִצִּיּוֹן יְשׁוּעַת יִשְׂרָאֵל
בְּשׁוּב יְיָ שְׁבוּת עַמּוֹ יָגֵל יַעֲקֹב יִשְׂמַח יִשְׂרָאֵל :

יְגַדַּל אֱלֹהִים חַי וְיִשְׁתַּבַּח · נְמְצָא וְאֵין עֵת אֶל מְצִיאוּתוֹ :
אֶחָד וְאֵין יָחִיד כְּיִחוּדוֹ · נֶעְלָם וְגַם אֵין סוֹף
לְאַחְדוּתוֹ : אֵין לוֹ דְּמוּת הַגּוּף וְאֵינוֹ גּוּף · לֹא נַעֲרוֹךְ
אֵלָיו קְדֻשָּׁתוֹ : קַדְמוֹן לְכָל־דָּבָר אֲשֶׁר נִבְרָא · רִאשׁוֹן וְאֵין
רֵאשִׁית לְרֵאשִׁיתוֹ : הִנּוֹ אֲדוֹן עוֹלָם לְכָל־נוֹצָר · יוֹרֶה
גְּדֻלָּתוֹ וּמַלְכוּתוֹ : שֶׁפַע נְבוּאָתוֹ נָתַן אֶל · אַנְשֵׁי סְגֻלָּתוֹ
וְתִפְאַרְתּוֹ : לֹא קָם בְּיִשְׂרָאֵל כְּמֹשֶׁה עוֹד · נָבִיא וּמַבִּיט אֶת
תְּמוּנָתוֹ : תּוֹרַת אֱמֶת נָתַן לְעַמּוֹ אֵל · עַל יַד נְבִיאוֹ נֶאֱמַן
בֵּיתוֹ : לֹא יַחֲלִיף הָאֵל וְלֹא יָמִיר־ דָּתוֹ לְעוֹלָמִים לְזוּלָתוֹ :
צוֹפֶה וְיוֹדֵעַ סִתְרֵנוּ · מַבִּיט לְסוֹף דָּבָר בְּקַדְמוּתוֹ : גּוֹמֵל

तुझा उजवा हात आम्हावर वाढला आहे, आणि तूंच आम्हास सर्व संकटांपासून सोडाविशिल. सर्व महान व थोर राजांपेक्षां तुझें नाम आमच्या दिसण्यांत वाढेल एथपर्यंत.) आमच्या बहुत पापांमुळें आम्हास लुटणाऱ्यांच्या हातीं दिलें आहेस. आमचे वैरी आह्मावर अधिकार करितात, व ते हट्टवादहि करितात. त्यांनीं आमच्या सर्व हाडांचे तांटांप्रमाणें तुकडे तुकडे केले आहेत; तरी देव आपल्या मोठ्या दयेनें आपल्या लोकांवर आपली नजर ठेवील आणि आपल्या चांगुलपणानें भविष्य पूर्ण करण्याकरितां तो आमचा माशीयाह व त्या बरोबर एलीयाहू भविष्यवादी यांस आम्हाकडे त्वरीतच पाठवील.

ज्या परमेश्वरानें मला बोध केला आहे, त्याचें वंदन मी करितो ; रात्रींहि माझ्या भावना मला शिकवितात. म्या परमेश्वर नित्य आपणापुढें ठेविला आहे, तो माझ्या उजव्या हाताकडे आहे ह्मणून मी ढळणार नाहीं. या करितां माझें हृदय हर्षतें व माझा गौरव उल्लासतें, माझा देहहि निर्भय आहे. कां कीं तूं माझा जीव अधोलोकांत सोडणार नाहींस, तूं आपल्या पवित्रास क्षय पावूं देणार नाहींस. जीवनाचा मार्ग मला कळविशील, तुज समोर हर्षाची पूर्ती आहे ; तुझ्या उजव्या हाताकडे सर्वकाळ आनंद आहे. सीयोनेतून इस्राएलाचें तारण कोण देईल ? परमेश्वर आपले लोक प्रवासांतून परत आणील तेव्हां याकोब उल्लासेल व इस्राएल हर्षेल.

जीवंत देव थोर मानिला व स्तविला जाईल, तो आहेच आणि त्याच्या अस्तित्वास काळरूप सीमा नाहीं. तो एकच आहे आणि त्याच्या एकत्वासारिखें दुसरें एकत्व नाहीं. तो अदृश्य आहे; आणि त्याच्या एकत्वासहि अंत नाहीं. त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं, त्याचे पवित्रतेची बरोबरी (कोणीच) करूं शकत नाहीं. तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वीचा आहे; तोच पहिला आणि त्याच्या मूळास आरंभ नाहीं. पाहा, तो जगाचा व प्रत्येक घडलेलें पदार्थाचा स्वामी आहे. तो त्याचें महत्व व त्याचा अधिकार दाखवितो. त्यानें आपल्या भविष्य कथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्ववान मनुष्यास दिली. ज्यानें त्याचें गौरव पाहिलें. त्या मोशे सारिखा इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं. देवानें आपल्या लोकांस, आपला भविष्यवादी व आपल्या घरचा विश्वासू याच्या हातून सत्य नियम शास्त्र दिलें आहे. देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लाऊन देण्याकरितां तो कधींहि

לְאִישׁ חָסִיד כְּמִפְעָלוֹ · נוֹתֵן לָרָשָׁע רָע כְּרִשְׁעָתוֹ : יִשְׁלַח לְקֵץ יָמִים מְשִׁיחֵנוּ · לִפְדוֹת מְחַכֵּי קֵץ יְשׁוּעָתוֹ : מֵחִים יְחַיֶּה אֵל בְּרוֹב חַסְדּוֹ · בָּרוּךְ עֲדֵי עַד שֵׁם תְּהִלָּתוֹ : אֵלֶּה שְׁלֹשׁ עֶשְׂרֵה לְעָקְרִים · הֵן הֵם יְסוֹד דַּת אֵל וְתוֹרָתוֹ : תּוֹרַת מֹשֶׁה אֱמֶת וּנְבוּאָתוֹ · בָּרוּךְ עֲדֵי עַד שֵׁם תְּהִלָּתוֹ :

בָּרוּךְ יְהוָה כִּי שָׁמַע קוֹל תַּחֲנוּנָי : יְהוָה עֻזִּי וּמָגִנִּי בּוֹ בָּטַח לִבִּי וְנֶעֱזַרְתִּי וַיַּעַל לִבִּי וּמִשִּׁירִי אֲהוֹדֶנּוּ : יְהוָה עֻזָּ־לָמוֹ וּמָעוֹז יְשׁוּעוֹת מְשִׁיחוֹ הוּא : הוֹשִׁיעָה אֶת־עַמֶּךָ וּבָרֵךְ אֶת נַחֲלָתֶךָ וּרְעֵם וְנַשְּׂאֵם עַד־הָעוֹלָם :

(ואומר למנצח בנגינות מזמור שיר אלהים יחננו וגו׳)

תפלה ובקשה לתענית ערב ראש חדש

שְׁמַע קוֹלִי אֲשֶׁר יְשַׁמַּע בְּקוֹלוֹת · וְהָאֵל הַמְקַבֵּל הַתְּפִלּוֹת : וְהָעוֹשֶׂה בְּלִי חֵקֶר גְּדוֹלוֹת · וְנִפְלָאוֹת וְהַנּוֹרָא עֲלִילוֹת : וְהֶחָכָם וְהַקָּנָם לְעוֹלָם · וְהַנִּבּוֹר עֲלֵי כָּל־הַיְכוֹלוֹת : וְהָרַחוּם וְהַחַנּוּן וְהַטּוֹב · וְהֶחָסִיד וְהַמַּרְבֶּה מְחִילוֹת : אֲשֶׁר עָנָה לְאַבְרָהָם · וְיִצְחָק · וְיִשְׂרָאֵל לְמַלְאוֹת כָּל־שְׁאֵלוֹת : וְהָעוֹנֶה בְּבֵית כֶּלֶא לְיוֹסֵף · וּמְבוֹר הֶעֱלָהוּ לַגְּדוּלוֹת : וְהָעוֹנֶה בְּמִצְרַיִם לְעַמּוֹ · וְהוֹצִיאָם לְחֵרוּת מִסְּבָלוֹת : וְהָעוֹנֶה בַּיָּם וַיַּעֲבִירֵם · וְטָבַע אוֹיְבֵיהֶם בַּמְּצוּלוֹת : וְהָעוֹנֶה בְּהַר סִינַי לְמֹשֶׁה · וּבִשְׂרוֹ בְּטוּבְךָ בַּגְּאוּלוֹת : וְהָעוֹנֶה לְאַהֲרֹן בַּקְּטֹרֶת · וְגַם פִּינְחָס עֲנִיתוֹ בַּפְּלִילוֹת : וְהָעוֹנֶה יְהוֹשֻׁעַ וְעֵלִי · וְגַם חַנָּה

पालटणार व बदलणार नाहीं. तो. आमचीं गुह्यें पाहतो व जाणतो; सर्व पदार्थांचा शेवट तो पूर्वीच लक्षांत आणितो. तो धार्मिक मनुष्याची फेड त्याच्या कर्माप्रमाणें करितो, आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणें शासन करितो. त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहाणाऱ्यांस खंडून घेण्याकरितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहास पाठवील. देव आपल्या बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करील; त्याचें स्तुत्य नाम सदासर्वकाळ धन्य असो, हीं तेरा मुळतत्वें देवाच्या नियमाचा व त्याच्या शास्त्राचा पाया आहेत. मोशेचें शास्त्र व त्याचें भविष्य कथन सत्य आहे; त्याच्या स्तुतीचें नाम सदा सर्वकाळ धन्य असो.

परमेश्वर सुवंदित असो, कांकीं त्यानें माझ्या काकुळतीची वाणी ऐकिली आहे. परमेश्वर माझें बल व माझी ढाल आहे, त्याजवर माझ्या हृदयानें भाव ठेविला आहे, आणि मी साह्य पावलों आहे, म्हणून माझें हृदय उल्लासतें, आणि मी आपल्या गायनाकडून त्याची स्तुति करीन. परमेश्वर त्यांचें बल आहे; आणि तो आपल्या अभिषिक्ताचा तारणदुर्गच आहे. तूं आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतनास आशिर्वाद दे; त्यांचे पालन कर व सदासर्वकाळ त्यांस उंचाव. (मग ६७ वें गीत म्हणावें.)

प्रतिपदेच्या आदल्या दिवशीं उपास करून करावयाची प्रार्थना व विनंती

हे वाणी ऐकणाऱ्या आणि प्रार्थना मान्य करणाऱ्या देवा, माझी वाणी ऐक. हे अंत नाहीं अशीं मोठालीं आश्चर्यकारक व भयंकर कृत्यें कारणाऱ्या, हे बुद्धिवंता, सर्वकाळ अचळ आणि सर्व सामर्थ्यां पेक्षां अधिक सामर्थ्यवान असणाऱ्या, हे दयावंता, कृपावंता, चांगल्या, यथार्थ व पुष्कळ क्षमा करणाऱ्या, हे आब्राहाम इसहाक व इस्राएल यांस त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याकरितां उत्तर देणाऱ्या; हे योसेफास बंदिशाळेंत उत्तर देणाऱ्या, आणि त्यास खांचेंतून उंच पदास चढविणाऱ्या; हे मिसरांत आपल्या लोकांस उत्तर देऊन त्यांस बेड्यांतून सोडवून मुक्त करणाऱ्या; हें त्यांस समुद्रांत उत्तर देऊन पार करणाऱ्या, आणि त्यांच्या वैऱ्यास खोलपणांत बुडविणाऱ्या; हे सीनाय पर्वतावर मोशयास उत्तर देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून सुटकेचें शुभवर्तमान त्यास कळविणाऱ्या; * हे आहारोनास धूप दाखवितांना आणि पिनहासास योग्य कृत्य † करितांना उत्तर देणाऱ्या, हे येहोशुवास आणि एलीस उत्तर देणाऱ्या, आणि हान्ना शब्देंकरून

* टीका १.

† जेव्हां इस्राएलांनीं शिदीमांत मोआबी कन्यांशीं व्यभिचार केला तेव्हां पिनहासानें एका इस्राएली माणसास व एका मोआबी स्त्रीस भाल्यानें भोंसाकिलें, हें त्यानें योग्य कृत्य केलें, आणि त्यामुळें इस्राएलांवरील पटकी बंद झाली.

בְּהִתְחַנְּנָהּ בְּמִלּוֹת׃ וְהָעוֹנֶה שְׁמוּאֵל בַּתְּשׁוּעוֹת׃ וְהָעוֹנֶה
עֲלֵי מַשְׁבֵּר לְחַלּוֹת׃ וְהָעוֹנֶה שְׁלֹמֹה רַב שְׁלוֹמוֹת. וְגַם
דָּוִד אֲשֶׁר שָׁר לָךְ בְּמַעֲלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְאֵלִיָּהוּ בַּכַּרְמֶל׃
וְאֵשׁ יָרְדָה וְאָכְלָה מַאֲכָלוֹת׃ וְהָעוֹנֶה בֶּיְשַׁע לֶאֱלִישָׁע׃
וְחִזְקִיָּה עֲנִיתוֹ בַתְּעָלוֹת׃ וְהָעוֹנֶה בְּלֵב הַיָּם לְיוֹנָה׃
וְהוֹצֵאתוֹ לְאוֹרוֹת מֵאֲפֵלוֹת׃ וְהָעוֹנֶה חֲנַנְיָה וַעֲזַרְיָה׃ וּמִישָׁאֵל
בְּהִצָּלוֹת לְהַפְלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְדָנִיֵּאל בְּרַחֲמָיו׃ וּמַלְאַךְ
חִלְּצָהוּ מִשְּׁחָלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְמָרְדְּכַי וְאֶסְתֵּר׃ וְהָפַכְתָּ
יְגוֹנוֹתָם לְגִילוֹת׃ וְהָעוֹנֶה בְּמוֹ עֵזֶר לְעֶזְרָא׃ וְחַשְׁמוֹנִים
עֲנִיתָם בַּחֲיָלוֹת׃ וְהָעוֹנֶה בְּתוֹךְ מַעְגָּל לְחוֹנִי׃ בְּעֵת נִשְׁבַּע
בְּשִׁמְךָ רַב פְּעוּלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְכָל־צַדִּיק וְחָסִיד׃ אֲשֶׁר הָיוּ
בְּכָל־דּוֹר בַּקְּהִלּוֹת׃ וְהָעוֹנֶה אֲנִיּוֹת יָם בְּסַעֲרוֹת׃ וְהָעוֹנֶה
לְמִתְעַנֶּה בְמַחֲלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְהוֹלְכִים בַּיְשִׁימוֹן׃ וְהָעוֹנֶה
אֲסִירִים בַּכְּבָלוֹת׃ וְהָעוֹנֶה לְכָל־צוֹעֵק וְקוֹרֵא וְכָל־בָּאִים
לְפָנֶיךָ לְחַלּוֹת׃ עֲנֵה עָנִי שְׁפַל כָּל־הַשְּׁפָלִים׃ וְשָׂא חֶטְאוֹ
מְקַבֵּל הַתְּפִלּוֹת׃ וְהַאֲרֵךְ נָא בְּרַחֲמֶיךָ שְׁנוֹתָיו׃ וְצַיֵּה כָּל־
שְׁאֵלוֹתָיו לְמַלְאוֹת׃ וְתַחְשׁוֹב כָּל־תְּפִלּוֹתָיו קְטֹרֶת׃ לְפָנֶיךָ
כְּקָרְבָּנוֹת וְעוֹלוֹת׃ וְהָאֵל הַמְּקַבֵּל הַתְּפִלּוֹת׃ שְׁמַע קוֹלִי
אֲשֶׁר יִשְׁמַע בְּקוֹלוֹת׃

סימן אני יצחק

אֵלִי אֵלִי אֵלִי לָמָה עֲזַבְתָּנוּ׃ שַׂמְתָּנוּ בַּשִּׁבְיָה׃
בְּיַד אוֹיֵב נְטַשְׁתָּנוּ׃ חָנֵּנוּ צוּר יָהּ׃ אֶזְעַק לָךְ
מִבּוֹר תַּחְתִּיָּה׃ (חננו צור) נִפְלָאוֹת עָשִׂיתָ׃ לַאֲבוֹתֵינוּ

काकळूत करीत असतां तिलाहि उत्तर देणाऱ्या; हे शमुएलास तारणाकडून उत्तर देणाऱ्या, आणि प्रसवणारीस तिच्या वेदनांत उत्तर देणाऱ्या; हे पुष्कळ शांततेकडून, शेलोमोस उत्तर देणाऱ्या, आणि दाबीद, ज्यानें तुला चढण्याचीं गीतें गाइलीं त्यासही; हे एलीयास कार्मेल डोंगरावर जेव्हां (आकाशांतून) अग्नीनें उतरून भक्ष खाल्ला * तेव्हां उत्तर देणाऱ्या; हे एलीशास तारणाकडून आणि हिजकीयास आरोग्यतेकडून उत्तर देणाऱ्या; हे योनास समुद्रामध्यें उत्तर देऊन अंधारांतून त्यास उजेडांत आणणाऱ्या; हे हानानया, आजारया व मीशाएल यांस चमत्कारानें सोडवून उत्तर देणाऱ्या; हे दानिएल ज्यास तुझ्या दूतानें सिंहापासून सोडविलें त्यास दयेंकरून उत्तर देणाऱ्या; हे मोरदेखाय व एस्तेर यांच्या दुःखास पालटून हर्ष करून त्यांस उत्तर देणाऱ्या; हे सहायाकडून एज्रास आणि हाशमोनीम कुटुंबास † लढईत उत्तर देणाऱ्या; हे होनी, ‡ ज्यानें तुझ्या मोठ्या आश्चर्यकारक नामाची शपथ वाहिली, त्यास कुंडलींत उत्तर देणाऱ्या; हे (तुझ्या) मंडळींत पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर देणाऱ्या, हे वादळांत समुद्रांतील तारवांस उत्तर देणाऱ्या, आणि हे रोग्यास त्याच्या दुःखांत उत्तर देणाऱ्या; हे अरण्यांत चालणाऱ्यांस उत्तर देणाऱ्या, आणि हे बेड्यांनीं लादलेल्यांस उत्तर देणाऱ्या, हे सर्व जे तुजपुढें ओरडतात व हाक मारितात त्यांस, आणि जे तुजपुढें प्रार्थना करावयास येतात त्यांस उत्तर देणाऱ्या, (माझी वाणी ऐक.) अति नीच झालेला जो गरीब त्यास उत्तर दे. आणि हे प्रार्थना मान्य करणाऱ्या, त्याचीं पापें क्षमा कर. आणि आपल्या दयेनें त्याच्या (आयुष्याचीं) वर्षें वाढीव, आणि त्याच्या सर्व मागण्या पूर्ण होण्यास आज्ञा कर. त्याच्या सर्व प्रार्थना तुजपुढें (दाखविलेल्या) धूपसारिख्या आणि तुजपुढें केलेल्या अर्पणासारिख्या व होमासारिख्या मोज. हे देवा, प्रार्थना मान्य करणाऱ्या आणि वाणी ऐकणाऱ्या, माझी वाणी ऐक.

हे माझ्या देवा ! हे माझ्या देवा ! हे माझ्या देवा ! आह्मास कां सोडिलेंस ? आम्हास दासत्वांत कां टाकिलेंस ? आम्हास शत्रूच्या हातीं कां सोपविलेंस ? हे अनंत खडकरूप आश्रया ! आम्हावर दया कर; मी खोल खांचेंतून तुजकडे ओरडत आहे.

---

* राजे १८, १७–४०.

† दुसऱ्या पवित्र मंदिरांतील मथातया मुख्य याजक याच्या कुटुंबास हाशमोनीम कुटुंब असें म्हटलें आहे.

‡ टीका २.

בְּמִצְרַיִם · אוֹתָם הִכִּיתָ · עַד מְאֹד כִּפְלֵי כִפְלַיִם (חננו צור)
יָם סוּף בָּקַעְתָּ · לְהַעֲבִיר אֶת־בָּנֶיךָ · וּבְיָדְךָ חֲזָקָה ·
טָבַעְתָּ אֶת אֹיְבֶיךָ : (חננו צור) יוֹרְדֵי הַיָּם · רָאוּ אֶת
גְּבוּרָתֶךָ · עַתָּה נְטַשְׁתָּנוּ · בְּיַד מַחֲרִיב בֵּיתֶךָ : (חננו צור)
צָלְלוּ כַּעוֹפֶרֶת · בְּמַיִם אַדִּירִים · יִשְׂרָאֵל עָבְרוּ · דְּגָלִים
דְּגָלִים : (חננו צור) חֲמוֹל עַל עַמֶּךָ · וְעַל עַם נַחֲלָתֶךָ ·
וּפְדֵה לְאֻמֶּךָ · בַּעֲבוּר דָּוִד עַבְדֶּךָ : (חננו צור) קוֹלִי שִׁמְעָה
וְעַל עַמְּךָ הוֹפִיעַ · וּשְׁלַח לָנוּ מָשִׁיחַ · בַּעֲבוּר כְּבוֹד
שְׁמֶךָ : (חננו צור)

סימן אני אברהם חזק

אִם פָּגַע בָּךְ הָאִי מְנֻוָּל · חִישׁ וּזְכוֹר לוֹ יוֹם הַמָּוֶת ·

יוֹם תִּשְׁכּוֹן מִשְׁכְּנוֹת עַוָּל · אֶרֶץ חֹשֶׁךְ וְצַלְמָוֶת : רוֹב
מִצּוֹת לְךָ כְּנוֹס · אַל יַבְטִיחֲךָ · בֶּן אֱנוֹשׁ · שֶׁהַשְּׁאוֹל לָךְ
בֵּית מָנוֹס : (רוב) נִצָּב שָׂטָן לְרַגְלַיִם · חֶרֶב חַדָּה בְּיָדַיִם ·
אָדָם יִרְאֶה לָעֵינַיִם · חֲמַת מֶלֶךְ מַלְאֲכֵי מָוֶת : (רוב) יִרְאֶה
הַבַּיִת אֵשׁ אֲכָלוֹ · מֵאֵשׁ מַלְבּוּשָׁיו וּמְעִילוֹ · מְלֹא עֵינַיִם
עַל כֻּלּוֹ · וְלוֹ הֵכִין כְּלֵי מָוֶת : (רוב) אָז יִרְעַד רַעַד
בִּרְאוֹתוֹ · כּוֹס פָּנָיו בְּאַדַּרְתּוֹ · רוֹצֶה לִבְרוֹחַ מֵאִתּוֹ ·
וְלָסוּר מִמּוֹקְשֵׁי מָוֶת : (רוב) בְּכָל מָקוֹם אֲשֶׁר יִבְרַח ·
הַשָּׂטָן אֶצְלוֹ יֶאֱרַח · אָז בְּקוֹל מַר צוֹעֵק יִצְרַח · אֲפָפוּנִי
חֶבְלֵי מָוֶת : (רוב) רוּחוֹ יִמְסוֹר וּגְוִיָּתוֹ · בִּרְאוֹת אָבְדָה
תִּקְוָתוֹ · לֹא יוֹעִיל עוֹז וּמֶמְשַׁלְתּוֹ · אֵין שִׁלְטוֹן בְּיוֹם
הַמָּוֶת : (רוב) הֵן דָּנִין לוֹ שִׁבְעָה דִינִין · חוֹלְפִין שִׁבְעָה

तूं आमच्या पूर्वजां करितां मिसरांत चमत्कार केलेस व त्या (मिसरी) लोकांस अतिशय व अनेक पट शिक्षा केलींस.

तुझे पुत्र पार जावे म्हणून तूं सूफ समुद्र दुभागिलास, आणि आपल्या सामर्थ्यवान हातानें आपल्या शत्रुस बुडाविलेंस.

जे समुद्रांत उतरले त्यांनीं तुझा पराक्रम पाहिला; परंतु आतां तूं आम्हांस तुझ्या मंदिराचा नाश करणारांच्या हातीं दिलें आहेस.

शिंग्या सारिखे ते महाजलांत बुडाले; परंतु इस्राएलांचे झेंड्यामागून झेंड पार गेले.

तुझ्या लोकांवर, तुझ्या वतनाच्या लोकांवर दया कर; आणि तुझा सेवक दावीद याकरितां तुझे राष्ट्रास सोडीव.

माझी वाणी ऐक, आणि आपल्या लोकांवर प्रकाशित हो; आणि तूं आपल्या नावाच्या गौरवाकरितां आम्हासाठीं माशीयाहास पाठीव.

जर तुला तो अमंगळ पशु * भेटेल, तर लागलीच त्यास मरणाच्या दिवसाची म्हणजे ज्या दिवशीं तूं अन्यायींच्या वस्त्यांत भूमींतील अंधारमय व मृत्यू छायेंतील वस्त्यांत वस्ती पावशील, त्या दिवसाची त्यास आठवण दे. तूं आपल्याकरितां पुष्कळ पुण्याई गोळा कर; हे मनुष्य पुत्रा ! कबर तुझें आश्रयाचें स्थान होईल, अशा त्याच्या भरंवशावर तूं विश्वास धरूं नको.

सातान हा दोन पायांवर उभा आहे, पाजविलेली तरवार त्याच्या हातीं आहे, राजाचा कोप मरणाचे दूत आहेत, हें मनुष्य आपल्या डोळ्यानें पाहतो. तो पाहतो कीं तें घर अग्नीनें भस्म होत आहे,† कारण त्याचीं वस्त्रें व त्याचा झगा अग्नि पासून आहे, तो सर्वत्र नेत्रांनीं भरलेला आहे आणि त्यानें आपणाकरितां मारक शस्त्रें सिद्ध केलीं आहेत.

तो त्यास पाहातो तेव्हां त्यास थरकांप सुटतो, तो आपल्या झग्यानें आपलें तोंड झांकितो, तो त्यापासून पळावयास व मृत्यूच्या फासातून सुटावयास इच्छितो.

ज्या ज्या ठिकाणीं तो पळतो, त्या त्या ठिकाणीं सातान त्याचा पाहुणा आहेच; मग तो मोठ्या शोकानें ओरडून ह्मणतो कीं, मृत्यूच्या बंधनांनीं मला वेष्टिलें आहे.

मग त्याची निराशा झाली, त्याचें सामर्थ्य व त्याची शक्ती हीं निष्फल झालीं, व मरणाच्या दिवसावर कोणाचा अधिकार चालत नाहीं, असें जेव्हां तो पाहातो, तेव्हां तो आपला आत्मा व देहहि स्वाधीन करितो.

---

* एथें अमंगळ पशु हें नांव दुष्ट वासनेस दिलें आहे.

† मनुष्य आपला देह मरणाच्या लागास आला आहे असें जेव्हां पाहातो.

עִדָּנִין · דִּין שַׁאֲחַר מָוֶת דָּנִין · מוֹצִא אֲנִי מַר מִמָּוֶת :
(רוב) מַכֶּה אַכֶּה אִישׁ לִיצְרוֹ · כָּל זֶה יֵזָכוֹר בְּיוֹם נָבְרוֹ ·
יוֹם שֶׁיֹּאכַל בַּדֵּי עוֹרוֹ · וְאֹכַל בַּדָּיו בְּכוֹר מָוֶת : (רוב)
חַזֵּק בְּדַת כִּי הִיא סְתָרָה · לֹא בְּהוֹן כִּי אֵינוֹ עֶזְרָה · לֹא
יוֹעִיל הוֹן בְּיוֹם עֶבְרָה · וּצְדָקָה תַּצִּיל מִמָּוֶת : (רוב)

מַה לְּךָ יְצִרִי תָּמִיד תִּרְדְּפֵנִי · וּלְאוֹיֵב לָךְ כָּל יוֹם
הַחְשְׁבֵנִי :(מה לך) יוֹם לְיוֹם תִּטְמוֹן חִנָּם פֶּה יְקוּשִׁים·
עַד אֲשֶׁר תּוֹךְ פֶּה מוֹקְשֶׁךָ תִּלְכְּדֵנִי : (מה לך)צַר וְאוֹיֵב
לִי אַתָּה מְנִיעוּרַי · תַּחֲרֹק עָלַי שֵׁן וְתִשְׁטְמֵנִי :(מה לך)
חָשְׁקָה נַפְשִׁי לְנִטּוֹת אַחֲרֶיךָ · כִּי בְצֵל יָדְךָ מִצַּר תִּצְּרֵנִי :
(מה לך) קִדְּמוּ עֵינַי לִבְכּוֹת בְּאַשְׁמוּרוֹת · כִּי בְעַב סַכּוֹתָה
וַתִּרְדְּפֵנִי : (מה לך) אִם אַדְמָה כִּי תִהְיֶה לִי לְעֶזְרָה · וּבְיוֹם
צָרָה אֶקְרָא וְתַעֲנֵנִי :(מה לך)צוּף דְּבַשׁ אִמְרֵי נֹעַם חִבַּךְ לִי ·
הֵן בְּחַכָּה עַד דַּכָּא תִּמְשְׁכֵנִי : (מה לך)

אֱלֹהַי עוֹז תְּהִלָּתִי · רְפָאֵנִי וְאֵרָפֵא ·
וְתֵן מַרְפֵּא לְמַחֲלָתִי · לְבַל אָמוּת וְאֶסָּפֶה : (אלהי)
לְךָ אוֹרָה בְּעוֹדִי חַי · בְּתוֹךְ רֵעַי וְגַם אַחַי ·
וְאַרְבֶּה מַהֲלַל שִׂיחִי · בְּקוֹל עָרֵב וְנִיב יָפֶה : (אלהי)
וְשׁוּעָתְךָ תְּבוֹאֵנִי · וְעַל רַגְלַי תְּקִימֵנִי ·
בְּשׁוּבִי עוֹד אֱלֵי בַנִּי · לְטוֹבָתְךָ אֲנִי צוֹפֶה : (אלהי)

आणि जसें परमेश्वरानें तुजसीं व तुझ्या पूर्वजांसीं शपथ वाहिली, तसें जेव्हां तो तुला खनान्यांच्या देशांत नेईल व तुला तो देईल तेव्हां असें होवो कीं, पोटचा प्रत्येक प्रथम झालेला पुरुष परमेश्वरासाठीं वेगळा कर, आणि जे पशु तुजजवळ असतील त्यांच्या पोटचे सर्व प्रथम झालेले नर परमेश्वराचे होतील. आणि प्रत्येक प्रथम झालेला गाढव कोंकरूं देऊन खंडून घे; आणि न खंडशील तर त्याची मान तोड; आणि मनुष्याचा जेष्ट पुत्र म्हणजे तुझ्या पुत्रांतील जेष्ट यासाठीं खंड भरून दे. आणि असें होईल कीं, तुझा पुत्र पुढें तुला पुसेल, हें काय ? तेव्हां त्यास सांग कीं, परमेश्वराने हाताच्या बलानें आम्हास मिसरांतून दासपणाच्या घरांतून काढलें. आणि असें झालें कीं, फारो आम्हास जाऊं देण्याविषयीं कठोर होता, तेव्हां परमेश्वरानें मिसर देशांतील अवघे ज्येष्ठ पुत्र--मानसांचे ज्येष्ठ पुत्र आणि पशूंचेहि प्रथम वत्स जिवें मारलें; यास्तव मी पोटच्या सर्व प्रथम झालेल्या नराचा यज्ञ परमेश्वराला करतों, आणि माझे सर्व ज्येष्ठ पुत्र खंडून घेतों. आणि हें तुझ्या हातावर खूण व तुझ्या डोळ्यांच्या मध्यें सूचनेची पटी अशें व्हावें, कां कीं परमेश्वरानें हाताच्या बलाने आम्हास मिसरांतून काढलें.*

(शाब्बाथ दिवशीं तेफीलीन बांधीत नाहींत, म्हणून मोठी सीसीथ पांघरल्यावर מה יקר חסדך इत्यादि वाक्यें चार वेळा बोलावीं.)

कीर्तनाचीं वाक्यें.

(हीं कीर्त्तनाचीं वाक्यें विनंतीच्या गीतांनंतर ह्मणावीं.)

मग हान्ना प्रार्थना करून म्हणाली, माझें मन परमेश्वराचे ठायीं आनंदित आहे, माझें शृंग परमेश्वराने उंच केलें आहे, माझें मुख माझ्या शत्रूवर उघडले आहे, कां कीं मी तुझ्या तारणा वरून आनंद पावतों. परमेश्वरा सारखा पवित्र कोणी नाहीं, कां कीं तुज शिवाय कोणी नाहीं, आमच्या देवा सारखा खडकरूप दुसरा कोणी नाहीं. अति गर्विष्टपणानें आणखी

*निर्गम अ० १३ ओ० १--१६.

מִפִּיכֶם כִּי אֵל דֵּעוֹת יְהוָה וְלוֹ נִתְכְּנוּ עֲלִילוֹת : קֶשֶׁת
גִּבּוֹרִים חַתִּים וְנִכְשָׁלִים אָזְרוּ חָיִל : שְׂבֵעִים בַּלֶּחֶם
נִשְׂכָּרוּ וְרֵעֵבִים חָדֵלוּ עַד־עֲקָרָה יָלְדָה שִׁבְעָה וְרַבַּת
בָּנִים אֻמְלָלָה : יְהוָה מֵמִית וּמְחַיֶּה מוֹרִיד שְׁאוֹל וַיָּעַל :
יְהוָה מוֹרִישׁ וּמַעֲשִׁיר מַשְׁפִּיל אַף־מְרוֹמֵם : מֵקִים מֵעָפָר
דָּל מֵאַשְׁפֹּת יָרִים אֶבְיוֹן לְהוֹשִׁיב עִם־נְדִיבִים וְכִסֵּא כָבוֹד
יַנְחִילֵם כִּי לַיהוָה מְצוּקֵי אֶרֶץ וַיָּשֶׁת עֲלֵיהֶם תֵּבֵל : רַגְלֵי
חֲסִידָיו יִשְׁמֹר וּרְשָׁעִים בַּחֹשֶׁךְ יִדָּמוּ כִּי־לֹא בְכֹחַ יִגְבַּר־
אִישׁ : יְהוָה יֵחַתּוּ מְרִיבָיו עָלָיו בַּשָּׁמַיִם יַרְעֵם יְהוָה יָדִין
אַפְסֵי־אָרֶץ וְיִתֶּן־עֹז לְמַלְכּוֹ וְיָרֵם קֶרֶן מְשִׁיחוֹ : אָתוֹתֵי
כְמָה רַבְרְבִין וְתִמְהוֹתֵי כְּמָה תַּקִּיפִין מַלְכוּתֵיהּ מַלְכוּת
עָלַם וְשָׁלְטָנֵיהּ עִם דָּר וָדָר : וַאֲנַחְנוּ עַמְּךָ וְצֹאן מַרְעִיתֶךָ
נוֹדֶה לְךָ לְעוֹלָם לְדוֹר וָדוֹר נְסַפֵּר תְּהִלָּתֶךָ : עֶרֶב וָבֹקֶר
וְצָהֳרַיִם אָשִׂיחָה וְאֶהֱמֶה וַיִּשְׁמַע קוֹלִי : פָּדָה־בְשָׁלוֹם נַפְשִׁי
בָּקָר וַיָּרִיעוּ כָּל־בְּנֵי אֱלֹהִים : לֹא אִירָא מֵרִבְבוֹת עָם
אֲשֶׁר סָבִיב שָׁתוּ עָלָי : וַאֲנִי בַּיהוָה אֲצַפֶּרֶת אוֹחִילָה
לֵאלֹהֵי יִשְׁעִי יִשְׁמָעֵנִי אֱלֹהָי : (בשבת אין אומרים־אַל
תִּשְׂמְחִי אֹיַבְתִּי לִי כִּי נָפַלְתִּי קַמְתִּי כִּי אֵשֵׁב בַּחֹשֶׁךְ יְהוָה
אוֹר לִי :) כִּי לְךָ יְהוָה הוֹחַלְתִּי אַתָּה תַּעֲנֶה אֲדֹנָי אֱלֹהָי :
רַגְלַי עָמְדָה בְּמִישׁוֹר בְּמַקְהֵלִים אֲבָרֵךְ יְהוָה :

זמירות

(תְּהִלַּת יְהוָה יְדַבֶּר פִּי וִיבָרֵךְ כָּל־בָּשָׂר שֵׁם קָדְשׁוֹ לְעוֹלָם
וָעֶד : וַאֲנַחְנוּ נְבָרֵךְ יָהּ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם הַלְלוּיָהּ) :

बोलूं नका, तुमच्या मुखांतून बढाई न निघो, कां कीं परमेश्वर ज्ञानाचा देव आहे, तो कृत्यें पारखतो. पराक्रम्यांची धनुष्यें मोडली आहेत, आणि पडा बयाच्या लागास येणाऱ्यांनीं बळ वेष्टून घेतलें आहें. जे तृप्त होते ते अन्नासाठीं मोल मजुरी करीत आहेत, आणि भुकेल्यांनीं तसे करणे सोडले आहे; होय जी वांझ होती ती सात (लेंकरें) प्रसवली, आणि जिला फार लेकरें आहेत ती अशक्त झाली आहे. मारणारा व जिवंत करणारा परमेश्वरच आहे; तो अधो लोकांस नेतो, व तोच वर आणितो. परमेश्वर दरिद्री करतो व धनवान करितो, तोच नीच करतो व तोच उंच करतो. तो दरिद्र्याला धूळींतून उठवितो, व भिकाऱ्याला उकरड्यावरून उभें करितो. त्यांना सरदारांमध्यें बसवितो, व त्यांस गौरवाचें आसन प्राप्त करितो; कां कीं, पृथ्वीचे खांब परमेश्वराचे आहेत, त्यावर त्यानें पृथ्वी ठेविली आहे. तो आपल्या भक्ताचे पाय सांभाळितो, परंतु दुष्ट अंधारांत मुकाटे राहातात, कां कीं बळानें कोणीच प्रबल होत नाहीं. परमेश्वर आपल्या विरोध्यांचा मोड करील, तो आकाशांतून त्यांवर गर्जना करील, परमेश्वर पृथ्वीच्या शेवटांचा न्याय करील, तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील. त्याचे उत्पात केवढे विशाल ? आणि त्याचे चमत्कार केवढ्या पराक्रमाचे आहेत ? त्याचें राज्य सनातन राज्य, आणि त्याचे प्रभूत्व युगानुयुग आहे. मग आम्ही तुझें लोक व तुझ्या कुरणातली शेरडें तुला सर्वकाळ स्तवीत जाऊं, आणि पिढ्यानपिढी तुझी प्रशंसा करीत जाऊं. सांज सकाळीं व दुपारीं मी विनंती करिताना ओरडेन, तेव्हां तो माझी वाणी ऐकेल. जेव्हां पाहाटेच्या ताऱ्यांनीं एकत्र गाईलें आणि देवाच्या पुत्रानीं हर्षवाद केला. तेव्हां लक्षावधि लोकांनीं मजभोंवती वेढा घातला तरी मी त्यास भिणार नाहीं. परंतु मी परमेश्वराकडे दृष्टि लावीन, मी आपल्या तारणाच्या देवाची प्रतिक्षा करीन, माझा देव माझें ऐकेल. (शाब्बाथ दिवशीं हें बोलूं नये.--अगे माझ्या वैरिणी मजवर हर्षूं नको; जरी मी पडलें तरी उठेन, जरी अंधारांत बसलें तरी परमेश्वर मला उजेड होईल.) कां तर हे परमेश्वरा, तुजवर मी आशा ठेवितों, हे माझ्या प्रभु माझ्या देवा, तूं मला उत्तर देशील. माझ्या पाय नीट ठिकाणीं उभा आहे, सभामध्यें मी परमेश्वराचें वंदन करीन.

कीर्तन.

(माझें मुख परमेश्वराची स्तुति बोलेल, आणि मनुष्य मात्र सदा सर्वकाळ त्याच्या पवित्र नामाला सुवंदित म्हणेल. आणि आम्ही आतां पासून सर्व काळ पर्यंत परमेश्वराचें वंदन करीत जाऊं. तुम्ही परमेश्वराला स्तवा.)

אֱלֹהַי נְשָׁמָה שֶׁנָּתַתָּ בִּי טְהוֹרָה (הִיא) אַתָּה בְרָאתָהּ · אַתָּה יְצַרְתָּהּ · אַתָּה נְפַחְתָּהּ בִּי · וְאַתָּה מְשַׁמְּרָהּ בְּקִרְבִּי · וְאַתָּה עָתִיד לִטְּלָהּ מִמֶּנִּי · וּלְהַחֲזִירָהּ בִּי לֶעָתִיד לָבֹא · כָּל־זְמַן שֶׁהַנְּשָׁמָה בְּקִרְבִּי · מוֹדֶה אֲנִי לְפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי · שֶׁאַתָּה הוּא רִבּוֹן כָּל־הַמַּעֲשִׂים · אֲדוֹן כָּל־הַנְּשָׁמוֹת · מוּשֵׁל בְּכָל־הַבְּרִיּוֹת · חַי וְקַיָּם לָעַד · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמַּחֲזִיר נְשָׁמוֹת לִפְגָרִים מֵתִים ׃

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם הַנּוֹתֵן לַשֶּׂכְוִי בִּינָה לְהַבְחִין בֵּין יוֹם וּבֵין לַיְלָה ׃

בָּא"י אֵמ"ה פּוֹקֵחַ עִוְרִים ׃

בָּא"י אֵמ"ה מַתִּיר אֲסוּרִים ׃

בָּא"י אֵמ"ה זוֹקֵף כְּפוּפִים ׃

בָּא"י אֵמ"ה מַלְבִּישׁ עֲרוּמִים ׃

בָּא"י אֵמ"ה הַנּוֹתֵן לַיָּעֵף כֹּחַ ׃

בָּא"י אֵמ"ה רוֹקַע הָאָרֶץ עַל הַמָּיִם ׃

בָּא"י אֵמ"ה הַמֵּכִין מִצְעֲדֵי גָבֶר ׃

בָּא"י אֵמ"ה שֶׁעָשָׂה לִי כָּל־צָרְכִּי ׃

בָּא"י אֵמ"ה אוֹזֵר יִשְׂרָאֵל בִּגְבוּרָה ׃

בָּא"י אֵמ"ה עוֹטֵר יִשְׂרָאֵל בְּתִפְאָרָה ׃

בָּא"י אֵמ"ה שֶׁלֹּא עָשָׂנִי גּוֹי (האשה אומרת גּוֹיָה) ׃

בָּא"י אֵמ"ה שֶׁלֹּא עָשָׂנִי עֶבֶד (האשה אומרת שִׁפְחָה) ׃

בָּא"י אֵמ"ה שֶׁלֹּא עָשָׂנִי אִשָּׁה (האשה אומרת שֶׁעָשָׂנִי כִּרְצוֹנוֹ) ׃

בָּא"י אֵמ"ה הַמַּעֲבִיר חֶבְלֵי שֵׁנָה מֵעֵינַי וּתְנוּמָה מֵעַפְעַפָּי ׃

हे माझ्या देवा ! जो जीव त्वां मजमध्यें दिला आहे, तो शुद्ध आहे; त्वां त्यास उत्पन्न करून व घडवून मजमध्यें फुंकीला आणि तूंच त्यास मजमध्यें राखितोस; आणि पुढे त्यास मजपासून घेशील; आणि उत्तरकाळीं मजमध्यें परत आणिशील. जोंपर्यंत मजमध्यें जीव आहे, तोंपर्यंत हे परमेश्वरा माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, तूं सर्व कृत्यांचा धनी, व सर्व प्राण्याचा स्वामी आणि सर्व सृष्टीचा सतत जीवंत व निश्चल असणारा सत्ताधारी आहेस, असा मान्य करितो. हे परमेश्वरा, मेलेल्याचे प्रेतांत पुनः जीव घालणाऱ्या तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा जगताच्या राजा, दिवस व रात्र यांमधील भेद जाणण्यास कोंबड्यास बुद्धि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आंधळ्यांस दृष्टि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, बंदिवानांस मोकळें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, ओणव्यांस उभे करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, नागव्यांस वस्त्र नेसविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, थकलेल्यांस शक्ति देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, पाण्यावर पृथ्वी विस्तारणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मनुष्याचीं पावलें स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या गरजा पूर्विणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस पराक्रमाकडून वेष्टिणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस सुंदरपणानें सुशोभित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला मूर्तिपूजक न करणाऱ्या, (स्त्रीनें ह्मणावें,—मला मूर्तिपुजणारीण न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला दास न करणाऱ्या, (स्त्रीनें ह्मणावें,—मला दासी न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला स्त्री न करणाऱ्या, (स्त्रीनें ह्मणावें,—मला आपले इच्छेप्रमाणें करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या डोळ्यांवरून झोंप व आमच्या पापण्यावरून निद्रा घालविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

וִיהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁתַּרְגִּילֵנוּ בְּתוֹרָתֶךָ · וְתַדְבִּיקֵנוּ בְּמִצְוֹתֶיךָ · וְאַל תְּבִיאֵנוּ לִידֵי חֵטְא · וְלֹא לִידֵי עֲבֵרָה · וְלֹא לִידֵי נִסָּיוֹן · וְלֹא לִידֵי בִזָּיוֹן · וְתַרְחִיקֵנוּ מִיֵּצֶר הָרַע · וְתַדְבִּיקֵנוּ בְיֵצֶר הַטּוֹב · וּתְנֵנוּ לְאַהֲבָה · לְחֵן וּלְחֶסֶד וּלְרַחֲמִים · בְּעֵינֶיךָ וּבְעֵינֵי כָל־רֹאֵינוּ · וְגָמְלֵנוּ חֲסָדִים טוֹבִים · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה גּוֹמֵל חֲסָדִים טוֹבִים לְעַמּוֹ יִשְׂרָאֵל :

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁתַּצִּילֵנוּ הַיּוֹם וּבְכָל־יוֹם וָיוֹם · מֵעַזֵּי פָנִים וּמֵעַזּוּת פָּנִים · מֵאָדָם רָע · מֵאִשָּׁה רָעָה · מִיֵּצֶר רָע · מֵחָבֵר רָע · מִשָּׁכֵן רָע · מִפֶּגַע רָע · מֵעַיִן הָרָע · וּמִלָּשׁוֹן הָרָע · מִמַּלְשִׁינוּת · מֵעֵדוּת שֶׁקֶר · מִשִּׂנְאַת הַבִּרְיוֹת · מֵעֲלִילָה מִמִּיתָה מְשֻׁנָּה · מֵחוֹלָאִים רָעִים · מִמִּקְרִים רָעִים · מִדִּין קֹשֶׁה · וּמִבַּעַל דִּין קָשֶׁה · בֵּין שֶׁהוּא בֶן־בְּרִית · וּבֵין שֶׁאֵינוּ בֶן־בְּרִית · וּמִדִּינָהּ שֶׁל גֵּיהִנָּם :

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר קִדְּשָׁנוּ בְּמִצְוֹתָיו וְצִוָּנוּ עַל דִּבְרֵי תוֹרָה : וְהַעֲרֵב (הַעֲרֵב) נָא יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־דִּבְרֵי תוֹרָתְךָ בְּפִינוּ וּבְפִּיפִיּוֹת עַמְּךָ בֵּית יִשְׂרָאֵל · וְנִהְיֶה אֲנַחְנוּ וְצֶאֱצָאֵינוּ וְצֶאֱצָאֵי צֶאֱצָאֵינוּ כֻּלָּנוּ יוֹדְעֵי שְׁמֶךָ וְלוֹמְדֵי תוֹרָתְךָ לִשְׁמָהּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמְלַמֵּד תּוֹרָה לְעַמּוֹ יִשְׂרָאֵל : בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר בָּחַר בָּנוּ מִכָּל־הָעַמִּים וְנָתַן לָנוּ אֶת־תּוֹרָתוֹ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה נוֹתֵן הַתּוֹרָה :

आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन तूं आम्हास तुझ्या शास्त्राभ्यासास लाव; तुझ्या आज्ञांस चिकटून राहावीव; आम्हास पापांत, उल्लंघनांत, मोहांत व धिक्कारांत पडूं देऊं नको. आम्हास कुकल्पनापासून दूर राखून सद्विचारास लगटून राहावीव, आणि तुझ्या दिसण्यांत व जे कोणी आम्हास पाहून आम्हाबरोबर परोपकार बुद्धीनें वर्ततात, त्यांच्या दिसण्यांत आम्हास प्रीति, अनुग्रह, दया व कृपा मिळूं दे. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस कृपा दाने देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा तुझी प्रसन्नता होऊन आज व प्रत्येक दिवशीं तूं आम्हास निष्ठुरता, निलाजरेपणा, वाईट मनुष्य, वाईट स्त्री, कुकल्पना, वाईट मित्र, वाईट शेजारी, अरिष्ट, पापदृष्टि, वाईट जिव्हा, चाहाडी, खोटी साक्ष, मनुष्य मात्रांचा द्वेष करणें, कुभांड, अपघात, वाईट रोग, अनर्थ, व कठोर न्याय यांपासून; आणि कराराचा पुत्र † असून किंवा कराराचा पुत्र नसून जो कठोर न्यायाधीश, यापासून व नरकाच्या दंडापासून आम्हास सोडीव.

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हांस आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या व शास्त्राविषयीं आम्हांस आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा आमच्या देवा, आम्ही विनंती करितों कीं, तुझ्या शास्त्रांतील गोष्टी आमच्या व तुझे लोक इस्राएलांचें घराणें, यांच्या तोंडांस मधूर लागाव्या; आणि आम्ही, आमच्या लेंकरांनी व आमच्या लेंकरांच्या लेकरांनी तुला जाणून शास्त्राचा अभ्यास करावा, म्हणून आम्ही तें शिकावें असें तूं कर. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र शिकविणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपलें नेम शास्त्र आम्हास देणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

† सुंतेचा करार व नेम शास्त्र जो मान्य करितो तो.

וַיְדַבֵּר יְהוָֹה אֶל־מֹשֶׁה לֵּאמֹר : דַּבֵּר אֶל־אַהֲרֹן וְאֶל־
בָּנָיו לֵאמֹר כֹּה תְבָרְכוּ אֶת־בְּנֵי יִשְׂרָאֵל אָמוֹר
לָהֶם : יְבָרֶכְךָ יְהוָֹה וְיִשְׁמְרֶךָ : יָאֵר יְהוָֹה פָּנָיו אֵלֶיךָ
וִיחֻנֶּךָּ : יִשָּׂא יְהוָֹה פָּנָיו אֵלֶיךָ וְיָשֵׂם לְךָ שָׁלוֹם : וְשָׂמוּ
אֶת־שְׁמִי עַל־בְּנֵי יִשְׂרָאֵל וַאֲנִי אֲבָרְכֵם :

פתיחת אליהו הנביא ז"ל

כתב האר"י זצוק"ל שטוב לאדם ללמוד פתיחת אליהו
בכניסתו לבית הכנסת קודם כל תפלה שהיא מסוגלת
לעזור ולהועיל לפתוח הלב ביראת השם ולא יעבור
מלאומרה וגם היא מסוגלת לכמה ענינים :
וקודם יאמר זה ·

וִיהִי נֹעַם יְיָ אֱלֹהֵינוּ עָלֵינוּ וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנָה עָלֵינוּ
וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנֵהוּ :

פָּתַח אֵלִיָּהוּ הַנָּבִיא זָכוּר לְטוֹב וְאָמַר רִבּוֹן עַלְמִין דְּאַנְתְּ
הוּא חָד וְלָא בְחֻשְׁכָּן. אַנְתְּ הוּא עִלָּאָה עַל כָּל
עִלָּאִין סְתִימָא עַל כָּל סְתִימִין · לֵית מַחֲשָׁבָה תְּפִיסָא
בָּךְ כְּלָל · אַנְתְּ הוּא דְאָפַקְתְּ עֶשֶׂר תִּקּוּנִין וְקָרֵינָן לוֹן עֶשֶׂר
סְפִירִן לְאַנְהָגָא בְּהוֹן עַלְמִין סְתִימִין דְּלָא אִתְגָּלְיָן
וְעַלְמִין דְּאִתְגָּלְיָן וּבְהוֹן אִתְכְּסִיאַת מִבְּנֵי נָשָׁא · וְאַנְתְּ
הוּא דְקָשִׁיר לוֹן וּמְיַחֵד לוֹן · וּבְגִין דְּאַנְתְּ מִלְּגָאו וְכָל
מָאן דְּאַפְרִישׁ חַד מִן חַבְרֵיהּ מֵאִלֵּין עֶשֶׂר אִתְחָשִׁיב לֵיהּ
כְּאִלּוּ אַפְרִישׁ בָּךְ · וְאִלֵּין עֶשֶׂר סְפִרָן אִינוּן אַזְלִין
כְּסִדְרָן חָד אָרִיךְ וְחָד קָצֵר וְחָד בֵּינוֹנִי · וְאַנְתְּ הוּא דְאַנְהִיג
לוֹן · וְלֵית מָאן דְּאַנְהִיג לָךְ לָא לְעֵילָּא וְלָא לְתַתָּא וְלָאוּ

आणखी परमेश्वरानें मोशाला असें सांगितले कीं, तूं आहारोनाला आणि त्याच्या पुत्रांस बोलून सांग कीं, तुम्ही इस्राएल संतानास आशीर्वाद देत असतां त्यांस असें म्हणा कीं, परमेश्वरानें तुम्हा आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वरानें आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वरानें आपली दृष्टी तुजवर लावून तुझें कल्याण करावें; तसें त्यांनीं माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.

एलीयाहु हन्नाबीनें परमेश्वराची केलेली स्तुतीः—

राबहाआरी जेसुखाल—म्हणजे "**जेखेर सद्दीख वेकादोश लिबराखा**"– "नितीवंत व पवित्र मनुष्याचे स्मरण आशिर्वादित असो." यानें असें लिहिलेले आहे कीं, हा भाग सर्व प्रार्थनेच्या अगोदर प्रार्थनस जातेवेळेस वाचणें हे मनुष्यास फार चांगले आहे. ह्यापासून फार फायदा आहे. व अनेक गोष्टीकरितां, ह्मणजे सफळता, परमेश्वराची भीती धरण्याकरितां. अंतःकरण उघडण्याकरितां, व "**येसेर हारास**"– दुष्ट कल्पना दूर करण्याकरितां अशा इत्यादी वस्तूंकरितां फायदेशीर आहे. **पाताह एलीयाहु हन्नाबीचा** भाग वाचण्या अगोदर "**वीही नोआमचे** वाक्य पुरें ह्मणावेंः—

आणि परमेश्वर जो आमचा देव त्याचा प्रसाद आह्मावर असावा; आणि आह्मासाठीं आमच्या हातांचें काम स्थीर कर. आमच्या हातांचें काम स्थीर कर.

एलीयाहु हन्नाबी सुरू करून म्हणतातः—जगाचा धनी तूं एक आहेस. व कोणत्याही वस्तूंत तुझी गणती करूं शकत नाहीं. सर्व जगताचा ईश्वर तूं आहेस. गुप्तांचा गुप्त आहेस. कोणतीही वस्तू धरून तूं परमेश्वर आहेस असें म्हणूं शकत नाहीं. व दहा आच्छादनें ह्मणजे आपण त्यास दहा **सेफिरोथ** म्हणतो.—(परमेश्वराच्या दयेच्या गुणाची गणती). त्यांत गुप्तजग व उघडे जग आहे. हें त्या दहा गोष्टींत आहे. तेणेंकरून हें जग चालते. हे दहा **सेफिरोथ** मनुष्यापासून गुप्त आहेत. तूं ते दहा **सेफिरोथचें** किरण एकमेकांत बांधलेले आहेस. व तुझ्याशिवाय ते कोणी बांधू शकत नाहीं. हे दहा **सेफिरोथ** एकत्र बांधिलेले आहेत, त्यांतून एखादा सुटून गेल्यास तुम्हास काढून टाकल्याप्रमाणें आहे. ह्मणजे (परमेश्वरापासून आपण निराळे झालों असे होते.) हे दहा **सेफिरोथ** एक लांब, एक लहान व एक मध्यभागीं व अनेक रितीनें तूं त्यांची व्यवस्था करून ठेविलेली आहेस. त्यांचा चालविणारा तूं आहेस; तुझ्या शिवाय त्याकोणी चालवणार नाहीं, वर नाहीं, खाली नाहीं,

מִכָּל סִטְרָא · לְבוּשִׁין תְּקִינָת לוֹן דְמִנַיְהוּ פַּרְחִין נִשְׁמָתִין
לִבְנֵי נָשָׁא · וְכַמָּא גּוּפִין תְּקִינַת לוֹן דְאִתְקְרִיאוּ גּוּפָא
לְגַבֵּי לְבוּשִׁין דִמְכַסְיָן עַלֵהוֹן וְאִתְקְרִיאוּ בְּתִקּוּנָא דָא ·
חֶסֶד דְרוֹעָא יְמִינָא · גְבוּרָה דְרוֹעָא שְׂמָאלָא · תִּפְאֶרֶת
גּוּפָא · נֶצַח וְהוֹד תְּרֵין שׁוֹקִין · יְסוֹד סִיוּמָא דְגוּפָא
אוֹת בְּרִית קוֹדֶשׁ מַלְכוּת פֶּה תּוֹרָה שֶׁבְּעַל פֶּה קָרֵינָן
לֵיהּ מוֹחָא חָכְמָה אִיהוּ מַחֲשָׁבָה מִלְּגָאו בִינָה לִבָּא וּבָהּ
הַלֵּב מֵבִין וְעַל אִלֵּין תְּרֵין כְּתִיב הַנִּסְתָּרוֹת לַיְיָ אֱלֹהֵינוּ
כֶּתֶר עֶלְיוֹן אִיהוּ כֶּתֶר מַלְכוּת וְעַלֵיהּ אִתְמַר מַגִּיד מֵרֵאשִׁית
אַחֲרִית וְאִיהוּ קַרְקַפְתָּא דִתְפִלֵּי מִלְּגָאו אִיהוּ יו״ד ה״א
וא״ו ה״א דְאִיהוּ אֹרַח אֲצִילוּת · אִיהוּ שַׁקְיוּ דְאִילָנָא
בִדְרוֹעוֹי וְעַנְפוֹי כְּמַיָּא דְאַשְׁקֵי לְאִילָנָא וְאִתְרַבֵּי בְהַהוּא
שַׁקְיוּ :

רִבּוֹן עַלְמִין אַנְתְּ הוּא עִלָּת הָעִלּוֹת וְסִבַּת הַסִּבּוֹת
דְאַשְׁקֵי לְאִלָנָא בְהַהוּא נְבִיעוּ · וְהַהוּא נְבִיעוּ
אִיהוּ כְּנִשְׁמְתָא לְגוּפָא דְאִיהוּ חַיִּים לְגוּפָא וּבָךְ לֵית
דִּמְיוֹן וְלֵית דִּיוּקְנָא מִכָּל מָה דִלְגָאו וּלְבָר · וּבָרָאתָ
שְׁמַיָּה וְאַרְעָא וְאַפָּקְתְּ מִנְּהֹן שִׁמְשָׁא וְסִיהֲרָא וְכוֹכְבַיָּא
וּמַזָּלֵי וּבְאַרְעָא אִילָנִין וּדְשָׁאִין וְגִנְּתָא דְעֵדֶן וְעִשְׂבִין ·
וְחֵיוָן וְעוֹפִין וְנוֹנִין וּבְעִירִין וּבְנֵי נָשָׁא לְאִשְׁתְּמוֹדָעָא
בְּהוֹן עִלָּאִין וְאֵיךְ יִתְנַהֲגוּן בְּהוֹן עִלָּאִין וְתַתָּאִין
וְאֵיךְ אִשְׁתְּמוֹדְעָן מֵעִלָּאֵי וְתַתָּאֵי וְלֵית דְּיֵדַע בָּךְ
כְּלַל · וּבַר מִינָךְ לֵית יְחוּדָא בְעִלָּאֵי וְתַתָּאֵי · וְאַנְתְּ
אִשְׁתְּמוֹדָע אָדוֹן עַל כּוֹלָא וְכָל סְפִירָן כָּל חַד אִית לֵיהּ

चाऱ्ही दिशेसही नाहीं, व त्यास वस्त्रानीं आच्छादिलें आहे. त्यांत सर्व मनुष्यांचे प्राण उडून जातात, व बाहेर येतात, व त्यांत किती शरीरें आच्छादिलेलीं आहेत, व त्यांवर वस्त्र घातलेले आहे, म्हणून त्यांत शरीर असले पाहिजे असें समजते–व ते याप्रमाणें आच्छादन केलेले आहे. ह्या **१० सेफिरोथची** नांवें खाली दिली आहेत.

(१) हेसेद. (२) गेबुरा (३) तिफएरेथ (४) (५) नेसावेहोद (६) येसोद (७) मलखूत (८) होखमा (९) बीना (१०) केतेर ह्या १० सेफिरोथची नांवें ह्याप्रमाणें आहेत, व वर लिहील्याप्रमाणें शरिरांत त्यांचे आच्छादन केलें आहे. (१) **हेसेदः**—उजव्या हाताच्या बाजूस. (२) **गेबुराः**—डाव्या हाताच्या बाजूस (३) **तिफएरेथः**–कंबेरपासून वर (४–५) **नेसावेहोदः**–हे दोन मांड्यांत आहे, (६) **येसोदः**—शरिराच्या गुप्त भागी, व तो पवित्र कराराचा भाग होय. (७) **मलखूतः**—हा सर्व शरिराचा राजा होय, हे तोंडांत आहे. व त्यायोगे लेखी नेमशास्त्र व तोंड जबानीचे नेमशास्त्र त्यांतून निघावेत. (८) **होखमाः**—मेंदूत दिला आहे तेणेंकरून आपणांस पवित्र विचार निघावा (९) **बिनाः**—अंतःकरणांत दिला आहे, त्यांतून आपणास शिकण्याकरितां अक्कल यावी, ह्मणून त्याचा संबंध मेंदूतून ठेविलेला आहे. **होखमा** व **बीनावर** शास्त्रांत लिहिले आहें कीं गुप्त जें आहे, ते परमेश्वराचे होय, व खुलासा केलेला तो मनुष्याचा होय. (१०) **केतेरः**—डोक्यावर मुगूटाप्रमाणें आहे. वरील ९ वस्तू मनुष्यास मिळाल्यानें त्यास राजाचा मुगूट मिळतो. यावर ह्मटलें आहे, प्रारंभापासून शेवट पर्यंत कळविणारा. ह्या सर्व वस्तू तेफिल्लीनच्या गांठींमध्यें आहेत. आंत व बाहेरही आहेत व (तेफिल्लीन हा आपला मुगूट आहे) त्या वस्तु कोणत्या तर יו"ד ה"א ואו"ו ה"א होत. יהוה हें परमेश्वराचें प्रथम नांव आहे. व दुसरी पुष्कळ नांवें आहेत त्यांची आपण गणती करूं शकत नाहीं व त्याचा हिशेबही नाहीं, व तोरांमध्यें जे दिले आहे ते सर्व יהוה च्या नांवावर आहे, ह्या नांवावर जग चालत आहे. व मनुष्याचा आधार व सर्व जनजनावरांचा आधार त्यावर असून त्याची पूर्णतीं त्यापासून होते, व त्या नांवानें सर्व चालत आहे.

יו"ד ה"א ואו"ו ה"א हे जे आहे, ते जसे झाडांस आपण पाणी घालतो, व तें सर्व वाढत जाते; तसें ह्यावरील परमेश्वराच्या शब्दाच्या चार अक्षरांनीं झाडें, त्याच्या फांद्या, व फळें फुलें इत्यादी पाण्याप्रमाणें वाढत जातात. (ज्या प्रमाणें जंगलांतील झाडें यांस कोणी पाणी देणारा नाहीं, तरी ती वाढतात, त्याप्रमाणें परमेश्वराच्या या वरील नांवाच्या शक्तिनें ती वाढत जातात.) तसेंच मनुष्याचें जिवनही हीं परमेश्वराच्या नांवानें वाढते.

שֵׁם יְדִיעַ · וּבְהוֹן אִתְקְרִיאוּ מַלְאָכַיָּא · וְאַנְתְּ לֵית לָךְ
שֵׁם יְדִיעַ דְּאַנְתְּ הוּא מְמַלֵּא כָּל שְׁמָהָן וְאַנְתְּ הוּא שְׁלִימוּ
דְּכֻלֵּהוּ · וְכַד אַנְתְּ תִּסְתַּלָּק מִנְּהוֹן · אִשְׁתְּאֲרוּ כֻּלֵּהוּ
שְׁמָהָן בְּגוּפָא בְּלֹא נִשְׁמְתָא · אַנְתְּ חַכִּים וְלָאוּ בְּחָכְמָה
יְדִיעָא אַנְתְּ הוּא מֵבִין וְלָאוּ מִבִּינָה יְדִיעָא · וְלֵית לָךְ אָתָר
יְדִיעָא אֶלָּא לְאִשְׁתְּמוֹדְעָא תֻּקְפָּךְ וְחֵלָךְ לִבְנֵי נָשָׁא ·
וּלְאַחְזָאָה לוֹן · אֵיךְ אִתְנְהִיג עַלְמָא בְּדִינָא וּבְרַחֲמֵי
דְּאִינוּן צֶדֶק וּמִשְׁפָּט כְּפוּם עוֹבָדֵהוֹן דִּבְנֵי נָשָׁא דִּין
אִיהוּ גְּבוּרָה מִשְׁפָּט עַמּוּדָא · דְּאַמְצָעִיתָא · צֶדֶק
מַלְכוּתָא קַדִּישָׁא · מֹאזְנֵי צֶדֶק תְּרֵן סַמְכֵי קְשׁוֹט ·
הִין צֶדֶק אוֹת בְּרִית · כּוֹלָּא לְאַחְזָאָה אֵיךְ אִתְנְהִיג
עַלְמָא אֲבָל לָאוּ דְּאִית לָךְ צֶדֶק יְדִיעָא דְּאִיהוּ דִּין וְלָאוּ
מִשְׁפָּט יְדִיעָא דְּאִיהוּ רַחֲמֵי · וְלָאוּ מִכֹּל אִלֵּין מִדּוֹת
כְּלַל קוּם רִבִּי שִׁמְעוֹן וְיִתְחַדְּשׁוּן מִלִּין עַל יְדָךְ · דְּהָא
רְשׁוּתָא אִית לָךְ לְגַלָּאָה רָזִין טְמִירִין עַל יְדָךְ מַה דְּלָא
אִתְיְהִיב רְשׁוּ לְגַלָּאָה לְשׁוּם בַּר נָשׁ עַד כְּעַן :

קָם רִבִּי שִׁמְעוֹן פָּתַח וְאָמַר לְךָ יְהוָה הַגְּדוּלָה וְהַגְּבוּרָה
וכו׳ עִלָּאִין שְׁמָעוּ אִינוּן דְּמִיכִין דְּחֶבְרוֹן וְרַעְיָא
מְהֵימְנָא אִתְּעָרוּ מִשְּׁנַתְכוֹן · הַקִּיצוּ וְרַנֵּנוּ שׁוֹכְנֵי עָפָר ·
אִלֵּין אִינוּן צַדִּקַיָּא דְּאִינוּן מִסִּטְרָא דְּהַהוּא דְּאִתְמַר בָּהּ
אֲנִי וְשֵׁנָה וְלִבִּי עֵר · וְלָאוּ אִינוּן מֵתִים וּבְגִין דָּא אִתְמַר
בְּהוֹן הַקִּיצוּ וְרַנֵּנוּ וכו׳ רַעְיָא מְהֵימְנָא אַנְתְּ וְאֲבָהָן
הַקִּיצוּ וְרַנֵּנוּ לְאִתְעַרוּתָא דִּשְׁכִנְתָּא דְּאִיהִי יְשֵׁנָה
כְּגָלוּתָא · דְּעַד כְּעַן צַדִּיקַיָּא כֻּלְּהוּ דְּמִיכִין וְשִׁנְתָּא

हे जगाच्या स्वामी ! तूं सर्वांत श्रेष्ठ आहेस. तूं कारण पुरें करणारा आहेस. पाणी घातल्याशिवाय जसें झाड परमेश्वराच्या शक्तीनें पाणी घातल्याप्रमाणें वाढते तसें मनुष्यास जीवन आहे, व ह्या प्रमाणें व ह्या शक्तिनें झाडांतही प्राण आहे. या पृथ्वींत तुझ्यासारिखा व तुझ्यासारिखा–जाणणारा कोणी नाहीं. तूं आकाश उत्पन्न केलेंस, व पृथ्वी उत्पन्न केलीस, त्यांतून सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्र, ग्रह, केलेस, व भूमींतून झाडें, गवत, एदेन बागेप्रमाणें बाग, जनावरांकरितां हिरवळ वनपशु पक्षी, मासे, बकरी, गाई इत्यादी जनावरें बनविलींस, व त्यांतून तूं मनुष्य उत्पन्न केलास, कारण वरील परमेश्वराच्या मार्गाप्रमाणें चालण्याकरितां केला गेला. वर काय आहे, खाली काय आहे, हे त्यानें समजावें. तुझ्याशिवाय कोणी जाणणारा नाहीं, हे फक्त मनुष्यानें जाणावें, म्हणून केलेले आहे, ही सर्व आश्चर्यांची गोष्ट होय.

तुझे एकत्व कशांतच नाहीं, यावरून आम्हीं जाणतो कीं, तूं सर्वांचा धनी आहेस. या **सेफिरोथला** प्रत्येकी एक एक नांवही तूं दिलें आहेस, व ह्या ह्या नांवानें **मलाख्हीम** लोकांस उत्पन्न करून त्यांस ही नावें दिलींस. परमेश्वरा ! तुझें कोणतें भव्य नांव आहे; ह्या नांवानें हाक मारावी हें सुद्धां आह्मांस समजूं शकत नाहीं, तुझें नांव पूर्णतेनें भरलेलें आहे. असें आपण बोलूं शकतो. त्या पूर्णतेच्या नावांतील एक अंशसुद्धां निघून गेल्यास आपल्या शिवाय शरीर याप्रमाणें स्थिती होतें; तूं मोठा विद्वान आहेस, व बिन शिकविल्या शिवाय आहेस, तूं मोठा बुद्धिमान आहेस, व तीही बिन शिकविल्या शिवाय आहें. तुझी बसण्या उठण्याची जागा तूं स्वतः जाणतोस, व ती ठरविलेली नाहीं. तुझा पराक्रम जाणण्याकरितां मनुष्यास वरील गोष्टी दिल्या गेल्या; व तेणेंकडून त्यास दाखविले जाते कीं, परमेश्वर या जगास शिक्षा व दया [**सेदेखउमीशपात**] याकडून कसें चालवितो हें समजतें. **दीन** व **रहामीम** जो आहे तो **सेदेख** व **मिशपात** धरून मनुष्य ज्याप्रमाणें चालतो, त्या प्रमाणें तूं त्यास फळ देतोस.

दीन हाग्गेबुराचे दर्शक आहे. **मिशपात** हा मधील खांब आहें व तो **रहामीम** आहे, व त्यावर पृथ्वी आहे. **सेदेख** परमेश्वराच्या **मलखूतचे** दर्शक आहे. या दोन खांबामध्यें सत्य तराजू आहे व त्याचे दोन आजूबाजूचे वजन करण्याचे भाग आहेत. **सेदेख हाब्बेरीथ कोदेशाचा** शब्द आहे.

(**बेरीथ कोदेशः** ह्मणजे सुंता–हा पवित्र करार आहे व त्यावर परमेश्वराचा शिक्का आहे, ज्याप्रमाणें न्याय सभेंतील हुकूमाप्रमाणें एखाद्या घरावर किंवा दुकानावर शिक्का मारिल्यास कोणी काढूं शकत नाहीं अशा शिक्क्यास जो कोणीं तोडील, किंवा हात लावील त्यास कडक शिक्षा मिळतें. त्याचप्रमाणें जो मनुष्य सुंतेचा पवित्र करार याचा शिक्का तोडून ह्मणजे बाहेर व्यवहार करण्यास जातो व त्यास डाग लाविंतो, त्यास वरील कोर्टाच्या शिक्षे प्रमाणे परमेश्वराकडून कडक शिक्षा मिळतें) हें सर्व या जगांत आह्मी कसें चालावें तें शिकविंतो.

בְּחוֹרֵחוֹן · מִיָּד יְהֵיבַת שְׁכִינְתָּא תְּלַת קָלִין לְנַבִּי רַעְיָא מְהֵימְנָא וְיֵימָא לֵיהּ קוּם רַעְיָא מְהֵימְנָא דְּהָא עָלָךְ אִתְמַר קוֹל דּוֹדִי דוֹפֵק לְנַבָּאי בְּאַרְבַּע אַתְוָן דִּילֵהּ · וְיֵימָא בְּדָהוֹן פְּתְחִי לִי אֲחוֹתִי רַעְיָתִי יוֹנָתִי תַּמָּתִי דְּהָא תָּם עָוֹנֵךְ בַּת צִיּוֹן לֹא יוֹסִיף לְהַגְלוֹתֵךְ שֶׁרֹאשִׁי נִמְלָא טַל מָאי נִמְלָא טַל אֶלָּא אָמַר קְדוּשָׁא בְּרִיךְ הוּא אֲנָּה חֲשִׁיבַת דְּמִיוֹמָא דְּאִתְחָרֵב בֵּי מַקְדְּשָׁא דְּעָאלְנָא בְּבֵיתָא דִילִי וְעָאלְנָא בְּיִשּׁוּבָא · לָאו הָכִי דְּלָא עָאלְנָא כָּל זִמְנָא דְּאַנְתְּ בְּגָלוּתָא הֲרֵי לָךְ סִימָנָא שֶׁרֹאשִׁי נִמְלָא טַל ה״א שְׁכִינְתָּא בְּגָלוּתָא · שְׁלִימוּ דִילָהּ וְחַיִּים דִּילָהּ אִיהוּ טַל · וְדָא אִיהוּ יו״ד ה״א וא״ו וְה״א אִיהִי שְׁכִינְתָּא דְּלָא רְחֲשָׁבָן טַל אֶלָּא יו״ד ה׳ וא״ו דְּסָלִיקוּ אַתְוָן לְחֶשְׁבָּן טַל · דְּאִיהִי מַלְיָא לִשְׁכִינְתָּא מִגְּבִיעוּ דְּכָל מְקוֹרִין עִלָּאִין · מִיָּד קָם רַעְיָא מְהֵימְנָא וַאֲבָהָן קַדִּישִׁין עִמֵּיהּ עַד כְּאן רָזָא דְּיִחוּדָה · בָּרוּךְ יְהוָה לְעוֹלָם אָמֵן וְאָמֵן

(אם יש מנין קדיש דרבנן וקודם יאמר זח׳)

אָמַר רִבִּי יְהוֹשֻׁעַ בֶּן־לֵוִי · עָתִיד הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא · לְהַנְחִיל לְכָל־צַדִּיק וְצַדִּיק שְׁלֹשׁ מֵאוֹת וַעֲשָׂרָה עוֹלָמוֹת שֶׁנֶּאֱמַר · לְהַנְחִיל אֹהֲבַי יֵשׁ וְאֹצְרוֹתֵיהֶם אֲמַלֵּא : אָמַר רִבִּי שִׁמְעוֹן בֶּן־חֲלַפְתָּא · לֹא מָצָא הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא · כֶּלִי מַחֲזִיק בְּרָכָה לְיִשְׂרָאֵל אֶלָּא הַשָּׁלוֹם · שֶׁנֶּאֱמַר · יְיָ עֹז לְעַמּוֹ יִתֵּן יְיָ יְבָרֵךְ אֶת־עַמּוֹ בַשָּׁלוֹם :

(**सेदेख** जो आहे तो **दीन** आहे **दीन** म्हणजे ही कडक शिक्षा आहे त्याच्यांत कांहीं अदला बदली करूं शकत नाही जसे न्याय आहें तसेंच झाले पाहिजे, हें अगदी तंतोतंत तराजूच्या काट्या प्रमाणे आहे यांत माप बरोबर दिलें पाहिजे.)

मिशपात जें आहे तें **राहामीम** आहे. म्हणजे दया आहे, त्याच्यांत आपण विनंती करून फेर फार करूं शकतो, कारण **राहामीम** हा दयेचा गूण आहे हें सर्व मनुष्या करितां होय. **सेदेखची** शिक्षा कोणास लागूं पडते ? तर जो कोणी **मेर्जादचा** जाणून बुजून गुन्हा करितो, त्या मनुष्या करितां होय.

मिशपातची शिक्षा कोणास लागूं पडतें ? तर जो कोणी **शेगेगचा** भुलचुकीनें गुन्हा करितो त्यां करितां होय. **सेदेख** व **मिशपात** हा न्याय तुजकरिता नाहीं परंतु मनुष्या करिता आहें.

(एलीयाहु हन्नाबी म्हणतो) रीब्बी शिमओन ऊठ व हातून **तोराचे** नवे वर्तमान करून दे; व परमेश्वराच्या ज्या गुप्त गोष्टी आहेत त्यांचा खुलासा कर. आज पर्यंत तुझ्याशिवाय कोणत्याही मनुष्यास **तोराचा** खुलासा करण्या करितां हुकूम दिलेला नाहीं. ज्या दिवसापासून **नेबुआ** इस्राएलांतून बंद झाला, त्या दिवसापासून त्याचा खुलासा कोणास मिळालेला नाहीं.

रीब्बी शिमओननें उठून बोलण्यास आरंभ केला. शास्त्रांत लिहिलें आहे कीं (हे परमेश्वरा, मोठेपणा, व पराक्रम, व तेज, व जय, व मान ही तुझी, कारण कीं; जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें आहे, हें परमेश्वरा सर्व राजावर आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे.) या वाक्यावर तो ह्मणतोः–वरील लोकांनो ऐका. व हेब्रोन-मध्यें निजणारे लोक (अब्राहाम–इसहाक–याआकोब) व **रायामेहेमना** (मोशे रब्बेनु) तुमच्या निद्रेंतून उठा. कारण शास्त्रांत लिहिलें आहेः—

"मातींत बसणाऱ्या लोकांनो" उठा, व परमेश्वराची स्तुती करा. हें वाक्य कोणा-संबंधी ह्मटलेलें आहे, तर ते नीतीवंत लोकासंबंधी आहे. आतां पुढील वाक्य शास्त्रांत जें लिहिलेलें आहे तें हें कीं "मी निजलेला आहे; परंतु माझे अंतःकरण जागें आहे, तर तें मेलेलें नाहीं. ह्मणून हें वाक्य त्यावर ह्मटलेले आहे.

"हाखीसु वेरन्नेनू"—"मातींत बसणाऱ्या लोकांनो" उठून परमेश्वराची स्तुती करा. तर **राया गेहेमना** (मोशे रब्बेनु) व तुझे वडील लोक (पूर्वज, आब्राहाम, इसहाक, व याआकोब) उठा, व शेखीनाची पूर्णता होण्याकरितां परमेश्वराची स्तुती करा. कारण शेखीना जो आहे, तो **गालूथ** मध्यें निजलेला आहे. (शेखीना **गालूथ** मध्यें म्ह,–दुःखांत पसरलेला आहे.) व (निजलेला आहे) म्ह० जेव्हां इस्राएलाचें राज्य गेले, व येरूशालेमेचा नाश झाला, व इस्राएल लोक जगभर पसरले गेले, व दुःखांत पडले, तेव्हां शेखीना निजला. व परमेश्वराच्या प्रितीमुळें, परमेश्वरही आपल्या संगती दुःख भोगीत आहे, व मशिहा येईपर्यंत आपण लोक दुःखात राहाणार, व त्याप्रमाणें शेखीनाही राहाणार.

רִבֵּי חַנַנְיָא בֶּן־עֲקַשְׁיָא אוֹמֵר · רָצָה הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא
לְזַכּוֹת אֶת־יִשְׂרָאֵל · לְפִיכָךְ הִרְבָּה לָהֶם תּוֹרָה
וּמִצְוֹת · שֶׁנֶּאֱמַר יְיָ חָפֵץ לְמַעַן צִדְקוֹ · יַגְדִּיל תּוֹרָה
וְיַאְדִּיר :

יִתְגַּדַּל וְיִתְקַדַּשׁ שְׁמֵיהּ רַבָּא (אמן) · בְּעָלְמָא דִּי־בְרָא
כִּרְעוּתֵיהּ וְיַמְלִיךְ מַלְכוּתֵיהּ · וְיַצְמַח פֻּרְקָנֵיהּ
וְיָקָרֵב מְשִׁיחֵיהּ(אמן)· בְּחַיֵּיכוֹן וּבְיוֹמֵיכוֹן וּבְחַיֵּי דְכָל־בֵּית
יִשְׂרָאֵל בַּעֲגָלָא וּבִזְמַן קָרִיב וְאִמְרוּ אָמֵן : יְהֵא שְׁמֵיהּ
רַבָּא מְבָרַךְ לְעָלַם לְעָלְמֵי עָלְמַיָּא יִתְבָּרַךְ וְיִשְׁתַּבַּח וְיִתְפָּאַר
וְיִתְרוֹמַם · וְיִתְנַשֵּׂא · וְיִתְהַדַּר · וְיִתְעַלֶּה · וְיִתְהַלַּל · שְׁמֵיהּ
דְּקוּדְשָׁא בְּרִיךְ הוּא · לְעֵלָּא מִן כָּל־בִּרְכָתָא · שִׁירָתָא
תֻּשְׁבְּחָתָא · וְנֶחֱמָתָא · דַּאֲמִירָן בְּעָלְמָא · וְאִמְרוּ אָמֵן :

עַל יִשְׂרָאֵל וְעַל רַבָּנָן וְעַל תַּלְמִידֵיהוֹן וְעַל כָּל־תַּלְמִידֵי
תַלְמִידֵיהוֹן · דְּיָתְבִין וְעָסְקִין בְּאוֹרַיְתָא קַדִּשְׁתָּא ·
דִּי בְאַתְרָא הָדֵין וְדִי בְכָל־אֲתַר וַאֲתַר · יְהֵא לָנָא וּלְהוֹן
וּלְכוֹן שְׁלָמָא חִנָּא וְחִסְדָּא וְחַיֵּי אֲרִיכֵי וּמְזוֹנֵי רְוִיחֵי
וְרַחֲמֵי · מִן קֳדָם אֱלָהָא מָארֵיהּ שְׁמַיָּא וְאַרְעָא וְאִמְרוּ אָמֵן :

יְהֵא שְׁלָמָא רַבָּא מִן שְׁמַיָּא · חַיִּים וְשָׂבָע וְיֵשׁוּעָה
וְנֶחָמָה וְשֵׁיזָבָא וּרְפוּאָה וּגְאוּלָה וּסְלִיחָה וְכַפָּרָה
וְרֶוַח וְהַצָּלָה · לָנוּ וּלְכָל־עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן :

עוֹשֶׂה שָׁלוֹם בִּמְרוֹמָיו · הוּא בְרַחֲמָיו יַעֲשֶׂה שָׁלוֹם
עָלֵינוּ · וְעַל כָּל עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן :

कोठपर्यंत नितीवंत लोक निजून राहातील ? उठा, हे बोलल्या बरोबर शेखीनानें तीन वेळा आवाज केला ह्मणजे मोशे रब्बेनुला तीन वेळा हांक मारिली. तीन वेळा हांक मारिली व **राया मेहेमनास्** ह्मणाला; हे **राया मेहेमना** उठ. (मोशे रब्बेनु) तुझ्या-वर बोलले आहे कीं " माझ्या मित्राचा मधूर आवाज येत आहे, व तो चांगला वाटत आहे, व याकरितां मी तुझा दरवाजा ठोकीत आहे, व तुला चार पदव्या देत आहे, व माझ्या करितां तूं स्तुती करण्याची सुरूवात कर. " हे माझ्या बहिणी–हे माझ्या मैत्रिणी–हे माझ्या प्रिये–हे माझ्या निर्दोषे " तुझ्या पापाचा शेवट झाला (म्ह० माफी झाली) हे सिंयोनेच्या मंडळीनो ! अजून तुम्हाला मी पाडावपणांत टाकणार नाहीं. परमेश्वर ह्मणतो कीं, " माझ्या डोक्यांत दंव भरलेला आहे " ह्मणजे याचा अर्थ असा आहे, परमेश्वर तो धन्य असो, तो इस्राएलांस म्हणतो कीं, तुम्ही असें समजू नका, ज्या दिवसांपासून पवित्र मंदिराचा (येरूशालेम) नाश झाला त्या दिवसा पासून अजूनपर्यंत मी तेथें गेलेला नाहीं. [शेखीना] व जाणार नाहीं. व मला विश्रांति नाहीं, व इस्राएलांसंगती मीही **गालूथ** मध्यें (दुख:मध्यें) आहे. जेव्हां तुह्मीं पाडावपणांतून निघाल, व मशिहा येईल व पवित्र मंदिर बांधले जाईल व ते इस्राएलांस मिळेल, तेव्हां मी तुमच्या संगती पवित्र मंदिरात येईन. ह्मणून लिहिले आहे कीं, " माझ्या डोक्यांत देव भरलेला आहे " समजा कीं, जसें येरूशालेमेंत एक पवित्र मंदिर आहे, तसें दुसरे पवित्र मंदिर आकाशांत आहे, खालील पवित्र मंदिराचा नाश झाला, परंतु आकाशांतील मंदिर जश्याच्या तसेंच आहे. परमे-श्वराची अशी मर्जी होती कीं इस्राएल लोकांस येरूशालेमेच्या मंदिराचा नाश झाला ह्मणून वरील मंदिरांत त्यांस घेऊन जावे. परंतु मोशे रेब्बेनुची अशी इच्छा नव्हती.

परमेश्वराचे नांव י ה ו ה जे आहे त्यांत चार अक्षरें आहेत व ह्या शब्दां-तील चौथें अक्षर ה जे आहे ते वर लिहिल्या प्रमाणें इस्राएलांसंगती **गालूथ** मध्यें आहे. (יהוה) जे आहे, त्यांतील पहिले अक्षर י होय. याच्या शक्तिनें इस्राएलांस मिसरांतून काढीले, व समुद्रांतून पार नेले, व त्यांस तोरा दिला.

(दुसरे अक्षर ה जे आहे याच्या शक्तिनें इस्राएलांस पवित्र भुमींत नेले गेले. व एकोणचाळीस राजे आपल्या ताब्यांत दिले, व त्या दिवसांपासून त्या राज्यांस व त्यांच्या प्रजेस आपल्या पवित्र मंदिरांत येण्याचें बंद केलें.)

(ו अक्षर परमेश्वराच्या पवित्र नामाचे जे तिसरें अक्षर आहे त्याच्या शक्तिनें इस्राएलांस बाबेलच्या पाडावपणांतून काढून पुन: येरूशालेमेंत आणिलें. व दुसरें पवित्र मंदिर बांधले गेले व आपल्या शत्रूपासून दूर केलें.)

אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ זָכְרֵנוּ בְּזִכָּרוֹן טוֹב מִלְּפָנֶיךָ ·
וּפָקְדֵנוּ בִּפְקוּדַת יְשׁוּעָה וְרַחֲמִים מִשְּׁמֵי שְׁמֵי
קֶדֶם · וְזָכֹר־לָנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אַהֲבַת הַקְּדֹמוֹנִים ·
אַבְרָהָם יִצְחָק וְיִשְׂרָאֵל עֲבָדֶיךָ · אֶת־הַבְּרִית וְאֶת־
הַחֶסֶד · וְאֶת־הַשְּׁבוּעָה שֶׁנִּשְׁבַּעְתָּ לְאַבְרָהָם אָבִינוּ
בְּהַר הַמֹּרִיָּה · וְאֶת־הָעֲקֵדָה שֶׁעָקַד אֶת־יִצְחָק בְּנוֹ עַל־
גַּבֵּי הַמִּזְבֵּחַ · כַּכָּתוּב בְּתוֹרָתֶךָ :

וַיְהִי אַחַר הַדְּבָרִים הָאֵלֶּה וְהָאֱלֹהִים נִסָּה אֶת־אַבְרָהָם
וַיֹּאמֶר אֵלָיו אַבְרָהָם וַיֹּאמֶר הִנֵּנִי : וַיֹּאמֶר קַח־
נָא אֶת־בִּנְךָ אֶת־יְחִידְךָ אֲשֶׁר־אָהַבְתָּ אֶת־יִצְחָק וְלֶךְ־
לְךָ אֶל־אֶרֶץ הַמֹּרִיָּה וְהַעֲלֵהוּ שָׁם לְעֹלָה עַל אַחַד
הֶהָרִים אֲשֶׁר אֹמַר אֵלֶיךָ : וַיַּשְׁכֵּם אַבְרָהָם בַּבֹּקֶר
וַיַּחֲבֹשׁ אֶת־חֲמֹרוֹ וַיִּקַּח אֶת־שְׁנֵי נְעָרָיו אִתּוֹ וְאֶת
יִצְחָק בְּנוֹ וַיְבַקַּע עֲצֵי עֹלָה וַיָּקָם וַיֵּלֶךְ אֶל־הַמָּקוֹם
אֲשֶׁר־אָמַר־לוֹ הָאֱלֹהִים : בַּיּוֹם הַשְּׁלִישִׁי וַיִּשָּׂא אַבְרָהָם
אֶת־עֵינָיו וַיַּרְא אֶת־הַמָּקוֹם מֵרָחֹק : וַיֹּאמֶר אַבְרָהָם
אֶל־נְעָרָיו שְׁבוּ־לָכֶם פֹּה עִם־הַחֲמוֹר וַאֲנִי וְהַנַּעַר נֵלְכָה
עַד־כֹּה וְנִשְׁתַּחֲוֶה וְנָשׁוּבָה אֲלֵיכֶם : וַיִּקַּח אַבְרָהָם אֶת־
עֲצֵי הָעֹלָה וַיָּשֶׂם עַל־יִצְחָק בְּנוֹ וַיִּקַּח בְּיָדוֹ אֶת־הָאֵשׁ
וְאֶת־הַמַּאֲכֶלֶת וַיֵּלְכוּ שְׁנֵיהֶם יַחְדָּו : וַיֹּאמֶר יִצְחָק אֶל־
אַבְרָהָם אָבִיו וַיֹּאמֶר אָבִי וַיֹּאמֶר הִנֵּנִי בְנִי וַיֹּאמֶר הִנֵּה
הָאֵשׁ וְהָעֵצִים וְאַיֵּה הַשֶּׂה לְעֹלָה : וַיֹּאמֶר אַבְרָהָם

आतां चवथें अक्षर ה मात्र राहिले, ते इस्राएलांबरोबर अजून **गालूथ** मध्यें आहे, व जेव्हां मशिहा येईल, व इस्राएलांची सुटका होईल, तेव्हां ה ही सुटेल. हे सर्व परमेश्वराची इस्राएलांवर प्रिती असल्यामुळें केले गेलें आहे. व ה हें अक्षर गेल्यानें वरील तीन अक्षरें राहिली. י"ו ד ה"א ו"א या अक्षरांची गणती ३९ होय. १३ + ६ + २० = ३९.

वती טל = ३९ च्या गणतीप्रमाणें ठेविलेली आहेत आतां ה काढिल्यानें बाकी י"ו ד ה"א ו"א राहिली व त्याची गणती ३९ होईल (טל) טל = ३९ जो आहे तो י"ו ד ה"א ו"א च्या गणतींत आहे.

हें ऐकून मोशे रब्बेनु संगती वडील लोक (आब्राहाम, इसहाक, व याआकोब) उठले. येथपर्यंत परमेश्वराच्या ऐकत्वाचें स्पष्टीकरण आहे.

परमेश्वर सदासर्वकाळ सुवदित असो, आमेन वे आमेन.

हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा ! तुजपुढें चांगल्या आठवणीने आमची आठवण करून पूर्वीच्या आकाशांच्या आकाशांतून दयेच्या व तारणाच्या दर्शनाकडून आम्हास दर्शन दे. आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा, (आमचे) पूर्वज आब्राहाम, इसहाक व याआकोब यांजवरील तुझी प्रीति, आब्राहामाबरोबर केलेला करार; त्याजवरील दया व त्याजवळ वाहिलेली शपथ; आणि त्याचा पुत्र इसहाक याचें स्थंडिलाच्या बाजूवर बांधलें जाणें तूं आठीव. जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं:—

आणि या गोष्टीनंतर असें झालें कीं, देवानें आब्राहामाची परीक्षा घेतली, आणि त्याला म्हटलें, हे आब्राहामा; तेव्हां हा म्हणाला पाहा मी येथें आहे. आणि त्यानें म्हटलें तूं आपला पुत्र, आपला एकुलता इसहाक, ज्यावर तूं प्रीति करितोस त्याला घेऊन मोरीया देशांत जा, आणि तेथील डोंगरांमधील एक जो मी तुला सांगेन त्यावर त्याचें होमरूप अर्पण कर. मग आब्राहामानें सकाळीं उठून आपलें गाढव आवळलें, आणि आपल्या तरुणांतले दोन व आपला पुत्र इसहाक आपणांबरोबर घेतलें, आणि होमाचीं लांकडें फोडलीं; मग उठून जी जागा देवानें सांगितली होती तिकडे चालता झाला. मग तिसऱ्या दिवशीं आब्राहामानें आपली दृष्टि वर करून ती जागा दुरून पाहिली. मग आब्राहाम आपल्या तरण्यांस म्हणाला, एथें गाढवाजवळ बसा, आणि मी व मुलगा तिकडे जाऊन भजन करूं आणि माघारें तुम्हाकडे येऊं. मग आब्राहामानें होमाचीं लांकडे घेऊन आपला पुत्र इसहाक यावर ठेवलीं; आणि आपल्या हातीं विस्तव व सुरी घेतली; आणि ते दोघे संगती गेले. तेव्हां इसहाकानें आपला बाप आब्राहाम याला ह्मटलें

אֱלֹהִים יִרְאֶה־לּוֹ הַשֶּׂה לְעֹלָה בְּנִי וַיֵּלְכוּ שְׁנֵיהֶם יַחְדָּו׃
וַיָּבֹאוּ אֶל־הַמָּקוֹם אֲשֶׁר אָמַר־לוֹ הָאֱלֹהִים וַיִּבֶן שָׁם
אַבְרָהָם אֶת־הַמִּזְבֵּחַ וַיַּעֲרֹךְ אֶת־הָעֵצִים וַיַּעֲקֹד אֶת־
יִצְחָק בְּנוֹ וַיָּשֶׂם אֹתוֹ עַל־הַמִּזְבֵּחַ מִמַּעַל לָעֵצִים׃
וַיִּשְׁלַח אַבְרָהָם אֶת־יָדוֹ וַיִּקַּח אֶת־הַמַּאֲכֶלֶת לִשְׁחֹט אֶת־
בְּנוֹ׃ וַיִּקְרָא אֵלָיו מַלְאַךְ יְהוָה מִן־הַשָּׁמַיִם וַיֹּאמֶר אַבְרָהָם
אַבְרָהָם וַיֹּאמֶר הִנֵּנִי׃ וַיֹּאמֶר אַל־תִּשְׁלַח יָדְךָ אֶל־הַנַּעַר
וְאַל־תַּעַשׂ לוֹ מְאוּמָה כִּי עַתָּה יָדַעְתִּי כִּי־יְרֵא אֱלֹהִים
אַתָּה וְלֹא חָשַׂכְתָּ אֶת־בִּנְךָ אֶת־יְחִידְךָ מִמֶּנִּי׃ וַיִּשָּׂא
אַבְרָהָם אֶת־עֵינָיו וַיַּרְא וְהִנֵּה־אַיִל אַחַר נֶאֱחַז בַּסְּבַךְ
בְּקַרְנָיו וַיֵּלֶךְ אַבְרָהָם וַיִּקַּח אֶת הָאַיִל וַיַּעֲלֵהוּ לְעֹלָה תַּחַת
בְּנוֹ׃ וַיִּקְרָא אַבְרָהָם שֵׁם־הַמָּקוֹם הַהוּא יְהוָה יִרְאֶה אֲשֶׁר
יֵאָמֵר הַיּוֹם בְּהַר יְהוָה יֵרָאֶה׃ וַיִּקְרָא מַלְאַךְ יְהוָה אֶל־
אַבְרָהָם שֵׁנִית מִן־הַשָּׁמָיִם׃ וַיֹּאמֶר בִּי נִשְׁבַּעְתִּי נְאֻם־
יְהוָה כִּי יַעַן אֲשֶׁר עָשִׂיתָ אֶת־הַדָּבָר הַזֶּה וְלֹא חָשַׂכְתָּ
אֶת־בִּנְךָ אֶת יְחִידֶךָ׃ כִּי־בָרֵךְ אֲבָרֶכְךָ וְהַרְבָּה אַרְבֶּה
אֶת־זַרְעֲךָ כְּכוֹכְבֵי הַשָּׁמַיִם וְכַחוֹל אֲשֶׁר עַל שְׂפַת הַיָּם
וְיִרַשׁ זַרְעֲךָ אֵת שַׁעַר אֹיְבָיו׃ וְהִתְבָּרְכוּ בְזַרְעֲךָ כֹּל
גּוֹיֵי הָאָרֶץ עֵקֶב אֲשֶׁר שָׁמַעְתָּ בְּקֹלִי׃ וַיָּשָׁב אַבְרָהָם אֶל
נְעָרָיו וַיָּקֻמוּ וַיֵּלְכוּ יַחְדָּו אֶל־בְּאֵר שָׁבַע וַיֵּשֶׁב אַבְרָהָם
בִּבְאֵר שָׁבַע׃

(אחר פרשת העקדה רבש"ע אומר)

וְשָׁחַט אֹתוֹ עַל יֶרֶךְ הַמִּזְבֵּחַ צָפֹנָה לִפְנֵי יְהוָה וְזָרְקוּ בְּנֵי
אַהֲרֹן הַכֹּהֲנִים אֶת־דָּמוֹ עַל־הַמִּזְבֵּחַ סָבִיב׃

माझ्या बापा, आणि हा म्हणाला, माझ्या पुत्रा, पाहा मी एथें आहे; मग त्यानें म्हटलें, पाहा विस्तव व लांकडें आहेत; परंतु होमाचें कोंकरूं कोठें आहे ? तेव्हां आब्राहाम म्हणाला, माझ्या पुत्रा, देव आपणासाठीं होमाचें कोंकरूं पाहून मिळवील; तसे ते दोघे संगतीं गेले; आणि जी जागा देवानें त्याला सांगितली होती तेथें ते पोंचले; मग आब्राहामाने तेथें वेदी बांधली व लांकडे रचिलीं, आणि आपला पुत्र इसहाक याला बांधलें आणि वेदीवरच्या लांकडांवर त्याला ठेवलें. मग आब्राहामानें आपला हात लांबवून आपला पुत्र वधायासाठीं सुरी घेतली. तेव्हां परमेश्वराचा दूत आकाशांतून त्याला हाक मारून बोलला, आब्राहामा, आब्राहामा; हा म्हणाला, पाहा मी एथें आहे. मग तो बोलला, तूं मुलावर आपला हात टाकूं नको व त्याला कांहींच करूं नको, कां तर आतां म्या जाणलें कीं, तूं देवाला भितोस, कां कीं त्वां आपला पुत्र आपला एकुलता याला मजपासून राखलें नाहीं. तेव्हां आब्राहामानें आपली दृष्टि वर करून पाहिलें, आणि पाहा मागें एक मेंढा झुडपांत आपल्या शिंगांनीं अडकला होता; तेव्हां आब्राहामानें जाऊन तो मेंढा घेतला आणि आपल्या पुत्राच्या ठिकाणीं तो होमरूपें अर्पिला. मग आब्राहामाने त्या ठिकाणाचें नांव यहोवायिरए असें ठेविलें; यास्तव आज असें म्हणतात, परमेश्वराच्या डोंगरावर पाहण्यांत येतें. आणि परमेश्वराच्या दूतानें आकाशांतून आब्राहामाला दुसऱ्यानें हांक मारून म्हटलें कीं परमेश्वर बोलतो, म्या आपली शपथ केली आहे कीं, त्वां ही गोष्ट केली, म्हणजे तुझ्या पुत्राला तुझ्या एकुलत्याला राखले नाहीं, यास्तव मी तुला आशीर्वाद देईन, आणि तुझें संतान आकाशांतील ताऱ्यांसारखे व समुद्राच्या कांठावरील रेतीसारखें वाढवीन; आणि तुझें संतान आपल्या वैऱ्यांच्या वेशींचें वतन पावेल. आणि तुझ्या संतानाकडून पृथ्वींतील सर्व राष्ट्रें आशिर्वाद पावतील, कां कीं त्वां माझी गोष्ट ऐकली आहे. मग आब्राहाम आपल्या तरण्यांकडे माघारें आला; आणि ते उठून बैरशेब्बास संगतीं गेले, आणि आब्राहाम बेरशेब्बांत राहत होता.

רִבּוֹנוֹ שֶׁל עוֹלָם · כְּמוֹ שֶׁכָּבַשׁ אַבְרָהָם אָבִינוּ אֶת
רַחֲמָיו לַעֲשׂוֹת רְצוֹנְךָ בְּלֵבָב שָׁלֵם · כֵּן יִכְבְּשׁוּ
רַחֲמֶיךָ אֶת כַּעַסֶךָ · וְיִגְוֹלוּ רַחֲמֶיךָ עַל מִדּוֹתֶיךָ · וְתִתְנַהֵג
עִמָּנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ בְּמִדַּת הַחֶסֶד וּבְמִדַּת הָרַחֲמִים ·
וְתִכָּנֵס לָנוּ לִפְנִים מִשּׁוּרַת הַדִּין · וּבְטוּבְךָ הַגָּדוֹל · יָשׁוּב
חֲרוֹן אַפֶּךָ מֵעַמֶּךָ · וּמֵעִירֶךָ · וּמֵאַרְצֶךָ · וּמִנַּחֲלָתֶךָ ·
וְקַיֵּם־לָנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־הַדָּבָר שֶׁהִבְטַחְתָּנוּ בְּתוֹרָתֶךָ ·
עַל יְדֵי מֹשֶׁה עַבְדֶּךָ בֶּאֱמוּר · וְזָכַרְתִּי אֶת־בְּרִיתִי יַעֲקֹב
וְאַף אֶת־בְּרִיתִי יִצְחָק וְאַף אֶת־בְּרִיתִי אַבְרָהָם אֶזְכֹּר
וְהָאָרֶץ אֶזְכֹּר: וְנֶאֱמַר · וְאַף גַּם זֹאת בִּהְיוֹתָם בְּאֶרֶץ
אֹיְבֵיהֶם לֹא מְאַסְתִּים וְלֹא גְעַלְתִּים לְכַלֹּתָם לְהָפֵר
בְּרִיתִי אִתָּם כִּי אֲנִי יְהוָה אֱלֹהֵיהֶם: וְנֶאֱמַר · וְזָכַרְתִּי
לָהֶם בְּרִית רִאשֹׁנִים אֲשֶׁר הוֹצֵאתִי אֹתָם מֵאֶרֶץ מִצְרַיִם
לְעֵינֵי הַגּוֹיִם לִהְיוֹת לָהֶם לֵאלֹהִים אֲנִי יְהוָה: וְנֶאֱמַר ·
וְשָׁב יְהוָה אֱלֹהֶיךָ אֶת־שְׁבוּתְךָ וְרִחֲמֶךָ וְשָׁב וְקִבֶּצְךָ
מִכָּל־הָעַמִּים אֲשֶׁר הֱפִיצְךָ יְהוָה אֱלֹהֶיךָ שָׁמָּה: אִם
יִהְיֶה נִדַּחֲךָ בִּקְצֵה הַשָּׁמָיִם מִשָּׁם יְקַבֶּצְךָ יְהוָה אֱלֹהֶיךָ
וּמִשָּׁם יִקָּחֶךָ: וֶהֱבִיאֲךָ יְהוָה אֱלֹהֶיךָ אֶל־הָאָרֶץ אֲשֶׁר
יָרְשׁוּ אֲבוֹתֶיךָ וִירִשְׁתָּהּ · וְהֵיטִבְךָ וְהִרְבְּךָ מֵאֲבֹתֶיךָ:
וְנֶאֱמַר עַל יַד נְבִיאֶךָ · יְהוָה חָנֵנוּ לְךָ קִוִּינוּ הֱיֵה זְרֹעָם
לַבְּקָרִים אַף יְשׁוּעָתֵנוּ בְּעֵת צָרָה: וְנֶאֱמַר · וְעֵת צָרָה
הִיא לְיַעֲקֹב וּמִמֶּנָּה יִוָּשֵׁעַ: וְנֶאֱמַר · בְּכָל־צָרָתָם לוֹ צָר
וּמַלְאַךְ פָּנָיו הוֹשִׁיעָם בְּאַהֲבָתוֹ וּבְחֶמְלָתוֹ הוּא גְאָלָם

(इसहाकाचे अर्पणाचा भाग वाचल्यानंतर आणि पुढील
" हे जगदीशा " हा भाग वाचण्या पूर्वी हें बोलावें.)

आणि त्यानें वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरासमोर तो (होम पशू) कापावा; मग आहारोनाचे पुत्र याजक यांनीं त्याचें रक्त वेदीवर चहूंकडे शिंपडावें.

हे जगदीशा, जसें आमचा बाप आब्राहाम यानें पूर्ण मनानें तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां आपल्या दयेस जिंकिलें, तसें तुझ्या दयेनें तुझ्या रागास जिंकावें, तुझ्या दयेनें तुझ्या (न्यायत्वाच्या) गुणास अगदीं झांकावें असें कर; आणि आम्हांबरोबर दयेच्या व कृपेच्या गुणाप्रमाणें वर्तून आम्हांस परिमित न्यायाच्या सिमेच्या आंत राख; आणि आपल्या मोठ्या चांगुलपणामुळें आपल्या लोकांवरून, नगरावरून, देशावरून व वतनावरून आपला राग फिरीव. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक मोशे याजकडून तूं आपल्या शास्त्रांत आम्हास अभय वचन दिलेल्या गोष्टी आमचे प्रत्ययास आण. जसें म्हटलें आहे कीं, आणि मी याआकोबासीं जो माझा करार तो आठवीन, आणि इसहाकासींहि जो माझा करार व आब्राहामासींहि जो माझा करार तो आठवीन, आणि मी देशहि आठवीन, आणि असें असतांहि ते आपल्या शत्रुच्या देशांत राहतील, तेव्हां मी त्यांची समाप्ति करावी, आणि त्यांसीं म्यां केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं; आणि त्यांचा कंटाळाहि करणार नाहीं; कांतर मी परमेश्वर त्यांचा देव आहे. तर त्यांच्या पूर्वजांसी जो करार, तो मी त्यांसाठीं आठवीन; कां तर त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा म्हणून म्या राष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी परमेश्वर आहे. तर तुझा देव परमेश्वर तुझे पाडाव करून नेलेल्यांस फिरवील, आणि तुजवर ममता करील; असें ज्या लोकांमध्यें तुझा देव परमेश्वर यानें तुझी दाणादाण केली. त्या सर्वांतून तुला फिरून गोळा करील जरी आकाशाच्या कांठापर्यंत तुला ढकललें असलें, तरी तुझा देव परमेश्वर तुला तेथून गोळा करील; तेथून देखील तुला मिळवून घेईल. आणि तुझ्या पूर्वजांस जो देश वतनाचा होता, त्यांत तुझा देव परमेश्वर तुला आणील, आणि तो तुझ्या वतनाचा होईल; तुझ्या पूर्वजापेक्षांहि तुझें बरें करून तुला वाढवील. आणि (हे देवा,) तुझ्या भविष्यवाद्यांच्या हातूनहि ह्मटलें (लिहिलें) गेलें आहे कीं, हे परमेश्वरा, आह्मावर कृपा कर, आह्मी तुझी वाट पाहिली आहे, प्रत्येक सकाळीं

וַיְנַטְּלֵם וַיְנַשְּׂאֵם כָּל־יְמֵי עוֹלָם׃ וְנֶאֱמַר׳ מִי אֵל
כָּמוֹךָ נֹשֵׂא עָוֹן וְעֹבֵר עַל פֶּשַׁע לִשְׁאֵרִית נַחֲלָתוֹ לֹא
הֶחֱזִיק לָעַד אַפּוֹ כִּי חָפֵץ חֶסֶד הוּא׃ יָשׁוּב יְרַחֲמֵנוּ יִכְבּוֹשׁ
עֲוֹנֹתֵינוּ וְתַשְׁלִיךְ בִּמְצוּלוֹת יָם כָּל־חַטֹּאתָם׃ תִּתֵּן
אֱמֶת לְיַעֲקֹב חֶסֶד לְאַבְרָהָם אֲשֶׁר נִשְׁבַּעְתָּ לַאֲבוֹתֵינוּ
מִימֵי קֶדֶם׳ וְנֶאֱמַר וַהֲבִיאוֹתִים אֶל־הַר קָדְשִׁי וְשִׂמַּחְתִּים
בְּבֵית תְּפִלָּתִי עֹלֹתֵיהֶם וְזִבְחֵיהֶם לְרָצוֹן עַל מִזְבְּחִי כִּי
בֵיתִי בֵּית תְּפִלָּה יִקָּרֵא לְכָל הָעַמִּים׃

אֵלּוּ דְּבָרִים שֶׁאֵין לָהֶם שִׁיעוּר הַפֵּאָה וְהַבִּכּוּרִים וְהָרֵאָיוֹן
וּגְמִילוּת חֲסָדִים וְתַלְמוּד תּוֹרָה׃ אֵלּוּ דְּבָרִים שֶׁאָדָם
עֹשֶׂה אוֹתָם אוֹכֵל מִפֵּרוֹתֵיהֶם בָּעוֹלָם הַזֶּה וְהַקֶּרֶן קַיֶּמֶת
לוֹ לְעוֹלָם הַבָּא׳ וְאֵלּוּ הֵן׳ כִּבּוּד אָב וָאֵם וּגְמִילוּת
חֲסָדִים וּבִקּוּר חוֹלִים וְהַכְנָסַת אוֹרְחִים וְהַשְׁכָּמַת בֵּית
הַכְּנֶסֶת וַהֲבָאַת שָׁלוֹם בֵּין אָדָם לַחֲבֵרוֹ וּבֵין אִישׁ
לְאִשְׁתּוֹ וְתַלְמוּד תּוֹרָה כְּנֶגֶד כֻּלָּם׃

לְעוֹלָם יְהֵא אָדָם יְרֵא שָׁמַיִם בַּסֵּתֶר כְּבַגָּלוּי וּמוֹדֶה עַל
הָאֱמֶת וְדוֹבֵר אֱמֶת בִּלְבָבוֹ׳ וְיַשְׁכִּים וְיֹאמַר רִבּוֹן
הָעוֹלָמִים וַאֲדוֹנֵי הָאֲדוֹנִים לֹא עַל צִדְקֹתֵינוּ אֲנַחְנוּ
מַפִּילִים תַּחֲנוּנֵינוּ לְפָנֶיךָ כִּי עַל רַחֲמֶיךָ הָרַבִּים׃ אֲדֹנָי
שְׁמָעָה׳ אֲדֹנָי סְלָחָה׳ אֲדֹנָי הַקְשִׁיבָה וַעֲשֵׂה אַל תְּאַחַר
לְמַעַנְךָ אֱלֹהַי כִּי שִׁמְךָ נִקְרָא עַל עִירְךָ וְעַל עַמֶּךָ׃

מַה־אָנוּ׳ מַה־חַיֵּינוּ׳ מַה חַסְדֵּנוּ׳ מַה־צִּדְקוֹתֵינוּ׳ מַה
יְשׁוּעָתֵנוּ׳ מַה־כֹּחֵנוּ׳ מַה־גְּבוּרָתֵנוּ׳ מַה־נֹּאמַר

तूं त्यांचा बाहु हो, संकटाच्या समयीं आमचें तारणहि हो. आणखी म्हटलें आहे कीं, त्यांच्या सर्व कष्टांत तो (देव) कष्ट पावे, आणि त्याचा समक्ष राहणारा दूत त्यांस तारी; तो आपल्या प्रीतीनें व लीनतेनें त्यांस उद्धारी; आणि सर्व पुरातन दिवसांत त्यांस उचलून वाही. आणखी असें म्हटलें आहे कीं, हे देवा, तो याकोबाचा संकट समय आहे, तथापि तो त्यांतून निभावेल. आणखी म्हटलें आहे कीं, हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे ? तो आपला क्रोध सर्वकाळपर्यंत बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडते. तो फिरेल, आम्हांवर दया करील; तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि तूं त्यांची सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकशील. (आणि आमचीं व तुझें लोक इस्राएल यांच्या घराण्यांचीं पापें, आठवण न पडे व झडती न होय व कधींहि मनांत न येत अशा ठिकाणीं तूं टाक.) तूं याआकोबासाठीं खरेपणा आणि आब्राहामासाठीं करुणा साधशील, जिच्याविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसां पासून शपथ वाहीस ती आणखी असें म्हटलें आहे कीं, त्यांसहि मी आपल्या पवित्र पर्वतांत आणीन, आपल्या प्रार्थनेच्या घरांत त्यांस हर्षित करीन; त्यांचे होम व त्यांचे बळी माझ्या वेदीवर मला मान्य होतील; कारण कीं माझें घर सर्व लोकांसाठीं प्रार्थनेचें घर असें म्हटले जाईल.

ज्या गोष्टींस परीमाण नाहीं, त्या येणेप्रमाणें:—शेताचा कांठ कापणें, प्रथम उत्पन्न वाहणें, भेटीसाठीं कांहीं आणणें, परोपकार करणें, व शास्त्राचा अभ्यास करणें. आणि ज्या गोष्टी आचरल्यानें मनुष्य या जगीं त्याचें फल भोगून पुढील जगांत त्याचें शृंग स्थापित होतें (मुख्य वेतन पावतो), त्या येणेप्रमाणें:—आई बापांचा मान राखणें, परोपकार करणें, रोग्यांचा समाचार घेणें, पाहुण्यांचा आदर सत्कार करणें, देवालयांत पहाटेस जाणें, आणि मनुष्यामध्यें व त्याच्या शेजाऱ्यामध्यें व पुरुषामध्यें व त्याच्या स्त्रीमध्यें समेट करणें; परंतु शास्त्राचा अभ्यास करणें सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे.

मनुष्याने सर्वदा देवाचें * भय, उघडपणें व गुप्तपणेंहि धरावें, सत्य अंगिकारावें व मनांत असेल तसें सत्य बोलावें, आणि पाहांटेस उठून असें म्हणावें कीं, हे जगताच्या † स्वामी व प्रभुंच्या प्रभु, आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आम्ही आपल्या विनंत्या तुजपुढें ओततों. हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमा कर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कांकीं तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे.

---

* इ. आकाशाचें. हाखामीम लोकांच्या ग्रंथांत कोठें कोठें देवाचें नांव उघडपणें लिहिण्याबद्दल आकाश असें सांपडतें.

† या । पुढल्या जगाचाहि स्वामी तोच आहे.

לְפָנֶיךָ יְהוָֹה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ · הֲלֹא כָל־הַגִּבּוֹרִים
כְּאַיִן לְפָנֶיךָ · וְאַנְשֵׁי הַשֵּׁם כְּלֹא הָיוּ · וַחֲכָמִים כִּבְלִי מַדַּע ·
וּנְבוֹנִים כִּבְלִי הַשְׂכֵּל · כִּי רוֹב מַעֲשֵׂינוּ תֹהוּ · וִימֵי חַיֵּינוּ
הֶבֶל לְפָנֶיךָ · וּמוֹתַר הָאָדָם מִן הַבְּהֵמָה אַיִן כִּי הַכֹּל
הָבֶל : לְבַד הַנְּשָׁמָה הַטְּהוֹרָה שֶׁהִיא עֲתִידָה לִתֵּן דִּין
וְחֶשְׁבּוֹן לִפְנֵי כִסֵּא כְבוֹדֶךָ · וְכָל־הַגּוֹיִם כְּאַיִן נֶגְדֶּךָ ·
שֶׁנֶּאֱמַר הֵן גּוֹיִם כְּמַר מִדְּלִי וּכְשַׁחַק מֹאזְנַיִם נֶחְשָׁבוּ הֵן
אִיִּים כַּדַּק יִטּוֹל : אֲבָל אֲנַחְנוּ עַמְּךָ בְּנֵי בְרִיתֶךָ בְּנֵי
אַבְרָהָם אוֹהֲבֶךָ שֶׁנִּשְׁבַּעְתָּ־לּוֹ בְהַר הַמֹּרִיָּה זֶרַע יִצְחָק
עֲקֵדֶךָ שֶׁנֶּעֱקַד עַל־גַּבֵּי הַמִּזְבֵּחַ עֲדַת יַעֲקֹב בִּנְךָ בְּכוֹרְךָ
שֶׁמֵּאַהֲבָתְךָ שֶׁאָהַבְתָּ אוֹתוֹ וּמִשִּׂמְחָתְךָ שֶׁשָּׂמַחְתָּ בּוֹ
קָרָאתָ אוֹתוֹ יִשְׂרָאֵל וִישֻׁרוּן :

לְפִיכָךְ אֲנַחְנוּ חַיָּבִים לְהוֹדוֹת לָךְ · וּלְשַׁבְּחָךְ וּלְפָאֲרָךְ
וַּלְרוֹמְמָךְ · וְלִתֵּן שִׁיר שֶׁבַח וְהוֹדָאָה לְשִׁמְךָ
הַגָּדוֹל · וְחַיָּבִים אֲנַחְנוּ לוֹמַר לְפָנֶיךָ שִׁירָה בְכָל־יוֹם
תָּמִיד · אַשְׁרֵנוּ מַה־טּוֹב חֶלְקֵנוּ · מַה־נָּעִים גּוֹרָלֵנוּ · וּמַה־
יָּפָה מְאֹד יְרוּשָׁתֵנוּ · אַשְׁרֵנוּ כְּשֶׁאָנוּ מַשְׁכִּימִין וּמַעֲרִיבִין
בְּבָתֵּי כְנֵסִיּוֹת וּבְבָתֵּי מֶדְרָשׁוֹת וּמְיַחֲדִים שִׁמְךָ בְּכָל־יוֹם
תָּמִיד אוֹמְרִים פַּעֲמַיִם בְּאַהֲבָה · שְׁמַע יִשְׂרָאֵל יְהוָֹה
אֱלֹהֵינוּ יְהוָֹה אֶחָד : (בלחש) בָּרוּךְ שֵׁם כְּבוֹד מַלְכוּתוֹ
לְעוֹלָם וָעֶד :

אַתָּה הוּא אֶחָד קוֹדֶם שֶׁבָּרָאתָ הָעוֹלָם · וְאַתָּה הוּא
אֶחָד לְאַחַר שֶׁבָּרָאתָ הָעוֹלָם · אַתָּה הוּא אֵל

आम्ही काय ! आमचें जिणें काय ! आमचें यथार्थपण काय ! आमचें पुण्य काय ! आमचें सामर्थ्य काय ! आमचें बल काय ! आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही तुजपुढें काय म्हणूं ! पराक्रमी (मनुष्यें) तुजपुढें कांहींच नाहींत; नामांकित मनुष्यें जशीं नव्हतींच; ज्ञानी मनुष्यें जशीं बुद्धि-हीन; आणि चतुर जशीं विवेकहीन अशीं नाहींत कीं काय ? कारण आमचीं कर्में बहुत करून शून्यच आहेत; आणि आमच्या आयुष्याचे दिवस तुजपुढें व्यर्थ आहेत. आणि मनुष्य पशुपेक्षां श्रेष्ठ नाहीं; कारण सर्व व्यर्थता आहे; मात्र जो शुद्ध आत्मा तुझ्या गौरवाच्या आसनासमोर झडती व हिशोब देणार, तो त्यास (अधिक) आहे. आणि पाहा, राष्ट्रें मोटेंतल्या बिंदुप्रमाणें आहेत; आणि पारड्यांतल्या बारिक धुळीप्रमाणें मोजली आहेत. पाहा तो द्वीपें कणासारखीं उचलितो; अर्से म्हटल्याप्रमाणें सर्व राष्ट्रें तुजपुढें जशीं कांहींच नाहींत. परंतु आम्ही तुझे लोक, तुझ्या करारांचीं लेंकरें, तुझा प्रियकर आब्राहाम ज्यांसीं त्वां मोरिया डोंगरावर शपथ केली त्याचीं लेंकरें; इसहाक, जो तुजकरितां स्थंडिलाच्या बाजूवर बांधला गेला त्याचें बीज; तुझा जेष्ठ पुत्र याकोब, ज्यावर आपल्या आवडीनें प्रीति करून आणि त्यामध्यें आनंदानें हर्ष मानून, ज्यास इस्राएल आणि येशुरून म्हटलें त्याचा आम्ही समुदाय आहों.

यास्तव आम्हांस तुझे उपकार मानावयास, तुला स्तवावयास, तुझें गौरव करा-वयास व तुला उंच मानावयास; आणि तुझ्या मोठ्या नामाचें गायन, कीर्तन व उपकार स्तुति करावयास योग्य आहे; आणि आम्हास नेहमी प्रति दिवशीं गीत गाणें योग्य आहे. आम्ही सुखी ! आमचा विभाग किती चांगला ! आमचे भाग्य किती सुंदर ! आणि आमचें वतन किती उत्तम ! आम्ही सुखी कीं आम्ही पाहाटेस व संध्याकाळीं देवालयांत व विद्यालयांत जाऊन, आणि तुझ्या नामाचें एकत्व मान्य करून दोन वेळां प्रीतिनें असे म्हणतों कीं, हें इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे. (हें हळू बोलावें.) त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

בָּעוֹלָם הַזֶּה · וְאַתָּה הוּא אֵל בָּעוֹלָם הַבָּא · וְאַתָּה הוּא
וּשְׁנוֹתֶיךָ לֹא יִתָּמּוּ · קָדוֹשׁ שִׁמְךָ בְּעוֹלָמֶךָ עַל עַם מְקַדְּשֵׁי
שְׁמֶךָ וּבְיִשּׁוּעָתְךָ מַלְּכֵנוּ תָּרוּם וְתַגְבִּיהַּ קַרְנֵנוּ · וְתוֹשִׁיעֵנוּ
בְּקָרוֹב לְמַעַן שִׁמְךָ בָּרוּךְ מְקַדֵּשׁ שְׁמוֹ (י״אשִׁמְךָ) בָּרַבִּים:

אַתָּה הוּא יְהוָה הָאֱלֹהִים בַּשָּׁמַיִם מִמַּעַל וְעַל
הָאָרֶץ מִתַּחַת בִּשְׁמֵי הַשָּׁמַיִם הָעֶלְיוֹנִים
וְהַתַּחְתּוֹנִים אַתָּה הוּא רִאשׁוֹן וְאַתָּה הוּא אַחֲרוֹן ·
וּמִבַּלְעָדֶיךָ אֵין אֱלֹהִים · קַבֵּץ נְפוּצוֹת קוֹנֶךָ מֵאַרְבַּע
כַּנְפוֹת הָאָרֶץ יַכִּירוּ וְיֵדְעוּ כָּל־בָּאֵי עוֹלָם · כִּי אַתָּה־הוּא
הָאֱלֹהִים לְבַדְּךָ עָלְיוֹן לְכָל־מַמְלְכוֹת הָאָרֶץ · אַתָּה עָשִׂיתָ
אֶת־הַשָּׁמַיִם וְאֶת־הָאָרֶץ · אֶת־הַיָּם וְאֶת־כָּל־אֲשֶׁר בָּם ·
וּמִי בְּכָל־מַעֲשֵׂי יָדֶיךָ בָּעֶלְיוֹנִים וּבַתַּחְתּוֹנִים שֶׁיֹּאמַר לָךְ
מַה־תַּעֲשֶׂה וּמַה־תִּפְעָל : אָבִינוּ שֶׁבַּשָּׁמַיִם חַי וְקַיָּם עֲשֵׂה
עִמָּנוּ צְדָקָה וָחֶסֶד בַּעֲבוּר כְּבוֹד שִׁמְךָ הַגָּדוֹל הַנִּבּוֹר
וְהַנּוֹרָא שֶׁנִּקְרָא עָלֵינוּ · וְקַיֵּם־לָנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־
הַדָּבָר שֶׁהִבְטַחְתָּנוּ עַל יְדֵי צְפַנְיָה חוֹזֶךָ כְּאָמוּר · בָּעֵת
הַהִיא אָבִיא אֶתְכֶם וּבָעֵת קַבְּצִי אֶתְכֶם כִּי אֶתֵּן אֶתְכֶם
לְשֵׁם וְלִתְהִלָּה בְּכָל עַמֵּי הָאָרֶץ בְּשׁוּבִי אֶת־שְׁבוּתֵיכֶם
לְעֵינֵיכֶם אָמַר יְהוָה :

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ ·
שֶׁתְּרַחֵם עָלֵינוּ וְתִמְחוֹל לָנוּ אֶת־כָּל־חַטֹּאתֵינוּ ·
וּתְכַפֵּר־לָנוּ אֶת־כָּל־עֲוֹנוֹתֵינוּ וְתִמְחוֹל וְתִסְלַח לְכָל־
כָּתוּב לֵאמֹר · יִמְלֹךְ יְהוָה לְעוֹלָם אֱלֹהַיִךְ צִיּוֹן לְדֹר וָדֹר
הַלְלוּיָהּ :)

אַתָּה נָדוֹשׁ וְשִׁמְךָ קָדוֹשׁ וּקְדוֹשִׁים בְּכָל־יוֹם יְהַלְלוּךָ
סֶּלָה · (כִּי אֵל מֶלֶךְ גָּדוֹל וְקָדוֹשׁ אַתָּה ·) בָּרוּךְ
אַתָּה יְהוָה הָאֵל הַקָּדוֹשׁ :
(בעש"ית אומרים הַמֶּלֶךְ הַקָּדוֹשׁ :)

אַתָּה חוֹנֵן לְאָדָם דַּעַת · וּמְלַמֵּד לֶאֱנוֹשׁ בִּינָה · וְהָנֵנוּ
מֵאִתְּךָ דֵּעָה וּבִינָה וְהַשְׂכֵּל · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה
חוֹנֵן הַדָּעַת :

הֲשִׁיבֵנוּ אָבִינוּ לְתוֹרָתֶךָ · וְקָרְבֵנוּ מַלְכֵּנוּ לַעֲבוֹדָתֶךָ ·
וְהַחֲזִירֵנוּ בִּתְשׁוּבָה שְׁלֵמָה לְפָנֶיךָ · בָּרוּךְ אַתָּה
יְהוָה הָרוֹצֶה בִּתְשׁוּבָה :

סְלַח לָנוּ אָבִינוּ כִּי חָטָאנוּ · מְחוֹל לָנוּ מַלְכֵּנוּ כִּי
פָשָׁעְנוּ · כִּי אֵל טוֹב וְסַלָּח אַתָּה · בָּרוּךְ אַתָּה
יְהוָה חַנּוּן הַמַּרְבֶּה לִסְלוֹחַ :

רְאֵה נָא בְעָנְיֵנוּ וְרִיבָה רִיבֵנוּ וּמַהֵר לְגָאֳלֵנוּ גְּאֻלָּה
שְׁלֵמָה לְמַעַן שְׁמֶךָ · כִּי אֵל גּוֹאֵל חָזָק אַתָּה ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה גּוֹאֵל יִשְׂרָאֵל :

[मोठ्यानें बोलताना हें ह्मणतात.

जसी पवित्र सेराफीमांची * मंडळी, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकाला मोठ्यानें बोलत म्हणाले "पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे," याप्रमाणें तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणें आम्ही तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्या समोर जे असतात ते स्तुति करून असें म्हणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनामध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे; तुम्ही परमेश्वराला स्तवा.]

तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात; (कारण तूंच महान राजा, व पवित्र देव आहेस) हे परमेश्वरा, पवित्र देवा, [पश्चात्तापाच्या दिवसांत–पवित्र राजा] तूं धन्य आहेस.

तूं मनुष्यावर ज्ञानाची कृपा करितोस, आणि मानवास बुद्धि शिकवतोस; त्या प्रमाणें आम्हावर ज्ञानाची, बुद्धिची व शहाणपणाची, कृपा कर; हे परमेश्वरा, कृपेकरून ज्ञान देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे आमच्या बापा, आह्मांस तुझ्या शास्त्राकडे वळीव, आणि हे आमच्या राजा, तुझी सेवा करावयास आम्हास जवळ घे. आणि पश्चात्तापाने आम्हास तुजपुढें परतीव. हे परमेश्वरा, पश्चात्तापामुळें प्रसन्न होणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे आमच्या बापा, आम्हास क्षमा कर, कारण आम्ही पाप केलें आहे; हे आमच्या राजा, आम्हास माफ कर, कारण आम्ही उल्लंघन केलें आहे; कां तर तूं चांगला व क्षमा करणारा देव आहेस. हे परमेश्वरा, कृपावंता व पुष्कळ क्षमा करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

आतां आमच्या दुःखाकडे पहा, आणि आमचा वाद तूं कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचा पूर्णपणें उद्धार करण्याकरितां त्वरा कर, कां तर तूं उद्धारणारा देव समर्थ आहेस. हे परमेश्वरा, इस्राएलांच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

---

* सेराफीम हे एक प्रकारचे दूत आहेत.

(בחזרה השליח צבור אומר כאן ענינו)

רְפָאֵנוּ יְהוָה וְנֵרָפֵא · הוֹשִׁיעֵנוּ וְנִוָּשֵׁעָה · כִּי תְהִלָּתֵנוּ
אַתָּה · וְהַעֲלֵה אֲרוּכָה וּמַרְפֵּא לְכָל־תַּחֲלוּאֵינוּ
וּלְכָל־מַכְאוֹבֵינוּ · וּלְכָל־מַכּוֹתֵינוּ · כִּי אֵל רוֹפֵא חוֹלֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל :
* (בקיץ

בָּרְכֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ (אָבִינוּ) בְּכָל־מַעֲשֵׂה יָדֵינוּ
וּבָרֵךְ שְׁנָתֵנוּ בְּטַלְלֵי רָצוֹן בְּרָכָה וּנְדָבָה ·
וּתְהִי אַחֲרִיתָהּ חַיִּים וְשָׂבָע וְשָׁלוֹם כַּשָּׁנִים הַטּוֹבוֹת
לִבְרָכָה · כִּי אֵל טוֹב וּמֵטִיב אַתָּה וּמְבָרֵךְ הַשָּׁנִים ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְבָרֵךְ הַשָּׁנִים :)
† (בחורף

בָּרֵךְ עָלֵינוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־הַשָּׁנָה הַזֹּאת
וְאֶת־כָּל־מִינֵי תְבוּאָתָהּ לְטוֹבָה · וְתֵן טַל
וּמָטָר לִבְרָכָה עַל כָּל־פְּנֵי הָאֲדָמָה · וְרַוֵּה פְּנֵי תֵבֵל ·
וְשַׂבַּע אֶת־הָעוֹלָם כֻּלּוֹ מִטּוּבֶךָ · וּמַלֵּא יָדֵינוּ מִבִּרְכוֹתֶיךָ
וּמִעְשֶׂר מַתְּנוֹת יָדֶיךָ . שְׁמֹרָה וְהַצִּילָה שָׁנָה זוֹ מִכָּל־
דָּבָר רָע וּמִכָּל־מִינֵי מַשְׁחִית וּמִכָּל־מִינֵי פּוּרְעָנוּת ·
וַעֲשֵׂה לָהּ תִּקְוָה טוֹבָה וְאַחֲרִית שָׁלוֹם · חוּס וְרַחֵם
עָלֶיהָ וְעַל כָּל־תְּבוּאָתָהּ וּפֵרוֹתֶיהָ · וּבָרְכָהּ בִּנְשִׁמֵי
רָצוֹן בְּרָכָה וּנְדָבָה וּתְהִי אַחֲרִיתָהּ חַיִּים וְשָׂבָע וְשָׁלוֹם
כַּשָּׁנִים הַטּוֹבוֹת לִבְרָכָה · כִּי אֵל טוֹב וּמֵטִיב אַתָּה
וּמְבָרֵךְ הַשָּׁנִים · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְבָרֵךְ הַשָּׁנִים :)

---

* पेसाहपासून हें बोलतात.

† डिसेंबर महिन्याच्या ४ थ्या, ५ व्या किंवा ६ व्या तारखेपासून हें बोलतात.

(उपासाच्या दिवशीं ही प्रार्थना मोठ्यानें बोलतांना पुढें लिहिलेला עננו हा भाग בעת צרה पर्यंत हाज्जान एथें बोलतो.)

हे परमेश्वरा, आम्हास निरोगी कर म्हणजे आम्ही निरोगी होऊं; आम्हांस तार म्हणजे आम्ही तारण पाऊं; कां तूं आमचें स्तुतिपात्र आहेस. आणि आमचे सर्व रोग, आमचीं सर्व दुखणीं व आह्मावरील सर्व घाव, उपचार करून बरे कर; कां तर तूं दयाळू व विश्वासू देव वैद्य आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांचे रोग बरे करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[उन्हाळ्यांत हें बोलावें.

हे परमश्वरा, आमच्या देवा (आमच्या बापा) आमच्या हातांच्या सर्व कामांस तूं आशीर्वाद दे; आणि आमच्या वर्षास प्रसन्नतेच्या, आशीर्वादाच्या व उदारपणाच्या दहिंवराकडून आशीर्वाद दे; आणि त्याचा शेवट चांगल्या वर्षांप्रमाणें जीवनानें, तृप्ततेनें, व सुखानें आशीर्वादित होवो; कां तर तूं चांगला व चांगलें करणारा, व वर्षांस आशीर्वाद देणारा आहेस. हे परमेश्वरा, वर्षांस आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.]

[हिंवाळ्यांत हें बोलावें.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, हें वर्ष व त्याचें निरनिराळ्या प्रकारचें उत्पन्न कल्याणकारक व्हावें म्हणून तूं त्यास आशीर्वाद दे. सर्व पृथ्वीच्या पाठीवर कुशल व्हावें म्हणून दहिंवर व पाऊस दे, पृथ्वीस तृप्त कर, आपल्या चांगुलपणानें सर्व जगास संतुष्ट कर, आणि तुझ्या आशीर्वादांनीं व तुझ्या हातांच्या विपूल दानांनीं आमचे हात भर. या वर्षास सर्व वाईट गोष्टींपासून, सर्व प्रकारच्या नाशापासून व सर्व प्रकारच्या शिक्षेपासून संभाळ व राख; आणि त्याजविषयींची आमची आशा कल्याणयुक्त व त्याचा शेवट सुखाचा होऊं दे. त्याजवर व त्याच्या सर्व उत्पन्नावर व फलावर दया व कृपा कर. आणि त्यास प्रसन्नतेच्या, आशीर्वादाच्या व उदारपणाच्या वृष्टिनें आशीर्वाद दे. आणि त्याचा शेवट चांगल्या वर्षांप्रमाणें जीवनानें, तृप्ततेनें, व सुखानें आशीर्वादित होवो; कां तर तूं चांगला व चांगलें करणारा व वर्षास आशीर्वाद देणारा आहेस. हे परमेश्वरा, वर्षांस आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.]

תְּקַע בְּשׁוֹפָר גָּדוֹל לְחֵרוּתֵנוּ וְשָׂא נֵס לְקַבֵּץ גָּלֻיּוֹתֵינוּ
וְקַבְּצֵנוּ יַחַד מֵאַרְבַּע כַּנְפוֹת הָאָרֶץ לְאַרְצֵנוּ ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְקַבֵּץ נִדְחֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל :

הָשִׁיבָה שׁוֹפְטֵינוּ כְּבָרִאשׁוֹנָה · וְיוֹעֲצֵינוּ כְּבַתְּחִלָּה ·
וְהָסֵר מִמֶּנּוּ יָגוֹן וַאֲנָחָה · וּמְלוֹךְ עָלֵינוּ מְהֵרָה
אַתָּה יְהוָה לְבַדְּךָ בְּרַחֲמִים בְּצֶדֶק וּבְמִשְׁפָּט · בָּרוּךְ
אַתָּה יְהוָה מֶלֶךְ אוֹהֵב צְדָקָה וּמִשְׁפָּט :
(בעשי״ת או׳ הַמֶּלֶךְ הַמִּשְׁפָּט :)

לַמַּלְשִׁינִים וְלַמִּינִים אַל תְּהִי תִקְוָה · וְכָל־הַזֵּדִים
כְּרֶגַע יֹאבֵדוּ · וְכָל־אוֹיְבֶיךָ וְכָל־שׂוֹנְאֶיךָ
מְהֵרָה יִכָּרֵתוּ · וּמַלְכוּת הָרִשְׁעָה מְהֵרָה תְּעַקֵּר וּתְשַׁבֵּר
וּתְכַלֵּם וְתַכְנִיעֵם וְתַשְׁמִידֵם בִּמְהֵרָה בְיָמֵינוּ · בָּרוּךְ אַתָּה
יְהוָה שׁוֹבֵר אוֹיְבִים וּמַכְנִיעַ מִינִים

עַל הַצַּדִּיקִים וְעַל הַחֲסִידִים וְעַל שְׁאֵרִית עַמְּךָ בֵּית
יִשְׂרָאֵל · וְעַל זִקְנֵיהֶם וְעַל פְּלֵיטַת בֵּית סוֹפְרֵיהֶם ·
וְעַל גֵּרֵי הַצֶּדֶק וְעָלֵינוּ יֶהֱמוּ נָא רַחֲמֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ ·
וְתֵן שָׂכָר טוֹב לְכָל־הַבּוֹטְחִים בְּשִׁמְךָ בֶּאֱמֶת · וְשִׂים
חֶלְקֵנוּ עִמָּהֶם · וּלְעוֹלָם לֹא נֵבוֹשׁ כִּי בְךָ בָּטָחְנוּ · וְעַל
הַסְּמִיכָה הַגָּדוֹל בֶּאֱמֶת נִשְׁעַנְנוּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מִשְׁעָן
וּמִבְטָח לַצַּדִּיקִים :

תְּשׁוּבָה בְּחוּס יְרוּשָׁלַיִם עִירְךָ כַּאֲשֶׁר דִּבַּרְתָּ · וְכִסֵּא
דָוִד עַבְדְּךָ מְהֵרָה בְּתוֹכָהּ תָּכִין וּבְנֵה אוֹתָהּ
בִּנְיַן עוֹלָם בִּמְהֵרָה בְיָמֵינוּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה בּוֹנֵה
יְרוּשָׁלָיִם

आमच्या मुक्तते करितां मोठ्यानें कर्णा वाजीव, आणि आमचे पाडाव एकत्र करण्यास झेंडा उभार, आणि पृथ्वीच्या चोहों कोनांकडून आम्हास आमच्या देशीं एकवट कर. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांच्या विखरलेल्यांस एकवट करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पाहिल्याप्रमाणें आमचे न्यायाधिश व पूर्वीप्रमाणें आमचे मंत्री स्थाप. आणि आम्हांपासून दुःख व खेद दूर कर. आणि हे परमेश्वरा, लवकरच तूं आम्हांवर एकटाच दयेने, यथार्थतेने व नीतीने राज्य कर. हे परमेश्वरा, यथार्थतेवर व नीतीवर प्रीति करणाऱ्या राजा, (पश्चात्तापाच्या दिवसांत--नीतीवंत राजा,) तूं धन्य आहेस.

चाहाडांस व धर्म भ्रष्टांस आशा नसो; सर्व अभिमानी एका क्षणांत नाहींसे होवोत. तुझे सर्व शत्रू व वैरी लवकर छेदले जावोत, आणि दुष्टाईचें राज्य तूं लवकर आमच्या दिवसांत उपटून काढ, छेदून टाक, भस्म कर, नमीव व त्याचा नाश कर. हे परमेश्वरा, शत्रूंस छेदणाऱ्या व गर्विष्टांस नमविणाऱ्या, तूं धन्य आहेस. *

हे परमेश्वरा, आमच्या देवा, सात्विकांकारतां, नितीमानाकरितां, तुझे लोक इस्राएलाचें घराणे याच्या शेषाकरितां, वडिलांकरितां, त्यांच्या शास्त्र्यांच्या घराण्यांतून उरलेल्याकरितां, नीतिमत्वाच्या विदेशांकरितां, आणि आम्हाकरितां, आतां तुझ्या दयेला द्रव येऊं दे; जे सत्यतेने तुझ्या नामावर भरंवसा ठेवितात त्या सर्वांस तूं चांगलें वेतन दे, आणि त्यांजबरोबर आमचाहि विभाग असूं दे; आणि आम्हीं तुजवर विश्वास ठेविला आहे, आणि तुझ्या मोठ्या दयेवर खरोखर भरंवसा ठेविला आहे, म्हणून आम्हीं कधींच लज्जित होऊं नये असे कर. हे परमेश्वरा, सात्विकांस आश्रय व भरंवसा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

जसें तूं म्हटलें आहेस त्याप्रमाणें तूं आपल्या येरूशालेम नगरीं वास कर; तुझा सेवक दावीद याचें आसन तिजमध्यें लवकर स्थापन कर; आणि ती इमारत सर्वकाळ टिकेल अशी लवकर व आमचे दिवसांत बांध. हे परमेश्वरा, येरूशालेमेस बांधणाऱ्या, तूं धन्य आहेस.

---

* या भागावर दिलेली टीका पृष्ठ ७५ च्या खाली पहा.

אֶת־צֶמַח דָּוִד עַבְדְּךָ מְהֵרָה תַצְמִיחַ · וְקַרְנוֹ תָּרוּם
בִּישׁוּעָתֶךָ · כִּי לִישׁוּעָתְךָ קִוִּינוּ כָּל־הַיּוֹם · בָּרוּךְ
אַתָּה יְהוָה מַצְמִיחַ קֶרֶן יְשׁוּעָה :

שְׁמַע קוֹלֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אָב הָרַחְמָן חוּס וְרַחֵם
עָלֵינוּ וְקַבֵּל בְּרַחֲמִים וּבְרָצוֹן אֶת־תְּפִלָּתֵנוּ · כִּי
אֵל שׁוֹמֵעַ תְּפִלּוֹת וְתַחֲנוּנִים אַתָּה · וּמִלְּפָנֶיךָ מַלְכֵּנוּ
רֵיקָם אַל תְּשִׁיבֵנוּ · חָנֵּנוּ וַעֲנֵנוּ וּשְׁמַע תְּפִלָּתֵנוּ ·
(בחענית היחיד אומר כאן ענני · ואם לא אמרו אין
מחזירין אותו · ויאמר אותו קודם שיעקור רגליו :

עֲנֵנוּ אָבִינוּ עֲנֵנוּ · בְּיוֹם צוֹם תַּעֲנִיתֵנוּ הַזֶּה · כִּי בְצָרָה
גְדוֹלָה אֲנַחְנוּ אַל־תֵּפֶן לְרִשְׁעֵנוּ וְאַל־תִּתְעַלַּם
מַלְכֵּנוּ מִבַּקָּשָׁתֵנוּ · הֱיֵה נָא קָרוֹב לְשַׁוְעָתֵנוּ מֻרָם
נִקְרָא אֶלֶיךָ אַתָּה חָעֱנֶה נִדְבָּר וְאַתָּה תִּשְׁמַע כְּדָבָר
שֶׁנֶּאֱמַר וְהָיָה טֶרֶם יִקְרָאוּ וַאֲנִי אֶעֱנֶה · וְזֹאת הֵם מְדַבְּרִים
וַאֲנִי אֶשְׁמַע · כִּי אַתָּה יְהוָה פּוֹדֶה וּמַצִּיל וְעוֹנֶה וּמְרַחֵם
בְּכָל־עֵת צָרָה וְצוּקָה ·
(והשליח צבור בין גואל לרופא חולים)
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הָעוֹנֶה לְעַמּוֹ יִשְׂרָאֵל בְּעֵת צָרָה :)
כִּי אַתָּה שׁוֹמֵעַ תְּפִלַּת כָּל־פֶּה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה שׁוֹמֵעַ
תְּפִלָּה :

רְצֵה יְהוָה אֱלֹהֵינוּ בְּעַמְּךָ יִשְׂרָאֵל וְלִתְפִלָּתָם שְׁעֵה ·
וְהָשֵׁב הָעֲבוֹדָה לִדְבִיר בֵּיתֶךָ · וְאִשֵּׁי יִשְׂרָאֵל
וּתְפִלָּתָם מְהֵרָה בְּאַהֲבָה תְקַבֵּל בְּרָצוֹן · וּתְהִי לְרָצוֹן
תָּמִיד עֲבוֹדַת יִשְׂרָאֵל עַמֶּךָ :

तुझा सेवक दावीद याचा कोंब लवकर उगीव, आणि तुझ्या तारणानें त्याचें शिंग उभार; कारण प्रति दिवशीं आम्ही तुझ्या तारणाची वाट पाहतों. हे परमेश्वरा, तारणाचें शिंग उगविणाऱ्या, तूं धन्य आहेस

हे परमेश्वरा, आमच्या देवा, दयाळू बापा, आमची वाणी ऐक, आम्हांवर दया व कृपा कर, आणि दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना ऐक; कारण तूं प्रार्थना व विनंती ऐकणारा देव आहेस; हे आमच्या राजा, आम्हास तुजपुढून रिकामें परतवूं नको; आम्हावर दया कर, आम्हास उत्तर दे आणि आमची प्रार्थना ऐक.

[एकट्याचा उपास असल्यास हें पुढील बोलावें; जर न बोलला तर परतूं नये; परंतु ही प्रार्थना संपल्यावर עושה שלום पूर्वी हें बोलावें. ही प्रार्थना मोठ्यानें बोलतांना हाज्जान हे सर्व ראה נא आणि רפאנו यांच्यामध्यें बोलतो.

हे आमच्या बापा, आम्हास उत्तर दे; या उपास करून दुःख करण्याच्या दिवशीं आम्हास उत्तर दे; कारण आम्ही मोठ्या दुःखांत आहों. आमची दुष्टाई मनावर धरूं नको; हे आमच्या राजा, आमच्या विनंतीपासून लपून राहूं नको, आमच्या ओरडण्याच्या जवळच ऐस. आणि त्यांनी हाक मारिल्यापूर्वी मी उत्तर देईन, ते बोलतांच ऐकेन असें म्हटल्याप्रमाणें आम्ही तुजकडे ओरडल्या अगोदर आम्हास उत्तर दे; आम्ही बोलतांच तूं ऐक. कारण उद्धारणारा, तारणारा, आणि सर्व संकटाच्या व दुःखाच्या समयीं उत्तर देणारा व दया करणारा, तूंच परमेश्वर आहेस.

(ही प्रार्थना मोठ्यानें बोलताना हाज्जान ענינו हा भाग ראה נא आणि רפאנו यांच्या मध्यें बोलून हा पुढील धन्यवाद करून पूर्ण करितो.)

हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, तूं धन्य आहेस.]

कारण तूंच सर्वांच्या मुखांतील प्रार्थना ऐकतोस. हे परमेश्वरा, प्रार्थना ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो, त्यांची प्रार्थना मनावर घे, आपल्या घराच्या प्रसाद स्थानीं पुजन पुनः चालू कर, इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर प्रीतीनें व आवडीनें मान्य कर, आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला सर्वदा आवडो.

(בראש חודש ובחול המועד אומרים

אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ יַעֲלֶה וְיָבֹא יַגִּיעַ וְיֵרָאֶה
וְיֵרָצֶה יִשָּׁמַע יִפָּקֵד וְיִזָּכֵר זִכְרוֹנֵנוּ וְזִכְרוֹן
אֲבוֹתֵינוּ · זִכְרוֹן יְרוּשָׁלַיִם עִירֶךָ וְזִכְרוֹן מָשִׁיחַ בֶּן דָּוִד
עַבְדֶּךָ וְזִכְרוֹן כָּל־עַמְּךָ בֵּית יִשְׂרָאֵל לְפָנֶיךָ לִפְלֵיטָה
לְטוֹבָה לְחֵן וּלְחֶסֶד וּלְרַחֲמִים · לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם
(בראש חדש הַיּוֹם רֹאשׁ הַחֹדֶשׁ הַזֶּה ·)
(בחול המועד של פסח
בְּיוֹם חַג הַמַּצּוֹת הַזֶּה · בְּיוֹם מִקְרָא קֹדֶשׁ הַזֶּה ·)
(בחול המועד של סוכות
בְּיוֹם חַג הַסֻּכּוֹת הַזֶּה · בְּיוֹם מִקְרָא קֹדֶשׁ הַזֶּה ·)
לְרַחֵם בּוֹ עָלֵינוּ וּלְהוֹשִׁיעֵנוּ · זָכְרֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ בּוֹ
לְטוֹבָה · וּפָקְדֵנוּ בּוֹ לִבְרָכָה · וְהוֹשִׁיעֵנוּ בּוֹ לְחַיִּים
טוֹבִים · בִּדְבַר יְשׁוּעָה וְרַחֲמִים · חוּס וְחָנֵּנוּ וְרַחֵם
וְרַחֵם עָלֵינוּ · וְהוֹשִׁיעֵנוּ כִּי אֵלֶיךָ עֵינֵינוּ כִּי אֵל מֶלֶךְ
חַנּוּן וְרַחוּם אָתָּה :)
וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים תַּחְפּוֹץ בָּנוּ וְתִרְצֵנוּ · וְתֶחֱזֶינָה
עֵינֵינוּ בְּשׁוּבְךָ לְצִיּוֹן בְּרַחֲמִים · בָּרוּךְ אַתָּה
יְהוָה הַמַּחֲזִיר שְׁכִינָתוֹ לְצִיּוֹן :
מוֹדִים אֲנַחְנוּ לָךְ שֶׁאַתָּה הוּא יְהוָה אֱלֹהֵינוּ
וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ לְעוֹלָם וָעֶד צוּרֵנוּ צ ר חַיֵּינוּ
וּמָגֵן יִשְׁעֵנוּ אַתָּה הוּא לְדוֹר וָדוֹר נוֹדֶה לְךָ וּנְסַפֵּר
תְּהִלָּתֶךָ · עַל חַיֵּינוּ הַמְּסוּרִים בְּיָדֶךָ · וְעַל נִשְׁמוֹתֵינוּ
הַפְּקוּדוֹת לָךְ · וְעַל נִסֶּיךָ שֶׁבְּכָל־יוֹם עִמָּנוּ · וְעַל

[प्रतिपदेच्या दिवशीं व सणांच्या व्यवहारिक दिवशीं हें बोलावें

हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या येरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो मशीयाह त्याची आणि तुझ्या सर्व इस्राएल लोकांचें घराणें यांची आठवण—

(प्रतिपदेच्या दिवशीं—या प्रतिपदेच्या दिवशीं)

(पेसाहच्या व्यवहारीक दिवशीं—

या न फुगलेल्या भाकरीच्या सणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं)

(मंडपाच्या सणाच्या व्यवहारिक दिवशीं—

या मंडपाच्या सणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं)

यशस्वी तारणाकरितां कृपेने, दयेने व ममतेने तुजपुढे चढो, येवो, पोहोंचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली जावो, आणि आठविली जावो, आम्हावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास, हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर, आम्हावर आशीर्वाद होण्याकरितां आम्हास दर्शन दे; आम्हास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनानें आम्हास राख, आम्हावर कृपा कर; आमची करुणा येऊं दे; आम्हावर दया कर, आणि आम्हास तार; कारण तूंच दयाळू व कृपाळू राजा आहेस; म्हणूनच आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.]

तूं आपल्या बहुत दयेनें आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो; मग आमचे डोळे तुला कृपेनें सियोनेकडे फिरतांना पाहतील. हे परमेश्वरा, आपला शेखीना * सियोनेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, जो तूं तुलाच आम्ही स्तवितों. ‡ तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमचे तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझे स्वाधीन आहे. तुझे चमत्कार आम्हांमध्यें नित्य केले जातात, आणि तुझी आश्चर्य कृत्यें व तुझा चांगुलपणा

---

* ईश्वरी साक्षात्कार.

‡ स्तवितों याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी अधिकार मान्य करितों असाहि करितात.

נִפְלְאוֹתֶיךָ וְטוֹבוֹתֶיךָ · שֶׁבְּכָל־עֵת עֶרֶב וָבֹקֶר וְצָהֳרַיִם ·
הַטּוֹב כִּי לֹא כָלוּ רַחֲמֶיךָ הַמְרַחֵם כִּי לֹא תַמּוּ חֲסָדֶיךָ ·
כִּי מֵעוֹלָם קִוִּינוּ לָךְ :

(מודים דרבנן

מוֹדִים אֲנַחְנוּ לָךְ שֶׁאַתָּה הוּא יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי
אֲבוֹתֵינוּ אֱלֹהֵי כָל־בָּשָׂר יוֹצְרֵנוּ יוֹצֵר בְּרֵאשִׁית
בְּרָכוֹת וְהוֹדָאוֹת לְשִׁמְךָ הַגָּדוֹל וְהַקָּדוֹשׁ · עַל שֶׁהֶחֱיִיתָנוּ
וְקִיַּמְתָּנוּ כֵּן תְּחַיֵּינוּ וּתְחַנֵּנוּ · וְתֶאֱסוֹף גָּלְיוֹתֵינוּ לְחַצְרוֹת
קָדְשֶׁךָ לִשְׁמוֹר חֻקֶּיךָ וְלַעֲשׂוֹת רְצוֹנֶךָ וּלְעָבְדְךָ בְּלֵבָב
שָׁלֵם עַל שֶׁאֲנַחְנוּ מוֹדִים לָךְ · בָּרוּךְ אֵל הַהוֹדָאוֹת :)

(בחנוכה אומרים

עַל הַנִּסִּים וְעַל הַפֻּרְקָן וְעַל הַגְּבוּרוֹת וְעַל הַתְּשׁוּעוֹת
וְעַל הַנִּפְלָאוֹת וְעַל הַנֶּחָמוֹת שֶׁעָשִׂיתָ לַאֲבוֹתֵינוּ
בַּיָּמִים הָהֵם בַּזְּמַן הַזֶּה : בִּימֵי מַתִּתְיָהוּ בֶּן יוֹחָנָן כֹּהֵן
גָּדוֹל חַשְׁמוֹנָאִי וּבָנָיו כְּשֶׁעָמְדָה מַלְכוּת יָוָן הָרְשָׁעָה
עַל עַמְּךָ יִשְׂרָאֵל לְשַׁכְּחָם תּוֹרָתָךְ וּלְהַעֲבִירָם מֵחֻקֵּי
רְצוֹנֶךָ · וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים עָמַדְתָּ לָהֶם בְּעֵת
צָרָתָם · רַבְתָּ אֶת־רִיבָם · דַּנְתָּ אֶת־דִּינָם · נָקַמְתָּ אֶת־
נִקְמָתָם · מָסַרְתָּ גִּבּוֹרִים בְּיַד חַלָּשִׁים · וְרַבִּים בְּיַד
מְעַטִּים · וּרְשָׁעִים בְּיַד צַדִּיקִים וּטְמֵאִים בְּיַד טְהוֹרִים ·
וְזֵדִים בְּיַד עוֹסְקֵי תּוֹרָתֶךָ · וּלְךָ עָשִׂיתָ שֵׁם גָּדוֹל וְקָדוֹשׁ
בְּעוֹלָמֶךָ וּלְעַמְּךָ יִשְׂרָאֵל עָשִׂיתָ תְּשׁוּעָה גְּדוֹלָה וּפוּרְקָן
כְּהַיּוֹם הַזֶּה · וְאַחַר כָּךְ בָּאוּ בָנֶיךָ לִדְבִיר בֵּיתֶךָ · וּפִנּוּ
אֶת־הֵיכָלֶךָ וְטִהֲרוּ אֶת־מִקְדָּשֶׁךָ · וְהִדְלִיקוּ נֵרוֹת בְּחַצְרוֹת
קָדְשֶׁךָ · וְקָבְעוּ שְׁמוֹנַת יָמִים אֵלּוּ בְּהַלֵּל וּבְהוֹדָאָה ·
וְעָשִׂיתָ עִמָּהֶם נִסִּים וְנִפְלָאוֹת וְנוֹדָה לִשְׁמְךָ הַגָּדוֹל סֶלָה :)

आम्ही संध्याकाळीं, सकाळीं व दोनप्रहरीं अनुभवितों, त्याकरितां आम्ही पिढीपिढीं तुझें कीर्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया आम्हावरून नाहींशी होत नाहीं; तूं कृपाळू कारण सर्वकाळ आम्ही तुजवर आशा ठेवितों, म्हणून तुझी कृपा आम्हांवरून सरत नाहीं.

[ही प्रार्थना पुनः मोठ्यानें बोलतांना हाज्जान वरील מורים बोलत असतां मंडळीनें हें पुढील बोलावें.

सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मांस-मयांचा देव, आमचा व प्रारंभीं (पृथ्वीचा) घडणारा, जो तूं तुलाच आम्ही स्तवितों. त्वां आम्हास जीवंत राखिलें व आम्हास रक्षिलें म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य म्हणतों व त्याचें स्तवन करितों. आणि आम्ही तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी, आणि पूर्ण मनानें तुझी सेवा करावी, म्हणून (आम्ही विनंती करितों कीं) त्याचप्रमाणें आह्मास जीवंत राख, आम्हावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट कर, कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा, आम्ही तुझी स्तुति करावी.]

[हानुक्याच्या सणांत हें बोलतात

आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत यावेळीं जीं अद्भुत कर्में, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस:— म्हणजे योहानानाचा पुत्र मतातया मुख्य याजक जो हाशमोनाय याच्या व त्याच्या पुत्रांच्या दिवसांत तुझे लोक इस्राएल यांस तुझ्या शास्त्राचा विसर पाडण्याकरितां, आणि तुझे प्रसन्नतेचे करार उल्लंघविण्याकरितां, दुष्ट यावानाचा राज्याधिकार जेव्हां उठला होता; तेव्हां तूं आपल्या परम दयेनें, त्यांच्या संकट समयीं त्यांसाठीं उभा राहिलास; त्यांचा वाद तूं केलास; त्यांचा न्याय तूं निवडिलास; आणि त्यांचा सूड तूं उगवून अशक्तांच्या हातीं बलवानास, थोड-क्यांच्या हातीं पुष्कळांस, सात्विकांच्या हातीं दुष्टांस, शुद्धांच्या हातीं अशुद्धांस, आणि तुझ्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांच्या हातीं गर्विष्ठांस सोंपून दिलेंस. आणि तूं आपणा-करितां आपले जगांत मोठी व पवित्र कीर्ती मिळवून केवळ आजच असें तूं आपले लोक इस्राएल यांचें मोठें तारण व उद्धार केलास. यानंतर तुझ्या लेकरांनीं तुझ्या पवित्र देवळांत येऊन तुझें मंदिर स्वच्छ केलें, तुझें पवित्र स्थान शुद्ध केलें, तुझ्या पवित्र अंगणांत दिवे लाविले, आणि हे आठ दिवस स्तुतीचे व कीर्तनाचे ठरविले; याप्रमाणें अद्भुत कर्में व चमत्कार तूं त्यांकरितां केलेस, म्हणून आह्मी तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह.]

(בפורים אומרים

עַל הַנִּסִּים וְעַל הַפֻּרְקָן וְעַל הַגְּבוּרוֹת וְעַל הַתְּשׁוּעוֹת וְעַל הַנִּפְלָאוֹת וְעַל הַנֶּחָמוֹת שֶׁעָשִׂיתָ לַאֲבוֹתֵינוּ בַּיָּמִים הָהֵם בַּזְּמַן הַזֶּה : בִּימֵי מָרְדְּכַי וְאֶסְתֵּר בְּשׁוּשַׁן הַבִּירָה כְּשֶׁעָמַד עֲלֵיהֶם הָמָן הָרָשָׁע · בִּקֵּשׁ לְהַשְׁמִיד לַהֲרוֹג וּלְאַבֵּד אֶת־כָּל־הַיְּהוּדִים מִנַּעַר וְעַד־זָקֵן טַף וְנָשִׁים בְּיוֹם אֶחָד בִּשְׁלוֹשָׁה עָשָׂר לְחֹדֶשׁ שְׁנֵים־עָשָׂר הוּא־חֹדֶשׁ אֲדָר וּשְׁלָלָם לָבוֹז · וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים הֵפַרְתָּ אֶת־עֲצָתוֹ וְקִלְקַלְתָּ אֶת־מַחֲשַׁבְתּוֹ וַהֲשֵׁבוֹתָ לוֹ גְּמוּלוֹ בְּרֹאשׁוֹ וְתָלוּ אוֹתוֹ וְאֶת־בָּנָיו עַל־הָעֵץ וְעָשִׂיתָ עִמָּהֶם נִסִּים וְנִפְלָאוֹת וְנוֹרָה לִשְׁמְךָ הַגָּדוֹל סֶלָה :)

וְעַל כֻּלָּם יִתְבָּרַךְ וְיִתְרוֹמַם וְיִתְנַשֵּׂא תָּמִיד שִׁמְךָ מַלְכֵּנוּ לְעוֹלָם וָעֶד · וְכָל־הַחַיִּים יוֹדוּךָ סֶלָה :

(בעשי"ת או'

וּכְתוֹב לְחַיִּים טוֹבִים כָּל־בְּנֵי בְרִיתֶךָ :)

וִיהַלְלוּ וְיבָרְכוּ אֶת־שִׁמְךָ הַגָּדוֹל בֶּאֱמֶת לְעוֹלָם כִּי טוֹב הָאֵל יְשׁוּעָתֵנוּ וְעֶזְרָתֵנוּ סֶלָה הָאֵל הַטּוֹב · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַטּוֹב שִׁמְךָ וּלְךָ נָאֶה לְהוֹדוֹת :

שִׂים שָׁלוֹם טוֹבָה וּבְרָכָה · חַיִּים חֵן וָחֶסֶד · וְרַחֲמִים עָלֵינוּ וְעַל כָּל־יִשְׂרָאֵל עַמֶּךָ · וּבָרְכֵנוּ אָבִינוּ כֻּלָּנוּ כְּאֶחָד בְּאוֹר פָּנֶיךָ · כִּי בְאוֹר פָּנֶיךָ נָתַתָּ לָנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ · תּוֹרָה וְחַיִּים · אַהֲבָה וָחֶסֶד · צְדָקָה וְרַחֲמִים · בְּרָכָה וְשָׁלוֹם · וְטוֹב בְּעֵינֶיךָ לְבָרְכֵנוּ · וּלְבָרֵךְ אֶת־כָּל־עַמְּךָ יִשְׂרָאֵל בְּרוֹב עֹז וְשָׁלוֹם :

[पुरीमच्या सणांत हें बोलतात.

आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत यावेळीं जीं अद्भुत कर्मे, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस:— ह्मणजे मोर्देखाय व एस्तेर यांच्या दिवसांत शूशान किल्ल्यांत जेव्हां दुष्ट हामान उठला, आणि एका दिवशीं बारावा महिना जो आदार महिना त्याच्या तेराव्या तारखेस येहुद्यांतील सर्व आबाल वृद्धांचा, व बायका पोरांचा नाश करावा, त्यास मारून टाकावें व नष्ट करावें आणि त्यांची लूट करून घ्यावी असें योजिलें; तेव्हां तूं आपल्या मोठ्या दयेनें त्याचा विचार मोडिलास, त्याच्या योजनेचा भंग केलास, आणि त्याची फेड त्याच्या शीरीं केलीस; आणि त्यांनीं त्यास व त्याच्या पुत्रांस लांकडावर फांशीं दिलें. याप्रमाणें अद्भुत कर्मे व चमत्कार तूं त्यांकरितां केलेस म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह.]

हे आमच्या राजा, या सर्व दयेवरून तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य म्हटलें, उंचावलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह.

(पश्चात्तापाच्या दिवसांत हें बोलावें.

आणि तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.)

मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास स्तवितील आणि धन्य म्हणतील; कारण तें चांगलें आहे. सेलाह. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस, तुझें नाम चांगलें आणि स्तवन तुलाच शोभतें.

हे परमेश्वरा, आम्हावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगलें, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे; आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हां सर्वांस एकमेळी आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हास शास्त्र व जीवन, प्रिती, व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिली आहेस. आणि आम्हास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें आहेच.

(בעשי"ת אומרים

וּבְסֵפֶר חַיִּים בְּרָכָה וְשָׁלוֹם וּפַרְנָסָה טוֹבָה וְיִשּׁוּעָה
וְנֶחָמָה וּגְזֵרוֹת טוֹבוֹת נִזָּכֵר וְנִכָּתֵב לְפָנֶיךָ אֲנַחְנוּ
וְכָל־עַמְּךָ יִשְׂרָאֵל לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם׃)
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמְּבָרֵךְ אֶת־עַמּוֹ יִשְׂרָאֵל בַּשָּׁלוֹם אָמֵן׃
יִהְיוּ לְרָצוֹן אִמְרֵי־פִי וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגוֹאֲלִי׃
(טוב לומר שיר למעלות אשא עיני אל ההרים)

אֱלֹהַי נְצוֹר לְשׁוֹנִי מֵרָע · וְשִׂפְתוֹתַי מִדַּבֵּר מִרְמָה ·
וְלִמְקַלְלַי נַפְשִׁי תִדּוֹם · וְנַפְשִׁי כֶּעָפָר לַכֹּל
תִּהְיֶה · פְּתַח לִבִּי בְּתוֹרָתֶךָ · וְאַחֲרֵי מִצְוֹתֶיךָ תִּרְדּוֹף
נַפְשִׁי · וְכָל־הַקָּמִים עָלַי לְרָעָה · מְהֵרָה הָפֵר עֲצָתָם
וְקַלְקֵל מַחְשְׁבוֹתָם · יִהְיוּ כְּמֹץ לִפְנֵי רוּחַ וּמַלְאַךְ יְהוָה
דּוֹחֶה עֲשֵׂה לְמַעַן שְׁמֶךָ · עֲשֵׂה לְמַעַן יְמִינֶךָ · עֲשֵׂה
לְמַעַן תּוֹרָתֶךָ · עֲשֵׂה לְמַעַן קְדוּשָׁתֶךָ׃ לְמַעַן יֵחָלְצוּן
יְדִידֶיךָ׃ הוֹשִׁיעָה יְמִינְךָ וַעֲנֵנִי׃ יִהְיוּ לְרָצוֹן אִמְרֵי־פִי
וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגוֹאֲלִי׃

עוֹשֶׂה שָׁלוֹם בִּמְרוֹמָיו הוּא בְּרַחֲמָיו יַעֲשֶׂה שָׁלוֹם עָלֵינוּ
וְעַל כָּל־עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן׃

(בימי תשובה אחר חזרת העמידה אומרים

אָבִינוּ מַלְכֵּנוּ חָטָאנוּ לְפָנֶיךָ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ אֵין לָנוּ מֶלֶךְ אֶלָּא אָתָּה׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ עֲשֵׂה עִמָּנוּ לְמַעַן שְׁמֶךָ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ חַדֵּשׁ עָלֵינוּ שָׁנָה טוֹבָה׃

[प्रायश्चित्ताच्या दिवसांत हें बोलावें.

आणि आह्मी व तुझे इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्न: सामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावूं असें कर.]

हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या तूं धन्य आहेस हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझे हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

[एथें गीत १२१ ह्मणावें हें बरें.]

हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझें ओठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, हे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौन्य धर. आणि माझा जीव सर्वांपुढें धुळीप्रमाणें (नम्र) होवो. माझ्या जीवानें तुझ्या आज्ञाप्रमाणें चालावें, म्हणून माझें मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव). आणि जे कोणी माझ्या वाईटावर उठतात त्याचे विचार लवकर मोडून त्यांच्या कुकल्पनांचा नाश कर. असें तूं आपल्या नांवाकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां, आपल्या पवित्रतेकरितां कर. तुझे प्रिय मुक्त व्हावे ह्मणून तूं आपल्या उजव्या हातानें मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, तुजपुढें माझ्या तोंडची वाक्यें व माझ्या हृदयांतले ध्यान मान्य होवो.

जो उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेनें आम्हास व आपल्या सर्व इस्राएल लोकांस शांति देवो; आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

[प्रायश्चिताच्या दिवसांत तिसऱ्या प्रहरचे प्रार्थनेमध्यें עמידה नतर हें बोलतात.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आम्हांस कोणी राजा नाहीं.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या नामाकरितां आम्हावर उपकार कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावर चांगल्या वर्षास आरंभ होऊं दे.

אָבִינוּ מַלְכֵּנוּ בַּטֵּל מֵעָלֵינוּ כָּל־גְּזֵרוֹת קָשׁוֹת וְרָעוֹת :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ בַּטֵּל מַחְשְׁבוֹת שׂוֹנְאֵינוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ הָפֵר עֲצַת אוֹיְבֵינוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כַּלֵּה כָּל־צָר וּמַשְׁטִין מֵעָלֵינוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כַּלֵּה דֶּבֶר וְחֶרֶב וְרָעָה וְרָעָב וּשְׁבִי וּבְזָה
וּמַשְׁחִית וּמַגֵּפָה מִבְּנֵי בְרִיתֶךָ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ שְׁלַח רְפוּאָה שְׁלֵמָה לְחוֹלֵי עַמֶּךָ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ מְנַע מַגֵּפָה מִנַּחֲלָתֶךָ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ זְכוֹר כִּי עָפָר אֲנַחְנוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ מְחוֹל וְסְלַח לְכָל־עֲוֹנוֹתֵינוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ קְרַע רוֹעַ גְּזַר דִּינֵנוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ מְחוֹק בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים כָּל־שִׁטְרֵי
חוֹבוֹתֵינוּ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ מְחֵה וְהַעֲבֵר פְּשָׁעֵינוּ מִנֶּגֶד עֵינֶיךָ :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר חַיִּים טוֹבִים :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר צַדִּיקִים :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר יְשָׁרִים וּתְמִימִים :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר מְחִילָה וּסְלִיחָה וְכַפָּרָה :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר מְזוֹנוֹת וּפַרְנָסָה טוֹבָה :
יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְיָ אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁתִּתֵּן לִי
וְלִבְנֵי בֵיתִי וּלְכָל הַסּוֹמְכִים עַל שֻׁלְחָנִי הַיּוֹם וּכָל
יוֹם וָיוֹם מְזוֹנוֹתַי וּמְזוֹנוֹתֵיהֶם בְּרֶבוֹד בִּזְכוּת שִׁמְךָ הַגָּדוֹל
וְהַקָּדוֹשׁ (*דיקרנוסא) הַמְמוּנֶה עַל הַפַּרְנָסָה :
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר גְּאוּלָּה וִישׁוּעָה :

---

* हे नांव उच्चारावयास मनाई आहे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावरून सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या द्वेषणाऱ्यांचे विचार रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रुंच्या ममलती मोड.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, सर्व शत्रूंस व आम्हावर बलात्कार करणारांस नाहींसे कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या कराराच्या लेंकरांवरून पटकी, तरवार, अरिष्ट, दुष्काळ, पाडावपण, लुटणे, नाश, आणि मरी नाहींसी कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या लोकांच्या रोगांस पूर्ण आरोग्यत पाठीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या वतनावरून मरी बंद कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्ही मातो आहों असो आठवण राख.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचे सर्व अपराध माफ व क्षमा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या न्यायाचा वाईट निवाडा फाडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या पुष्कळ दयेने आमच्या ऋणाचे रोखे खोडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचीं उल्लंघने तुझ्या पुढून पुसून टाक व दूर कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास नीतीमानांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास यथार्थांच्या व सरळांच्या पुस्तकांत लिहो.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास क्षमेच्या, माफीच्या व प्रायश्चित्ताच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या उपजीवनांच्या व अन्नसामग्रिच्या पुस्तकांत लिही.

हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं प्रसन्न होऊन आज व प्रति दिवशीं मला माझे आणि माझ्या कुटुंबांतील मनुष्यांस आणि माझ्या मेजावर आधार धरून राहाणारांस त्याचें अन्न तुझें मोठे व पवित्र (ריקרנוסא*) नाम जें अन्नावर नेमिलेलें आहे त्याकरितां सन्मानाने दे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास मुक्ततेच्या व तारणाच्या पुस्तकांत लिहा.

---

* हें नांव उच्चारावयास मनाई आहे.

אָבִינוּ מַלְכֵּנוּ זָכְרֵנוּ בְּזִכָּרוֹן טוֹב מִלְּפָנֶיךָ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ הַצְמַח לָנוּ יְשׁוּעָה בְּקָרוֹב ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ חָרֹם צֶרֶן יִשְׂרָאֵל עַמֶּךָ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ וְהָרֹם קֶרֶן מְשִׁיחֶךָ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ הַחֲזִירֵנוּ בִּתְשׁוּבָה שְׁלֵמָה לְפָנֶיךָ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ שְׁמַע קוֹלֵנוּ חוּס וְרַחֵם עָלֵינוּ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ עֲשֵׂה לְמַעַנְךָ אִם לֹא לְמַעֲנֵנוּ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ כַּפֵּל בְּרַחֲמִים וּבְרָצוֹן אֶת־תְּפִלָּתֵנוּ ׃
אָבִינוּ מַלְכֵּנוּ אַל תְּשִׁיבֵנוּ רֵיקָם מִלְּפָנֶיךָ ׃)

אָנָּא יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ · תָּבֹא לְפָנֶיךָ
תְּפִלָּתֵנוּ · וְאַל תִּתְעַלָּם מִתְּחִנָּתֵנוּ · שֶׁאֵין אֲנוּ
עַזֵּי פָנִים וּקְשֵׁי עֹרֶף לוֹמַר · לְפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי
אֲבוֹתֵינוּ צַדִּיקִים אֲנַחְנוּ וְלֹא חָטָאנוּ · אֲבָל חָטָאנוּ ·
אֲנַחְנוּ וַאֲבוֹתֵינוּ : אָשַׁמְנוּ · בָּגַדְנוּ · גָּזַלְנוּ · דִּבַּרְנוּ דוֹפִי
וְלָשׁוֹן הָרַע · הֶעֱוִינוּ · וְהִרְשַׁעְנוּ · זַדְנוּ · חָמַסְנוּ ·
טָפַלְנוּ שֶׁקֶר · יָעַצְנוּ עֲצוֹת רָעוֹת · כִּזַּבְנוּ · לַצְנוּ ·
לוֹעַזְנוּ · מָרַדְנוּ · נִאַצְנוּ · נָאַפְנוּ · נָשְׁבַּעְנוּ לַשָּׁוְא
וְלַשֶּׁקֶר · סָרַרְנוּ · עָוִינוּ · פָּשַׁעְנוּ · צָרַרְנוּ · קִשִּׁינוּ עֹרֶף ·
רָשַׁעְנוּ · שִׁחַתְנוּ · תִּעַבְנוּ · תָּעִינוּ וְתִעְתָּעְנוּ · וְסַרְנוּ
מִמִּצְוֹתֶיךָ וּמִמִּשְׁפָּטֶיךָ הַטּוֹבִים וְלֹא שָׁוָה לָנוּ · וְאַתָּה
צַדִּיק עַל כָּל־הַבָּא עָלֵינוּ כִּי אֱמֶת עָשִׂיתָ וַאֲנַחְנוּ
הִרְשַׁעְנוּ ׃

אֵל אֶרֶךְ אַפַּיִם אַתָּה וּבַעַל רַחֲמִים · גְּדֹלַת רַחֲמֶיךָ
וַחֲסָדֶיךָ · הוֹדַעְתָּ לְעַבְדֶּיךָ מִקֶּדֶם וְכֵן כָּתוּב בְּתוֹרָתֶךָ ·
וַיֵּרֶד יְהוָה בֶּעָנָן וַיִּתְיַצֵּב עִמּוֹ שָׁם · וַיִּקְרָא בְּשֵׁם יְהוָה
וַיַּעֲבֹר יְהוָה עַל־פָּנָיו וַיִּקְרָא יְהוָה יְהוָה אֵל רַחוּם וְחַנּוּן
אֶרֶךְ אַפַּיִם וְרַב־חֶסֶד וֶאֱמֶת ׃

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हांकरितां तारण लवकरच उगीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझे लोक इस्त्रायल यांचे शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या अभिषिक्ताचे शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, पूर्ण पश्चात्तापानें आम्हास फिरीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमची वाणी ऐक आणि आम्हांवर दया व कृपा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, जर आह्मांकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां तसें कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजपुढून आम्हांस रिकामें परतवूं नको.]

हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आम्ही मागतों; आणि आमच्या विनंतीपासून तूं लपून राहूं नको. कारण आम्ही यथार्थ आहों, आम्ही पाप केले नाहीं, असें तुजपुढें बोलावास, हे आमच्या देवा व आमच्या पुर्वजांच्या देवा, आम्हास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चयें आम्ही व आमच्या वडिलांनींहि पाप केलें आहे. आम्ही अतिक्रम केले, विश्वास घात केला, लुटलें, चाहाडी केली व नाईट भाषणेही केलीं, अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलुम केला, खोटें रचिलें, वाईट योजनाही केल्या, भोंदलें, थट्टा केली, वेडावले, बंडवा केला, अपवाद केला, हेलना केली, व्यभिचार केला, आम्ही व्यर्थ व खोट्या शपथाहि वाहिल्या, अनिवार झालों, वांकडे वर्तलों, ऊल्लंघनें केली, दुःख दिलें, आम्ही आपली मान ताठरही केली, दुराचार केलें, नासलें, ओंगळ केलें, बहकलों आणि दुसऱ्यासही बहकविलें. आणि आम्ही तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फीतूर झालों परंतु तेणेकरून आम्हास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जे अवघें आम्हांवर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहेस, परंतु आम्ही दुष्टाई केली आहे.

मंदक्रोधी देव आणि दयेचा स्वामी तूंच आहेस; तूं आपल्या दयेचें व कृपेचें महत्व पूर्वी नम्र मोशे यांस कळविलेंस आणि शास्त्रांस असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि त्यानें परमेश्वराचें नाम मोठ्यानें सांगितलें.

וַיַּעֲבֹר יְהוָה עַל־פָּנָיו וַיִּקְרָא · יְהוָה יְהוָה · אֵל רַחוּם
וְחַנּוּן · אֶרֶךְ · אַפַּיִם · וְרַב חֶסֶד · וֶאֱמֶת : נֹצֵר
חֶסֶד · לָאֲלָפִים · נֹשֵׂא עָוֹן · וָפֶשַׁע · וְחַטָּאָה · וְנַקֵּה :

(בעור השליח צבור אומר ויעבור נוהגים לומר

אֵל רַחוּם שִׁמְךָ אֵל חַנּוּן שִׁמְךָ אֶל אֶרֶךְ אַפַּיִם שִׁמְךָ
מָלֵא רַחֲמִים שִׁמְךָ בָּנוּ נִקְרָא שִׁמְךָ בַּעֲבוּר שִׁמְךָ
בְּקָרְאִי עֲנֵנִי אֱלֹהֵי צִדְקִי בַּצָּר הִרְחַבְתָּ לִי חָנֵּנִי וּשְׁמַע
תְּפִלָּתִי : וַאֲנִי תְּפִלָּתִי לְךָ יְהוָה עֵת רָצוֹן אֱלֹהִים בְּרוֹב
חַסְדֶּךָ עֲנֵנִי בֶּאֱמֶת יִשְׁעֶךָ : עֲנֵנִי בָעֵת וּבָעֲנָה הַזֹּאת :)

(סדר נפילת אפים

רַחוּם וְחַנּוּן חָמָאנוּ לְפָנֶיךָ רַחֵם עָלֵינוּ וְהוֹשִׁיעֵנוּ :
לְדָוִד אֵלֶיךָ יְהוָה נַפְשִׁי אֶשָּׂא : אֱלֹהַי בְּךָ בָּטַחְתִּי
אַל־אֵבוֹשָׁה אַל יַעֲלְזוּ אוֹיְבַי לִי : גַּם־כָּל קֹוֶיךָ
לֹא יֵבֹשׁוּ יֵבֹשׁוּ הַבּוֹגְדִים רֵיקָם : דְּרָכֶיךָ יְהוָה הוֹדִיעֵנִי
אֹרְחוֹתֶיךָ לַמְּדֵנִי : הַדְרִיכֵנִי בַאֲמִתֶּךָ וְלַמְּדֵנִי כִּי־אַתָּה
אֱלֹהֵי יִשְׁעִי אוֹתְךָ קִוִּיתִי כָּל־הַיּוֹם : זְכֹר רַחֲמֶיךָ יְהוָה
וַחֲסָדֶיךָ כִּי מֵעוֹלָם הֵמָּה : חַטֹּאת נְעוּרַי וּפְשָׁעַי אַל־
תִּזְכֹּר כְּחַסְדְּךָ זְכָר־לִי אַתָּה לְמַעַן טוּבְךָ יְהוָה : טוֹב
וְיָשָׁר יְהוָה עַל־כֵּן יוֹרֶה חַטָּאִים בַּדָּרֶךְ יַדְרֵךְ עֲנָוִים
בַּמִּשְׁפָּט וילמד [וְיַלְמֵּד] עֲנָוִים דַּרְכּוֹ : כָּל־אָרְחוֹת יְהוָה חֶסֶד
וֶאֱמֶת לְנֹצְרֵי בְרִיתוֹ וְעֵדֹתָיו : לְמַעַן־שִׁמְךָ יְהוָה וְסָלַחְתָּ
לַעֲוֹנִי כִּי רַב־הוּא : מִי זֶה הָאִישׁ יְרֵא יְהוָה יוֹרֶנּוּ בְּדֶרֶךְ

तेव्हां परमेश्वरानें त्याच्यापुढें जवळून जाऊन मोठ्यानें असें म्हटलें कीं, परमेश्वर परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंद क्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा हाजारांसीं दया राखितो; अन्याय व उल्लंघनें व पाप यांची क्षमा करितो आणि निर्दोष ठरवितो.

[हाज्जान वरील भाग बोलत आहे इतक्यांत मंडळीनें हें बोलावें.

तुझें नाव दयाळू देव, तुझें नाव कृपाळू देव, तुझें नांव मंदक्रोधी देव, तुझें नांव करुणा सागर असें आहे. आणि तुझें नाम आम्हामध्यें गाजविलें जातें. म्हणून तुझे नामाकरितां, मी हाक मारितों तेव्हां हे माझ्या न्यायी देवा, मला उत्तर दे; मी संकटांत होतों तेव्हां त्वां मला मुक्त केलें; मजवर दया करून माझी प्रार्थना ऐक. आणि हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस तुजपुढें माझी प्रार्थना आहे, हे देवा, तूं आपल्या कृपेनें आपल्या उद्धारक सत्यतेनें मला उत्तर दे.]

[भूमीवर पडून हें बोलावें.

हे दयाळू व कृपाळू आम्ही तुजविरुद्ध पाप केलें आहे; तर आम्हावर दया कर व आम्हास तार.

हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुजकडे वर लावितों. हे माझ्या देवा, म्या तुजवर आशा ठेविली आहे; म्या लज्जित न व्हावें, माझ्या शत्रूस मजवर हर्षू देऊं नये. जे तुझ्या आशेवर राहतात, ते सर्व लज्जित न व्हावे; जे उगेच दगा करितात, ते लज्जित व्हावे. हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला कळीव, आपल्या वाटा मला शिकीव. तूं आपल्या सत्यतेच्या मार्गाने मला चालीव आणि मला शिकीव, कारण कीं तूं माझ्या तारणाचा देव आहेस; सर्व दिवस मी तुजवर आशा ठेवितों. हे परमेश्वरा, तूं आपल्या फार ममतेची, व आपल्या फार दयेची आठवण कर, कांतर त्या सर्वकाळापासून आहेत. हे परमेश्वरा, तूं माझ्या बाळपणांतलीं पापें, आणि माझे अतिक्रम आठवूं नको; तुझ्या दयेप्रमाणें, तुझ्या चांगुलपणामुळें माझी आठवण कर. परमेश्वर चांगला व नीट आहे; यास्तव तो पाप्यांस मार्गी लाविती, दीनास न्यायानें चालवितो; आपलाच मार्ग दीनांस शिकवितो. जे परमेश्वराचे करार व त्याचे नेम पाळितात, त्यांसीं त्याच्या सर्व वाटा दयारूप व सत्यतारूप आहेत. हे परमेश्वरा, तूं आपल्या नामाकरितां माझा अन्याय क्षमा कर, कारण कीं तो मोठा आहे. जो माणूस पर-

בְּחָר : נַפְשׁוֹ בְּטוּב תָּלִין וְזַרְעוֹ יִירַשׁ אָרֶץ : סוֹד יְהוָה
לִירֵאָיו וּבְרִיתוֹ לְהוֹדִיעָם : עֵינַי תָּמִיד אֶל־יְהוָה כִּי הוּא
יוֹצִיא מֵרֶשֶׁת רַגְלָי : פְּנֵה־אֵלַי וְחָנֵּנִי כִּי־יָחִיד וְעָנִי אָנִי :
צָרוֹת לְבָבִי הַרְחִיבוּ מְמְצוּקוֹתַי הוֹצִיאֵנִי : רְאֵה־עָנְיִי
וַעֲמָלִי וְשָׂא לְכָל־חַטֹּאתָי : רְאֵה אוֹיְבַי כִּי רָבּוּ וְשִׂנְאַת
חָמָס שְׂנָאוּנִי : שָׁמְרָה נַפְשִׁי וְהַצִּילֵנִי אַל־אֵבוֹשׁ כִּי־חָסִיתִי
בָךְ : תֹּם־וָיֹשֶׁר יִצְּרוּנִי כִּי קִוִּיתִיךָ : פְּדֵה־אֱלֹהִים אֶת־יִשְׂרָאֵל
מִכָּל־צָרוֹתָיו : וְהוּא יִפְדֶּה אֶת־יִשְׂרָאֵל מִכֹּל עֲוֹנוֹתָיו :
יְהוָה אֱלֹהֵי יִשְׂרָאֵל שׁוּב מֵחֲרוֹן אַפֶּךָ · וְהִנָּחֵם עַל
הָרָעָה לְעַמֶּךָ :)

אָבִינוּ מַלְכֵּנוּ אָבִינוּ אַתָּה · אָבִינוּ מַלְכֵּנוּ אֵין לָנוּ מֶלֶךְ
אֶלָּא אַתָּה · אָבִינוּ מַלְכֵּנוּ רַחֵם עָלֵינוּ · אָבִינוּ
מַלְכֵּנוּ חָנֵּנוּ וַעֲנֵנוּ כִּי אֵין בָּנוּ מַעֲשִׂים עֲשֵׂה עִמָּנוּ צְדָקָה
וָחֶסֶד לְמַעַן שִׁמְךָ הַגָּדוֹל וְהוֹשִׁיעֵנוּ · וַאֲנַחְנוּ לֹא נֵדַע
מַה־נַּעֲשֶׂה כִּי עָלֶיךָ עֵינֵינוּ : זְכֹר רַחֲמֶיךָ יְהוָה וַחֲסָדֶיךָ כִּי
מֵעוֹלָם הֵמָּה : יְהִי חַסְדְּךָ יְהוָה עָלֵינוּ כַּאֲשֶׁר יִחַלְנוּ לָךְ :
אַל תִּזְכָּר לָנוּ עֲוֹנוֹת רִאשׁוֹנִים מַהֵר יְקַדְּמוּנוּ רַחֲמֶיךָ כִּי
דַלּוֹנוּ מְאֹד : עָזְרֵנוּ בְּשֵׁם יְהוָה עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ : חָנֵּנוּ
יְהוָה חָנֵּנוּ כִּי רַב שָׂבַעְנוּ בוּז : בְּרָגֶז רַחֵם תִּזְכּוֹר · בְּרֶגֶז
אַהֲבָה תִּזְכּוֹר· בְּרֶגֶז עֲקֵדָה תִּזְכֹּר· בְּרֶגֶז תְּמִימוּת תִּזְכּוֹר :
יְהוָה הוֹשִׁיעָה הַמֶּלֶךְ יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ: כִּי הוּא יָדַע יִצְרֵנוּ
זָכוֹר כִּי עָפָר אֲנַחְנוּ : עָזְרֵנוּ אֱלֹהֵי יִשְׁעֵנוּ עַל דְּבַר כְּבוֹד
שְׁמֶךָ וְהַצִּילֵנוּ וְכַפֵּר עַל חַטֹּאתֵינוּ לְמַעַן שְׁמֶךָ :

मेश्वराला भितो, तो कोण ? त्यास तो निवडलेल्या मार्गांत शिकवील. त्याचा जीव सुखी राहील, आणि त्याचें संतान पृथ्वीचें वतन पावेल. परमेश्वराचें रहस्य त्याच्या भिणाऱ्यांसीं आहे, आणि तो आपला करार त्यांस कळवील. माझे डोळे परमेश्वराकडे नेहमीं आहेत, कारण कीं तो माझे पाय जाळ्यांतून काढितो. तूं मजकडे पहा आणि मजवर दया कर; कारण कीं मी एकला व दुःखित आहे. माझ्या हृदयांतलीं संकों वाढविलेलीं आहेत; तूं माझ्या पेंचांतून मला काढ. माझें दुःख व माझे कष्ट पहा, आणि माझीं सर्व पापें क्षमा कर. माझ्या शत्रूंवर पहा कां कीं ते बहुत आहेत, आणि त्यांनीं कठोर द्वेषानें मला द्वेषिलें आहे. तूं माझा जीव राख आणि मला सोडीव; म्या लज्जित न व्हावें कां तर मी तुजवर आशा ठेविली आहे. यथार्थपण नीटपण यांनीं मला राखावें; कां तर मी तुजवर आशा ठेवितों. हे देवा, इस्राएलाला त्याच्या सर्व संकटांतून खंडून काढ. तोच इस्राएलाला त्याच्या सर्व अन्यायांतून खंडून घेईल.

हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या रागाचा संताप सोड, आणि आपल्या लोकांवरच्या या वाईटाविषयीं पश्चात्ताप कर (मन पालट).]

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूंच आमचा पिता आहेस; हें आमच्या राजा, तुजवांचून आम्हास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावर दया कर. हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावर कृपा करून आम्हास उत्तर दे; कारण आह्मांमध्यें कांहींच (चांगलीं) कृत्यें नाहींत. तूं आपल्या मोठ्या नामाकरितां आम्हाशीं यथार्थता व दया कर, आणि आम्हास तार; आम्ही काय करावें हें आम्ही जाणत नाहीं; आमचे डोळे तुजकडे लागले आहेत. हे परमेश्वरा, तुझी दया व कृपा आठीव; कारण त्या सर्वकाळापासून आहेत, हे परमेश्वरा, जसी आम्ही तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आम्हावर होवो. आमचीं पूर्वीचीं पापें आठवूं नको; त्वरेनें तुझी दया आम्हापुढें कर; कारण आम्ही फार नीचावलों आहों. आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा जो परमेश्वर, त्याच्या नामानें आम्हास सहाय आहे. हे परमेश्वरा, आम्हांवर कृपा कर, आम्हांवर कृपा कर, कां तर आम्हों फार तुच्छ झालों आहों. क्रोधाच्या समयीं (आब्राहामावरील) प्रीति तूं आठीव; क्रोधाच्या समयीं (इसहाकाचें) बांधलें जाणें आठीव; क्रोधाच्या समयीं (याआकोबाची) पूर्णता आठीव; क्रोधाच्या समयीं दया आठीव. हे परमेश्वरा, तारण कर; आम्हीं हांक मारितों, त्या दिवशीं राजानें आम्हांस उत्तर द्यावें. कां तर तो आमची रचना जाणतो; आम्ही मातीचे आहों, ही आठवण तो करितो. हे आमच्या तारणाच्या देवा, आपल्या नामाच्या गौरवासाठीं आम्हास सहाय कर; आणि आपल्या नामासाठीं आमच्या पापांची क्षमा करून आम्हांस सोडीव.

(אם יש מנין אומרים קדיש תתקבל דף ק)

(בערב שבת אומרים ה׳ מלך גאות לבש וכו׳. ובר״ה
אומרים מזמור ח׳ה׳ אדונינו וכו׳. בח״המ של
פסה אומרים בצאת ישראל. ובח״המ
של סוכות אומרים שופטני)

לַמְנַצֵּחַ בִּנְגִינוֹת מִזְמוֹר שִׁיר: אֱלֹהִים יְחָנֵּנוּ וִיבָרְכֵנוּ
יָאֵר פָּנָיו אִתָּנוּ סֶלָה: לָדַעַת בָּאָרֶץ דַּרְכֶּךָ בְּכָל
גּוֹיִם יְשׁוּעָתֶךָ: יוֹדוּךָ עַמִּים אֱלֹהִים יוֹדוּךָ עַמִּים כֻּלָּם:
יִשְׂמְחוּ וִירַנְּנוּ לְאֻמִּים כִּי תִשְׁפֹּט עַמִּים מִישׁוֹר וּלְאֻמִּים
בָּאָרֶץ תַּנְחֵם סֶלָה: יוֹדוּךָ עַמִּים אֱלֹהִים יוֹדוּךָ עַמִּים כֻּלָּם:
אֶרֶץ נָתְנָה יְבוּלָהּ יְבָרְכֵנוּ אֱלֹהִים אֱלֹהֵינוּ: יְבָרְכֵנוּ אֱלֹהִים
וְיִירְאוּ אוֹתוֹ כָּל אַפְסֵי אָרֶץ:

(אם יש מנין אומרים קדיש יהא שלמה רבא דף ק״ח)

עָלֵינוּ לְשַׁבֵּחַ לַאֲדוֹן הַכֹּל. לָתֵת גְּדֻלָּה לְיוֹצֵר
בְּרֵאשִׁית. שֶׁלֹּא עָשָׂנוּ כְּגוֹיֵי הָאֲרָצוֹת. וְלֹא
שָׂמָנוּ כְּמִשְׁפְּחוֹת הָאֲדָמָה. שֶׁלֹּא שָׂם חֶלְקֵנוּ כָּהֶם.
וְגוֹרָלֵנוּ כְּכָל־הֲמוֹנָם. (שֶׁהֵם מִשְׁתַּחֲוִים לְהֶבֶל וָרִיק.
וּמִתְפַּלְלִים אֶל אֵל לֹא יוֹשִׁיעַ.) וַאֲנַחְנוּ מִשְׁתַּחֲוִים
לִפְנֵי מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא. שֶׁהוּא
נוֹטֶה שָׁמַיִם. וְיוֹסֵד אָרֶץ. וּמוֹשַׁב יְקָרוֹ בַּשָּׁמַיִם מִמַּעַל.
שְׁכִינַת עֻזּוֹ בְּגָבְהֵי מְרוֹמִים. הוּא אֱלֹהֵינוּ. וְאֵין עוֹד
אַחֵר. אֱמֶת מַלְכֵּנוּ. וְאֶפֶס זוּלָתוֹ. כַּכָּתוּב בַּתּוֹרָה וְיָדַעְתָּ
הַיּוֹם וַהֲשֵׁבֹתָ אֶל־לְבָבֶךָ. כִּי יְהוָה הוּא הָאֱלֹהִים בַּשָּׁמַיִם
מִמַּעַל וְעַל הָאָרֶץ מִתָּחַת אֵין עוֹד:

[दहा मनुष्यें असल्यास " कदीश तिथकव्वाल" बोलावा. पृष्ठ १००]

(शुक्रवारा या पुढील गीता बद्दल गात ९१ आणि प्रतिपदेच्या दिवशीं गीत ८ बोलतात. पेसाह मधील व्यवहारिक दिवसांत गीत ११४ व सुक्कोथ मधील व्यवहारिक दिवसांत गीत ४३ म्हणतात.)

मुख्य वाजंत्र्याला; नेगिनोथावर गायनाचें गीत. देवानें आम्हावर कृपा करावी; आणि आम्हास आशीर्वाद द्यावा; आपलें मुख आम्हावर प्रकाशित करावें. सेलाह. यासाठीं कीं पृथ्वींत तुझा मार्ग कळावा; सर्व राष्ट्रांस तुझें तारण कळावें. हे देवा, लोकांनीं तुझी स्तुति करावी; सर्व लोकांनीं तुझी स्तुति करावी. राष्ट्रांनीं आनंद करून हर्षशब्द करावे; कारण कीं तूं लोकांचा न्याय यथार्थ करशील, आणि पृथ्वींतल्या प्रजा, यांस चालविसील. सेलाह. हे देवा, लोकांनीं तुझी स्तुति करावी, सर्व लोकांनीं तुझी स्तुति करावी. पृथ्वी आपलें उत्पन्न देईल; देव, आमचाच देव आम्हास आशीर्वाद देईल. देव आम्हांस आशीर्वाद देईल; आणि पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचें भय धरतील.

[दहा मनुष्यें असल्यास " कदीश येहे शेलामा " बोलावा. पृष्ठ १०८]

आम्ही सर्वांच्या प्रभुची स्तुति करावी; आणि आरंभी (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्यानें आम्हांस जगांतील राष्ट्रांप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलांप्रमाणें आम्हांस ठेविलें नाहीं; त्यांच्या वांट्याप्रमाणें आमचा वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्यांप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात आणि जो देव तारीत नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्यानें आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवांची वस्ती वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्यांच वैभव उंचांत आहे, त्यास आम्ही नमन करितों. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य आणि त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, आणि आज तुम्ही जाणून आपल्या हृदयीं असें ठसवून घ्या कीं, वरतीं आकाशांत आणि खालती पृथ्वीवर परमेश्वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

עַל כֵּן נְקַוֶּה לָךְ יְהוָה אֱלֹהֵינוּ לִרְאוֹת מְהֵרָה בְּתִפְאֶרֶת
עֻזֶּךָ לְהַעֲבִיר גִּלּוּלִים מִן הָאָרֶץ וְהָאֱלִילִים כָּרוֹת
יִכָּרֵתוּן לְתַקֵּן עוֹלָם בְּמַלְכוּת שַׁדַּי וְכָל־בְּנֵי בָשָׂר
יִקְרְאוּ בִשְׁמֶךָ לְהַפְנוֹת אֵלֶיךָ כָּל־רִשְׁעֵי אָרֶץ · יַכִּירוּ וְיֵדְעוּ
כָּל־יוֹשְׁבֵי תֵבֵל כִּי לְךָ תִכְרַע כָּל־בֶּרֶךְ תִּשָּׁבַע כָּל־
לָשׁוֹן לְפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ יִכְרְעוּ וְיִפְּלוּ וְלִכְבוֹד שִׁמְךָ
יָקָר יִתֵּנוּ וְיַקַּבְּלוּ כֻּלָּם אֶת־עוֹל מַלְכוּתֶךָ וְתִמְלוֹךְ
עֲלֵיהֶם מְהֵרָה לְעוֹלָם וָעֶד · כִּי הַמַּלְכוּת שֶׁלְּךָ הִיא
וּלְעוֹלְמֵי עַד תִּמְלוֹךְ בְּכָבוֹד · כַּכָּתוּב בְּתוֹרָתֶךָ · יְהוָה
יִמְלֹךְ לְעוֹלָם וָעֶד : וְהָיָה יְהוָה לְמֶלֶךְ עַל כָּל־הָאָרֶץ
בַּיּוֹם הַהוּא יִהְיֶה יְהוָה אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד :

מִזְמוֹר לְדָוִד יְהוָה קָרָאתִיךָ חוּשָׁה לִי הַאֲזִינָה קוֹלִי
בָּהָ־אִי לָךְ : תִּכּוֹן תְּפִלָּתִי קְטֹרֶת לְפָנֶיךָ מַשְׂאַת
כַּפַּי מִנְחַת עָרֶב : שִׁיתָה יְהוָה שָׁמְרָה לְפִי נְצָרֶה עַל דַּל
שְׂפָתָי : אַל תַּט לִבִּי לְדָבָר רָע לְהִתְעוֹלֵל עֲלִילוֹת בְּרֶשַׁע
אֶת־אֲשִׁים פְּעֻלֵי אָוֶן וּבַל אֶלְחַם רְמַעֲמֵיהֶם : יֶהֱלְמֵנִי
צַדִּיק חֶסֶד וְיוֹכִיחֵנִי שֶׁמֶן רֹאשׁ אַל יָנִיא רֹאשִׁי כִּי עוֹד
וּתְפִלָּתִי בְּרָעוֹתֵיהֶם : נִשְׁמְטוּ בִידֵי סֶלַע שְׁפָטֵיהֶם וְשָׁמְעוּ
אֲמָרַי כִּי נָעֲמוּ : כְּמוֹ פֹלֵחַ וּבֹקֵעַ בָּאָרֶץ נִפְוְרוּ עַצְמֵינוּ לְפִי
שְׁאוֹל : כִּי אֵלֶיךָ יֱהוִה אֲדֹנָי עֵינָי בְּכָה חָסִיתִי אַל תְּעַר
נַפְשִׁי : שָׁמְרֵנִי מִיְדֵי פַּח יָקְשׁוּ לִי וּמֹקְשׁוֹת פֹּעֲלֵי אָוֶן :
יִפְּלוּ בְמִכְמֹרָיו רְשָׁעִים יַחַד אָנֹכִי עַד אֶעֱבוֹר :

מַשְׂכִּיל לְדָוִד בִּהְיוֹתוֹ בַּמְּעָרָה תְּפִלָּה : קוֹלִי אֶל־
יְהוָה אֶזְעָק קוֹלִי אֶל יְהוָה אֶתְחַנָּן : אֶשְׁפֹּךְ

यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवानें पृथ्वींतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्व समर्थांच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मांसमयांच्या संतानांनीं तुझ्या नामानें हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टांनीं तुजकडे फिरावें, आणि सर्व गुढघे तुजपुढेंच नमावें आणि सर्व जिव्हांनीं तुजविषयींच शपथ वाहावी, असें व्हावें; म्हणून पृथ्वीवरील सर्व राहणारे तुलाच ओळखतील व जाणतील; असें लवकर पहाण्यास आम्ही आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढेंच ते नमतील व नमस्कार करितील; तुझ्या नामाच्या गौरवांचा आदर करितील, आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील. यास्तव तूं लवकर त्यांवर सर्वकाळचें राज्य कर. कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील, जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच.

दावीदाकडून गीत. हे परमेश्वरा, मी तुला हाक मारितों; तूं मजसाठीं उतावळी कर; मी तुला हाक मारितों, तेव्हां माझ्या शब्दाकडे कान लाव. माझी प्रार्थना धुपासारिखी, माझें हात उभारणें संध्याकाळच्या नैवेद्यासारिखें तुझ्यासमोर सादर होवो. हे परमेश्वरा, तूं माझ्या तोंडावर पाहरा ठेव; माझ्या ओठांच्या द्वारांचें रक्षण कर, माझें हृदय कुकर्मी माणसांच्या संगतीं दुष्टपणावर न वळावें; दुराचरण करावयास, कोणत्याहि वाईटाकडे वळूं देऊं नको; आणि त्यांचीं मिष्टान्नें मला खाऊं देऊं नको. नीतिमानानें तर मला हाणावें; उपकार होईल; त्याने माझा निषेध करावा; मस्तकाचें उटणें होईल; माझें मस्तक अव्हेरणार नाहीं; आणखी त्यांच्या अनर्थांत माझी प्रार्थना होईल. त्यांचे न्यायाधीश डोंगराच्या कड्यांवरून सोडलें गेले, तेव्हां त्यांनीं माझीं वाक्ये ऐकिलीं, कारण कीं गोड होतीं. जसें कोणी भूमि उखळितांना व फोडितांना घडतें तसीं, आमचीं हाडें प्रेतस्थळाच्या तोंडीं पसरलेलीं आहेत. तथापि, हे प्रभू परमेश्वरा, माझे डोळे तुजकडे आहेत; मी तुझी आशा धरून राहिलों आहे; तूं माझ्या जिवाला उघडें ठेवूं नको. जो फांस त्यांनीं मजसाठीं लाविला, त्यापासून, आणि दुष्कर्म्यांच्या जाळ्यांपासून मला राख. दुष्टानीं आपल्याच जाळ्यांमध्यें पडावें; इतक्यांत म्या पार जावें.

दावीदाकडून मस्कील; जेव्हां तो गुहेंत होता, तेव्हांची प्रार्थना. मी आपल्या शब्दानें परमेश्वराजवळ ओरडेन; मी आपल्या शब्दानें परमेश्वराजवळ काकुळती करीन. मी आपलें हृदय त्याच्यापुढें ओतून

לְפָנָיו שִׂיחִי צָרָתִי לְפָנָיו אַגִּיד : בְּהִתְעַטֵּף עָלַי רוּחִי
וְאַתָּה יָדַעְתָּ נְתִיבָתִי בְּאֹרַח זוּ אַהֲלֵךְ טָמְנוּ פַּח לִי :
הַבֵּיט יָמִין וּרְאֵה וְאֵין לִי מַכִּיר אָבַד מָנוֹס מִמֶּנִּי אֵין
דּוֹרֵשׁ לְנַפְשִׁי : זָעַקְתִּי אֵלֶיךָ יְהוָה אָמַרְתִּי אַתָּה מַחְסִי
חֶלְקִי בְּאֶרֶץ הַחַיִּים : הַקְשִׁיבָה אֶל רִנָּתִי כִּי דַלּוֹתִי מְאֹד
הַצִּילֵנִי מֵרֹדְפַי כִּי אָמְצוּ מִמֶּנִּי : הוֹצִיאָה מִמַּסְגֵּר נַפְשִׁי
לְהוֹדוֹת אֶת שְׁמֶךָ בִּי יַכְתִּרוּ צַדִּיקִים כִּי תִגְמֹל עָלָי :

תפלת ערבית

(אומרים מזמור של אותו היום · ובראש חדש ברכי נפשי ·
ובחנוכה ובפורים ובחול המועד אומרים מזמור
השייך לאותו היום ואח״כ אומרים)

שִׁיר הַמַּעֲלוֹת הִנֵּה בָּרְכוּ אֶת יְהוָה כָּל עַבְדֵי יְהוָה
הָעֹמְדִים בְּבֵית יְהוָה בַּלֵּילוֹת : שְׂאוּ יְדֵיכֶם קֹדֶשׁ
וּבָרְכוּ אֶת יְהוָה : יְבָרֶכְךָ יְהוָה מִצִּיּוֹן עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ :

יְהוָה צְבָאוֹת עִמָּנוּ מִשְׂגָּב לָנוּ אֱלֹהֵי יַעֲקֹב סֶלָה : יְהוָה
צְבָאוֹת אַשְׁרֵי אָדָם בֹּטֵחַ בָּךְ : יְהוָה הוֹשִׁיעָה
הַמֶּלֶךְ יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ : בְּשָׁלוֹם יַחְדָּו אֶשְׁכְּבָה וְאִישָׁן
כִּי אַתָּה יְהוָה לְבָדָד לָבֶטַח תוֹשִׁיבֵנִי : תּוֹרִיעֵנִי אֹרַח
חַיִּים שֹׂבַע שְׂמָחוֹת אֵת פָּנֶיךָ נְעִימוֹת בִּימִינְךָ נֶצַח :
מִי יִתֵּן מִצִּיּוֹן יְשׁוּעַת יִשְׂרָאֵל בְּשׁוּב יְהוָה שְׁבוּת עַמּוֹ
יָגֵל יַעֲקֹב יִשְׂמַח יִשְׂרָאֵל : יוֹמָם יְצַוֶּה יְהוָה חַסְדּוֹ וּבַלַּיְלָה

काढीन; त्याच्यापुढें आपल्या संकटाचें निवेदन करीन. जेव्हां माझा आत्मा मज-मध्यें बुडतो, तेव्हां माझी वाट तुला कळली आहे; ज्या मार्गानें म्या चालावें, त्यांत त्यांनीं मजसाठीं फांस गुप्त मांडिला आहे. तूं उजव्या हाताकडे न्याहाळून पाहा; माझा कोणी ओळखणारा नाहीं; मला आश्रय नाहींसा झाला; माझ्या जिवाला विचारणारा कोणी नाहीं. हे परमेश्वरा, मी तुझ्याजवळ ओरडतों; मी ह्मणालों कीं, तूं माझा आश्रय, जिवंताच्या लोकीं माझा वांटा आहेस. माझ्या रडण्याकडे लक्ष लाव; कां तर मी फार दुबळा झालों; माझ्या पाठीं लागणाऱ्यापासून मला सोडीव, कारण कीं ते मजपेक्षां बळकट आहेत. तुझ्या नांवाची स्तुति करावयास, माझा जीव बंदींतून काढ; त्वां मजवर उपकार केल्यावरून नीतिमान माझ्या चहुंकडे येतील.

संध्याकाळचीं प्रार्थना.

(ज्या दिवशीं प्रार्थना करायाची त्या दिवसाचें गीत वाचावें ह्मणजे प्रतिपदेच्या दिवशीं בראי נפשי आणि हान्नुका, पुरीम, व सणाचे मधले दिवस या दिवशीं त्या दिवसां करितां नेमिलेलीं गीतें वाचून मग हें बोलावें.)

चढण्याचें गीत. अहो परमेश्वराचे सर्व सेवक, पहा, जे तुह्मी रात्रीं परमेश्वराच्या मंदिरांत उभे राहतां, ते तुम्ही परमेश्वराची स्तुति करा. आपले हात पवित्रस्थानीं उभारून परमेश्वराची स्तुति करा. आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्न करणारा परमेश्वर, यानें सियोनेंतून तुला आशीर्वाद द्यावा.

सैन्याचा परमेश्वर आम्हा संगती आहे, याआकोबाचा देव आमचा आश्रय आहे. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर भाव ठेवितो, तो धन्य आहे. हे परमेश्वरा, तारण कर, आम्ही प्रार्थितों तेव्हां राजानें उत्तर द्यावें. मी लागलाच आडवा पडून स्वस्थपणें झोंप घेईन; कां कीं, केवळ तूंच, हे परमेश्वरा, मला निर्भय राहवितोस. जीवनाचा मार्ग मला कळीव तुज समोर हर्षाची पूर्त्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे सर्वकाळ आनंद आहे. सियोनेतून इस्राएलाचें तारण कोण देईल ? परमेश्वर आपले लोक प्रवासांतून परत आणील, तेव्हां याआकोब हर्षेल व इस्राएल उल्लासेल. दिवसां परमेश्वर आपली दया प्रगट करील, आणि रात्रीं त्याचें गीत मजपाशीं होईल; माझ्या जीवनाच्या देवाला मजकडून

שִׁירָה עִמִּי תְּפִלָּה לְאֵל חָיָּי : וּתְשׁוּעַת צַדִּיקִים מֵיְהוָה
מָעוּזָּם בְּעֵת צָרָה : וַיַּעְזְרֵם יְהוָה וַיְפַלְּטֵם יְפַלְּטֵם מֵרְשָׁעִים
וְיוֹשִׁיעֵם כִּי חָסוּ בוֹ : חִזְקוּ וְיַאֲמֵץ לְבַבְכֶם כָּל הַמְיַחֲלִים
לַיְהוָה :

(ועומד שליח צבור לפני התיבה ואומר)

(אם יש מנין אומרים קדיש לעילא דף ס״ה)

וְהוּא רַחוּם יְכַפֵּר עָוֹן וְלֹא יַשְׁחִית וְהִרְבָּה לְהָשִׁיב
אַפּוֹ וְלֹא יָעִיר כָּל חֲמָתוֹ : יְהוָה הוֹשִׁיעָה הַמֶּלֶךְ
יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ :

(ואומר החזן

בָּרְכוּ אֶת יְהוָה הַמְבֹרָךְ :)

(ואומרים הקהל בלחש

יִשְׁתַּבַּח וְיִתְפָּאַר שִׁמוֹ שֶׁל מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים הַקָּדוֹשׁ
בָּרוּךְ הוּא • שֶׁהוּא רִאשׁוֹן וְהוּא אַחֲרוֹן וּמִבַּלְעָדָיו
אֵין אֱלֹהִים : יְהִי שֵׁם יְהוָה מְבֹרָךְ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם :
וּמְרוֹמָם עַל כָּל בְּרָכָה וּתְהִלָּה :)

(ועונין בקול רם

בָּרוּךְ יְהוָה הַמְבֹרָךְ לְעוֹלָם וָעֶד :) (והחזן חוזרו)

בָּרוּךְ אַתָּה יהוה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר בִּדְבָרוֹ
מַעֲרִיב עֲרָבִים בְּחָכְמָה • פּוֹתֵחַ שְׁעָרִים
בִּתְבוּנָה • מְשַׁנֶּה עִתִּים וּמַחֲלִיף אֶת הַזְּמַנִּים • וּמְסַדֵּר אֶת
הַכּוֹכָבִים • בְּמִשְׁמְרוֹתֵיהֶם בָּרָקִיעַ כִּרְצוֹנוֹ • בּוֹרֵא יוֹמָם
וָלָיְלָה • גּוֹלֵל אוֹר מִפְּנֵי חֹשֶׁךְ וְחֹשֶׁךְ מִפְּנֵי אוֹר • הַמַּעֲבִיר
יוֹם וּמֵבִיא לַיְלָה • וּמַבְדִּיל בֵּין יוֹם וּבֵין לַיְלָה • יְהוָה
צְבָאוֹת שְׁמוֹ • בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמַּעֲרִיב עֲרָבִים :

प्रार्थना होईल. कारण नीतिमानाचें तारण परमेश्वराकडून होतें, संकटसमयीं तोच त्यांचा आश्रय आहे. परमेश्वर त्यांचें सहाय करील व त्यांस सोडवील, दुष्टांपासून त्यांस सोडवील व तारील, कां तर ते त्याचा आश्रय धरितात. जे परमेश्वराची आशा धरितात, ते तुह्मी सर्व धीर धरा, म्हणजे तुमचें मन तो सबल करील.

(मग हाज्जान तेब्यावर उभा राहून हे म्हणतो.)

[दहा मनुष्यें असल्यास " कद्दिश लेएला " ह्मणावा. पृष्ठ ६५]

तो ममताळू आहे; यास्तव, तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करित नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो, आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं, हे परमेश्वरा, तारण कर, आम्ही हाक मारितों त्या दिवशीं राजानें आम्हांस उत्तर द्यावे.

[हाज्जान ह्मणतो.

सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.]

[हें वरील वाक्य हाज्जान म्हणतो आहे इतक्यांत मंडळीने पुढील हळू म्हणावे.

राजा, राजांचा राजा, आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें व गौरविलें जावो. पहिला तोच, व शेवटलाहि तोच; आणि त्यांवाचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुतिपेक्षां व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.]

[मंडळी मोठ्या स्वराने उत्तर देते.

सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.] (हें वाक्य हाज्जान पुनः म्हणतो.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या शब्देंकरून संध्याकाळ करणाऱ्या, ज्ञानानें आकाशाचीं द्वारें उघडणाऱ्या, बुद्धीने ऋतूंस पालटणाऱ्या, वेळ फिरविणाऱ्या, आपल्या इच्छेप्रमाणे ताऱ्यांस आकाशामध्यें त्यांच्या मार्गानें चालविणाऱ्या, दिवस व रात्र उत्पन्न करणाऱ्या, काळोखापुढून उजेड आणि उजेडापुढून काळोख हटविणाऱ्या, दिवस घालवून रात्र आणणाऱ्या, आणि दिवस व रात्र यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. ज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर तो तूंच. हे परमेश्वरा, संध्याकाळ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אַהֲבַת עוֹלָם בֵּית יִשְׂרָאֵל עַמְּךָ אָהַבְתָּ · תּוֹרָה
וּמִצְוֹת חֻקִּים וּמִשְׁפָּטִים אוֹתָנוּ לִמַּדְתָּ · עַל
כֵּן יְהוָה אֱלֹהֵינוּ בְּשָׁכְבֵנוּ וּבְקוּמֵנוּ נָשִׂיחַ בְּחֻקֶּיךָ · וְנִשְׂמַח
וְנַעֲלוֹז בְּדִבְרֵי תַלְמוּד תּוֹרָתֶךָ · וּמִצְוֹתֶיךָ וְחֻקּוֹתֶיךָ לְעוֹלָם
וָעֶד · כִּי הֵם חַיֵּינוּ וְאוֹרֶךְ יָמֵינוּ · וּבָהֶם נֶהְגֶּה יוֹמָם
וָלָיְלָה · וְאַהֲבָתְךָ (וְחֶמְלָתְךָ) לֹא תָסוּר מִמֶּנּוּ לְעוֹלָמִים ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אוֹהֵב אֶת עַמּוֹ יִשְׂרָאֵל :

שְׁמַע יִשְׂרָאֵל יְהוָה אֱלֹהֵינוּ יְהוָה אֶחָד :

(ואומרים בלחש

בָּרוּךְ שֵׁם כְּבוֹד מַלְכוּתוֹ לְעוֹלָם וָעֶד :)

וְאָהַבְתָּ אֵת יְהוָה אֱלֹהֶיךָ בְּכָל־לְבָבְךָ וּבְכָל־נַפְשְׁךָ
וּבְכָל־מְאֹדֶךָ : וְהָיוּ הַדְּבָרִים הָאֵלֶּה אֲשֶׁר
אָנֹכִי מְצַוְּךָ הַיּוֹם עַל לְבָבֶךָ : וְשִׁנַּנְתָּם לְבָנֶיךָ וְדִבַּרְתָּ
בָּם בְּשִׁבְתְּךָ בְּבֵיתֶךָ וּבְלֶכְתְּךָ בַדֶּרֶךְ וּבְשָׁכְבְּךָ וּבְקוּמֶךָ :
וּקְשַׁרְתָּם לְאוֹת עַל־יָדֶךָ וְהָיוּ לְטֹטָפֹת בֵּין עֵינֶיךָ :
וּכְתַבְתָּם עַל מְזוּזוֹת בֵּיתֶךָ וּבִשְׁעָרֶיךָ :

וְהָיָה אִם שָׁמֹעַ תִּשְׁמְעוּ אֶל־מִצְוֹתַי אֲשֶׁר אָנֹכִי מְצַוֶּה
אֶתְכֶם הַיּוֹם לְאַהֲבָה אֶת־יְהוָה אֱלֹהֵיכֶם וּלְעָבְדוֹ
בְּכָל־לְבַבְכֶם וּבְכָל־נַפְשְׁכֶם : וְנָתַתִּי מְטַר אַרְצְכֶם
בְּעִתּוֹ יוֹרֶה וּמַלְקוֹשׁ וְאָסַפְתָּ דְגָנֶךָ וְתִירֹשְׁךָ וְיִצְהָרֶךָ :
וְנָתַתִּי עֵשֶׂב בְּשָׂדְךָ לִבְהֶמְתֶּךָ וְאָכַלְתָּ וְשָׂבָעְתָּ : הִשָּׁמְרוּ
לָכֶם פֶּן־יִפְתֶּה לְבַבְכֶם וְסַרְתֶּם וַעֲבַדְתֶּם אֱלֹהִים אֲחֵרִים
וְהִשְׁתַּחֲוִיתֶם לָהֶם : וְחָרָה * אַף יְהוָה בָּכֶם וְעָצַר אֶת־

* אף אוֹב אוֹמרים.

त्वां आपला लोक इस्राएल याच्या घराण्यावर अखंड ममतेनें दया केली आहेस. त्वां आम्हास शास्त्र, विधि, नियम व न्याय शिकविले आहेत. यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, निजतांना व उठतांना आम्ही तुझ्या नियमाचें ध्यान करूं. आणि तुझ्या शास्त्रांतील, विधींतील आणि नियमांतील बोधक गोष्टींविषयीं सर्वकाळ आनंद व उल्हास मानूं ; कारण त्या आमचें जीवन व आमच्या आयुष्याचें दीर्घत्व आहेत; त्यांविषयीं रात्रंदिवस आह्मी मनन करूं. आणि तूं आपली दया व कृपा आम्हावरून कधींहि काढूं नको. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांवर प्रीति करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

(हें वाक्य हळू बोलावें.

त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.)

तर तूं आपल्या सर्व अंत:करणानें व आपल्या सर्व जिवानें व आपल्या सर्व शक्तीनें आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर. आणि मी आज तुला ज्या गोष्टी आज्ञेनें सांगतों, त्या तुझ्या हृदयांत असाव्या. आणि तूं आपल्या लेकरांजवळ त्या पुनः पुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना आणि वाटेवर चालतांना, आणि निजतांना आणि उठतांना यांविषयीं बोलत जा. आणि तूं त्या आपल्या हातासीं खुणेसाठीं बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं दे. आणि आपल्या घराच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही.

आणि ज्या आज्ञा मी आज तुम्हांस लावून देतों, त्या जर तुह्मी ऐकालच ऐकाल, म्हणजे आपल्या सर्व हृदयानें व आपल्या सर्व जिवानें आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आणि त्यांची सेवा कराल. तर असें होईल कीं, मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मागली वृष्टि पाडीन; अशानें तूं आपलें धान्य व आपला ताजा द्राक्षरस व आपलें तेल यांचा संग्रह करशील. आणि मी तुझ्या पशूसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन; असा तूं खाऊन तृप्त होशील. तुह्मी आपणाविषयीं सांभाळा, नाहीं तर तुमचें हृदय फसेल; आणि तुम्ही वळून दुसऱ्या देवांची सेवा कराल व त्यांचें भजन कराल. मग परमेश्वर तुम्हांवर रागें भरेल; आणि तो आकाशाला असें बंद करील कीं पाऊस होणार

הַשָּׁמַיִם וְלֹא יִהְיֶה מָטָר וְהָאֲדָמָה לֹא תִתֵּן אֶת־יְבוּלָהּ
וַאֲבַדְתֶּם · מְהֵרָה מֵעַל הָאָרֶץ הַטֹּבָה אֲשֶׁר יְהוָה נֹתֵן
לָכֶם : וְשַׂמְתֶּם אֶת־דְּבָרַי אֵלֶּה עַל־לְבַבְכֶם וְעַל־נַפְשְׁכֶם
וּקְשַׁרְתֶּם · אֹתָם לְאוֹת עַל־יֶדְכֶם וְהָיוּ לְטוֹטָפֹת בֵּין
עֵינֵיכֶם : וְלִמַּדְתֶּם אֹתָם אֶת־בְּנֵיכֶם לְדַבֵּר בָּם
בְּשִׁבְתְּךָ בְּבֵיתֶךָ וּבְלֶכְתְּךָ בַדֶּרֶךְ וּבְשָׁכְבְּךָ וּבְקוּמֶךָ :
וּכְתַבְתָּם עַל־מְזוּזוֹת בֵּיתֶךָ וּבִשְׁעָרֶיךָ : לְמַעַן יִרְבּוּ
יְמֵיכֶם וִימֵי בְנֵיכֶם עַל הָאֲדָמָה אֲשֶׁר נִשְׁבַּע יְהוָה לַאֲבֹתֵיכֶם
לָתֵת לָהֶם כִּימֵי הַשָּׁמַיִם עַל הָאָרֶץ :

וַיֹּאמֶר יְהוָה אֶל־מֹשֶׁה לֵאמֹר : דַּבֵּר אֶל־בְּנֵי יִשְׂרָאֵל
וְאָמַרְתָּ אֲלֵהֶם וְעָשׂוּ לָהֶם צִיצִת עַל־כַּנְפֵי
בִגְדֵיהֶם לְדֹרֹתָם וְנָתְנוּ עַל צִיצִת הַכָּנָף פְּתִיל תְּכֵלֶת :
וְהָיָה לָכֶם לְצִיצִת וּרְאִיתֶם אֹתוֹ וּזְכַרְתֶּם · אֶת־כָּל־
מִצְוֹת יְהוָה וַעֲשִׂיתֶם אֹתָם וְלֹא־תָתוּרוּ אַחֲרֵי לְבַבְכֶם
וְאַחֲרֵי עֵינֵיכֶם אֲשֶׁר־אַתֶּם זֹנִים־אַחֲרֵיהֶם : לְמַעַן תִּזְכְּרוּ
וַעֲשִׂיתֶם אֶת־כָּל־מִצְוֹתָי וִהְיִיתֶם קְדֹשִׁים לֵאלֹהֵיכֶם :
אֲנִי יְהוָה אֱלֹהֵיכֶם אֲשֶׁר הוֹצֵאתִי אֶתְכֶם · מֵאֶרֶץ מִצְרַיִם
לִהְיוֹת לָכֶם לֵאלֹהִים אֲנִי יְהוָה אֱלֹהֵיכֶם : (וענים הקהל
אֱמֶת : וחוזר ש״ץ יְהוָה אֱלֹהֵיכֶם אֱמֶת)

וֶאֱמוּנָה כָּל זֹאת וְקַיָּם עָלֵינוּ : כִּי הוּא יְהוָה
אֱלֹהֵינוּ וְאֵין זוּלָתוֹ · וַאֲנַחְנוּ יִשְׂרָאֵל עַמּוֹ :
הַפּוֹדֵנוּ מִיַּד מְלָכִים · הַגּוֹאֲלֵנוּ מִכַּף כָּל עָרִיצִים :
הָאֵל הַנִּפְרָע לָנוּ מִצָּרֵינוּ · הַמְשַׁלֵּם גְּמוּל לְכָל אוֹיְבֵי
נַפְשֵׁנוּ : הַשָּׂם נַפְשֵׁנוּ בַּחַיִּים · וְלֹא נָתַן לַמּוֹט רַגְלֵנוּ :

नाहीं, भूमिहि आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला देश परमेश्वर तुम्हांस देतो, त्यांतून तुम्ही लवकर नाहींसे व्हाल. तर तुम्ही ह्या गोष्टी आपल्या हृदयांत व आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं खुणेसाठीं त्या बांधा, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळ भूषण अशा असूं द्या. आणि तुह्मी आपल्या लेंकरांस त्या शिकवा; ह्मणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि जेव्हा वाटेने चालतोस आणि जेव्हां निजतोस, आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्याविषयीं बोलत जा, आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाजावर त्या लिहीं. ह्मणजे जी भूमि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील; जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे.

आणि परमेश्वराने मोशयाला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलाच्या संतानाजवळ बोलून त्यांस सांग कीं, त्यांनीं आपल्या पिढी परंपरा आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा लावावा. ती झालर तर तुह्मास अशी व्हावी कीं,: तुह्मी तीं पाहून परमेश्वराच्या सर्व आज्ञा आठवाव्या आणि त्याप्रमाणें आचरण करावें, असें कीं, ज्यास अनुसरून तुम्हीं व्यभिचारी झालां, म्हणजे आपलें हृदय व आपली दृष्टि त्याच्या मागें जाऊं नये. यासाठीं कीं तुह्मी माझ्या सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या देवासाठीं पवित्र व्हावें. मी परमेश्वर तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं तुह्मास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमेश्वर तुमचा देव आहें.

परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

हें सर्व सत्य, निःसंशय, आम्हामध्यें स्थापित आहे कीं, तोच आमचा परमेश्वर देव आहे; त्याशिवाय दुसरा कोणी नाहीं; आणि आम्ही इस्राएल त्याचे लोक आहों. आमच्या तारकाने राजांच्या हातांतून आम्हास खंडून काढलें; आमच्या राजानें बलात्काऱ्यांच्या पंज्यांतून आम्हास सोडिवलें. त्याच देवाने आम्हासाठीं आमच्या वैऱ्यांचा सूड घेतला, आणि आमच्या जिवाच्या सर्व शत्रूस योग्य दंड केला. तो आमचा प्राण वाचवितो, आणि आमचे पाय सरकूं देत

הַמַּרְיכֵנוּ עַל בָּמוֹת אוֹיְבֵינוּ וַיָּרֶם קַרְנֵנוּ עַל כָּל שׂוֹנְאֵינוּ:
הָאֵל הָעוֹשֶׂה לָנוּ נְקָמָה בְּפַרְעֹה · בְּאוֹתוֹת וּבְמוֹפְתִים
בְּאַרְמַת בְּנֵי חָם: הַמַּכֶּה בְּעֶבְרָתוֹ כָּל בְּכוֹרֵי מִצְרַיִם ·
וַיּוֹצִיא אֶת עַמּוֹ יִשְׂרָאֵל מִתּוֹכָם לְחֵרוּת עוֹלָם: הַמַּעֲבִיר
בָּנָיו בֵּין גִּזְרֵי יַם סוּף · וְאֶת רוֹדְפֵיהֶם וְאֶת שׂוֹנְאֵיהֶם
בְּתְהוֹמוֹת טִבַּע: רָאוּ בָנִים אֶת גְּבוּרָתוֹ שִׁבְּחוּ וְהוֹדוּ
לִשְׁמוֹ וּמַלְכוּתוֹ בְּרָצוֹן קִבְּלוּ עֲלֵיהֶם: מֹשֶׁה וּבְנֵי יִשְׂרָאֵל
לְךָ עָנוּ שִׁירָה בְּשִׂמְחָה רַבָּה · וְאָמְרוּ כֻלָּם: מִי כָמֹכָה
בָּאֵלִים יְהוָה מִי כָּמֹכָה נֶאְדָּר בַּקֹּדֶשׁ נוֹרָא תְהִלֹּת עֹשֵׂה
פֶלֶא: מַלְכוּתְךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ רָאוּ בָנֶיךָ עַל הַיָּם יַחַד
כֻּלָּם הוֹדוּ וְהִמְלִיכוּ וְאָמְרוּ יְהוָה יִמְלֹךְ לְעוֹלָם וָעֶד:
וְנֶאֱמַר כִּי פָדָה יְהוָה אֶת יַעֲקֹב וּגְאָלוֹ מִיַּד חָזָק מִמֶּנּוּ ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה גָּאַל יִשְׂרָאֵל:

הַשְׁכִּיבֵנוּ אָבִינוּ לְשָׁלוֹם · וְהַעֲמִידֵנוּ מַלְכֵּנוּ לְחַיִּים
טוֹבִים וּלְשָׁלוֹם · וּפְרוֹשׂ עָלֵינוּ סֻכַּת
שְׁלוֹמֶךָ · וְתַקְּנֵנוּ מַלְכֵּנוּ בְּעֵצָה טוֹבָה מִלְּפָנֶיךָ · וְהוֹשִׁיעֵנוּ
מְהֵרָה לְמַעַן שְׁמֶךָ · וְהָגֵן בַּעֲדֵנוּ · וְהָסֵר מֵעָלֵינוּ מַכַּת
אוֹיֵב · דֶּבֶר · חֶרֶב · חוֹלִי · צָרָה · רָעָה · רָעָב · וְיָגוֹן ·
וּמַשְׁחִית וּמַגֵּפָה · שִׂבּוֹר וְהָסֵר שָׂטָן מִלְּפָנֵינוּ וּמֵאַחֲרֵינוּ ·
וּבְצֵל כְּנָפֶיךָ תַּסְתִּירֵנוּ · וּשְׁמוֹר צֵאתֵנוּ וּבוֹאֵנוּ לְחַיִּים
טוֹבִים וּלְשָׁלוֹם מֵעַתָּה וְעַד עוֹלָם · כִּי אֵל שׁוֹמְרֵנוּ וּמַצִּילֵנוּ
אַתָּה מִכָּל דָּבָר רָע וּמְפַחֵד לַיְלָה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה
שׁוֹמֵר אֶת עַמּוֹ יִשְׂרָאֵל לָעַד אָמֵן:

(אם יש מנין אומרים קדיש לעילא דף ס״ה)

नाहीं. त्यानें आम्हास आमच्या शत्रूंच्या उंच स्थानावरून चालविलें, आणि आमच्या सर्व द्वेष्ट्यांवर आमचें शिंग उभारिलें. त्याच देवानें हामाच्या वंशाच्या देशांत चमत्कार व आश्चर्य कर्मे करून आम्हासाठीं फारोचा सूड उगविला. त्यानेच आपल्या रागाने मिसरांतील सर्व जेष्ठ पुत्र मारून आपल्या इस्राएल लोकांस निरंतरच्या मोकळीकीकरितां त्यांमधून काढिलें. त्यानें आपल्या लेंकरांस सूफ समुद्राच्या विभागांमधून चालवून त्यांचा पाठलाग व द्वेष करणारांस डोहांत बुडविलें. त्याच्या लेंकरांनी (असा) त्याचा पराक्रम पाहून त्याच्या नामाचें कीर्तन व स्तवन केलें, आणि स्वइच्छेनें त्याचें राज्य आपणावर मान्य केलें. मोशे व इस्राएलांच्या लेंकरांनी मोठ्या आनंदाने गायन करून एकदांच म्हणाले, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण ! पवित्रतेने महान, स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्ता असा तुझसारिखा कोण आहे ! हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सर्व लेंकरांनी समुद्र (तिरीं) तुझी राजसत्ता पाहिल्यावरून तुझी स्तुति केली, आणि तुझें राज्य आपणावर मान्य करून म्हणाले, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि असें म्हटलें आहे कीं, परमेश्वराने याकोब उद्धरिला आहे, आणि त्यापेक्षां जो बलवान होत त्याच्या हातांतून त्यास सोडविलें आहे. हे परमेश्वरा, इस्राएलाच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

हे आमच्या बापा, आम्हाम शांतीने झोंप लागूं दे; आणि ह आमच्या राजा, चांगल्या जीवनाने व शांतीने आम्हास उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा मंडप आम्हावर पसरून आपल्या सुबोधाने आम्हास सुधार; तूं आपल्या नामाकरितां लवकर आमचे तारण कर. आणि आम्हास रक्षून शत्रू, मरी, तरवार, रोग, संकट, अरिष्ट, दुष्काळ, दु:ख, नाश आणि पटकी यांच्या पीडा आम्हापासून दूर कर, आणि सातानाचा मोड करून त्यास आम्हापुढून व आम्हामागून दूर कर; तुझ्या पंखाच्या छायेखालीं आम्हास आश्रय दे; आणि आतांपासून सर्वकाळपर्यंत आमचें बाहेर जाणे व आंत येणें जीवनाने, सुखानें व शांतीने राख; कारण सर्व वाईट गोष्टींपासून व रात्रींच्या भयापासून आम्हास राखणारा व सोडाविणारा देव तूंच आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस सर्वकाळ रक्षणाऱ्या, तूं धन्य आहेस. आमेन.

(एथें दहा मनुष्यें असल्यास "कद्दीश लेएला" म्हणावा पृष्ठ ६५)

(אדון הכל · **יאהדונהי** · היה הוה ויהיה)

אֲדֹנָי שְׂפָתַי תִּפְתָּח וּפִי יַגִּיד תְּהִלָּתֶךָ׃

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ · אֱלֹהֵי אַבְרָהָם אֱלֹהֵי יִצְחָק וֵאלֹהֵי יַעֲקֹב · הָאֵל הַגָּדוֹל הַגִּבּוֹר וְהַנּוֹרָא · אֵל עֶלְיוֹן גּוֹמֵל חֲסָדִים טוֹבִים · קוֹנֵה הַכֹּל וְזוֹכֵר חַסְדֵי אָבוֹת · וּמֵבִיא גּוֹאֵל לִבְנֵי בְנֵיהֶם לְמַעַן שְׁמוֹ בְּאַהֲבָה׃

(בעש"ת אומרים

זָכְרֵנוּ לְחַיִּים מֶלֶךְ חָפֵץ בַּחַיִּים כָּתְבֵנוּ בְּסֵפֶר הַחַיִּים לְמַעַנְךָ אֱלֹהִים חַיִּים׃)

מֶלֶךְ עוֹזֵר וּמוֹשִׁיעַ וּמָגֵן · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מָגֵן אַבְרָהָם׃

אַתָּה גִּבּוֹר לְעוֹלָם אֲדֹנָי · מְחַיֵּה מֵתִים אַתָּה · רַב לְהוֹשִׁיעַ (בקיץ * מוֹרִיד הַטָּל) (ובחורף ‡ מַשִּׁיב הָרוּחַ וּמוֹרִיד הַגֶּשֶׁם) מְכַלְכֵּל חַיִּים בְּחֶסֶד מְחַיֵּה מֵתִים בְּרַחֲמִים רַבִּים · סוֹמֵךְ נוֹפְלִים · וְרוֹפֵא חוֹלִים · וּמַתִּיר אֲסוּרִים · וּמְקַיֵּם אֱמוּנָתוֹ לִישֵׁנֵי עָפָר · מִי כָמוֹךָ בַּעַל גְּבוּרוֹת וּמִי דּוֹמֶה לָךְ · מֶלֶךְ מֵמִית וּמְחַיֶּה וּמַצְמִיחַ יְשׁוּעָה׃

(בעש"ת אומרים

מִי כָמוֹךָ אָב הָרַחֲמָן זוֹכֵר יְצוּרָיו בְּרַחֲמִים לְחַיִּים׃)

וְנֶאֱמָן אַתָּה לְהַחֲיוֹת מֵתִים · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְחַיֵּה הַמֵּתִים׃

---

* पेसाहच्या पहिल्या दिवसाच्या ' मुसाफा ' पासून מוריד הטל बोलतात.

‡ शेमीनी आसेरेथच्या ' मुसाफा ' पासून משיב הרוח ומוריד הגשם बो॰

[सर्वांचा प्रभु परमेश्वर होता, आहे व असेल.]

हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक याआकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांचा धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि त्यांच्या लेंकरांच्या लेंकरांसाठीं दयेंकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[पश्चात्तापाच्या दिवसांत हें बोलावें.

हे जीवनांत आनंद मानणाऱ्या राजा ! जीवनाकरितां आमची आठवण कर हे जीवनांच्या देवा, तूं आपणाकरितां आह्मांस जीवनांच्या पुस्तकांत लिही.]

तूं राजा, सहायकर्ता, तारक व आम्हांवर ढालरूप असणारा, आहेस. हे परमेश्वरा आब्राहामाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

हे प्रभू, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस; मेलेल्यास जीवंत करणारा, तारायास समर्थ (उन्हाळ्यांत—दहिंवर पाडणारा) (हिंवाळ्यांत—वारा वाहविणारा आणि पाऊस पाडणारा) बहुत कृपेनें प्राणीमात्रांचें पोषण करणारा, बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यां बरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण ? आणि हे राजा, मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या व तारण उगविणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल !

[पश्चात्तापाच्या दिवसांत हें बोलावें.

हे दयाळू बापा, दयेनें प्राणीमात्रांची जीवनाकरितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे ?]

आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा, मेलेल्यास जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אַתָּה קָדוֹשׁ וְשִׁמְךָ קָדוֹשׁ וּקְדוֹשִׁים בְּכָל־יוֹם יְהַלְלוּךָ סֶּלָה׃ (כִּי אֵל מֶלֶךְ גָּדוֹל וְקָדוֹשׁ אַתָּה׃) בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הָאֵל הַקָּדוֹשׁ׃
(בעש"ת אומרים הַמֶּלֶךְ הַקָּדוֹשׁ׃)

אַתָּה חוֹנֵן לְאָדָם דַּעַת׃ וּמְלַמֵּד לֶאֱנוֹשׁ בִּינָה׃

במוצאי שבת ובמוצאי יום טוב אומרים

אַתָּה חוֹנַנְתָּנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ מַדַּע וְהַשְׂכֵּל׃ אַתָּה אֲמַרְתָּ לְהַבְדִּיל בֵּין קֹדֶשׁ לְחוֹל׃ וּבֵין אוֹר לְחֹשֶׁךְ׃ וּבֵין יִשְׂרָאֵל לָעַמִּים׃ וּבֵין יוֹם הַשְּׁבִיעִי לְשֵׁשֶׁת יְמֵי הַמַּעֲשֶׂה׃ בֵּשֵׁם שֶׁהִבְדַּלְתָּנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ מֵעַמֵּי הָאֲרָצוֹת וּמִמִּשְׁפְּחוֹת הָאֲדָמָה׃ כֵּךְ פְּדֵנוּ וְהַצִּילֵנוּ מִשָּׂטָן רָע וּמִפֶּגַע רָע׃ וּמִכָּל־גְּזֵרוֹת קָשׁוֹת וְרָעוֹת הַמִּתְרַגְּשׁוֹת לָבֹא בָּעוֹלָם׃

וְדָנֵנוּ מֵאִתְּךָ דֵּעָה וּבִינָה וְהַשְׂכֵּל׃ בָּרוּךְ אַתָּה יְהוָה חוֹנֵן הַדָּעַת׃

הֲשִׁיבֵנוּ אָבִינוּ לְתוֹרָתֶךָ׃ וְקָרְבֵנוּ מַלְכֵּנוּ לַעֲבוֹדָתֶךָ׃ וְהַחֲזִירֵנוּ בִּתְשׁוּבָה שְׁלֵמָה לְפָנֶיךָ׃ בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הָרוֹצֶה בִּתְשׁוּבָה׃

סְלַח לָנוּ אָבִינוּ כִּי חָטָאנוּ׃ מְחוֹל לָנוּ מַלְכֵּנוּ כִּי פָשָׁעְנוּ׃ כִּי אֵל טוֹב וְסַלָּח אַתָּה׃ בָּרוּךְ אַתָּה יְהוָה חַנּוּן הַמַּרְבֶּה לִסְלוֹחַ׃

רְאֵה נָא בְעָנְיֵנוּ וְרִיבָה רִיבֵנוּ וּמַהֵר לְגָאֳלֵנוּ גְּאֻלָּה שְׁלֵמָה לְמַעַן שְׁמֶךָ׃ כִּי אֵל גּוֹאֵל חָזָק אַתָּה׃ בָּרוּךְ אַתָּה יְהוָה גּוֹאֵל יִשְׂרָאֵל׃

רְפָאֵנוּ יְהוָה וְנֵרָפֵא׃ הוֹשִׁיעֵנוּ וְנִוָּשֵׁעָה׃ כִּי תְהִלָּתֵנוּ אַתָּה׃ וְהַעֲלֵה אֲרוּכָה וּמַרְפֵּא לְכָל־חֳלָיֵנוּ וּלְכָל־מַכְאוֹבֵינוּ׃ וּלְכָל־מַכּוֹתֵינוּ׃ כִּי אֵל רוֹפֵא רַחֲמָן

तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात; (कारण तूंच महान राजा, व पवित्र देव आहेस) हे परमेश्वरा, पवित्र देवा, [पश्चात्तापाच्या दिवसांत–पवित्र राजा] तूं धन्य आहेस.

शाब्बाथ आणि सण समाप्त होण्याच्या वेळीं हे बोलावें.

तूं मनुष्यावर ज्ञानाची कृपा करितोस, आणि मानवास बुद्धि शिकवतोस; तूं आम्हावर ज्ञानाची व शहाणपणाची कृपा केली आहेस. तूं पवित्र गोष्टीमध्यें व व्यवहारीक गोष्टींमध्यें, उजेडामध्यें व काळोखामध्यें, व इस्राएलांमध्यें व इतर लोकांमध्यें, सातव्या दिवसामध्यें व व्यवहाराच्या सहा दिवसांमध्यें भेद राखण्यास सांगितलें आहेस. तर हे परमेश्वरा, आमच्या देवा, ज्याप्रमाणें तूं आम्हास जगांतील इतर लोकांपासून आणि पृथ्वीवरील इतर जातींपासून निराळे राखिले आहेस, तसें तूं आहेस, तसें तूं आह्मास वाईट सातान (वैरी), व अपघात व सर्व कठोर व वाईट हुकुमनामे, ज्यामुळें जगांत धुंदाई होते, त्यांपासून आम्हास तार व सोडीव. त्यामाणें आम्हावर ज्ञानाची, बुद्धिची व शहाणपणाची कृपा कर; हे परमेश्वरा, कृपेकरून ज्ञान देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे आमच्या बापा, आह्मांस तुझ्या शास्त्राकडे वळीव, आणि हे आमच्या राजा, तुझी सेवा करावयास आम्हास जवळ घे. आणि पश्चात्तापाने आम्हास तुजपुढें परतीव. हे परमेश्वरा, पश्चात्तापामुळें प्रसन्न होणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे आमच्या बापा, आम्हास क्षमा कर, कारण आम्ही पाप केलें आहे; हे आमच्या राजा, आम्हास माफ कर, कारण आम्ही उल्लंघन केलें आहे; कां तर तूं चांगला व क्षमा करणारा देव आहेस. हे परमेश्वरा, कृपावंता व पुष्कळ क्षमा करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

आतां आमच्या दुःखाकडे पहा, आणि आमचा वाद तूं कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचा पूर्णपणें उद्धार करण्याकरितां त्वरा कर, कां तर तूं उद्धारणारा देव समर्थ आहेस. हे परमेश्वरा, इस्राएलांच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा, आम्हास निरोगी कर म्हणजे आम्ही निरोगी होऊं; आम्हांस तार म्हणजे आम्हीं तारण पाऊं; कां तूं आमचें स्तुतिपात्र आहेस. आणि आमचे सर्व रोग, आमचीं सर्व दुखणीं व आह्मावरील सर्व घाव, उपचार करून बरे कर;

וְנֶאֱמָן אַתָּה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה רוֹפֵא חוֹלֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל :

* (בקיץ

בָּרְכֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ (אָבִינוּ) בְּכָל־מַעֲשֵׂה יָדֵינוּ

וּבָרֵךְ שְׁנָתֵנוּ בְּטַלְלֵי רָצוֹן בְּרָכָה וּנְדָבָה ·
וּתְהִי אַחֲרִיתָהּ חַיִּים וְשָׂבָע וְשָׁלוֹם כַּשָּׁנִים הַטּוֹבוֹת
לִבְרָכָה · כִּי אֵל טוֹב וּמֵטִיב אַתָּה וּמְבָרֵךְ הַשָּׁנִים ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְבָרֵךְ הַשָּׁנִים :)

† (בחורף

בָּרֵךְ עָלֵינוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־הַשָּׁנָה הַזֹּאת

וְאֶת־כָּל־מִינֵי תְבוּאָתָהּ לְטוֹבָה · וְתֵן טַל
וּמָטָר לִבְרָכָה עַל כָּל־פְּנֵי הָאֲדָמָה · וְרַוֵּה פְּנֵי תֵבֵל ·
וְשַׂבַּע אֶת־הָעוֹלָם כָּלּוֹ מִטּוּבֶךָ · וּמַלֵּא יָדֵינוּ מִבִּרְכוֹתֶיךָ
וּמֵעֹשֶׁר מַתְּנוֹת יָדֶיךָ · שְׁמֹרָה וְהַצִּילָה שָׁנָה זוֹ מִכָּל־
דָּבָר רָע וּמִכָּל־מִינֵי מַשְׁחִית וּמִכָּל־מִינֵי פּוּרְעָנוּת ·
וַעֲשֵׂה לָהּ תִּקְוָה טוֹבָה וְאַחֲרִית שָׁלוֹם · חוּס וְרַחֵם
עָלֶיהָ וְעַל כָּל־תְּבוּאָתָהּ וּפֵרוֹתֶיהָ · וּבָרְכָהּ בִּנְשִׁמֵי
רָצוֹן בְּרָכָה וּנְדָבָה וּתְהִי אַחֲרִיתָהּ חַיִּים וְשָׂבָע וְשָׁלוֹם
כַּשָּׁנִים הַטּוֹבוֹת לִבְרָכָה · כִּי אֵל טוֹב וּמֵטִיב אַתָּה
וּמְבָרֵךְ הַשָּׁנִים · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְבָרֵךְ הַשָּׁנִים :)

תְּקַע בְּשׁוֹפָר גָּדוֹל לְחֵרוּתֵנוּ וְשָׂא נֵס לְקַבֵּץ גָּלֻיּוֹתֵינוּ

וְקַבְּצֵנוּ יַחַד מֵאַרְבַּע כַּנְפוֹת הָאָרֶץ לְאַרְצֵנוּ ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מְקַבֵּץ נִדְחֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל :

הָשִׁיבָה שׁוֹפְטֵינוּ כְּבָרִאשׁוֹנָה · וְיוֹעֲצֵינוּ כְּבַתְּחִלָּה ·
וְהָסֵר מִמֶּנּוּ יָגוֹן וַאֲנָחָה · וּמְלוֹךְ עָלֵינוּ מְהֵרָה

---

* पेसाहपासून हें बोलतात.

† डिसेंबर महिन्याच्या ४ थ्या, ५ व्या किंवा ६ व्या तारखेपासून हें बोलतात.

कां तर तूं दयाळू व विश्वासू देव वैद्य आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांचे रोग बरे करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[उन्हाळ्यांत हें बोलावें.

हे परमेश्वरा, आमच्या देवा (आमच्या बापा) आमच्या हातांच्या सर्व कामांस तूं आशीर्वाद दे; आणि आमच्या वर्षास प्रसन्नतेच्या, आशीर्वादाच्या व उदारपणाच्या दहिंवराकडून आशीर्वाद दे; आणि त्याचा शेवट चांगल्या वर्षाप्रमाणें जीवनानें, तृप्ततेनें, व सुखानें आशीर्वादित होवो; कां तर तूं चांगला व चांगलें करणारा, व वर्षास आशीर्वाद देणारा आहेस. हे परमेश्वरा, वर्षास आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.]

[हिंवाळ्यांत हें बोलावें.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, हें वर्ष व त्याचें निरनिराळ्या प्रकारचें उत्पन्न कल्याणकारक व्हावें म्हणून तूं त्यास आशीर्वाद दे. सर्व पृथ्वीच्या पाठीवर कुशल व्हावें म्हणून दहिंवर व पाऊस दे, पृथ्वीस तृप्त कर, आपल्या चांगुलपणानें सर्व जगास संतुष्ट कर, आणि तुझ्या आशीर्वादांनीं व तुझ्या हातांच्या विपूल दानांनीं आमचे हात भर. या वर्षास सर्व वाईट गोष्टींपासून, सर्व प्रकारच्या नाशापासून व सर्व प्रकारच्या शिक्षेपासून संभाळ व राख; आणि त्याजविषयींची आमची आशा कल्याणयुक्त व त्याचा शेवट सुखाचा होऊं दे. त्याजवर व त्याच्या सर्व उत्पन्नावर व फलावर दया व कृपा कर. आणि त्यास प्रसन्नतेच्या, आशीर्वादाच्या व उदारपणाच्या वृष्टिनें आशीर्वाद दे. आणि त्याचा शेवट चांगल्या वर्षाप्रमाणें जीवनानें, तृप्ततेनें, व सुखानें आशीर्वादित होवो; कां तर तूं चांगला व चांगलें करणारा व वर्षास आशीर्वाद देणारा आहेस. हे परमेश्वरा, वर्षास आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.]

आमच्या मुक्तते करितां मोठ्यानें कर्णा वाजीव, आणि आमचे पाडाव एकवट करण्यास झेंडा उभार, आणि पृथ्वीच्या चोहों कोनांकडून आम्हास आमच्या देशीं एकवट कर. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांच्या विखरलेल्यांस एकवट करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पहिल्याप्रमाणें आमचे न्यायाधिश व पूर्वीप्रमाणें आमचे मंत्री स्थाप. आणि आम्हांपासून दुःख व खेद दूर कर. आणि हे परमेश्वरा, लवकरच

לַמַּלְשִׁינִים וְלַמִּינִים אַל תְּהִי תִקְוָה · וְכָל־הַזֵּדִים
כְּרֶגַע יֹאבֵדוּ · וְכָל־אוֹיְבֶיךָ וְכָל־שׂוֹנְאֶיךָ
מְהֵרָה יִכָּרֵתוּ · וּמַלְכוּת הָרִשְׁעָה מְהֵרָה תְּעַקֵּר וּתְשַׁבֵּר
וּתְכַלֵּם וְתַכְנִיעֵם וְתַשְׁמִידֵם בִּמְהֵרָה בְיָמֵינוּ · בָּרוּךְ אַתָּה
יְהוָה שׁוֹבֵר אוֹיְבִים וּמַכְנִיעַ מִינִים

עַל הַצַּדִּיקִים וְעַל הַחֲסִידִים וְעַל שְׁאֵרִית עַמְּךָ בֵּית
יִשְׂרָאֵל · וְעַל זִקְנֵיהֶם וְעַל פְּלֵיטַת בֵּית סוֹפְרֵיהֶם ·
וְעַל גֵּרֵי הַצֶּדֶק וְעָלֵינוּ יֶהֱמוּ נָא רַחֲמֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ ·
וְתֵן שָׂכָר טוֹב לְכָל־הַבּוֹטְחִים בְּשִׁמְךָ בֶּאֱמֶת · וְשִׂים
חֶלְקֵנוּ עִמָּהֶם · וּלְעוֹלָם לֹא נֵבוֹשׁ כִּי בְךָ בָּטָחְנוּ · וְעַל
חַסְדְּךָ הַגָּדוֹל בֶּאֱמֶת נִשְׁעַנְנוּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מִשְׁעָן
וּמִבְטָח לַצַּדִּיקִים :

תְּשׁוּכוֹן בְּתוֹךְ יְרוּשָׁלַיִם עִירְךָ כַּאֲשֶׁר דִּבַּרְתָּ · וְכִסֵּא
דָוִד עַבְדְּךָ מְהֵרָה בְתוֹכָהּ תָּכִין וּבְנֵה אוֹתָהּ
בִּנְיַן עוֹלָם בִּמְהֵרָה בְיָמֵינוּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה בּוֹנֵה
יְרוּשָׁלָיִם

אֶת־צֶמַח דָּוִד עַבְדְּךָ מְהֵרָה תַּצְמִיחַ · וְקַרְנוֹ תָּרוּם
בִּישׁוּעָתֶךָ · כִּי לִישׁוּעָתְךָ קִוִּינוּ כָּל־הַיּוֹם · בָּרוּךְ
אַתָּה יְהוָה מַצְמִיחַ קֶרֶן יְשׁוּעָה :

שְׁמַע קוֹלֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ אָב רַחֲמָן חוּס וְרַחֵם
עָלֵינוּ וְקַבֵּל בְּרַחֲמִים וּבְרָצוֹן אֶת־תְּפִלָּתֵנוּ · כִּי
אֵל שׁוֹמֵעַ תְּפִלּוֹת וְתַחֲנוּנִים אַתָּה · וּמִלְּפָנֶיךָ מַלְכֵּנוּ
רֵיקָם אַל תְּשִׁיבֵנוּ · חָנֵּנוּ וַעֲנֵנוּ וּשְׁמַע תְּפִלָּתֵנוּ ·

चाहाडांस व धर्म भ्रष्टांस आशा नसो; सर्व अभिमानी एका क्षणांत नाहींसे होवोत. तुझे सर्व शत्रू व वैरी लवकर छेदले जावोत, आणि दुष्टाईचें राज्य तूं लवकर आमच्या दिवसांत उपटून काढ, छेदून टाक, भस्म कर, नमीव व त्याचा नाश कर. हे परमेश्वरा, शत्रूंस छेदणाऱ्या, व गर्विष्ठांस नमविणाऱ्या, तूं धन्य आहेस. *

हे परमेश्वरा, आमच्या देवा, सात्विकांकरितां, नीतिमानांकरितां, तुझे लोक इस्राएलाचें घराणें याच्या शेषाकरितां, वडिलांकरितां, त्यांच्या शारुयांच्या घराण्यांतून उरलेल्याकरितां, नीतिमत्वाच्या विदेशांकरितां, आणि आम्हांकरितां, आतां तुझ्या दयेला द्रव्य येऊं दे; जे सत्यतेनें तुझ्या नामावर भरंवसा ठेवितात त्या सर्वांस तूं चांगलें वेतन दे, आणि त्यांजबरोबर आमचाहि विभाग असूं दे; आणि आम्ही तुजवर विश्वास ठेविला आहे, आणि तुझ्या मोठ्या दयेवर खरोखर भरंवसा ठेविला आहे, म्हणून आम्ही कधींच लज्जित होऊं नये असे कर. हे परमेश्वरा, सात्विकांस आश्रय व भरंवसा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

जसें तूं म्हटलें आहेस त्याप्रमाणें तूं आपल्या येरूशालेम नगरीं वास कर; तुझा सेवक दावीद याचें आसन तिजमध्यें लवकर स्थापन कर; आणि ती इमारत सर्वकाळ टिकेल अशी लवकर व आमचे दिवसांत बांध. हे परमेश्वरा, येरूशालेमेस बांधणाऱ्या, तूं धन्य आहेस.

तुझा सेवक दावीद याचा कोंब लवकर उगीव, आणि तुझ्या तारणानें त्याचें शिंग उभार; कारण प्रति दिवशीं आम्ही तुझ्या तारणाची वाट पाहतो. हे परमेश्वरा, तारणाचें शिंग उगविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, दयाळू बापा, आमची वाणी ऐक, आम्हांवर दया व कृपा कर, आणि दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना ऐक; कारण तूं प्रार्थना व विनंती ऐकणारा देव आहेस; हे आमच्या राजा, आम्हांस तुजपुढें रिकामे परतवूं नको; आम्हांवर दया कर, आम्हांस उत्तर दे आणि आमची प्रार्थना ऐक;

---

* या भागावर दिलेली टीका पृष्ट ७५ च्या खाली पहा.

כִּי אַתָּה שׁוֹמֵעַ תְּפִלַּת כָּל פֶּה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה שׁוֹמֵעַ תְּפִלָּה :

רְצֵה יְהוָה אֱלֹהֵינוּ בְּעַמְּךָ יִשְׂרָאֵל וְלִתְפִלָּתָם שְׁעֵה · וְהָשֵׁב הָעֲבוֹדָה לִדְבִיר בֵּיתֶךָ · וְאִשֵּׁי יִשְׂרָאֵל וּתְפִלָּתָם מְהֵרָה בְּאַהֲבָה תְקַבֵּל בְּרָצוֹן · וּתְהִי לְרָצוֹן תָּמִיד עֲבוֹדַת יִשְׂרָאֵל עַמֶּךָ :

(בראש חודש ובחול המועד אומרים

אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ יַעֲלֶה וְיָבֹא יַגִּיעַ וְיֵרָאֶה וְיֵרָצֶה יִשָּׁמַע יִפָּקֵד וְיִזָּכֵר זִכְרוֹנֵנוּ וְזִכְרוֹן אֲבוֹתֵינוּ · זִכְרוֹן יְרוּשָׁלַיִם עִירֶךָ וְזִכְרוֹן מָשִׁיחַ בֶּן דָּוִד עַבְדֶּךָ וְזִכְרוֹן כָּל־עַמְּךָ בֵּית יִשְׂרָאֵל לְפָנֶיךָ לִפְלֵיטָה לְטוֹבָה לְחֵן וּלְחֶסֶד וּלְרַחֲמִים · לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם

(בראש חדש בְּיוֹם רֹאשׁ הַחֹדֶשׁ הַזֶּה ·)

(בחול המועד של פסח

בְּיוֹם חַג הַמַּצּוֹת הַזֶּה · בְּיוֹם מִקְרָא קֹדֶשׁ הַזֶּה ·)

(בחול המועד של סוכות

בְּיוֹם חַג הַסֻּכּוֹת הַזֶּה · בְּיוֹם מִקְרָא קֹדֶשׁ הַזֶּה ·)

לְרַחֵם בּוֹ עָלֵינוּ וּלְהוֹשִׁיעֵנוּ · זָכְרֵנוּ יְהוָה אֱלֹהֵינוּ בּוֹ לְטוֹבָה · וּפָקְדֵנוּ בּוֹ לִבְרָכָה · וְהוֹשִׁיעֵנוּ בּוֹ לְחַיִּים טוֹבִים · בִּדְבַר יְשׁוּעָה וְרַחֲמִים · חוּס וְחָנֵּנוּ וְרַחֵם עָלֵינוּ · וְהוֹשִׁיעֵנוּ כִּי אֵלֶיךָ עֵינֵינוּ כִּי אֵל מֶלֶךְ חַנּוּן וְרַחוּם אַתָּה :)

וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים תַּחְפּוֹץ בָּנוּ וְתִרְצֵנוּ · וְתֶחֱזֶינָה עֵינֵינוּ בְּשׁוּבְךָ לְצִיּוֹן בְּרַחֲמִים · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמַּחֲזִיר שְׁכִינָתוֹ לְצִיּוֹן :

कारण तूंच सर्वांच्या मुखांतील प्रार्थना ऐकतोस. हे परमेश्वरा, प्रार्थना ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो, त्यांची प्रार्थना मनावर घे, आपल्या घराच्या प्रसाद स्थानीं पूजन पुनः चालू कर, इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर प्रीतीनें व आवडीनें मान्य कर, आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला सर्वदा आवडो.

[प्रतिपदेच्या दिवशीं व सणांच्या व्यवहारिक दिवशीं हें बोलावें.

हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या येरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो मशीयाह त्याची आणि तुझ्या सर्व इस्राएल लोकांचें घराणें यांची आठवण—

(प्रतिपदेच्या दिवशीं—या प्रतिपदेच्या दिवशीं)

(पेसाहच्या व्यवहारिक दिवशीं—

या न फुगलेल्या भाकरीच्या सणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं)

(मंडपाच्या सणाच्या व्यवहारिक दिवशीं—

या मंडपाच्या सणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं)

यशस्वी तारणाकरितां कृपेनें, दयेनें व ममतेनें तुजपुढें चढो, येवो, पोहोंचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली जावो, आणि आठविली जावो· आम्हावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास, हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आम्हावर आशीर्वाद होण्याकरितां आम्हास दर्शन दे; आम्हास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनानें आम्हास राख, आम्हावर कृपा कर; आमची करुणा येऊं दे; आह्मावर दया कर, आणि आम्हास तार; कारण तूंच दयाळू व कृपाळू राजा आहेस; म्हणूनच आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.]

तूं आपल्या बहुत दयेनें आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो; मग आमचे डोळे तुला कृपेनें सियोनेकडे फिरताना पाहतील. हे परमेश्वरा, आपला शेखीना * सियोने मध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

---

* ईश्वरी साक्षात्कार.

מודים אֲנַחְנוּ לָךְ שֶׁאַתָּה הוּא יְהוָה אֱלֹהֵינוּ
וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ לְעוֹלָם וָעֶד צוּר חַיֵּינוּ
מָגֵן יִשְׁעֵנוּ אַתָּה הוּא לְדוֹר וָדוֹר נוֹדֶה לְךָ וּנְסַפֵּר
תְּהִלָּתֶךָ · עַל חַיֵּינוּ הַמְּסוּרִים בְּיָדֶךָ · וְעַל נִשְׁמוֹתֵינוּ
הַפְּקוּדוֹת לָךְ · וְעַל נִסֶּיךָ שֶׁבְּכָל־יוֹם עִמָּנוּ · וְעַל
נִפְלְאוֹתֶיךָ וְטוֹבוֹתֶיךָ · שֶׁבְּכָל־עֵת עֶרֶב וָבֹקֶר וְצָהֳרָיִם ·
הַטּוֹב כִּי לֹא כָלוּ רַחֲמֶיךָ הַמְרַחֵם כִּי לֹא תַמּוּ חֲסָדֶיךָ ·
כִּי מֵעוֹלָם קִוִּינוּ לָךְ :

(בחנוכה אומרים

עַל הַנִּסִּים וְעַל הַפֻּרְקָן וְעַל הַגְּבוּרוֹת וְעַל הַתְּשׁוּעוֹת
וְעַל הַנִּפְלָאוֹת וְעַל הַנֶּחָמוֹת שֶׁעָשִׂיתָ לַאֲבוֹתֵינוּ
בַּיָּמִים הָהֵם בַּזְּמַן הַזֶּה : בִּימֵי מַתִּתְיָהוּ בֶּן יוֹחָנָן כֹּהֵן
גָּדוֹל חַשְׁמוֹנָאִי וּבָנָיו כְּשֶׁעָמְדָה מַלְכוּת יָוָן הָרְשָׁעָה
עַל עַמְּךָ יִשְׂרָאֵל לְשַׁכְּחָם מִתּוֹרָתֶךָ וּלְהַעֲבִירָם מֵחֻקֵּי
רְצוֹנֶךָ · וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים עָמַדְתָּ לָהֶם בְּעֵת
צָרָתָם · רַבְתָּ אֶת־דִּינָם · דַּנְתָּ אֶת־דִּינָם · נָקַמְתָּ אֶת־
נִקְמָתָם · מָסַרְתָּ גִּבּוֹרִים בְּיַד חַלָּשִׁים · וְרַבִּים בְּיַד
מְעַטִּים · וּרְשָׁעִים בְּיַד צַדִּיקִים וּמְמֵאִים בְּיַד טְהוֹרִים ·
וְזֵדִים בְּיַד עוֹסְקֵי תוֹרָתֶךָ · וּלְךָ עָשִׂיתָ שֵׁם גָּדוֹל וְקָדוֹשׁ
בְּעוֹלָמֶךָ וּלְעַמְּךָ יִשְׂרָאֵל עָשִׂיתָ תְּשׁוּעָה גְּדוֹלָה וּפוּרְקָן
כְּהַיּוֹם הַזֶּה · וְאַחַר כַּךְ בָּאוּ בָנֶיךָ לִדְבִיר בֵּיתֶךָ · וּפִנּוּ
אֶת־הֵיכָלֶךָ וְטִהֲרוּ אֶת־מִקְדָּשֶׁךָ · וְהִדְלִיקוּ נֵרוֹת בְּחַצְרוֹת
קָדְשֶׁךָ · וְקָבְעוּ שְׁמוֹנָה יָמִים אֵלּוּ בְּהַלֵּל וּבְהוֹדָאָה ·
וְעָשִׂיתָ עִמָּהֶם נִסִּים וְנִפְלָאוֹת וְנוֹדֶה לְשִׁמְךָ הַגָּדוֹל סֶלָה :)

सदांसवकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, जो तूं तुलाच आम्ही स्तवितों * तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमचे तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपविलेला आहे, आमचा आत्मा तुझे स्वाधीन आहे. तुझे चमत्कार आह्मांमध्यें नित्य केले जातात, आणि तुझीं आश्चर्य कृत्यें व तुझा चांगुलपणा आम्ही संध्याकाळीं, सकाळीं व दोनप्रहरीं अनुभवितों, त्याकरितां आम्ही पिढोपिढीं तुझें कीर्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया आम्हावरून नाहींसी होत नाहीं; तूं कृपाळू कारण सर्वकाळ आम्ही तुजवर आशा ठेवितों, म्हणून तुझी कृपा आम्हांवरून सरत नाहीं.

[हान्नुक्याच्या सणांत हें म्हणतात.

आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत यावेळीं जीं अद्भुत कर्में, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस:— म्हणजे योहानानाचा पुत्र मतातया मुख्य याजक जो हाशमोनाय याच्या व त्याच्या पुत्रांच्या दिवसांत तुंझे लोक इस्राएल यांस तुझ्या शास्त्राचा विसर पाडण्याकरितां. आणि तुझे प्रसन्नतेचे करार उल्लंघविण्याकरितां, दुष्ट यावानाचा राज्याधिकार जेव्हां उठला होता; तेव्हां तूं आपल्या परम दयेनें त्यांच्या संकटसमयीं त्यांसाठीं उभा राहिलास; त्यांचा वाद तूं केलास; त्यांचा न्याय तूं निवडिलास; आणि त्यांचा सूड तूं उगवून अशक्तांच्या हातीं बलवानांस, थोडक्यांच्या हातीं पुष्कळांस, सात्विकांच्या हातीं दुष्टांस, शुद्धांच्या हातीं अशुद्धांस, आणि तुझ्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांच्या हातीं गर्विष्ठांस सोंपून दिलेंस. आणि तूं आपणाकरितां आपले जगांत मोठी व पवित्र कीर्ति मिळवून केवळ आजच असें तूं आपले लोक इस्राएल यांचें मोठें तारण व उद्धार केलास. यानंतर तुझ्या लेंकरांनीं तुझ्या पवित्र देवळांत येऊन तुझें मंदिर स्वच्छ केलें, तुझ्या पवित्र अंगणांत दिवे लाविले, आणि हे आठ दिवस स्तुतीचे व कीर्तनाचे ठरविले; याप्रमाणें अद्भुत कर्में व चमत्कार तूं त्याचकरितां केलेस, म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह.]

---

* स्तवितों याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी आधिकार मान्य करितों असाहि करितात.

(בפורים אומרים

עַל הַנִּסִּים וְעַל הַפֻּרְקָן וְעַל הַגְּבוּרוֹת וְעַל הַתְּשׁוּעוֹת וְעַל
הַנִּפְלָאוֹת וְעַל הַנֶּחָמוֹת שֶׁעָשִׂיתָ לַאֲבוֹתֵינוּ בַּיָּמִים הָהֵם
בַּזְּמַן הַזֶּה : בִּימֵי מָרְדְּכַי וְאֶסְתֵּר בְּשׁוּשָׁן הַבִּירָה
כְּשֶׁעָמַד עֲלֵיהֶם הָמָן הָרָשָׁע · בִּקֵּשׁ לְהַשְׁמִיד לַהֲרוֹג
וּלְאַבֵּד אֶת כָּל הַיְּהוּדִים מִנַּעַר וְעַד זָקֵן טַף וְנָשִׁים בְּיוֹם
אֶחָד בִּשְׁלשָׁה עָשָׂר לְחֹדֶשׁ שְׁנֵים עָשָׂר הוּא חֹדֶשׁ אֲדָר
וּשְׁלָלָם לָבוֹז · וְאַתָּה בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים הֵפַרְתָּ אֶת עֲצָתוֹ
וְקִלְקַלְתָּ אֶת מַחֲשַׁבְתּוֹ וַהֲשֵׁבוֹתָ לוֹ גְּמוּלוֹ בְּרֹאשׁוֹ
וְתָלוּ אוֹתוֹ וְאֶת בָּנָיו עַל הָעֵץ וְעָשִׂיתָ עִמָּהֶם נֵסִּים
וְנִפְלָאוֹת וְנוֹרָה לִשְׁמְךָ הַגָּדוֹל סֶלָה :)

וְעַל כֻּלָּם יִתְבָּרַךְ וְיִתְרוֹמַם וְיִתְנַשֵּׂא תָּמִיד שִׁמְךָ מַלְכֵּנוּ
לְעוֹלָם וָעֶד · וְכָל הַחַיִּים יוֹדוּךָ סֶלָה :

(בימי תשובה אומרים

וּכְתוֹב לְחַיִּים טוֹבִים כָּל בְּנֵי בְרִיתֶךָ :)

וְיַהַלְלוּ וְיָבָרְכוּ אֶת שִׁמְךָ הַגָּדוֹל בֶּאֱמֶת לְעוֹלָם כִּי טוֹב
הָאֵל יְשׁוּעָתֵנוּ וְעֶזְרָתֵנוּ סֶלָה הָאֵל הַטּוֹב ·
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַטּוֹב שִׁמְךָ וּלְךָ נָאֶה לְהוֹדוֹת :

שִׂים שָׁלוֹם טוֹבָה וּבְרָכָה חַיִּים חֵן וָחֶסֶד · צְדָקָה
וְרַחֲמִים עָלֵינוּ וְעַל כָּל יִשְׂרָאֵל עַמֶּךָ · וּבָרְכֵנוּ
אָבִינוּ כֻּלָּנוּ כְּאֶחָד בְּאוֹר פָּנֶיךָ · כִּי בְאוֹר פָּנֶיךָ נָתַתָּ לָנוּ
יְהוָה אֱלֹהֵינוּ · תּוֹרָה וְחַיִּים · אַהֲבָה וָחֶסֶד · צְדָקָה
וְרַחֲמִים · בְּרָכָה וְשָׁלוֹם · וְטוֹב בְּעֵינֶיךָ לְבָרְכֵנוּ · וּלְבָרֵךְ
אֶת כָּל עַמְּךָ יִשְׂרָאֵל בְּרוֹב עֹז וְשָׁלוֹם :

(पुरीमच्या सणांत हें म्हणतात.

आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत यावेळीं जीं अद्भुत कर्मे, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलीस:—म्हणजे मोर्देखाय व एस्तेर यांच्या दिवसांत शूशान किल्ल्यांत जेव्हां दुष्ट हामान उठला, आणि एका दिवशीं बारावा महिना जो आदार महिना त्याच्या तेराव्या तारखेस येहुद्यांतील सर्व आबाल वृद्धांचा, व बायका पोरांचा नाश करावा, त्यांस मारून टाकावे व नष्ट करावे आणि त्यांची लुट करून घ्यावी असें योजिलें; तेव्हां तूं आपल्या मोठ्या दयेनें त्याचा विचार मोडिलास, त्याच्या योजनेचा भंग केलास, आणि त्याची फेड त्याच्या शिरीं केलीस; आणि त्यांनी त्यास व त्याच्या पुत्रास लांकडावर फांशी दिलें. याप्रमाणें अद्भुत कर्मे व चमत्कार तूं त्यांकरितां केलेस म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह)

हे आमच्या राजा, या सर्व दयवरून तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य झालें, उंचावलें व वर्णिले जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह.

[पश्चात्तापाच्या दिवसांत हें म्हणावें.

आणि तूं आपल्या कराराच्या लेकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.]

मग हे आमच्या तारणाच्या व साह्यकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास स्तवितील आणि धन्य म्हणतील; कारण तें चांगलें आहे, सेलाह. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस, तुझें नाम चांगलें आणि स्तवन तुलाच शोभतें.

हे परमेश्वरा, आम्हावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगले आशीर्वाद, जीवन दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे; आणि हे आमच्या बापा तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हां सर्वांस एकवेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मांस शास्त्र व जीवन, प्रीति, व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिली आहेस. आणि आम्हांस व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें आहेच.

(בעשי"ת אומרים

וּבְסֵפֶר חַיִּים בְּרָכָה וְשָׁלוֹם וּפַרְנָסָה טוֹבָה וְיִשּׁוּעָה
וְנֶחָמָה וּגְזֵרוֹת טוֹבוֹת נִזָּכֵר וְנִכָּתֵב לְפָנֶיךָ אֲנַחְנוּ
וְכָל־עַמְּךָ יִשְׂרָאֵל לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם׃)
בָּרוּךְ אַתָּה יְהוָה הַמְבָרֵךְ אֶת־עַמּוֹ יִשְׂרָאֵל בַּשָּׁלוֹם אָמֵן׃
יִהְיוּ לְרָצוֹן אִמְרֵי־פִי וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגוֹאֲלִי׃

(טוב לומר שיר למעלות אשא עיני אל ההרים)

אֱלֹהַי נְצוֹר לְשׁוֹנִי מֵרָע · וְשִׂפְתוֹתַי מִדַּבֵּר מִרְמָה ·
וְלִמְקַלְלַי נַפְשִׁי תִדּוֹם · וְנַפְשִׁי כֶּעָפָר לַכֹּל
תִּהְיֶה · פְּתַח לִבִּי בְּתוֹרָתֶךָ · וְאַחֲרֵי מִצְוֹתֶיךָ תִּרְדּוֹף
נַפְשִׁי · וְכָל־הַקָּמִים עָלַי לְרָעָה · מְהֵרָה הָפֵר עֲצָתָם
וְקַלְקֵל מַחְשְׁבוֹתָם · יִהְיוּ כְּמֹץ לִפְנֵי רוּחַ וּמַלְאַךְ יְהוָה
דּוֹחֶה עֲשֵׂה לְמַעַן שְׁמֶךָ · עֲשֵׂה לְמַעַן יְמִינֶךָ · עֲשֵׂה
לְמַעַן תּוֹרָתֶךָ · עֲשֵׂה לְמַעַן קְדוּשָׁתֶךָ׃ לְמַעַן יֵחָלְצוּן
יְדִידֶיךָ׃ הוֹשִׁיעָה יְמִינְךָ וַעֲנֵנִי׃ יִהְיוּ לְרָצוֹן אִמְרֵי־פִי
וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגוֹאֲלִי׃

עוֹשֶׂה שָׁלוֹם בִּמְרוֹמָיו הוּא בְרַחֲמָיו יַעֲשֶׂה שָׁלוֹם עָלֵינוּ
וְעַל כָּל־עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן׃

(ואומר בקול רם)

יְהִי שֵׁם יְהוָה מְבוֹרָךְ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם׃ מִמִּזְרַח
שֶׁמֶשׁ עַד מְבוֹאוֹ מְהֻלָּל שֵׁם יְהוָה׃ יְהוָה אֲדוֹנֵינוּ
מַה אַדִּיר שִׁמְךָ בְּכָל הָאָרֶץ׃

(אם יש מנין אומרים קדיש תתקבל דף ק")

[प्रायश्चित्ताच्या दिवसांत हें म्हणावें.

आणि आम्ही व तुझे इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्न सामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत असें कर.]

हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशिर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

[एथें गीत १२१ म्हणावें हें बरें]

हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझें ओठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौन धर आणि माझा जीव सर्वांपुढें धुळीप्रमाणें (नम्र) होवो. माझ्या जीवाने तुझ्या आज्ञाप्रमाणें चालावें, म्हणून माझें मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव) आणि जे कोणी माझ्या वाईटावर उठतात त्यांचे विचार लवकर मोडून त्यांच्या कुकल्पनांचा नाश कर. असें तूं आपल्या नांवाकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां, (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां, आपल्या पवित्रतेकरितां कर. तुझे प्रिय मुक्त व्हावे म्हणून तूं आपल्या उजव्या हाताने मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

जो उंच आकाशांत शांति राखतो, तो दयेनें आम्हांस व आपल्या सर्व इस्राएल लोकांस शांति देवो; आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

(मग हें मोठ्यानें म्हणावें.)

आतांपासून सर्वकाळ पर्यंत परमेश्वराचें नांव धन्य म्हटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळती पर्यंत परमेश्वराच्या नांवाची स्तुति असो. हे परमेश्वरा, आमच्या प्रभु, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान !

[दहा मनुष्यें असल्यास "कद्दीश तिथकब्बाल" म्हणावा. पृष्ठ १००]

שִׁיר לַמַּעֲלוֹת אֶשָּׂא עֵינַי אֶל־הֶהָרִים מֵאַיִן יָבֹא עֶזְרִי׃

עֶזְרִי מֵעִם יְהוָה עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ׃ אַל־יִתֵּן לַמּוֹט רַגְלֶךָ אַל־יָנוּם שֹׁמְרֶךָ׃ הִנֵּה לֹא־יָנוּם וְלֹא יִישָׁן שׁוֹמֵר יִשְׂרָאֵל׃ יְהוָה שֹׁמְרֶךָ יְהוָה צִלְּךָ עַל־יַד יְמִינֶךָ׃ יוֹמָם הַשֶּׁמֶשׁ לֹא־יַכֶּכָּה וְיָרֵחַ בַּלָּיְלָה׃ יְהוָה יִשְׁמָרְךָ מִכָּל־רָע יִשְׁמֹר אֶת־נַפְשֶׁךָ׃ יְהוָה יִשְׁמָר־צֵאתְךָ וּבוֹאֶךָ מֵעַתָּה וְעַד־עוֹלָם׃

(אם יש מנין אומרים קדיש יהא שלמה רבא דף ק״ח)

(ואומר החזן

בָּרְכוּ אֶת יְהוָה הַמְבֹרָךְ׃)

(ועונין בקול רם

בָּרוּךְ יְהוָה הַמְבֹרָךְ לְעוֹלָם וָעֶד׃) (והחזן חוזרו)

עָלֵינוּ לְשַׁבֵּחַ לַאֲדוֹן הַכֹּל׃ לָתֵת גְּדֻלָּה לְיוֹצֵר בְּרֵאשִׁית׃ שֶׁלֹּא עָשָׂנוּ כְּגוֹיֵי הָאֲרָצוֹת׃ וְלֹא שָׂמָנוּ כְּמִשְׁפְּחוֹת הָאֲדָמָה׃ שֶׁלֹּא שָׂם חֶלְקֵנוּ כָּהֶם׃ וְגוֹרָלֵנוּ כְּכָל־הֲמוֹנָם׃ (שֶׁהֵם מִשְׁתַּחֲוִים לְהֶבֶל וָרִיק׃ וּמִתְפַּלְלִים אֶל אֵל לֹא יוֹשִׁיעַ׃) וַאֲנַחְנוּ מִשְׁתַּחֲוִים לִפְנֵי מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא׃ שֶׁהוּא נוֹטֶה שָׁמַיִם׃ וְיוֹסֵד אָרֶץ׃ וּמוֹשַׁב יְקָרוֹ בַּשָּׁמַיִם מִמַּעַל׃ וּשְׁכִינַת עֻזּוֹ בְּגָבְהֵי מְרוֹמִים׃ הוּא אֱלֹהֵינוּ׃ וְאֵין עוֹד אַחֵר׃ אֱמֶת מַלְכֵּנוּ׃ וְאֶפֶס זוּלָתוֹ׃ כַּכָּתוּב בַּתּוֹרָה וְיָדַעְתָּ הַיּוֹם וַהֲשֵׁבֹתָ אֶל־לְבָבֶךָ׃ כִּי יְהוָה הוּא הָאֱלֹהִים בַּשָּׁמַיִם מִמַּעַל וְעַל הָאָרֶץ מִתָּחַת אֵין עוֹד׃

चढण्याचें गीत. डोंगराकडे मी आपली दृष्टि लावितों; माझें सहाय्य कोठून येतें? परमेश्वर, ज्यानें आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, त्याकडून मला सहाय्य होतें. तो तुझा पाय सरकूं देणार नाहीं; तुझा राखणारा निजत नाहीं; पाहा, इस्त्राएलाचा राखणारा निजत नाहीं, आणि झोंप घेत नाहीं. परमेश्वर तुझा राखणारा; परमेश्वर तुझ्या उजव्या हाताकडे तुझी छाया आहे. दिवसा सूर्य व रात्रीं चंद्र तुला बाधणार नाहीं. परमेश्वर तुला सर्व वाईटापासून राखील. तुझा प्राण राखील, तुझें बाहेर जाणें व तुझें आंत येणें, आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वर राखील.

[दहा मनुष्यें असल्यास "कद्दीश येहे शेलामा" ह्मणावा. पृष्ठ १०८]

(हाज्जान ह्मणतो.

सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.]

[मंडळी मोठ्या स्वरानें उत्तर देते.

सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.] (हें वाक्य हाज्जान पुनः ह्मणतो)

आह्मी सर्वांच्या प्रभुची स्तुति करावी; आणि प्रारंभीं (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्यानें आह्मांस जगांतील राष्ट्राप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलांप्रमाणें आह्मांस ठेविलें नाहीं; त्यांच्या वांट्याप्रमाणें आमचा वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्याप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात; आणि जो देव तारीत नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्यानें आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवाची वस्ती वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्याचें वैभव उंचांत आहे, त्यास आह्मी नमन करितो. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य व त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं आणि आज तुह्मी जाणून आपल्या हृदयीं असें ठसवून घ्या कीं, वरतीं आकाशांत आणि खालती पृथ्वीवर परमेश्वर तोच आहे दुसरा कोणी नाहीं.

עַל בֵּן נְקַוֶּה לָךְ יְהוָה אֱלֹהֵינוּ לִרְאוֹת מְהֵרָה בְּתִפְאֶרֶת
עֻזֶּךָ לְהַעֲבִיר גִּלּוּלִים מִן הָאָרֶץ וְהָאֱלִילִים כָּרוֹת
יִכָּרֵתוּן לְתַקֵּן עוֹלָם בְּמַלְכוּת שַׁדַּי וְכָל־בְּנֵי בָשָׂר
יִקְרְאוּ בִשְׁמֶךָ לְהַפְנוֹת אֵלֶיךָ כָּל־רִשְׁעֵי אָרֶץ · יַכִּירוּ וְיֵדְעוּ
כָּל־יוֹשְׁבֵי תֵּבֵל כִּי לְךָ תִּכְרַע כָּל־בֶּרֶךְ תִּשָּׁבַע כָּל־
לָשׁוֹן לְפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ יִכְרְעוּ וְיִפֹּלוּ וְלִכְבוֹד שִׁמְךָ
יָקָר יִתֵּנוּ וְיַקַּבְּלוּ כֻלָּם אֶת־עוֹל מַלְכוּתֶךָ וְתִמְלוֹךְ
עֲלֵיהֶם מְהֵרָה לְעוֹלָם וָעֶד · כִּי הַמַּלְכוּת שֶׁלְּךָ הִיא
וּלְעוֹלְמֵי עַד תִּמְלוֹךְ בְּכָבוֹד · כַּכָּתוּב בְּתוֹרָתֶךָ · יְהוָה
יִמְלֹךְ לְעוֹלָם וָעֶד : וְהָיָה יְהוָה לְמֶלֶךְ עַל כָּל־הָאָרֶץ
בַּיּוֹם הַהוּא יִהְיֶה יְהוָה אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד :

סדר קריאת שמע על המטה

רִבּוֹנוֹ שֶׁל עוֹלָם הֲרֵינִי מוֹחֵל וְסוֹלֵחַ לְכָל מִי שֶׁהִכְעִיס
וְהִקְנִיט אוֹתִי · אוֹ שֶׁחָטָא כְּנֶגְדִּי : בֵּין בְּגוּפִי
בֵּין בְּמָמוֹנִי · בֵּין בִּכְבוֹדִי · בֵּין בְּכָל אֲשֶׁר לִי · בֵּין
בְּאוֹנֶס · בֵּין בְּרָצוֹן · בֵּין בְּשׁוֹגֵג · בֵּין בְּמֵזִיד · בֵּין
בְּדִבּוּר · בֵּין בְּמַעֲשֶׂה · בֵּין בְּגִלְגּוּל זֶה · בֵּין בְּגִלְגּוּל
אַחֵר לְכָל בַּר יִשְׂרָאֵל · וְלֹא יֵעָנֵשׁ שׁוּם אָדָם בְּסִבָּתִי
יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁלֹּא אֶחֱטָא
עוֹד · וּמַה שֶׁחָטָאתִי לְפָנֶיךָ מְחוֹק בְּרַחֲמֶיךָ הָרַבִּים ·
אֲבָל לֹא עַל יְדֵי יִסּוּרִין וְחוֹלָאִים רָעִים · יִהְיוּ לְרָצוֹן
אִמְרֵי־פִי וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגוֹאֲלִי :

यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवानें पृथ्वीतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्व समर्थांच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मांसमयांच्या संतानांनीं तुझ्या नामानें हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टांनीं तुजकडे फिरावें, आणि गुडघे तुजपुढेंच नमावे आणि सर्व जिव्हांनीं तुजविषयींच शपथ वाहावी, असें व्हावें; ह्मणून पृथ्वीवरील सर्व रहाणारे तुलाच ओळखतील व जाणतील; असें लवकर पहाण्यास आह्मी आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढें ते नमतील व नमस्कार करितील, तुझ्या नामाच्या गौरवाचा आदर करितील, आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील, यास्तव तूं लवकर त्यांवर सर्व काळचें राज्य कर कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच

निजावयास जातांना करावयाची प्रार्थना.

हे जगदीशा! पहा; इस्त्राएलाच्या पुत्रांतून ज्या कोणी माझ्या शरिराच्या संबंधानें, माझ्या पैक्याच्या संबंधानें, माझ्या मानाच्या सबंधानें किंवा जें कांही माझें त्याच्या संबंधानें, अगत्यामुळें, जाणून, न जाणून किंवा हट्टानें शब्देंकरून किंवा कर्माकडून, या जन्मीं किंवा दुसऱ्या जन्मीं मला चेतविलें किंवा चिडविलें असेल, किंवा मज-विरुद्ध कांहीं पाप केलें असेल, तें मी त्या सर्वांस क्षमा व माफ करितों; आणि मज कारणें कोणत्याही मनुष्यास शिक्षा न होवो. हे परमेश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, मी आणखी पाप करूं नये, आणि जें पाप मी तुजपुढें केलें आहे, त्याचा तूं आपल्या पुष्कळ दयेनें नाश करावा; परंतु मजवर कठोर शासन व वाईट रोग येऊं नयेत अशी तुझी प्रसन्नता होवो. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या तुजपुढें माझ्या तोंडची वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

הַשְׁכִּיבֵנוּ אָבִינוּ לְשָׁלוֹם · וְהַעֲמִידֵנוּ מַלְכֵּנוּ לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם · וּפְרוֹשׂ עָלֵינוּ סֻכַּת שְׁלוֹמֶךָ · וְתַקְּנֵנוּ מַלְכֵּנוּ בְּעֵצָה טוֹבָה מִלְּפָנֶיךָ · וְהוֹשִׁיעֵנוּ מְהֵרָה לְמַעַן שְׁמֶךָ · וְהָגֵן בַּעֲדֵנוּ · וְהָסֵר מֵעָלֵינוּ מַכַּת אוֹיֵב · דֶּבֶר · חֶרֶב · חוֹלִי · צָרָה · רָעָה · רָעָב · וְיָגוֹן · וּמַשְׁחִית וּמַגֵּפָה · שְׁבוֹר וְהָסֵר שָׂטָן מִלְּפָנֵינוּ וּמֵאַחֲרֵינוּ · וּבְצֵל כְּנָפֶיךָ תַּסְתִּירֵנוּ · וּשְׁמוֹר צֵאתֵנוּ וּבוֹאֵנוּ לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם מֵעַתָּה וְעַד עוֹלָם · כִּי אֵל שׁוֹמְרֵנוּ וּמַצִּילֵנוּ אַתָּה מִכָּל דָּבָר רָע · וּמְפַחַד לַיְלָה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה שׁוֹמֵר אֶת עַמּוֹ יִשְׂרָאֵל לָעַד אָמֵן ׃

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם · הַמַּפִּיל חֶבְלֵי שֵׁנָה עַל עֵינֵינוּ וּתְנוּמָה עַל עַפְעַפֵּינוּ · וּמֵאִיר לְאִישׁוֹן בַּת עָיִן ׃ יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁתַּשְׁכִּיבֵנוּ לְשָׁלוֹם · וַתַּעֲמִידֵנוּ לְחַיִּים טוֹבִים וּלְשָׁלוֹם · וְתֵן חֶלְקֵנוּ בְּתוֹרָתֶךָ · וְתַרְגִּילֵנוּ לִדְבַר מִצְוָה · וְאַל תַּרְגִּילֵנוּ לִדְכַר עֲבֵרָה · וְאַל תְּבִיאֵנוּ לִידֵי חֵטְא · וְלֹא לִידֵי עֲבֵרָה · וְלֹא לִידֵי נִסָּיוֹן וְלֹא לִידֵי בְזָיוֹן · וְיִשְׁלוֹט בָּנוּ יֵצֶר הַטּוֹב · וְאַל יִשְׁלוֹט בָּנוּ יֵצֶר הָרַע · וְתַצִּילֵנוּ מִיֵּצֶר הָרַע וּמֵחֲלָאִים רָעִים · וְאַל יַבְהִילוּנוּ חֲלוֹמוֹת רָעִים וְהִרְהוּרִים רָעִים · וּתְהֵא מִטָּתֵנוּ שְׁלֵמָה לְפָנֶיךָ · וְהָאֵר עֵינֵינוּ פֶּן נִישַׁן הַמָּוֶת · בָּרוּךְ (כנ״ל אַתָּה יְהוָה) הַמֵּאִיר לְעוֹלָם כֻּלּוֹ בִּכְבוֹדוֹ אֵל מֶלֶךְ נֶאֱמָן ׃

हे आमच्या बापा, आम्हास शांतीने झोंप लागूं दे; आणि हे आमच्या राजा, चांगल्या जीवनानें व शांतीनें आम्हांस उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा मंडप आम्हावर पसरून आपल्या सुबोधानें आम्हास सुधार; तूं आपल्या नामाकरितां लवकर आमचे तारण कर. आणि आम्हास रक्षून शत्रु, मरी, तरवार, रोग, संकट, अरिष्ट, दुष्काळ, दुःख, नाश आणि पटकी यांच्या पीडा आम्हापासून दूर कर. आणि सातानाचा मोड करून त्यास आम्हापुढून व आम्हामागून दूर कर; तुझ्या पंखाच्या छाये खालीं आम्हास आश्रय दे; आणि आतां पासून सर्वकाळ पर्यंत आमचे बाहेर जाणे व आंत येणें जीवनाने, सुखाने व शांतीनें राख; कारण सर्व वाईट गोष्टींपासून व रात्रींच्या भयापासून आम्हास राखणारा व सोडविणारा देव तूंच आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस सर्वकाळ रक्षिणाऱ्या, तूं धन्य आहेस. (**कोणी हा वरील शेवटले वाक्यांतील धन्यवाद ईश्वरी नाम न घेतां करितात तो येणेंप्रमाणेः**)– आपल्या इस्राएल लोकांस सर्वकाळ रक्षिणारा धन्य आहे. आमेन.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या डोळ्यांवर झोंप व आमच्या पापण्यांवर निद्रा आणणाऱ्या, आणि डोळ्याच्या बाहुलीस प्रकाशित करणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता आम्हावर होऊन, तूं आम्हास शांतीने झोंप लागूं दे, आम्हास चांगल्या जीवनाने व शांतीने उठीव, तुझ्या शास्त्रांत आम्हांस विभाग दे, (तुझ्या) आज्ञा पूर्ण करण्याची आम्हांस वहिवाट लाव, आणि तुझ्या आज्ञा भंग करण्याची वहिवाट लागूं देवूं नको; आम्हांस पापांत, उल्लंघनांत मोहांत व धिक्कारांत पडूं देऊं नको, आम्हावर शुद्ध वासनेचा अधिकार चालू दे; आणि दुष्ट वासनेचा अधिकार चालू देवूं नको; आम्हांस दुष्ट वासनेपासून व वाईट रोगांपासून सोडीव, आम्हास वाईट स्वप्नांनी व वाईट भ्रमांनीं घाबरवूं नये, आम्हांस तुजपुढें पूर्णपणें विश्रांति मिळूं दे, आणि आमचे डोळे तूं प्रकाशित कर, नाहीं तर आम्हांस मरणाची झोंप लागेल. हे परमेश्वरा, सर्व जगास आपल्य गौरवानें प्रकाशित करणाऱ्या, तूं धन्य आहेस. (**कोणी हा वरील शेवटले वाक्यांतिल धन्यवाद ईश्वरी नाम न घेतां करितात तो येणेंप्रमाणेः**)—सर्व जगास आपल्या गौरवानें प्रकाशित करणारा धन्य आहे. हे विश्वासू देव राजा !

(ויקרא קריאת שמע כולו שהוא בדף קלד" ואח"כ)

יַעֲלְזוּ חֲסִידִים בְּכָבוֹד יְרַנְּנוּ עַל־מִשְׁכְּבוֹתָם: רוֹמְמוֹת

אֵל בִּגְרוֹנָם וְחֶרֶב פִּיפִיּוֹת בְּיָדָם: הִנֵּה מִטָּתוֹ

שֶׁלִּשְׁלֹמֹה שִׁשִּׁים גִּבֹּרִים סָבִיב לָהּ מִגִּבּוֹרֵי יִשְׂרָאֵל:

כֻּלָּם אֲחֻזֵי חֶרֶב מְלֻמְּדֵי מִלְחָמָה אִישׁ חַרְבּוֹ עַל־יְרֵכוֹ

מִפַּחַד בַּלֵּילוֹת: יְבָרֶכְךָ יְהוָה וְיִשְׁמְרֶךָ: (נ"פ) יָאֵר יְהוָה

פָּנָיו אֵלֶיךָ וִיחֻנֶּךָּ: (נ"פ) יִשָּׂא יְהוָה פָּנָיו אֵלֶיךָ וְיָשֵׂם

לְךָ שָׁלוֹם: (נ"פ)

יֹשֵׁב בְּסֵתֶר עֶלְיוֹן בְּצֵל שַׁדַּי יִתְלוֹנָן: אֹמַר לַיהוָה

מַחְסִי וּמְצוּדָתִי אֱלֹהַי אֶבְטַח־בּוֹ: כִּי הוּא יַצִּילְךָ

מִפַּח יָקוּשׁ מִדֶּבֶר הַוּוֹת: בְּאֶבְרָתוֹ יָסֶךְ לָךְ וְתַחַת כְּנָפָיו

תֶּחְסֶה צִנָּה וְסֹחֵרָה אֲמִתּוֹ: לֹא תִירָא מִפַּחַד לָיְלָה

מֵחֵץ יָעוּף יוֹמָם: מִדֶּבֶר בָּאֹפֶל יַהֲלֹךְ מִקֶּטֶב יָשׁוּד

צָהֳרָיִם: יִפֹּל מִצִּדְּךָ אֶלֶף וּרְבָבָה מִימִינֶךָ אֵלֶיךָ לֹא יִגָּשׁ:

רַק בְּעֵינֶיךָ תַבִּיט וְשִׁלֻּמַת רְשָׁעִים תִּרְאֶה: כִּי אַתָּה

יְהוָה מַחְסִי:

(עד מחסי הוא הנכון כידוע ויש משלימין המזמור

עד בישועתי)

(בתחילה יאמר בכל לילה כל אנא בכח עד סופו

ואח"כ בלילה א" יחזור שורה א" ב"פ ובליל"

הב' יחזור שורה הב" ב"פ ובלילה הג"

שורה ג' ב"פ וכן כל השבוע תמיד

כסדר זה ויכוין השם ולא יבטא

בשפתיו ח"ו:)

א אָנָּא בְּכֹחַ · גְּדֻלַּת יְמִינְךָ · תַּתִּיר צְרוּרָה:

(या नंतर पृष्ठ १३४ येथें लिहिल्याप्रमाणें שמע ישראל पासून אלהיכם ׳׳ पयत वाचून मग हें वाचावें.)

भक्त गौरवांत उल्हासोत, ते आपल्या बिछान्यावर उंच स्वरानें गावोत. देवास गौरविणें त्यांच्या कंठांत असो, आणि त्यांच्या हातांत दुधारी तरवार असो. पहा, त्याचा पलंग जो शेलोमोंचा आहे, त्या भोंवतें इस्राएलाच्या वीरांतील साठ वीर असतात. ते सर्व लढाईविषयीं शहाणे असून तरवार धरितात, रात्रींतल्या भयामुळें प्रत्येकाची तरवार त्याच्या मांडीस असते. परमेश्वर तुला आशीर्वाद देवो आणि तुझे रक्षण करो. (तीन वेळा). परमेश्वर आपले दृष्टींचा प्रकाश तुजवर पाडो आणि तुजवर कृपा करो. (तीन वेळा). परमेश्वर आपली दृष्टि तुजवर लावो आणि तुला शांति देवो. (तीन वेळा).
मुखांत होईल. परमेश्वराविषयीं माझा जीव नावाजून घेईल; जे दीन ते ऐकून संतोष पावतील. तुम्ही माझ्यासंगतीं परमेश्वराला थोर माना; आम्ही एकत्र त्याचे नाम उंचावूं. मी परमेश्वराला शरण गेलो, तेव्हां त्यानें मला उत्तर दिलें आणि माझ्या सर्व भयांपासून मला सोडविले. हे त्याकडे लक्ष लावून प्रकाश पावले; त्यांची तोंडें लज्जित झालीं नाहीत. या दिनानें हाक मारिली. तेव्हां परमेश्वरानें ऐकिलें आणि त्याला त्याच्या सर्व संकटांतून तारिलें. परमेश्वराच्या भिणाऱ्यांभोंवती त्याचा दूत वस्ती करून त्यांचें संरक्षण करितो. तुम्ही चव घेऊन पांहा, कां कीं परमेश्वर चांगला आहे; जो मनुष्य त्याजवर आशा ठेवितो तो धन्य, अहो परमेश्वराचें पवित्र, तुम्ही त्याला भ्या, कारण कीं त्याच्या भिणाऱ्यांस कांहीं उणें नाहीं. तरणें सिंह दुर्बल होतात, आणि त्यांस भूक लागती, परंतु जे परमेश्वराला शरण जातात, त्यांस कांहीं उत्तमाचें उणेपण होणार नाहीं. अहो लेकरें, तुम्ही येऊन माझें ऐका; मी तुम्हांस परमेश्वराचें भय शिकवीन. जो मनुष्य आयुष्याची इच्छा धरितो, ज्याला उत्तम अनुभवायाचे दिवस आवडतात, तो कोण ? तो तूं आपली जीभ वाईटांपासून आणि आपले ओठ कपट बोलण्यापासून राख. वाईटांपासून फीर आणि चांगलें कर; शांति शोध आणि तिला अनुसर, परमेश्वराचे डोळे नीतिवंताकडे आणि त्याचे कान त्यांच्या हाक मारण्याकडे आहेत. परंतु परमेश्वराचें तोंड वाईट करणाऱ्यांविरुद्ध यासाठीं आहे कीं, त्यांची आठवण पृथ्वींतून काढून टाकावी. तें ओरडतात, तेव्हां परमेश्वर ऐकून त्यांस त्यांच्या सर्व संकटांतून सोडवितो. ज्यांचे हृदय फुटलेलें त्यांच्याजवळ परमेश्वर आहे, आणि ज्यांचा आत्मा भंगलेला, त्यांस तो तारितो. नीतिमानाला बहुत दुःखें होतात, परंतु त्या सर्वांतून त्याला परमेश्वर सोडवितो. तो त्याचीं सर्व हाडें राखितो, त्यांतलें एकहि मोडलें जात नाहीं. जें वाईट ते दुष्टाला जिवें मारील; जे नीतिमानाचा द्वेष करितात, त्यांची ओसाडी होईल. परमेश्वर आपल्या सेवकांचा जीव खंडून सोडवितो, जे त्यावर आशा ठेवितात, त्यांतल्या कोणाचीहि ओसाडी होणार नाहीं.

देवाचा पुरुष मोशे याची प्रार्थना. हे परमेश्वरा, सर्व पिढ्यांत तूं आमचा आश्रय आहेस. पर्वत उत्पन्न झाल्यापूर्वी आणि त्वां पृथ्वी व भूमि रचिल्यापूर्वी अनादिकालापासून अनंतकालपर्यंत तूं देव आहेस. मनुष्य तूं मातीस मिळवितो व म्हणतोस, अहो मनुष्यांनों, तुम्ही फिरा. कां कीं सहस्र वर्षे तुझ्या देखतां गतकालच्या दिवसाप्रमाणें व रात्रींतील प्रहरासारखीं आहेत. त्यांस तूं पुरासारखें वाहवून नेतोस, तीं स्वप्नच आहेत, सकाळीं जशी हिरवळ उगवती तशी; सकाळीं ती फुटून उगवती, सांजे कापली जाती व वाळून जाती. तर तुझ्या क्रोधानें आम्ही नाहींसे होतो, आणि तुझ्या कोपानें व्याकुळ होतों. त्वां आपल्या-

עֲוֹנוֹתֵינוּ לְנֶגְדֶּךָ עֲלָמֵנוּ לִמְאוֹר פָּנֶיךָ: כִּי כָל יָמֵינוּ פָּנוּ
בְּעֶבְרָתֶךָ כִּלִּינוּ שָׁנֵינוּ כְּמוֹ הֶגֶה: יְמֵי שְׁנוֹתֵינוּ בָהֶם
שִׁבְעִים שָׁנָה וְאִם בִּגְבוּרוֹת שְׁמוֹנִים שָׁנָה וְרָהְבָּם עָמָל
וָאָוֶן כִּי גָז חִישׁ וַנָּעֻפָה: מִי יוֹדֵעַ עֹז אַפֶּךָ וּכְיִרְאָתְךָ
עֶבְרָתֶךָ: לִמְנוֹת יָמֵינוּ כֵּן הוֹדַע וְנָבִא לְבַב חָכְמָה:
שׁוּבָה יְהוָה עַד מָתַי וְהִנָּחֵם עַל עֲבָדֶיךָ: שַׂבְּעֵנוּ
בַבֹּקֶר חַסְדֶּךָ וּנְרַנְּנָה וְנִשְׂמְחָה בְּכָל יָמֵינוּ: שַׂמְּחֵנוּ
כִּימוֹת עִנִּיתָנוּ שְׁנוֹת רָאִינוּ רָעָה: יֵרָאֶה אֶל עֲבָדֶיךָ
פָּעֳלֶךָ וַהֲדָרְךָ עַל בְּנֵיהֶם: וִיהִי נֹעַם אֲדֹנָי אֱלֹהֵינוּ
עָלֵינוּ וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנָה עָלֵינוּ וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנֵהוּ:

ישב בְּסֵתֶר עֶלְיוֹן בְּצֵל שַׁדַּי יִתְלוֹנָן: אֹמַר לַיהוָה מַחְסִי
וּמְצוּדָתִי אֱלֹהַי אֶבְטַח בּוֹ: כִּי הוּא יַצִּילְךָ מִפַּח
יָקוּשׁ מִדֶּבֶר הַוּוֹת: בְּאֶבְרָתוֹ יָסֶךְ לָךְ וְתַחַת כְּנָפָיו תֶּחְסֶה
צִנָּה וְסֹחֵרָה אֲמִתּוֹ: לֹא תִירָא מִפַּחַד לָיְלָה מֵחֵץ יָעוּף יוֹמָם:
מִדֶּבֶר בָּאֹפֶל יַהֲלֹךְ מֶקֶטֶב יָשׁוּד צָהֳרָיִם: יִפֹּל מִצִּדְּךָ אֶלֶף
וּרְבָבָה מִימִינֶךָ אֵלֶיךָ לֹא יִגָּשׁ: רַק בְּעֵינֶיךָ תַּבִּיט וְשִׁלֻּמַת
רְשָׁעִים תִּרְאֶה: כִּי אַתָּה יְהוָה מַחְסִי עֶלְיוֹן שַׂמְתָּ מְעוֹנֶךָ:
לֹא תְאֻנֶּה אֵלֶיךָ רָעָה וְנֶגַע לֹא יִקְרַב בְּאָהֳלֶיךָ: כִּי מַלְאָכָיו
יְצַוֶּה לָךְ לִשְׁמָרְךָ בְּכָל דְּרָכֶיךָ: עַל כַּפַּיִם יִשָּׂאוּנְךָ פֶּן תִּגּוֹף
בָּאֶבֶן רַגְלֶךָ: עַל שַׁחַל וָפֶתֶן תִּדְרֹךְ תִּרְמֹס כְּפִיר וְתַנִּין:
כִּי בִי חָשַׁק וַאֲפַלְּטֵהוּ אֲשַׂגְּבֵהוּ כִּי יָדַע שְׁמִי: יִקְרָאֵנִי
וְאֶעֱנֵהוּ עִמּוֹ אָנֹכִי בְצָרָה אֲחַלְּצֵהוּ וַאֲכַבְּדֵהוּ: אֹרֶךְ
יָמִים אַשְׂבִּיעֵהוּ וְאַרְאֵהוּ בִּישׁוּעָתִי:

पुढें आमचे अन्याय व आपल्या मुखप्रकाशीं आमचीं गुप्त पातकें ठेवलीं आहेत. कां कीं आमचे सर्व दिवस तुझ्या कोपांत जातात, आम्हीं आपलीं वर्षें कल्पनेशीं घालवितों. आमच्या आयुष्याचीं सत्तर वर्षें असतात, आणि शक्तीकडून ऐशीं वर्षें असतील तरी त्यांचा ताठा कष्ट व दु:खच आहे, कां तर तो लौकर सरतो व आम्ही उडून जातों, तुझ्या क्रोधाचें बल कोण जाणे ? आणि तुझ्या भयाप्रमाणेंच तुझा रोष आहे. आम्हास आपले दिवस गणावयाला असें शिकीव कीं आम्हीं सुज्ञान बुद्धि पावूं. हे परमेश्वरा, तूं फीर, किती वेळापर्यंत उशीर होईल ? तुला आपल्या सेवकाविषयीं अनुताप व्हावा. तूं आपल्या कृपेनें आम्हास लौकर तृप्त कर, मग आम्ही आपले सर्व दिवस उत्सव व हर्ष करीत जाऊं. ज्या दिवसांत त्वां आम्हास पिडिलें, ज्या वर्षांत आम्ही कष्ट अनुभविले, त्यांप्रमाणें आम्हांस आनंदित कर. तुझ्या सेवकांस तुझें कर्म व त्यांच्या लेकरांस तुझें वैभव प्रगट होवो. आणि परमेश्वर जो आमचा देव त्याचा प्रसाद आम्हावर असावा; आणि आम्हासाठीं आमच्या हातांचें काम स्थीर कर, आमच्या हातांचें काम स्थीर कर.

तो परात्पराच्या आच्छादनाखालीं बसतो, तो सर्वसमर्थाच्या छायेंत राहतो. माझा आश्रय व माझें दुर्ग असें मी परमेश्वराला म्हणतों; माझा देव, ज्याजवर मी विश्वासत जाईन तो. निश्चयें पारध्याच्या पाशापासून व नाशक मरीपासून तो तुला सोडवील. तो आपल्या पिसांनीं तुला आच्छादील, तूंहि त्याच्या पंखाचा आश्रय धरिशील, त्याचें सत्य तुझी ढाल व तुझें कवच असें होईल. रात्रितलें भय, दिवसांतला उडता तीर यांस तूं भिणार नाहींस. जी मरी काळोखीं चालती, जो अभिमर्द मध्यान्हीं नाश करतो त्यांसहि भिणार नाहींस. तुझ्या बाजूस सहस्रावधि व तुझ्या उजव्या हातास आयुतावधि पडतील, परंतु तुजशीं भिडणार नाहीं. केवळ आपल्या डोळ्यांनीं अवलोकन करिशील, आणि दुष्टाचें प्रतिदान पाहशील. कां तर हे परमेश्वरा, तूंच माझा आश्रय आहेस; त्वां परात्पर आपली वस्ती अशी केली आहस. अरिष्ट तुजजवळ येणार नाहीं व उपद्रव तुझ्या वस्तीशीं भिडणार नाहीं. कारण तुझ्या सर्व मार्गांत तुला राखावयास तो आपल्या दूतांस आज्ञा देईल. धोंड्याशीं तुझ्या पायाला ठेंच लागूं नये म्हणून ते आपल्या हातांनीं तुला धरितील. सिंह व जोगी साप तुडविशील, तरुण सिंह व नाग सुदंडशील. त्यानें माझी आवड धरिली आहे म्हणून मी त्याला मुक्त करीन, त्यानें माझें नाम जाणलें आहे यामुळें मी त्यास उंचावीन. तो मला अरोळी करील तेव्हां त्याला उत्तर देईन, तो संकटांत असतांना मी त्याजवळ होईन, मी त्याला मुक्त करून गौरवीन. दीर्घ आयुष्यानें त्यास मी तृप्त करीन, त्यास मी आपलें तारण अनुभवूं देईन.

מִזְמוֹר שִׁירוּ לַיהוָה שִׁיר חָדָשׁ כִּי נִפְלָאוֹת עָשָׂה
הוֹשִׁיעָה לּוֹ יְמִינוֹ וּזְרוֹעַ קָדְשׁוֹ: הוֹדִיעַ יְהוָה
יְשׁוּעָתוֹ לְעֵינֵי הַגּוֹיִם גִּלָּה צִדְקָתוֹ: זָכַר חַסְדּוֹ וֶאֱמוּנָתוֹ
לְבֵית יִשְׂרָאֵל רָאוּ כָל אַפְסֵי אָרֶץ אֵת יְשׁוּעַת אֱלֹהֵינוּ:
הָרִיעוּ לַיהוָה כָּל הָאָרֶץ פִּצְחוּ וְרַנְּנוּ וְזַמֵּרוּ: זַמְּרוּ לַיהוָה
בְּכִנּוֹר בְּכִנּוֹר וְקוֹל זִמְרָה: בַּחֲצֹצְרוֹת וְקוֹל שׁוֹפָר הָרִיעוּ
לִפְנֵי הַמֶּלֶךְ יְהוָה: יִרְעַם הַיָּם וּמְלֹאוֹ תֵּבֵל וְיֹשְׁבֵי בָהּ:
נְהָרוֹת יִמְחֲאוּ כָף יַחַד הָרִים יְרַנֵּנוּ: לִפְנֵי יְהוָה כִּי בָא
לִשְׁפֹּט הָאָרֶץ יִשְׁפֹּט תֵּבֵל בְּצֶדֶק וְעַמִּים בְּמֵישָׁרִים:
שִׁיר לַמַּעֲלוֹת אֶשָּׂא עֵינַי אֶל־הֶהָרִים מֵאַיִן יָבוֹא עֶזְרִי:
עֶזְרִי מֵעִם יְהוָה עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ: אַל יִתֵּן
לַמּוֹט רַגְלֶךָ אַל יָנוּם שֹׁמְרֶךָ: הִנֵּה לֹא יָנוּם וְלֹא יִישָׁן
שׁוֹמֵר יִשְׂרָאֵל: יְהוָה שֹׁמְרֶךָ יְהוָה צִלְּךָ עַל יַד יְמִינֶךָ:
יוֹמָם הַשֶּׁמֶשׁ לֹא יַכֶּכָּה וְיָרֵחַ בַּלָּיְלָה: יְהוָה יִשְׁמָרְךָ מִכָּל־
רָע יִשְׁמֹר אֶת־נַפְשֶׁךָ: יְהוָה יִשְׁמָר־צֵאתְךָ וּבוֹאֶךָ מֵעַתָּה
וְעַד עוֹלָם:
שִׁיר הַמַּעֲלוֹת לְדָוִד שָׂמַחְתִּי בְּאֹמְרִים לִי בֵּית יְהוָה
נֵלֵךְ: עוֹמְדוֹת הָיוּ רַגְלֵינוּ בִּשְׁעָרַיִךְ יְרוּשָׁלִָם:
יְרוּשָׁלִַם הַבְּנוּיָה כְּעִיר שֶׁחֻבְּרָה־לָּהּ יַחְדָּו: שֶׁשָּׁם עָלוּ
שְׁבָטִים שִׁבְטֵי־יָהּ עֵדוּת לְיִשְׂרָאֵל לְהוֹדוֹת לְשֵׁם יְהוָה: כִּי
שָׁמָּה יָשְׁבוּ כִסְאוֹת לְמִשְׁפָּט כִּסְאוֹת לְבֵית דָּוִד: שַׁאֲלוּ
שְׁלוֹם יְרוּשָׁלִַם יִשְׁלָיוּ אֹהֲבָיִךְ: יְהִי שָׁלוֹם בְּחֵילֵךְ שַׁלְוָה
בְּאַרְמְנוֹתָיִךְ: לְמַעַן אַחַי וְרֵעָי אֲדַבְּרָה־נָּא שָׁלוֹם בָּךְ:
לְמַעַן בֵּית־יְהוָה אֱלֹהֵינוּ אֲבַקְשָׁה טוֹב לָךְ:

कीर्तन. तुह्मी परमेश्वराला नवें गायन गा, कारण कीं त्यानें आश्चर्य कर्मे केलीं आहेत, त्याच्या उजव्या हातानें आणि त्याच्या पवित्र भुजेनें त्या करितां तारण केलें आहे. परमेश्वरानें आपलें तारण कळविलें; त्यानें राष्ट्रांच्या दृष्टीस आपलें नीतिमत्व प्रगट केलें आहे. त्यानें इस्राएलाच्या घराण्यावरली आपली दया व आपली सत्यता आठविली आहे; पृथ्वीच्या सीमांतल्या सर्वांनीं आमच्या देवाचें तारण पाहिलें आहे. अहो पृथ्वीतले सर्व, तुम्ही परमेश्वराजवळ गजर करा, हाक फोडा, आणि हर्षशब्द काढून कीर्तन करा. तंतुवाद्यावर, कीर्तनीय शब्दानें, तंतुवाद्यावर परमेश्वराजवळ स्तुतिनाद करा. परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दानें तुताऱ्यांनीं गजर करा. समुद्र व त्याचीं भरणें, पृथ्वी व तींतिल राहणारे यांनीं गर्जना करावी. नद्यांनीं टाळी वाजवावी; त्याबरोबर परमेश्वरासमोर डोंगरांनीं हर्षनाद करावा. कारण कीं तो पृथ्वीचा न्याय करावयास येतो, तो नीतीनें जगाचा, व सरळपणानें राष्ट्रांचा न्याय करील.

पदांचें गीत. पर्वताकडे मी आपली दृष्टी लावूं काय? माझें सहाय कोठून येतें? परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्ता त्यापासूनच माझें सहाय येतें. तो तुझा पाय सरकूं देणार नाहीं, तुझा राखणारा निजत नाहीं. पाहा, जो इस्राएलास राखतो तो निजत नाहीं व झोपेंत पडत नाहीं. परमेश्वर तुझा राखणारा आहे, तुझ्या उजव्या हाताकडे परमेश्वर तुझी छायास आहे. दिवसां सूर्य किंवा रात्रीं चंद्र तुला बाधणार नाहीं. परमेश्वर तुला सर्व अरिष्टांपासून राखील, तो तुझ्या जिवास राखील, आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वर तुझें बाहेर जाणें व तुझें आंत येणें राखील.

दावीदाचें पदांचें गीत. आपण परमेश्वराच्या मंदिरास जाऊं, असें जे मला म्हणाले त्यासंगती मी हर्षलों. हे यरूशलेमे, तुझ्या द्वारांत आमचे पाय उभे राहतील; यरूशलेम संगत जडलेल्या नगराप्रमाणें बांधलेलें आहे. त्याकडे वंश, परमेश्वराचे वंश इस्राएलाच्या प्रमाणाजवळ परमेश्वराच्या नामाची उपकारस्तुति करावयास चढत जातात कां तर तेथें न्यायासने, दावीदाच्या घराण्याचीं आसनें मांडली आहेत. यरूशलेमेच्या कल्याणासाठीं प्रार्थना करा, जे तुला प्रिय मानितात ते सुखी होतील. तुझ्या कोटांत कल्याण व तुझ्या वाड्यांत क्षेम असो. माझे बंधु व मित्र यांजकरितां मी बोलेनच, तुजमध्यें कल्याण असो. परमेश्वर जो आमचा देव त्याच्या मंदिराकरितां मी तुझ्या हितास झटत जाईन.

שִׁיר הַמַּעֲלוֹת אֵלֶיךָ נָשָׂאתִי אֶת־עֵינַי הַיּוֹשְׁבִי בַּשָּׁמָיִם
הִנֵּה כְעֵינֵי עֲבָדִים אֶל־יַד אֲדוֹנֵיהֶם כְּעֵינֵי שִׁפְחָה
אֶל־יַד גְּבִרְתָּהּ כֵּן עֵינֵינוּ אֶל־יְהוָה אֱלֹהֵינוּ עַד שֶׁיְּחָנֵנוּ׃
חָנֵּנוּ יְהוָה חָנֵּנוּ כִּי־רַב שָׂבַעְנוּ בוּז׃ רַבַּת שָׂבְעָה־לָּהּ
נַפְשֵׁנוּ הַלַּעֲג הַשַּׁאֲנַנִּים הַבּוּז לִגְאֵי יוֹנִים׃

שִׁיר הַמַּעֲלוֹת לְדָוִד לוּלֵי יְהוָה שֶׁהָיָה לָנוּ יֹאמַר־נָא
יִשְׂרָאֵל׃ לוּלֵי יְהוָה שֶׁהָיָה לָנוּ בְּקוּם עָלֵינוּ אָדָם׃
אֲזַי חַיִּים בְּלָעוּנוּ בַּחֲרוֹת אַפָּם בָּנוּ׃ אֲזַי הַמַּיִם שְׁטָפוּנוּ
נַחְלָה עָבַר עַל־נַפְשֵׁנוּ׃ אֲזַי עָבַר עַל־נַפְשֵׁנוּ הַמָּיִם
הַזֵּידוֹנִים׃ בָּרוּךְ יְהוָה שֶׁלֹּא נְתָנָנוּ טֶרֶף לְשִׁנֵּיהֶם׃ נַפְשֵׁנוּ
כְּצִפּוֹר נִמְלְטָה מִפַּח יוֹקְשִׁים הַפַּח נִשְׁבָּר וַאֲנַחְנוּ
נִמְלָטְנוּ׃ עֶזְרֵנוּ בְּשֵׁם יְהוָה עֹשֵׂה שָׁמַיִם וָאָרֶץ׃

הַלְלוּיָהּ הַלְלוּ אֶת־שֵׁם יְהוָה הַלְלוּ עַבְדֵי יְהוָה׃
שֶׁעֹמְדִים בְּבֵית יְהוָה בְּחַצְרוֹת בֵּית אֱלֹהֵינוּ׃
הַלְלוּיָהּ כִּי־טוֹב יְהוָה זַמְּרוּ לִשְׁמוֹ כִּי נָעִים׃ כִּי־יַעֲקֹב
בָּחַר־לוֹ יָהּ יִשְׂרָאֵל לִסְגֻלָּתוֹ׃ כִּי אֲנִי יָדַעְתִּי כִּי־גָדוֹל יְהוָה
וַאֲדֹנֵינוּ מִכָּל־אֱלֹהִים׃ כֹּל אֲשֶׁר־חָפֵץ יְהוָה עָשָׂה בַּשָּׁמַיִם
וּבָאָרֶץ בַּיַּמִּים וְכָל־תְּהֹמוֹת׃ מַעֲלֶה נְשִׂאִים מִקְצֵה
הָאָרֶץ בְּרָקִים לַמָּטָר עֹשֶׂה מוֹצֵא רוּחַ מֵאוֹצְרוֹתָיו׃
שֶׁהִכָּה בְּכוֹרֵי מִצְרָיִם מֵאָדָם עַד־בְּהֵמָה׃ שָׁלַח אֹתוֹת
וּמוֹפְתִים בְּתוֹכֵכִי מִצְרָיִם בְּפַרְעֹה וּבְכָל־עֲבָדָיו׃ שֶׁהִכָּה
גּוֹיִם רַבִּים וְהָרַג מְלָכִים עֲצוּמִים׃ לְסִיחוֹן מֶלֶךְ הָאֱמֹרִי
וּלְעוֹג מֶלֶךְ הַבָּשָׁן וּלְכֹל מַמְלְכוֹת כְּנָעַן׃ וְנָתַן אַרְצָם
נַחֲלָה נַחֲלָה לְיִשְׂרָאֵל עַמּוֹ׃ יְהוָה שִׁמְךָ לְעוֹלָם יְהוָה זִכְרְךָ

पदांचें गीत. हे, जो आकाशांत राहतोस त्या तुजकडे मी आपली दृष्टि लावतों. पाहा, जसे सेवकांचे डोळे आपल्या धन्याच्या हाताकडे व दासीचे डोळे आपल्या धनीणीच्या हाताकडे पाहतात, तसें परमेश्वर जो आमचा देव तो आम्हावर दया करी-पर्यंत त्याजकडे आमचे डोळे पाहतात, आम्हावर दया कर, हे परमेश्वरा, आम्हावर दया कर, कारण आम्ही फार तुच्छ झालों आहों. जे निष्काळजी त्यांच्या उपहासानें व गर्विष्ठांच्या निंदेनें आमचा जीव फार व्यापला आहे.

दावीदाचें पदांचें गीत. इस्राएल म्हणो की जर परमेश्वर आम्हाकडे नसता, जेव्हां मनुष्यें आम्हावर उठली तेव्हां आम्हाकडे जर परमेश्वर नसता तर जेव्हां आम्हावर त्यांचा क्रोध संतप्त झाला तेव्हां त्यांनीं आम्हाला सजीव गिळिलें असतें. तेव्हां जलांनीं आम्हास बुडविलें असतें, प्रवाह आमच्या जिवावर गेला असता. तेव्हां उचंबळलेलीं जलें आमच्या जिवावर गेलीं असतीं. परमेश्वर ज्यानें आम्हास त्यांच्या दांतांसाठीं आहारसें दिलें नाहीं तो सुवंदित असो. जसा पक्षी पारध्यांच्या पाशांतून तसा आमचा जीव मुक्त झाला आहे, पाश तुटला व आम्ही मुक्त झालों आहों. परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्ता त्याच्या नामांत आमचें सहाय आहे.

तुम्ही परमेश्वराला स्तवा; परमेश्वराच्या नांवाचें स्तवन करा; अहो परमेश्वराचे सेवक त्याचें स्तवन करा. जे तुम्ही परमेश्वराच्या मंदिरांत आमच्या देवाच्या घरच्या वाड्यामध्यें उभे राहतां ते, तुम्ही परमेश्वराला स्तवा; कारण कीं परमेश्वर चांगला; त्याच्या नांवाचें कीर्तन करा; कां तें सुंदर आहे. कां कीं परमेश्वरानें आपल्यासाठीं याआकोब, आपलें स्वकीय धन होण्यासाठीं इस्राएल निवडून घेतला आहे. कारण मी जाणतों कीं आमचा प्रभु, परमेश्वर सर्व देवांपेक्षां थोर आहे. जें परमेश्वरानें इच्छिलें, तें सर्व त्यानें आकाशांत व पृथ्वींत, समुद्रामध्यें व अवघ्या डोहांमध्यें केलें आहे. तो पृथ्वीच्या पाठीपासून धुकीं चढवितो; पावसासाठीं विजा उत्पन्न करितो; आपल्या संग्रहांतून वारा काढितो. मनुष्यापासून पशूपर्यंत त्यानें मिसरांतलें प्रथम जन्मलेलें मारिलें. हे मिसरा, तुजमध्यें फारो व त्याचे सर्व सेवक यांवर उत्पात व चमत्कार त्यानें लाविले. त्यानें मोठीं राष्ट्रें मारिलीं, आणि बलाढ्य राजे जिवें मारिले. अमोऱ्यांचा राजा सीहोन व बाशानाचा राजा ओग व खनानांतलीं सर्व राज्यें यांस मारिलें. आणि त्यांचा देश आपल्या इस्राएल लोकाला वतन करून दिला. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकाळिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. कारण कीं परमेश्वर

לְדֹר־וָדֹר׃ כִּי־יָרִין יְהוָה עַמּוֹ וְעַל־עֲבָדָיו יִתְנֶחָם׃ עֲצַבֵּי
הַגּוֹיִם כֶּסֶף וְזָהָב מַעֲשֵׂה יְדֵי אָדָם׃ פֶּה לָהֶם וְלֹא יְדַבֵּרוּ
עֵינַיִם לָהֶם וְלֹא יִרְאוּ׃ אָזְנַיִם לָהֶם וְלֹא יַאֲזִינוּ אַף אֵין־יֵשׁ־
רוּחַ בְּפִיהֶם׃ כְּמוֹהֶם יִהְיוּ עֹשֵׂיהֶם כֹּל אֲשֶׁר־בֹּטֵחַ בָּהֶם׃
בֵּית יִשְׂרָאֵל בָּרְכוּ אֶת־יְהוָה בֵּית אַהֲרֹן בָּרְכוּ אֶת־יְהוָה׃
בֵּית הַלֵּוִי בָּרְכוּ אֶת־יְהוָה יִרְאֵי יְהוָה בָּרְכוּ אֶת יְהוָה׃
בָּרוּךְ יְהוָה מִצִּיּוֹן שֹׁכֵן יְרוּשָׁלָם הַלְלוּיָהּ׃

הוֹדוּ לַיהוָה כִּי־טוֹב כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃

הוֹדוּ לֵאלֹהֵי הָאֱלֹהִים כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
הוֹדוּ לַאֲדֹנֵי הָאֲדֹנִים כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְעֹשֵׂה נִפְלָאוֹת גְּדוֹלוֹת לְבַדּוֹ כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְעֹשֵׂה הַשָּׁמַיִם בִּתְבוּנָה כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְרֹקַע הָאָרֶץ עַל־הַמָּיִם כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְעֹשֵׂה אוֹרִים גְּדוֹלִים כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
אֶת־הַשֶּׁמֶשׁ לְמֶמְשֶׁלֶת בַּיּוֹם כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
אֶת־הַיָּרֵחַ וְכוֹכָבִים לְמֶמְשְׁלוֹת בַּלָּיְלָה כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְמַכֵּה מִצְרַיִם בִּבְכוֹרֵיהֶם כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
וַיּוֹצֵא יִשְׂרָאֵל מִתּוֹכָם כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
בְּיָד חֲזָקָה וּבִזְרוֹעַ נְטוּיָה כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְגֹזֵר יַם־סוּף לִגְזָרִים כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
וְהֶעֱבִיר יִשְׂרָאֵל בְּתוֹכוֹ כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
וְנִעֵר פַּרְעֹה וְחֵילוֹ בְיַם־סוּף כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְמוֹלִיךְ עַמּוֹ בַּמִּדְבָּר כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃
לְמַכֵּה מְלָכִים גְּדֹלִים כִּי לְעוֹלָם חַסְדּוֹ׃

आपल्या लोकांचा निवाडा करील, आणि आपल्या सेवकांविषयीं अनुतापेल. राष्ट्रांच्या मूर्ति रुप्याच्या व सोन्याच्या; मनुष्यहातांनीं केलेल्या आहेत. त्यांस तोंड आहे, तरी त्या बोलत नाहींत; त्यांस डोळे आहेत, तरी पाहत नाहींत; त्यांस कान आहेत, तरी ऐकत नाहींत; त्यांच्या तोंडीं श्वासहि नाहीं. त्यांचे करणारे व त्यांजवर आशा ठेवणारे ते सर्व त्यांसारिखे आहेत. हे इस्राएलाच्या घराण्या, तुम्ही परमेश्वराची स्तुति करा; हे आहरोनाच्या घराण्या, तुम्ही परमेश्वराची स्तुति करा. हे लेवीच्या घराण्या, तुम्ही परमेश्वराची स्तुति करा; जे परमेश्वराचें भय धरितात, ते तुम्ही परमेश्वराची स्तुति करा. परमेश्वर जो यरूशालेमांत वस्ति करितो तो सीयोनेंतून सुवंदीत असो. तुम्ही परमेश्वराचें स्तवन करा.

तुम्ही परमेश्वराची स्तुति करा; कारण तो चांगला; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

देवांचा देव याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

प्रभूंचा प्रभू याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

जो आपण मात्र मोठीं आश्चर्यकृत्यें करितो, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें बुद्धिनें आकाश उत्पन्न केलें, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें पृथ्वी पाण्यावर विस्तारिली, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें मोठ्या ज्योति उत्पन्न केल्या, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें दिवस चालवावयास सूर्य उत्पन्न केला, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

रात्र चालवावयास चंद्र व तारेहि; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें मिसऱ्यांचे ज्येष्ठ पुत्र मारिले, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

आणि त्यांमधून इस्राएल काढिला; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

बळकट हातानें, व उभारलेल्या भुजेनें काढिला; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें सूफ समुद्राचे विभाग करून चिरलें, त्याची; कारण त्याची दया सर्वकाळची आहे.

आणि त्यानें त्यामधून इस्राएलाला पार नेलें; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

आणि फारोला व त्याच्या सैन्याला सूफ समुद्रांत पाडून टाकिलें; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें आपला लोक रानांतून चालविला, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

ज्यानें मोठ्या राजांस मारिलें, त्याची; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

וַיְהַרֹג מְלָכִים אַדִּירִים כִּי׳׳חַ :
לְסִיחוֹן מֶלֶךְ הָאֱמֹרִי כִּי׳׳חַ :
וּלְעוֹג מֶלֶךְ הַבָּשָׁן כִּי׳׳חַ :
וְנָתַן אַרְצָם לְנַחֲלָה כִּי׳׳חַ :
נַחֲלָה לְיִשְׂרָאֵל עַבְדּוֹ כִּי׳׳חַ :
שֶׁבְּשִׁפְלֵנוּ זָכַר לָנוּ כִּי׳׳חַ :
וַיִּפְרְקֵנוּ מִצָּרֵינוּ כִּי׳׳חַ :
נֹתֵן לֶחֶם לְכָל־בָּשָׂר כִּי׳׳חַ :
הוֹדוּ לְאֵל הַשָּׁמָיִם כִּי׳׳חַ :

(ואח״כ הש״ץ אומר קדיש דרבנן אם אין עשרה לפני הודו קודם יאמר אמר ר׳ יהושע וגו׳ עד תורה ויאדיר דף ל״ו :)

כִּי׳ נָבָר עָלֵינוּ חַסְדּוֹ וֶאֱמֶת יְהוָה לְעוֹלָם הַלְלוּיָהּ :

בָּרוּךְ הַמַּנְחִיל מְנוּחָה לְעַמּוֹ יִשְׂרָאֵל בְּיוֹם שַׁבַּת קֹדֶשׁ :

בָּרוּךְ שֶׁאָמַר וְהָיָה הָעוֹלָם · בָּרוּךְ אוֹמֵר וְעֹשֶׂה · בָּרוּךְ גּוֹזֵר וּמְקַיֵּם · בָּרוּךְ עֹשֶׂה בְרֵאשִׁית · בָּרוּךְ מְרַחֵם עַל הָאָרֶץ · בָּרוּךְ מְרַחֵם עַל הַבְּרִיּוֹת · בָּרוּךְ מְשַׁלֵּם שָׂכָר טוֹב לִירֵאָיו · בָּרוּךְ מַעֲבִיר אֲפֵלָה וּמֵבִיא אוֹרָה · בָּרוּךְ אֵל חַי לָעַד וְקַיָּם לָנֶצַח · בָּרוּךְ שֶׁאֵין לְפָנָיו עַוְלָה · וְלֹא שִׁכְחָה וְלֹא מַשּׂוֹא פָנִים · וְלֹא מְקַח שֹׁחַד · צַדִּיק הוּא בְּכָל־דְּרָכָיו · וְחָסִיד בְּכָל־מַעֲשָׂיו · בָּרוּךְ פּוֹדֶה וּמַצִּיל :

(בשבת וחו״המ־בָּרוּךְ שֶׁנָּתַן לְעַמּוֹ יִשְׂרָאֵל אֶת־יוֹם הַשַּׁבָּת הַזֶּה · אֶת יוֹם בפסח־חַג הַמַּצּוֹת · בסוכות־אֶת יוֹם חַג הַסֻּכּוֹת) הַזֶּה וְאֶת יוֹם מִקְרָא קֹדֶשׁ הַזֶּה :

महान राजेहि जिवें मारिले; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

अमोऱ्यांचा राजा सीहोन याला (मारिलें); कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

याशानाचा राजा ओग यालाहि; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

आणि त्यांचा देश वतन करून दिला; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

आपला सेवक इस्राएल याला वतन दिलें; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

त्यानें आमच्या नीचपणांत आमची आठवण केली; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

आणि आमच्या वैऱ्यांपासून आह्मास मुक्त केलें; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

तो सर्व जिवांस अन्न देतो; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

तुम्ही आकाशांतल्या देवाची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

(जेमीरोथ मधील ' होदू ' येथें कद्दीश न म्हटल्यास येथें दहा मनुष्यें असल्यास पान ५१ मधील कद्दीश रब्बानान म्हणावें; व त्यापूर्वी ' आमार रिब्बी येहोशुवा ' ते ' तोरावीआद्दीर ' पर्यंत म्हणावें.)

कारण कीं त्याची दया आम्हावर भारी आहे; आणि परमेश्वराची सत्यता सर्वकाळ पर्यंत आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

ज्यानें आपल्या इस्राएल लोकांस पवित्र शाब्बाथ दिवशीं विसाव्याचें वतन दिलें तो धन्य आहे.

जो बोलला आणि पृथ्वी झाली तो धन्य; जो बोलतो आणि करितो तो धन्य; जो ठरवितो व स्थापितो तो धन्य; ज्यानें प्रारंभीं (जग) उत्पन्न केलें तो धन्य; जो पृथ्वीवर दया करितो तो धन्य; जो प्राणिमात्रांवर दया करितो तो धन्य; जो आपल्या भिणाऱ्यांस चांगलें वेतन देतो तो धन्य; जो अंधार घालवून प्रकाश आणितो तो धन्य; सदा जीवंत व सर्वकाळ स्थापित जो देव तो धन्य; ज्याच्यापुढें दुष्टाई टिकत नाहीं, ज्यास विसर पडत नाहीं, आणि जो तोंड ओळख धरीत नाहीं व लांच घेत नाहीं तो धन्य; तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ व सर्व कामांत दयाळू आहे; जो खंडून घेतो व सोडवितो तो धन्य आहे.

[(**शाब्बाथ असून सणाचा दिवस असल्यास**—ज्यानें आपल्या इस्राएल लोकांस हा शाब्बाथ दिवस)

(**पेसामध्यें व्यावहारिक दिवस**–हा न फुगलेल्या भाकरीच्या सणाचा दिवस.)

(**सुक्कोथमध्यें व्यावहारिक दिवस**—हा मंडपाच्या सणाचा दिवस.) हा पवित्र मेळा ज्यानें दिला तो धन्य.]

בָּרוּךְ הוּא וּבָרוּךְ שְׁמוֹ וּבָרוּךְ זִכְרוֹ לְעוֹלְמֵי עַד: בָּרוּךְ
אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם הָאֵל הָאָב הָרַחֲמָן מְהֻלָּל בְּפִי עַמּוֹ מְשֻׁבָּח וּמְפוֹאָר
בִּלְשׁוֹן כָּל חֲסִידָיו וַעֲבָדָיו וּבְשִׁירֵי דָוִד עַבְדֶּךָ נְהַלֶּלְךָ יְהוָה
אֱלֹהֵינוּ בִּשְׁבָחוֹת וּבְזִמִּירוֹת נְהוֹדְךָ וּנְבָרֶכְךָ וְנִשְׁתַּבַּחֲךָ
וְנַפְאֶרְךָ וְנַרוֹמִמְךָ וְנַמְלִיכְךָ וְנַקְדִּישְׁךָ וְנַעֲרִיצְךָ וְנַזְכִּיר
שִׁמְךָ מַלְכֵּנוּ אֱלֹהֵינוּ יָחִיד חַי הָעוֹלָמִים מֶשֻׁבָּח וּמְפוֹאָר
שְׁמוֹ עֲדֵי עַד בָּרוּךְ אַתָּה יְהוָה מֶלֶךְ מְהֻלָּל בְּתִשְׁבָּחוֹת
מִזְמוֹר שִׁיר לְיוֹם הַשַּׁבָּת: טוֹב לְהוֹדוֹת לַיהוָה וּלְזַמֵּר
לְשִׁמְךָ עֶלְיוֹן: לְהַגִּיד בַּבֹּקֶר חַסְדֶּךָ וֶאֱמוּנָתְךָ
בַּלֵּילוֹת: עֲלֵי־עָשׂוֹר וַעֲלֵי־נָבֶל עֲלֵי הִגָּיוֹן בְּכִנּוֹר: כִּי
שִׂמַּחְתָּנִי יְהוָה בְּפָעֳלֶךָ בְּמַעֲשֵׂי יָדֶיךָ אֲרַנֵּן: מַה־גָּדְלוּ
מַעֲשֶׂיךָ יְהוָה מְאֹד עָמְקוּ מַחְשְׁבֹתֶיךָ: אִישׁ־בַּעַר לֹא
יֵדָע וּכְסִיל לֹא־יָבִין אֶת־זֹאת: בִּפְרֹחַ רְשָׁעִים כְּמוֹ עֵשֶׂב
וַיָּצִיצוּ כָּל־פֹּעֲלֵי אָוֶן לְהִשָּׁמְדָם עֲדֵי־עַד: וְאַתָּה מָרוֹם
לְעֹלָם יְהוָה: כִּי־הִנֵּה אוֹיְבֶיךָ יְהוָה כִּי־הִנֵּה אוֹיְבֶיךָ
יֹאבֵדוּ יִתְפָּרְדוּ כָּל־פֹּעֲלֵי אָוֶן: וַתָּרֶם כִּרְאֵים קַרְנִי בַּלֹּתִי
בְּשֶׁמֶן רַעֲנָן: וַתַּבֵּט עֵינִי בְּשׁוּרָי בַּקָּמִים עָלַי מְרֵעִים
תִּשְׁמַעְנָה אָזְנָי: צַדִּיק כַּתָּמָר יִפְרָח כְּאֶרֶז בַּלְּבָנוֹן יִשְׂגֶּה:
שְׁתוּלִים בְּבֵית יְהוָה בְּחַצְרוֹת אֱלֹהֵינוּ יַפְרִיחוּ: עוֹד
יְנוּבוּן בְּשֵׂיבָה דְּשֵׁנִים וְרַעֲנַנִּים יִהְיוּ: לְהַגִּיד כִּי־יָשָׁר
יְהוָה צוּרִי וְלֹא־עַוְלָתָה בּוֹ:
יְהוָה מָלָךְ גֵּאוּת לָבֵשׁ לָבֵשׁ יְהוָה עֹז הִתְאַזָּר אַף־
תִּכּוֹן תֵּבֵל בַּל־תִּמּוֹט: נָכוֹן כִּסְאֲךָ מֵאָז מֵעוֹלָם

तो धन्य, त्याचें नांव धन्य, आणि त्याचें स्मरणहि सर्वकाळ धन्य आहे. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मोठ्या व पवित्र राजा, दयाळू बापा, आपल्या लोकांच्या मुखांकडून स्तविला जाणाऱ्या; आणि आपल्या यथार्थांच्या व भक्तांच्या जिव्हेकडून वाखाणिला व गौरविला जाणाऱ्या, तूं धन्य आहेस. आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझा सेवक दावीद याच्या गीतांकडून आम्ही तुझी स्तुति करूं, स्तवनाकडून व कीर्तनाकडून तुला आम्ही सन्मान देऊं, थोर मानूं, स्तवूं, गौरवूं आणि उंचावूं, आमचा राजा असें मान्य करूं, पवित्र मानूं व तुझें भय धरूं, आणि हे आमच्या राजा, आमच्या देवा, सर्वकाळ जीवंत असणारा जो एकच, स्तविलेला, आणि ज्याचें नाम सदासर्वकाळ गौरविलेलें, आम्ही तुझें नांव स्मरूं; हे परमेश्वरा ! आमच्या देवा, स्तवनांकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस.

शाब्बाथ दिवशीं गाण्याचें गीत. परमेश्वराची स्तुति करणें, हे परात्परा, तुझ्या नावाचें कीर्तन करणें बरें आहे. दशतारवाद्यावर व तारपेटीवर, ध्यानवाद्यावर व विण्यावर सकाळीं तुझी दया, व रात्रीच्या रात्रीं तुझी सत्यता, प्रगट करणें बरें आहे; कारण कीं हे परमेश्वरा, त्वां आपल्या कर्मांकडून मला संतुष्ट केलें आहे; तुझ्या हातांच्या कृत्यावरून मी उल्हासाचा शब्द करीन. हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें मोठीं आहेत; तुझे विचार फार खोल आहेत. पशुशील मनुष्य जाणत नाहीं; आणि मूर्ख हें समजत नाहीं. जेव्हां दुष्ट गवतासारिखे फुटतात, आणि सर्व दुष्कर्मी फुलतात, तेव्हां तें त्यांच्या सदासर्वकाळ नाशासाठीं आहे. पण हे परमेश्वरा, तुला सर्वकाळ थोर मानावें; कां तर हे परमेश्वरा, पाहा, तुझे शत्रू, पाहा तुझे शत्रू नाश पावतील; सर्व दुष्कर्मी विसकळींत होतील. परंतु माझें शिंग गेंड्याच्यासारिखें तूं उंच करशील, मी साजुक तेलानें नाहीन. आणि मजवर टपणारे, मजवर उठणारे यांस माझें डोळे पाहतील; दुष्टांविषयीं माझे कान ऐकतील. पुण्यवान खजुरी झाडासारिखा फुलेल; लबानोनावरल्या एरेजसारिखा वाढेल. जे परमेश्वराच्या घरीं लावलेले, ते आमच्या देवाच्या वाड्यांत पालवतील, वृद्धपणांत देखील फळ देतील; रसाळ व हिरवे होतील; यासाठीं कीं परमेश्वर सरळ हें दाखवावें, तो माझा खडक आणि त्यामध्यें कांहीं वावगें नाहीं.

परमेश्वर राज्य करितो; तो उत्कृष्टता ल्यालेला; परमेश्वर ल्यालेला आहे, त्यानें आपल्याला पराक्रम वेष्टिला आहे. अवघी पृथ्वी स्थीर स्थापलेली आहे; ती हालणार नाहीं. प्राचीन काळापासून तुझें सिंहासन स्थाप-

אַתָּה׃ נָשְׂאוּ נְהָרוֹת יְהוָה נָשְׂאוּ נְהָרוֹת קוֹלָם יִשְׂאוּ
נְהָרוֹת דָּכְיָם׃ מִקֹּלוֹת מַיִם רַבִּים אַדִּירִים מִשְׁבְּרֵי יָם
אַדִּיר בַּמָּרוֹם יְהוָה׃ עֵדֹתֶיךָ נֶאֶמְנוּ מְאֹד לְבֵיתְךָ נַאֲוָה
קֹדֶשׁ יְהוָה לְאֹרֶךְ יָמִים׃

יְהִי כְבוֹד יְהוָה לְעוֹלָם יִשְׂמַח יְהוָה בְּמַעֲשָׂיו׃ יְהִי שֵׁם
יְהוָה מְבֹרָךְ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם׃ מִמִּזְרַח־שֶׁמֶשׁ עַד
מְבוֹאוֹ מְהֻלָּל שֵׁם יְהוָה׃ רָם עַל כָּל־גּוֹיִם יְהוָה עַל
הַשָּׁמַיִם כְּבוֹדוֹ׃ יְהוָה שִׁמְךָ לְעוֹלָם יְהוָה זִכְרְךָ לְדֹר
וָדֹר׃ יְהוָה בַּשָּׁמַיִם הֵכִין כִּסְאוֹ וּמַלְכוּתוֹ בַּכֹּל מָשָׁלָה׃
יִשְׂמְחוּ הַשָּׁמַיִם וְתָגֵל הָאָרֶץ וְיֹאמְרוּ בַגּוֹיִם יְהוָה מָלָךְ׃
יְהוָה מֶלֶךְ יְהוָה מָלָךְ יְהוָה יִמְלוֹךְ לְעוֹלָם וָעֶד׃ יְהוָה
מֶלֶךְ עוֹלָם וָעֶד אָבְדוּ גוֹיִם מֵאַרְצוֹ׃ יְהוָה הֵפִיר עֲצַת
גּוֹיִם הֵנִיא מַחְשְׁבוֹת עַמִּים׃ רַבּוֹת מַחֲשָׁבוֹת בְּלֵב־אִישׁ
וַעֲצַת יְהוָה הִיא תָקוּם׃ עֲצַת יְהוָה לְעוֹלָם תַּעֲמֹד
מַחְשְׁבוֹת לִבּוֹ לְדֹר וָדֹר׃ כִּי הוּא אָמַר וַיֶּהִי הוּא צִוָּה
וַיַּעֲמֹד׃ כִּי בָחַר יְהוָה בְּצִיּוֹן אִוָּה לְמוֹשָׁב לוֹ׃ כִּי יַעֲקֹב
בָּחַר לוֹ יָהּ יִשְׂרָאֵל לִסְגֻלָּתוֹ׃ כִּי לֹא יִטֹּשׁ יְהוָה עַמּוֹ
וְנַחֲלָתוֹ לֹא יַעֲזֹב׃ וְהוּא רַחוּם יְכַפֵּר עָוֹן וְלֹא יַשְׁחִית
וְהִרְבָּה לְהָשִׁיב אַפּוֹ וְלֹא יָעִיר כָּל־חֲמָתוֹ׃ יְהוָה הוֹשִׁיעָה
הַמֶּלֶךְ יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ׃

אַשְׁרֵי יוֹשְׁבֵי בֵיתֶךָ עוֹד יְהַלְלוּךָ סֶּלָה׃ אַשְׁרֵי הָעָם
שֶׁכָּכָה לּוֹ אַשְׁרֵי הָעָם שֶׁיְהוָה אֱלֹהָיו׃

תְּהִלָּה לְדָוִד אֲרוֹמִמְךָ אֱלוֹהַי הַמֶּלֶךְ וַאֲבָרְכָה שִׁמְךָ
לְעוֹלָם וָעֶד׃ בְּכָל־יוֹם אֲבָרְכֶךָּ וַאֲהַלְלָה שִׁמְךָ

लेलें आहे; तूं अनादि आहेस. हे परमेश्वरा, ओघानीं उंचाविला, ओघानी आपला शब्द उंचविला आहे; ओघ आपल्या लाटांस उंचवितात. मोठ्या महान् पाण्याच्या वाणीपेक्षां, समुद्राच्या लहरींपेक्षां परमेश्वर उंचावर महान् आहे. हे परमेश्वरा, तुझ्या नेमणुकी अति सत्य आहेत; तुझ्या घरीं पवित्रता सदा सुशोभित आहे.

परमेश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जाईल; परमेश्वर आपल्या कृत्यांवर संतुष्ट होईल. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नांव धन्य म्हटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत परमेश्वराच्या नांवाची स्तुति असो. सर्व राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आकाशांत आहे. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. परमेश्वरानें आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याचा राज्याधिकार सर्वांवर आहे. आकाशानें आनंद करावा; आणि पृथ्वीने हर्षावें; आणि तीं राष्ट्रांत सांगतात कीं, परमेश्वर राज्य करितो. परमेश्वर राज्य करितो, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. परमेश्वर सदासर्वकाळ राजा आहे; त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. परमेश्वर लोकांचा विचार नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करितो. मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु जो परमेश्वराचा संकल्प तोच ठरेल. परमेश्वराचा विचार सर्वकाळ टिकतो; त्याच्या मनांतल्या योजना पिढोपिढीं चालतात. कारण तो बोलतांच, ती (पृथ्वी) झाली; त्यानें आज्ञा करितांच ती स्थिर राहिली. कां तर परमेश्वरानें सीयोन निवडून घेतली, आपल्या राहण्यासाठीं इच्छिली आहे. कांकीं परमेश्वरानें आपल्यासाठीं याआकोब, आपलें स्वकीयधन होण्यासाठीं इस्राएल निवडून घेतला आहे. कां तर परमेश्वर आपल्या लोकांला सोडीत नाहीं; आणि आपल्या वतनाला टाकीत नाहीं. तथापि तो ममताळू आहे, यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं, तो बहुत वेळ आपला राग टाळितो, आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर, आम्ही हांक मारितों, तेव्हां राजानें आम्हांस उत्तर द्यावें.

जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमीं तुझा उत्सव करतील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

दावीदाकडून. हे माझ्या देवा, तूं राजा, मी तुला उंचावीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नांवाची स्तुति करीन. सर्व दिवशीं तुझी स्तुति करीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नांवाचें स्तवन करीन. परमेश्वर थोर

לְעוֹלָם וָעֶד: גָּדוֹל יְהוָה וּמְהֻלָּל מְאֹד וְלִגְדֻלָּתוֹ אֵין
חֵקֶר: דּוֹר לְדוֹר יְשַׁבַּח מַעֲשֶׂיךָ וּגְבוּרֹתֶיךָ יַגִּידוּ: הֲדַר
כְּבוֹד הוֹדֶךָ וְדִבְרֵי נִפְלְאֹתֶיךָ אָשִׂיחָה: וֶעֱזוּז נוֹרְאוֹתֶיךָ
יֹאמֵרוּ וּגְדֻלָּתְךָ אֲסַפְּרֶנָּה: זֵכֶר רַב־טוּבְךָ יַבִּיעוּ וְצִדְקָתְךָ
יְרַנֵּנוּ: חַנּוּן וְרַחוּם יְהוָה אֶרֶךְ אַפַּיִם וּגְדָל־חָסֶד: טוֹב־
יְהוָה לַכֹּל וְרַחֲמָיו עַל־כָּל־מַעֲשָׂיו: יוֹדוּךָ יְהוָה כָּל־
מַעֲשֶׂיךָ וַחֲסִידֶיךָ יְבָרְכוּכָה: כְּבוֹד מַלְכוּתְךָ יֹאמֵרוּ
וּגְבוּרָתְךָ יְדַבֵּרוּ: לְהוֹדִיעַ לִבְנֵי הָאָדָם גְּבוּרֹתָיו וּכְבוֹד
הֲדַר מַלְכוּתוֹ: מַלְכוּתְךָ מַלְכוּת כָּל־עֹלָמִים וּמֶמְשַׁלְתְּךָ
בְּכָל־דּוֹר וָדֹר: סוֹמֵךְ יְהוָה לְכָל־הַנֹּפְלִים וְזוֹקֵף לְכָל־
הַכְּפוּפִים: עֵינֵי כֹל אֵלֶיךָ יְשַׂבֵּרוּ וְאַתָּה נוֹתֵן־לָהֶם אֶת־
אָכְלָם בְּעִתּוֹ: פּוֹתֵחַ אֶת־יָדֶךָ וּמַשְׂבִּיעַ לְכָל־חַי רָצוֹן:
צַדִּיק יְהוָה בְּכָל־דְּרָכָיו וְחָסִיד בְּכָל־מַעֲשָׂיו: קָרוֹב
יְהוָה לְכָל־קֹרְאָיו לְכֹל אֲשֶׁר יִקְרָאֻהוּ בֶּאֱמֶת: רְצוֹן־יְרֵאָיו
יַעֲשֶׂה וְאֶת־שַׁוְעָתָם יִשְׁמַע וְיוֹשִׁיעֵם: שׁוֹמֵר יְהוָה אֶת־
כָּל־אֹהֲבָיו וְאֵת כָּל־הָרְשָׁעִים יַשְׁמִיד: תְּהִלַּת יְהוָה יְדַבֶּר־
פִּי וִיבָרֵךְ כָּל־בָּשָׂר שֵׁם קָדְשׁוֹ לְעוֹלָם וָעֶד: וַאֲנַחְנוּ נְבָרֵךְ
יָהּ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם הַלְלוּיָהּ:

הַלְלוּיָהּ הַלְלִי נַפְשִׁי אֶת־יְהוָה: אֲהַלְלָה יְהוָה בְּחַיָּי
אֲזַמְּרָה לֵאלֹהַי בְּעוֹדִי: אַל־תִּבְטְחוּ בִּנְדִיבִים
בְּבֶן־אָדָם שֶׁאֵין לוֹ תְּשׁוּעָה: תֵּצֵא רוּחוֹ יָשֹׁב לְאַדְמָתוֹ
בַּיּוֹם הַהוּא אָבְדוּ עֶשְׁתֹּנֹתָיו: אַשְׁרֵי שֶׁאֵל יַעֲקֹב בְּעֶזְרוֹ
שִׂבְרוֹ עַל־יְהוָה אֱלֹהָיו: עֹשֶׂה שָׁמַיִם וָאָרֶץ אֶת־הַיָּם וְאֶת־
כָּל־אֲשֶׁר־בָּם הַשֹּׁמֵר אֱמֶת לְעוֹלָם: עֹשֶׂה מִשְׁפָּט לָעֲשׁוּקִים

आणि फार स्तुतिमान आहे; त्याचें थोरपण अपार आहे. पिढी पिढीला तुझ्या कृत्यांची प्रशंसा करील, आणि तुझ्या पराक्रमाचें निवेदन करितील. तुझी स्तुति गौरवी महानपणाची, आणि मी तुझ्या आश्चर्यकृत्यांच्या गोष्टींचे विचार काढीन. लोक तुझ्या भयंकर कृत्यांच्या पराक्रमाविषयीं बोलतील आणि मी तुझें थोरपण वर्णीन ते तुझ्या मोठ्या बरेपणाची आठवण फार करितील, तुझें नीतिमत्व गाजवितील. परमेश्वर कृपाळू व ममताळू; मंदक्रोध आणि मोठ्या दयेचा आहे. परमेश्वर सर्वांशीं चांगला; आणि त्याच्या सर्व कृत्यांवर त्याची फार ममता आहे. हे परमेश्वरा, तुझीं सर्व कृत्यें तुला स्तवितात, आणि तुझे भक्त तुझी स्तुति करितात; तुझ्या राज्यांचें गौरव सांगतात, आणि तुझ्या पराक्रमाविषयीं बोलतात; यासाठीं कीं, आपण त्याच्या पराक्रमाचीं कृत्यें व त्याच्या राज्यांचें वैभवी गौरव आदामाच्या संतानांस कळवावें. तुझें राज्य सर्व युगांचें राज्य; आणि तुझा आधिकार पिढीच्या पिढींतल्या सर्वांवर आहे. जे पडत आहेत, त्या सर्वांस परमेश्वर आधार देतो: आणि सर्व ओणव्यांस तो उभें करितो. सर्वांचे डोळे आशेनें तुजकडे लागतात; आणि तूं त्यांचें भक्ष्य यथाकाळीं त्यांस देतोस. तूं आपले हात उघडून सर्व जिवांची इच्छा पूर्ण करितोस. परमेश्वर आपल्या सर्व चालीनीं पवित्र; आणि आपल्या सर्व कृत्यांवर उपकारक आहे. जे सर्व परमेश्वराला हाक मारितात, जे सत्यतेने त्याला हाक मारितात त्या सर्वांस तो जवळ आहे. जे त्याचें भय धरितात, त्यांचा मनोरथ तो पूर्ण करितो; आणि त्यांचें ओरडणें ऐकून त्यांस तारितो. जे परमेश्वरावर प्रीति करितात, त्या सर्वांस तो राखितो; परंतु सर्व दुष्टांचा नाश करील. माझें तोंड परमेश्वराची स्तुति उच्चारील; आणि सर्व मनुष्यमात्र त्याच्या पवित्र नामाची स्तुति सदासर्वकाळ करील. आणि आम्ही आतांपासून सर्वकाळ-पर्यंत परमेश्वराचें वंदन करीत जाऊं. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

तुम्ही परमेश्वराला स्तवा; हे माझ्या जिवा, तूं परमेश्वराचें स्तवन कर. मी आपल्या आयुष्यभर परमेश्वराचें स्तवन करीन; मी आहे तोंपर्यंत, आपल्या देवाचें कीर्तन करीन. अधिकारी, आदामाचा वंशस्थ ज्याकडे तारण नाहीं, त्यावर तुम्ही भरंवसा ठेवूं नका. त्याचा आत्मा निघून जातो; तो आपल्या मातीस फिरून मिळतो; त्याच दिवशीं त्यांच्या योजना नाश पावतात. ज्याला आपल्या सहायावर याआकोबाचा देव, ज्याची आशा आपला देव परमेश्वर यावर आहे, तो धन्य. त्यानें आकाश व पृथ्वी व समुद्र व त्यांमध्यें जें अवघें तें उत्पन्न केलें. तो सत्यता सर्वकाळ पाळितो. जाचलेल्यांसाठीं न्याय करितो; भुकेल्यांस अन्न देतो. परमेश्वर बंदिवानांची सुटका

נֹתֵן לָהֶם לָרְעֵבִים יְהוָה מַתִּיר אֲסוּרִים: יְהוָה פֹּקֵחַ
עִוְרִים יְהוָה זֹקֵף כְּפוּפִים יְהוָה אֹהֵב צַדִּיקִים: יְהוָה
שֹׁמֵר אֶת־גֵּרִים יָתוֹם וְאַלְמָנָה יְעוֹדֵד וְדֶרֶךְ רְשָׁעִים יְעַוֵּת:
יִמְלֹךְ יְהוָה לְעוֹלָם אֱלֹהַיִךְ צִיּוֹן לְדֹר וָדֹר הַלְלוּיָהּ:

הַלְלוּיָהּ כִּי־טוֹב זַמְּרָה אֱלֹהֵינוּ כִּי־נָעִים נָאוָה תְּהִלָּה:
בּוֹנֵה יְרוּשָׁלַם יְיָ נִדְחֵי יִשְׂרָאֵל יְכַנֵּס: הָרוֹפֵא
לִשְׁבוּרֵי לֵב וּמְחַבֵּשׁ לְעַצְּבוֹתָם: מוֹנֶה מִסְפָּר לַכּוֹכָבִים
לְכֻלָּם שֵׁמוֹת יִקְרָא: גָּדוֹל אֲדוֹנֵינוּ וְרַב־כֹּחַ לִתְבוּנָתוֹ
אֵין מִסְפָּר: מְעוֹדֵד עֲנָוִים יְיָ מַשְׁפִּיל רְשָׁעִים עֲדֵי־אָרֶץ:
עֱנוּ לַיהוָה בְּתוֹדָה זַמְּרוּ לֵאלֹהֵינוּ בְּכִנּוֹר: הַמְכַסֶּה
שָׁמַיִם בְּעָבִים הַמֵּכִין לָאָרֶץ מָטָר הַמַּצְמִיחַ הָרִים חָצִיר:
נוֹתֵן לִבְהֵמָה לַחְמָהּ לִבְנֵי עֹרֵב אֲשֶׁר יִקְרָאוּ: לֹא
בִגְבוּרַת הַסּוּס יֶחְפָּץ לֹא־בְשׁוֹקֵי הָאִישׁ יִרְצֶה: רוֹצֶה
יְהוָה אֶת־יְרֵאָיו אֶת־הַמְיַחֲלִים לְחַסְדּוֹ: שַׁבְּחִי יְרוּשָׁלַם
אֶת־יְהוָה הַלְלִי אֱלֹהַיִךְ צִיּוֹן: כִּי־חִזַּק בְּרִיחֵי שְׁעָרָיִךְ בֵּרַךְ
בָּנַיִךְ בְּקִרְבֵּךְ: הַשָּׂם־גְּבוּלֵךְ שָׁלוֹם חֵלֶב חִטִּים יַשְׂבִּיעֵךְ:
הַשֹּׁלֵחַ אִמְרָתוֹ אָרֶץ עַד־מְהֵרָה יָרוּץ דְּבָרוֹ: הַנֹּתֵן שֶׁלֶג
כַּצָּמֶר כְּפוֹר כָּאֵפֶר יְפַזֵּר: מַשְׁלִיךְ קַרְחוֹ כְפִתִּים לִפְנֵי
קָרָתוֹ מִי יַעֲמֹד: יִשְׁלַח דְּבָרוֹ וְיַמְסֵם יַשֵּׁב רוּחוֹ יִזְלוּ־
מָיִם: מַגִּיד דְּבָרָיו לְיַעֲקֹב חֻקָּיו וּמִשְׁפָּטָיו לְיִשְׂרָאֵל:
לֹא עָשָׂה־כֵן לְכָל־גּוֹי וּמִשְׁפָּטִים בַּל־יְדָעוּם הַלְלוּיָהּ:

הַלְלוּיָהּ הַלְלוּ אֶת־יְהוָה מִן־הַשָּׁמַיִם הַלְלוּהוּ
בַּמְּרוֹמִים: הַלְלוּהוּ כָּל־מַלְאָכָיו הַלְלוּהוּ כָּל־

देतो. परमेश्वर बंदिवानांची सुटका करितो. परमेश्वर आंधळ्यांस दिसे असें करितो. परमेश्वर ओणव्यांस उभें करितो परमेश्वर नीतिमानावर प्रीति करितो. परमेश्वर विदेशांस रक्षितो; अनाथ व विधवा यांस आधार देतो; परंतु दुष्टांची गति विपरित करितो. परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सीयोने, तुझा देव पिढोपिढी आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

तुम्ही परमेश्वराला स्तवा; कां तर आमच्या देवाची स्तुति गाणें, उत्तम आहे, कां तर तें गोड; त्याचें स्तवन रमणीय आहे. परमेश्वर यरूशालेम रचितो; इस्राएलांतून जे विखरलेले, त्यांस तो एकत्र मिळवितो. हृदय फुटलेल्यांस बरें करितो; आणि त्याच्या जखमांवर पट्टी बांधितो. तो ताऱ्यांची गणना करितो; त्या सर्वांस नांवें ठेवितो. आमचा प्रभु थोर, आणि मोठ्या बळाचा, त्याचें ज्ञान अपरमित आहे. परमेश्वर दुःखितांस यथास्थित करितो; दुष्टांस भूमीस मिळवितो. तुम्ही परमेश्वराजवळ स्तुतीनें गा; तंतुवाद्यावर आमच्या देवाचें कीर्तन करा. तो ढगांनी आकाशाला झांकितो; भूमीवर पाऊस यथास्थित पाडितो; डोंगरांवर गवत वाढवितो. तो पशूला आणि कावळ्याच्या ओरडणाऱ्या पिलांना, भक्ष्य देतो. तो घोड्याच्या पराक्रमानें संतोष पावत नाहीं; मनुष्याच्या पायानी संतुष्ट होत नाहीं. जे परमेश्वराचें भय धरितात, जे त्याच्या दयेची आशा धरून राहतात, त्यांवर तो संतुष्ट आहे. हे यरूशालेमे, तूं परमेश्वराला वाखाण; हे सीयोने, तूं आपल्या देवाचें स्तवन कर. कारण कीं त्यानें तुझ्या वेसींचें अडसर बळकट केलें; तुझ्यांतील तुझ्या प्रजा यांस आशीर्वाद दिला आहे. तो तुझी सीमा शांत ठेवितो; पौष्टिक गव्हानी तुला तृप्त करितो. आपलें वचन पृथ्वीवर पाठवितो; त्याचा शब्द वेगानें धावत चालतो. तो लोंकरीसारखें बर्फ पाडितो; थिजलेलें दहिंवर राखेसारिखें पसरितो. आपल्या गारा तुकड्यांसारिख्या पाडितो; त्याच्या गारापुढें कोण उभा राहील ? तो आपली आज्ञा पाठवून त्यांस विखरितो; आपला वारा फिरता करितो, तेव्हां पाणी वाहतें. तो आपल्या गोष्टी याआकोबाला, आपल्या नेमणुकी व आपले न्याय इस्राएलाला विदित करितो. त्यानें कोणत्याहि राष्ट्रास असें केलें नाहीं, आणि त्याचे न्याय त्यांनी अगदीं जाणिले नाहींत. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

तुम्ही परमेश्वराला स्तवा; अहो आकाशांतले, तुम्ही परमेश्वराला स्तवा; उंच ठिकाणांमध्यें त्याचें स्तवन करा. अहो त्याचे सर्व दूत, तुम्ही त्याला स्तवा; अहो त्याचीं सर्व सैन्यें, तुम्ही त्याला स्तवा. अहो सूर्य व चंद्रहो, तुम्ही त्याला

צְבָאוֹ׃ הַלְלוּהוּ שֶׁמֶשׁ וְיָרֵחַ הַלְלוּהוּ כָּל־כּוֹכְבֵי אוֹר׃
הַלְלוּהוּ שְׁמֵי הַשָּׁמָיִם וְהַמַּיִם אֲשֶׁר מֵעֵל הַשָּׁמָיִם׃ יְהַלְלוּ
אֶת־שֵׁם יְהוָה כִּי הוּא צִוָּה וְנִבְרָאוּ׃ וַיַּעֲמִידֵם לָעַד לְעוֹלָם
חָק־נָתַן וְלֹא יַעֲבוֹר׃ הַלְלוּ אֶת־יְהוָה מִן־הָאָרֶץ תַּנִּינִים
וְכָל־תְּהֹמוֹת׃ אֵשׁ וּבָרָד שֶׁלֶג וְקִיטוֹר רוּחַ סְעָרָה עֹשָׂה
דְבָרוֹ׃ הֶהָרִים וְכָל־גְּבָעוֹת עֵץ פְּרִי וְכָל־אֲרָזִים׃ הַחַיָּה
וְכָל־בְּהֵמָה רֶמֶשׂ וְצִפּוֹר כָּנָף׃ מַלְכֵי־אֶרֶץ וְכָל־לְאֻמִּים
שָׂרִים וְכָל־שֹׁפְטֵי אָרֶץ׃ בַּחוּרִים וְגַם־בְּתוּלוֹת זְקֵנִים
עִם־נְעָרִים׃ יְהַלְלוּ אֶת־שֵׁם יְהוָה כִּי־נִשְׂגָּב שְׁמוֹ לְבַדּוֹ
הוֹדוֹ עַל־אֶרֶץ וְשָׁמָיִם׃ וַיָּרֶם קֶרֶן לְעַמּוֹ תְּהִלָּה־לְכָל
חֲסִידָיו לִבְנֵי יִשְׂרָאֵל עַם קְרֹבוֹ הַלְלוּיָהּ׃

הַלְלוּיָהּ שִׁירוּ לַיהוָה שִׁיר חָדָשׁ תְּהִלָּתוֹ בִּקְהַל
חֲסִידִים׃ יִשְׂמַח יִשְׂרָאֵל בְּעֹשָׂיו בְּנֵי־צִיּוֹן יָגִילוּ
בְּמַלְכָּם׃ יְהַלְלוּ שְׁמוֹ בְמָחוֹל בְּתֹף וְכִנּוֹר יְזַמְּרוּ־לוֹ׃ כִּי־
רוֹצֶה יְהוָה בְּעַמּוֹ יְפָאֵר עֲנָוִים בִּישׁוּעָה׃ יַעְלְזוּ חֲסִידִים
בְּכָבוֹד יְרַנְּנוּ עַל מִשְׁכְּבוֹתָם׃ רוֹמְמוֹת אֵל בִּגְרוֹנָם וְחֶרֶב
פִּיפִיּוֹת בְּיָדָם׃ לַעֲשׂוֹת נְקָמָה בַּגּוֹיִם תּוֹכֵחוֹת בַּלְאֻמִּים׃
לֶאְסֹר מַלְכֵיהֶם בְּזִקִים וְנִכְבְּדֵיהֶם בְּכַבְלֵי בַרְזֶל׃ לַעֲשׂוֹת
בָּהֶם מִשְׁפָּט כָּתוּב הָדָר הוּא לְכָל־חֲסִידָיו הַלְלוּיָהּ׃

הַלְלוּיָהּ הַלְלוּ־אֵל בְּקָדְשׁוֹ הַלְלוּהוּ בִּרְקִיעַ עֻזּוֹ׃ הַלְלוּהוּ
בִּגְבוּרֹתָיו הַלְלוּהוּ כְּרֹב גֻּדְלוֹ׃ הַלְלוּהוּ בְּתֵקַע
שׁוֹפָר הַלְלוּהוּ בְּנֵבֶל וְכִנּוֹר׃ הַלְלוּהוּ בְּתֹף וּמָחוֹל הַלְלוּהוּ
בְּמִנִּים וְעֻגָב׃ הַלְלוּהוּ בְּצִלְצְלֵי־שָׁמַע הַלְלוּהוּ בְּצִלְצְלֵי
תְרוּעָה׃ כֹּל הַנְּשָׁמָה תְּהַלֵּל יָהּ הַלְלוּיָהּ׃ כהת״יה׃

स्तवा, अहो प्रकाशमान सर्व तारे, तुम्ही त्याला स्तवा. आकाशांच्या आकाशांहो, आणि आकाशांवरले प्राणी, तुम्ही त्याला स्तवा. त्यानीं परमेश्वराच्या नांवाला स्तवावें; कारण कीं त्याने आज्ञा दिली म्हणजे तीं उत्पन्न होतात आणि त्याने त्यांस सदासर्वकाळपर्यंत स्थापिलें; त्याने नेम लाविला आणि तो टळत नाहीं. अहो पृथ्वीतले मोठे मगरहो, आणि समुद्र डोहांतले सर्वहो, तुह्मी परमेश्वराला स्तवा. अग्नि व गारावृष्टि, बर्फ व धुकें, त्याचें वचन पाळणारा, वादळी वारा तो, पर्वत व सर्व डोंगर, फळझाडें, व सर्व एरेजवृक्ष; श्वापदें व सर्व पशु, वळवळणारे जंतू व उडणारे पक्षी; पृथ्वींतले राजे, व सर्व प्रजा, अधिकारी व पृथ्वींतले सर्व न्यायाधीश नबे तरणे, तरण्या व आबाल वृद्ध; यांनीं परमेश्वराच्या नांवाला स्तवावें; कारण कीं केवळ त्याचेंच नांव उंच मानायाचें; त्याचें गौरव पृथ्वीवरती व आकाशावरती आहे. आणि तो आपल्या लोकांचें शिंग उभारितो; त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचा लोक इस्राएल संतानें यानीं स्तवन करावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

तुम्ही परमेश्वराला स्तवा; परमेश्वराजवळ नवें गायन गा; त्याच्या भक्तमंडळींत त्याची स्तुति करा; इस्राएलानें आपल्या उत्पन्न-करणाऱ्याविषयीं संतोष करावा; सीयोनेंतल्या प्रजेनें आपल्या राजाविषयीं हर्षावें. उत्साहमंडळींत त्यांनीं त्याचें नांव स्तवावें; डफावर व तंतुवाद्यावर त्याचें कीर्तन करावें; कां तर परमेश्वर आपल्या लोकावर प्रसन्न आहे; तो दुःखितांस तारणानें शोभायमान करितो. भक्तानीं गौरव करून उल्हास करावा; आपल्या आंथरुणांवर हर्ष करावा. त्यांच्या गळ्यांत देवाचीं उंच स्तवनें, आणि त्यांच्या हातांत दुधारी तरवार असावी; ह्मणजे त्यांनीं राष्ट्राचा सूड घ्यावा; मुलखांस शासनें करावीं. त्यांच्या राजांस सांखळ्यांनीं, त्यांच्या श्रीमंतांस लोखंडाच्या बेड्यांनीं बंद करावें; त्यांस लिहिलेला न्याय लागू करावा ह्मणून. हें वैभव त्याच्या सर्व भक्तांसाठीं नेमलेलें आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; देवाच्या पवित्र स्थानीं त्याला स्तवा; त्याच्या सामर्थ्याच्या अंतराळीं त्याला स्तवा. त्याच्या पराक्रमांमुळें त्याला स्तवा; त्याच्या मोठेपणा-प्रमाणें त्याला स्तवा. करणा वाजवितां त्याला स्तवा; तारपेटीवर व तंतुवाद्यावर त्याला स्तवा; डफानें व उत्साहमंडळींत त्याला स्तवा; सारमंडळ व मनोरंजक यांवर त्याला स्तवा; उंच टाळांनीं त्याला स्तवा; नादाच्या झांजांनीं त्याला स्तवा. (दोन वेळां—प्रत्येक श्वासवानानें परमेश्वराला स्तवावें. तुह्मी परमेश्वराला स्तवा.)

בָּרוּךְ יְהוָֹה לְעוֹלָם אָמֵן וְאָמֵן׃ בָּרוּךְ יְהוָֹה מִצִּיּוֹן שׁוֹכֵן
יְרוּשָׁלַיִם הַלְלוּיָהּ׃ בָּרוּךְ יְהוָֹה אֱלֹהִים אֱלֹהֵי
יִשְׂרָאֵל עֹשֶׂה נִפְלָאוֹת לְבַדּוֹ׃ וּבָרוּךְ שֵׁם כְּבוֹדוֹ לְעוֹלָם
וְיִמָּלֵא כְבוֹדוֹ אֶת־כָּל־הָאָרֶץ אָמֵן וְאָמֵן׃

(צריך לעמוד בכוונה

וַיְבָרֶךְ דָּוִיד אֶת־יְהוָֹה לְעֵינֵי כָּל־הַקָּהָל וַיֹּאמֶר דָּוִיד
בָּרוּךְ אַתָּה יְהוָֹה אֱלֹהֵי יִשְׂרָאֵל אָבִינוּ מֵעוֹלָם
וְעַד עוֹלָם׃ לְךָ יְהוָֹה הַגְּדֻלָּה וְהַגְּבוּרָה וְהַתִּפְאֶרֶת וְהַנֵּצַח
וְהַהוֹד כִּי כֹל בַּשָּׁמַיִם וּבָאָרֶץ לְךָ יְהוָֹה הַמַּמְלָכָה
וְהַמִּתְנַשֵּׂא לְכֹל לְרֹאשׁ׃ וְהָעֹשֶׁר וְהַכָּבוֹד מִלְּפָנֶיךָ וְאַתָּה
מוֹשֵׁל בַּכֹּל וּבְיָדְךָ כֹּחַ וּגְבוּרָה וּבְיָדְךָ לְגַדֵּל וּלְחַזֵּק
לַכֹּל׃ וְעַתָּה אֱלֹהֵינוּ מוֹדִים אֲנַחְנוּ לָךְ וּמְהַלְלִים לְשֵׁם
תִּפְאַרְתֶּךָ׃ וִיבָרְכוּ שֵׁם כְּבוֹדֶךָ וּמְרוֹמָם עַל כָּל־בְּרָכָה
וּתְהִלָּה׃ אַתָּה־הוּא יְהוָֹה לְבַדֶּךָ אַתָּה עָשִׂיתָ אֶת־
הַשָּׁמַיִם שְׁמֵי הַשָּׁמַיִם וְכָל־צְבָאָם הָאָרֶץ וְכָל־אֲשֶׁר עָלֶיהָ
הַיַּמִּים וְכָל־אֲשֶׁר בָּהֶם וְאַתָּה מְחַיֶּה אֶת־כֻּלָּם וּצְבָא
הַשָּׁמַיִם לְךָ מִשְׁתַּחֲוִים׃*) אַתָּה הוּא יְהוָֹה הָאֱלֹהִים אֲשֶׁר
בָּחַרְתָּ בְּאַבְרָם וְהוֹצֵאתוֹ מֵאוּר כַּשְׂדִּים וְשַׂמְתָּ שְׁמוֹ
אַבְרָהָם׃ וּמָצָאתָ אֶת־לְבָבוֹ נֶאֱמָן לְפָנֶיךָ וְכָרוֹת עִמּוֹ
הַבְּרִית לָתֵת אֶת־אֶרֶץ הַכְּנַעֲנִי הַחִתִּי הָאֱמֹרִי וְהַפְּרִזִּי
וְהַיְבוּסִי וְהַגִּרְגָּשִׁי לָתֵת לְזַרְעוֹ וַתָּקֶם אֶת־דְּבָרֶיךָ כִּי
צַדִּיק אָתָּה׃ וַתֵּרֶא אֶת־עֳנִי אֲבֹתֵינוּ בְּמִצְרָיִם וְאֶת־
זַעֲקָתָם שָׁמַעְתָּ עַל יַם סוּף׃ וַתִּתֵּן אֹתֹת וּמֹפְתִים
בְּפַרְעֹה וּבְכָל־עֲבָדָיו וּבְכָל־עַם אַרְצוֹ כִּי יָדַעְתָּ כִּי הֵזִידוּ

* एथपर्यंत भक्तिभावानें उभे राहून बोलावें.

परमेश्वराची सर्वकाळ स्तुति असो. आमेन व आमेन. यरूशालेमेंत जो परमेश्वर, वस्ति करितो त्याची सीयोनेंतून स्तुति असो. तुझी परमेश्वराचें स्तवन करा. परमेश्वर देव इस्राएलांचा देव, जो केवळ आश्चर्य कृत्यें करितो, त्याची स्तुति असो. त्याच्या गौरवी नामाची स्तुति सर्वकाळ असो, आणि त्याच्या गौरवाने सर्व पृथ्वी भरली जावो. आमेन व आमेन.

[हें भक्तिभावानें उभें राहून बोलावें.

आणखी दावीदानें सर्व समुदायाच्या देखतां परमेश्वराची स्तुति केली; तेव्हां दावीदानें म्हटलें " हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तुझी स्तुति व्हावी. हे परमेश्वरा, मोठेपणा, व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझी; कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे. संपत्ति व गौरवहि तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार करितोस; तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि सर्वांस मोठेंपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं आहे. तर हे आमच्या देवा, आतां आम्ही तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अति तेजस्वी नामाची स्तुति करितों. आणि तुझें गौरव विशिष्ट नाम सर्व स्तुती व प्रशंसा यांवरती उंचावलेलें असतां वंदिलें जावें. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस. त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतले सर्व उत्पन्न केलेलें तीं सर्व तूं वाचवितोस व आकाशाचीं सैन्यें तुझें भजन करितात. तूं परमेश्वर देव आहेस,] ज्या त्वां आब्रामाला निवडून खास्द्यांच्या ऊर गावांतून काढून घेतलें, आणि त्याचें नाम आब्राहाम ठेविलें. आणि त्याचें मन तुजपुढें विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती अमोरी व परिजी व यबूसी व गीर्गाशी, यांचा देश त्याच्या संततीला द्यावयाला त्यासी करार केला, आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कांकीं तूं सात्विक आहेस. आणि त्वां मिसरांत आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफ समुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. आणि फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या देशाच्या सर्व लोकांवर अद्भुतें व उत्पात केले, कां कीं त्यांनीं त्यांजवर गर्व केला असें त्वां जाणिलें, आणि आजच्या प्रमाणें आपल्याला नाम प्राप्त केलें. तेव्हां

נָשַׁפְתָּ בְרוּחֲךָ כִּסָּמוֹ יָם
צָלְלוּ כַּעוֹפֶרֶת בְּמַיִם אַדִּירִים : מִי־כָמֹכָה
בָּאֵלִם יְהוָה מִי כָּמֹכָה
נֶאְדָּר בַּקֹּדֶשׁ נוֹרָא תְּהִלֹּת עֹשֵׂה־פֶלֶא :
נָטִיתָ יְמִינְךָ תִּבְלָעֵמוֹ
אֶרֶץ : נָחִיתָ בְחַסְדְּךָ עַם זוּ גָּאָלְתָּ נֵהַלְתָּ בְּעָזְּךָ
אֶל־נְוֵה קָדְשֶׁךָ : שָׁמְעוּ
עַמִּים יִרְגָּזוּן חִיל אָחַז יֹשְׁבֵי פְלֶשֶׁת : אָז נִבְהֲלוּ
אַלּוּפֵי אֱדוֹם אֵילֵי מוֹאָב
יֹאחֲזֵמוֹ רָעַד נָמֹגוּ כֹּל יֹשְׁבֵי כְנָעַן : תִּפֹּל
עֲלֵיהֶם אֵימָתָה וָפַחַד
בִּגְדֹל זְרוֹעֲךָ יִדְמוּ כָּאָבֶן עַד־יַעֲבֹר עַמְּךָ יְהוָה
עַד־יַעֲבֹר עַם־זוּ קָנִיתָ :
תְּבִאֵמוֹ וְתִטָּעֵמוֹ בְּהַר נַחֲלָתְךָ מָכוֹן
לְשִׁבְתְּךָ פָּעַלְתָּ יְהוָה
מִקְדָּשׁ אֲדֹנָי כּוֹנְנוּ יָדֶיךָ : יְהוָה יִמְלֹךְ לְעֹלָם וָעֶד :
יְהוָה יִמְלֹךְ לְעוֹלָם וָעֶד :
יְהוָה מַלְכוּתֵיהּ קָאִים לְעָלַם וּלְעָלְמֵי עָלְמַיָּא
כִּי בָא סוּס פַּרְעֹה בְּרִכְבּוֹ וּבְפָרָשָׁיו בַּיָּם וַיָּשֶׁב יְהוָה
עֲלֵיהֶם אֶת־מֵי הַיָּם וּבְנֵי יִשְׂרָאֵל הָלְכוּ בַיַּבָּשָׁה בְּתוֹךְ הַיָּם :
(יד כאן בכל שבת · ובשבת בשלח יש נוהגים
לומר עד רופאך

וַתִּקַּח מִרְיָם הַנְּבִיאָה אֲחוֹת אַהֲרֹן אֶת הַתֹּף בְּיָדָהּ
וַתֵּצֶאן כָּל הַנָּשִׁים אַחֲרֶיהָ בְּתֻפִּים וּבִמְחֹלוֹת :

वाऱ्यानें फुंकिलें; समुद्रानें त्यांस झांकिलें; ते
शिस्यासारिखे महापाण्यांत बुडाले. हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्या
सारिखा कोण! पवित्रतेनें तुझ्यासारिखा
महान कोण! (तूं) स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्ता आहेस.
त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीनें
त्यांस गिळिलें. त्वां हे खंडून घेतलेले लोक दयेनें आणिले, आपल्या
सामर्थ्यानें आपल्या पवित्र स्थानाकडे नेलें.
राष्ट्रें ऐकून कांपतील, पलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील.
तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित
होतील; मोआबी बलाढ्यांस कंप व्यापील; खनानांतील सर्व
राहणारे विरून जातील. भय व घाबरेंपण
त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध
होतील कीं, हे परमेश्वरा, तुझे लोक पार
जातील, जे लोक त्वां विकत घेतले ते पार जातील. तोंपर्यंत तूं
त्यांस आणून आपल्या वतनाच्या डोंगरांत
लावशील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्तीसाठीं केलें
आहे. हे प्रभू, तें पवित्र स्थान तुझ्या
हातांनीं सिद्ध केलें आहे. परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील.
परमेश्वराचें राज्य सर्वकाळ आणि सर्वकाळांच्या
सर्वकाळ स्थापित आहे. कां तर फारोचे घोडे त्याच्या रथासुद्धां व
त्याच्या स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि
परमेश्वरानें समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु इस्राएलाचीं
संतानें समुद्राच्यामधून कोरड्या भूमीवरून गेलीं.

[ज्या शाब्बाथ दिवशीं शास्त्र वाचितांना त्यांतून אז ישיר हा भाग वाचायाचा असतो त्या दिवशीं मात्र हें पुढील बोलतात.

तेव्हां मिर्याम भविष्यवादीण आहारोनाची बहीण इने आपल्या हातीं डफ घेतला आणि तिच्या मागें सर्व बायका डफ घेऊन ताफ्यांनीं बाहेर आल्या.

תַּעַן לָהֶם מִרְיָם שִׁירוּ לַיהוָה כִּי גָאֹה גָּאָה סוּס וְרֹכְבוֹ
רָמָה בַיָּם: וַיַּסַּע מֹשֶׁה אֶת יִשְׂרָאֵל מִיַּם סוּף וַיֵּצְאוּ אֶל
מִדְבַּר שׁוּר וַיֵּלְכוּ שְׁלֹשֶׁת יָמִים בַּמִּדְבָּר וְלֹא מָצְאוּ מָיִם:
וַיָּבֹאוּ מָרָתָה וְלֹא יָכְלוּ לִשְׁתֹּת מַיִם מִמָּרָה כִּי מָרִים הֵם
עַל כֵּן קָרָא שְׁמָהּ מָרָה: וַיִּלֹּנוּ הָעָם עַל מֹשֶׁה לֵאמֹר
מַה נִּשְׁתֶּה: וַיִּצְעַק אֶל יְהוָה וַיּוֹרֵהוּ יְהוָה עֵץ וַיַּשְׁלֵךְ
אֶל הַמַּיִם וַיִּמְתְּקוּ הַמָּיִם שָׁם שָׂם לוֹ חֹק וּמִשְׁפָּט וְשָׁם
נִסָּהוּ: וַיֹּאמֶר אִם שָׁמוֹעַ תִּשְׁמַע לְקוֹל יְהוָה אֱלֹהֶיךָ
וְהַיָּשָׁר בְּעֵינָיו תַּעֲשֶׂה וְהַאֲזַנְתָּ לְמִצְוֹתָיו וְשָׁמַרְתָּ כָּל חֻקָּיו
כָּל הַמַּחֲלָה אֲשֶׁר שַׂמְתִּי בְּמִצְרַיִם לֹא אָשִׂים עָלֶיךָ כִּי
אֲנִי יְהוָה רֹפְאֶךָ:)

כִּי לַיהוָה הַמְּלוּכָה וּמוֹשֵׁל בַּגּוֹיִם: וְעָלוּ מוֹשִׁיעִים

בְּהַר צִיּוֹן לִשְׁפֹּט אֶת הַר עֵשָׂו וְהָיְתָה לַיהוָה
הַמְּלוּכָה: וְהָיָה יְהוָה לְמֶלֶךְ עַל כָּל הָאָרֶץ בַּיּוֹם הַהוּא
יִהְיֶה יְהוָה אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד:

(ועומד הש"ץ לפני התבה ואומר נשמת)

נִשְׁמַת כָּל חַי תְּבָרֵךְ אֶת שִׁמְךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וְרוּחַ כָּל

בָּשָׂר תְּפָאֵר וּתְרוֹמֵם זִכְרְךָ מַלְכֵּנוּ תָּמִיד · מִן
הָעוֹלָם וְעַד הָעוֹלָם אַתָּה אֵל · וּמִבַּלְעָדֶיךָ אֵין לָנוּ מֶלֶךְ
גּוֹאֵל וּמוֹשִׁיעַ פּוֹדֶה וּמַצִּיל · וְעוֹנֶה וּמְרַחֵם · בְּכָל עֵת צָרָה
וְצוּקָה · אֵין לָנוּ מֶלֶךְ עוֹזֵר וְסוֹמֵךְ אֶלָּא אַתָּה:
אֱלֹהַי הָרִאשׁוֹנִים וְהָאַחֲרוֹנִים · אֱלוֹהַּ כָּל בְּרִיּוֹת · אֲדוֹן
כָּל תּוֹלָדוֹת · הַמְּהֻלָּל בְּכָל הַתִּשְׁבָּחוֹת · הַמְנַהֵג
עוֹלָמוֹ בְּחֶסֶד וּבְרִיּוֹתָיו בְּרַחֲמִים · וַיהוָה עֵר · לֹא יָנוּם וְלֹא

मिर्यामीनें त्यांस असें उत्तर केलें कीं, परमेश्वराला गा, कां कीं तो थोरच आहे, त्यानें घोडे व त्यांवरचे स्वार समुद्रांत टाकले आहेत. मग मोशयाने इस्राएलास सुफसमुद्रापासून नेलें आणि ते शूर नांवें रानांत गेले; तेव्हां तें तीन दिवस रानांत चालले आणि त्यांस पाणी मिळालें नाहीं. मग ते माऱ्यास आले, आणि माऱ्यांतील पाणी कडू होतें यामुळें तें त्यांच्यानें पिववेना, यावरून त्याला 'मारा' असें नांव पडलें. तेव्हां लोक मोशयावर कुरकुरत म्हणाले, आम्ही काय पिऊं ? तेव्हां त्यानें परमेश्वराचा धावा केला, आणि परमेश्वरानें त्याला एक झाड दाखविलें, आणि त्यानें तें पाण्यांत टाकलें, मग पाणी गोड झालें; तेथें त्यानें त्यास नेम व न्याय लावला आणि तेथें त्यांची परिक्षा घेतली. आणि त्यानें म्हटलें, जर तूं आपला देव परमेश्वर याचा वाणी ऐकशील, त्याच्या दृष्टीस जे नीट तें करशील, त्याच्या आज्ञा मानशील आणि त्याचे सर्व नेम पाळशील, तर जीं दुखणीं म्या मिसऱ्यांवर घातलीं त्यांतील कोणतेंहि मी तुजवर घालणार नाहीं, कां तर तुला निरोगी करणारा मी परमेश्वर आहे.]

कांतर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करावयाला सीयोन पर्वतावर तारणारे चढतील, आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल, त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच.

(मग हाज्जान तेव्यावर उभा राहून हें पुढील बोलतो.)

हे परमेश्वरा ! आमच्या देवा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य म्हणतो; आणि हे आमच्या राजा ! सर्व मांसमयांचा जीव तुझ्या स्मरणाचें नित्य गौरव करून प्रशंसा करितो. सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस; आम्हास तुजवांचून कोणी राजा, खंडून घेणारा, तारणारा, मुक्त करणारा, सोडविणारा, आणि दुःखाच्या व संकटाच्या समयीं उत्तर देणारा व दया करणारा कोणी नाहीं; आम्हांस तुजवांचून राजा, सहाय कर्ता व आश्रय देणारा कोणी नाहीं.

हे आदिकाळच्या व अंतकाळच्या देवा ! सर्व प्राण्यांच्या देवा ! सर्व उत्पत्तीच्या स्वामी ! तूं सर्व स्तुतीकडून वर्णिला आहेस; तूं आपल्या जगाला दयेने आणि सर्व प्राण्यांस कृपेनें चालवितोस. आणि परमेश्वर जागृत आहे; तो निजत नाहीं

יֵשָׁן · הַמְעוֹרֵר יְשֵׁנִים וְהַמֵּקִיץ נִרְדָּמִים · מְחַיֶּה מֵתִים וְרוֹפֵא חוֹלִים · פּוֹקֵחַ עִוְרִים וְזוֹקֵף כְּפוּפִים · הַמֵּשִׂיחַ אִלְּמִים וְהַמְפַעְנֵחַ נֶעֱלָמִים · וּלְךָ לְבַדְּךָ אֲנַחְנוּ מוֹדִים ׃

מֵאוֹצְרוֹתֶיךָ לְהַנְהִיג הַסְּפִינָה וְכָל תּוֹפְשֵׂי מָשׁוֹט וּמַנְהִיגֶיהָ וּמַלָּחֶיהָ וְחוֹבְלֶיהָ וְאוֹמָנֶיהָ שֶׁיְּחַגּוּ אוֹתָהּ בָּרָאוּי בְּלֹא עַצְלוּת וּבְלֹא חֻשּׁוּל וּבְלֹא חָשׁוּת כֹּחַ וְרַגִּיעֵנוּ אֶל מְחוֹז חֶפְצֵנוּ בְּלִי שׁוּם חֶזֶק וּבְלִי שׁוּם צַעַר וּבְלִי שׁוּם חֻפְסַד כְּמוֹ שֶׁאַתָּה מוֹשֵׁל בְּגֵאוּת הַיָּם בְּשׁוֹא נַלָּיו אַתָּה תְשַׁבְּחֵם : יָקֻם סְעָרָה לִדְמָמָה וַיֶּחֱשׁוּ גַּלֵּיהֶם : שָׂמְרָה נַפְשִׁי וְהַצִּילֵנִי אַל אֵבוֹשׁ כִּי חָסִיתִי בָךְ : וַאֲנַחְנוּ נְבָרֵךְ יָהּ מֵעַתָּה וְעַד עוֹלָם הַלְלוּיָהּ:

(הנכנם להקיז דם אומר)

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁיְּהֵא עֶסֶק זֶה לִי לִרְפוּאָה וְתִרְפָּאֵנִי רְפוּאָה שְׁלֵמָה רְפוּאַת חַיִּים כִּי אֵל רוֹפֵא חִנָּם וְנֶאֱמָן אַתָּה : (ואחר שהקיז אומר) בָּרוּךְ אַתָּה יְהוָה רוֹפֵא חוֹלִים :

ברכת הגומל

(ארבעה הם שצריכין להודות · יורדי הים · והולכי מדברות · והיוצא מבית האסורים ומי שחלה ונתרפא · ובכולם כתוב יודו לה׳ חסדו · וירוממוהו בקהל עם · מכאן שצריך להודות בקהל · ומאי מברכין ·)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם הַגּוֹמֵל לְחַיָּבִים טוֹבוֹת שֶׁגְּמָלַנִי כָּל־טוּב : (ועונין לו אמן ואומר החזן)

הָאֵל אֲשֶׁר גְּמָלְךָ כָּל־טוּב וְחֵן וְחֶסֶד וְחֶמְלָה · יִתְבָּרַךְ וְיִתְרוֹמַם עַל כָּל־בְּרָכָה וּתְהִלָּה · הוּא יְרַחֲמֵיו יְשִׁימְךָ וְיִגְמָלְךָ לָעַד כָּל־טוּב נֶצַח חֶלַח :

וידוי לשכיב מרע

(קבלנוהו מהחסידים ואנשי מעשה · וטוב לאסוף עשרה אנשים בבית החולה)

योग्य रीतीने आळस न करतां, अशक्त न होतां हिंम्मत न खचवितां चालवावें ह्मणून तूं आपल्या भांडारांतून चांगला वारा सुटूं दे. आणि समुद्राच्या गर्वाला तूं शासतोस, त्याच्या लाटा उचंबळतात तेव्हां तूं त्या शांत करितोस, आणि जो वादळ निवांत होई असें करितो, तेव्हां त्याच्या लाटा निःशब्द होतात, तो तूंच; म्हणून कांहीं उपद्रव न होतां, कांहीं संकट न येतां, व कांहीं हानि न होतां, आम्ही इच्छिलेल्या बंदरीं तूं आम्हांस पोचीव. माझा जीव राख व मला मुक्त कर; मी लज्जित होऊं नये, कां कीं, मी तुझा आश्रय धरिला आहे. तर आम्ही आतांपासून सर्वकाळ पर्यंत परमेश्वराचें वंदन करीत जाऊं, तुम्ही परमेश्वराला स्तवा.

(रक्त काढून घेणारानें हें ह्मणावें.)

हे परमेश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, हें काम माझ्या अरोग्यते-करितां होवो, आणि तूं मला पूर्ण अरोग्यतेनें व जीवनाच्या अरोग्यतेनें निरोगी कर; कारण फुकट व विश्वासू वैद्य देव तूंच आहेस.

(रक्त काढल्यावर हे ह्मणावें.)

हे परमेश्वरा, रोग्यास निरोगी करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पूर्ण उपकार झाल्यावरून सुवंदन.

[समुद्रांतून प्रवास करून आलेले, रानांतून आलेले, बंदिशाळेंतून सुटलेले आणि रोगांतून निरोगी झालेले, या चौघांनी ईश्वर स्तुति केली पाहिजे; या चौघांनी परमेश्वराच्या दयेकरितां त्याची स्तुति करावी, आणि लोकांच्या समेत त्यास उंचवावें असें या सर्वाविषयीं लिहिलें आहे. * यावरून ही स्तुति मंडळींत व्हावी, आणि जी धन्यवाद ते करितात तो येणे प्रमाणें.]

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, दोषांवर उपकार करणाऱ्या, ज्यानें मजवर सर्व चांगल्या प्रकारें उपकार केले तो तूं धन्य आहेस.

(यास "तथास्तु" असें उत्तर देतात; आणि हाज्जान हें पुढील म्हणतो.]

ज्या देवाने तुजवर सर्व प्रकारे चांगल्या दयेने, कृपेने व अनुग्रहाने उपकार केले, जो सर्व सुवंदनापेक्षां व स्तुतीपेक्षां सुवंदित व उंचावलेला आहे, तोच आपल्या दयेनें तुला रक्षो; आणि सदांसर्वकाळ सर्व प्रकारें चांगल्यानें तुजवर उपकार करो.

मरणाचे लागास आलेल्याचें पापाविषयीं कबूल होणें.

[यथार्थ व सत्कर्मी मनुष्यांकडून हें खालीं लिहीलेलें आपणांस सांपडते व तसे करण्या करितां रोग्याच्या घरीं दहा मनुष्यें मिळवावीं हें बरें]

* गीत १०७.

(חניא מי שחלה ונטה למות אומרים לו חתודה שכן דרך כל המומתים מתודין שכן דרשו רז"ל דכתיב ואשמה הנפש ההיא והתודו זה בנין אב לכל המומתים שטעונין וידוי וכדי שלא לשבר לבו אומרים לו בדברים רכים חזק ואמץ אל תדאג מזה כי הרבה התודו ולא מתו הרבה לא התודו ומתו ובשכר זה שאתה מתודה לפניו יתברך אתה חי וכל המתודה יש לו חלק לעולם הבא כדכתיב ומודה ועוזב ירוחם. ומוציאין הנשים והילדים מן הבית ואומר:)

רִבּוֹן הָעוֹלָמִים בַּעַל הַסְּלִיחוֹת וְהָרַחֲמִים יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁתַּעֲלֶה זְכְרוֹנִי לְפָנֶיךָ כְּסֵה כְבוֹדֶךָ לְטוֹבָה וּרְאֵה בְעָנְיִי כִּי אֵין מְחוֹם בִּבְשָׂרִי מִפְּנֵי זַעְמֶךָ. אֵין שָׁלוֹם בַּעֲצָמַי מִפְּנֵי חַטָּאתִי. וְעַתָּה אֱלוֹהַּ סְלִיחוֹת הַמֵּה אֵלַי חֶסְדֶּיךָ וְאַל תָּבֹא בְּמִשְׁפָּט אֶת עַבְדֶּךָ. וְאִם קָרְבָה עֵת פְּקוּדָתִי לָמוּת. אַחֲדוּתְךָ לָעַד מִפִּי לֹא תָמוּשׁ כַּפָּתוּב בְּתוֹרָתֶךָ שְׁמַע יִשְׂרָאֵל יְהוָה אֱלֹהֵינוּ יְהוָה אֶחָד: בָּרוּךְ שֵׁם כְּבוֹד מַלְכוּתוֹ לְעוֹלָם וָעֶד:

מוֹדֶה אֲנִי לְפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי אֵל אֱלֹהֵי הָרוּחוֹת לְכָל בָּשָׂר שֶׁרִפּוּאָתִי בְּיָדֶךָ וּמִיתָתִי בְּיָדֶךָ וְיִהְיֶה רָצוֹן מִלְּפָנֶיךָ שֶׁתִּרְפָּאֵנִי רְפוּאָה שְׁלֵמָה וְיַעֲלֶה זִכְרוֹנִי וּתְפִלָּתִי לְפָנֶיךָ כִּתְפִלַּת חִזְקִיָּהוּ בַּחֲלוֹתוֹ וְאִם קָרְבָה עֵת פְּקוּדָתִי לָמוּת תְּהֵא מִיתָתִי כַּפָּרָה לְכָל־חַטֹּאתַי וּלְכָל עֲוֹנוֹתַי וּלְכָל־פְּשָׁעַי שֶׁחָטָאתִי וְשֶׁעָוִיתִי וְשֶׁפָּשַׁעְתִּי לְפָנֶיךָ

[राब्बी लोक ह्मणतात, कीं जो कोणी रोगी होतो आणि मरणाच्या पंथीं लागतो, त्यास ह्मणावें कीं, तूं आपलीं पापें कबूल हो; कारण जे मरायास टेंकतात त्यांनीं आपलीं पापें कबूल व्हावीं अशी रीति आहे. कारण धन्य स्मरणाचे आपले गुरू जनांनीं शास्त्रांत "परमेश्वराशीं पाप करून दोषी होतो, त्याने आपला अपराध कबूल व्हावा, हा सर्व मरावयास टेकलेल्यांच्या संबंधानें मूळ विषय आहे"; ह्मणून त्यास पापें कबूल करणें अगत्य आहे असें सांगितलें आहे. परंतु त्याचें मन दुखवूं नय ह्मणून त्यास मऊ भाषणाने ह्मणावें कीं, धीर व बळकटी धर आणि यावरून खेद मानूं नको, कारण पुष्कळांनीं आपलीं पापें कबूल केलीं तरी ते मेले नाहींत; आणि पुष्कळांनीं आपलीं पापें कबूल केलीं नाहींत ते मेले. आणि तूं धन्य ईश्वरापुढें कबूल होतोस ह्मणून तूं जिवंत आहेस. आणि जे कोणी कबूल होतात त्यांस पुढील जगींहि वतन आहे. जसें ह्मटलें आहे कीं, जो (पाप) कबूल होऊन सोडितो तो दया पावतो. मग बायका मुलें यांस घरांतून काढल्यावर तो हें ह्मणतो.]

हे जगतांच्या राजा, हे क्षमेच्या व दयेच्या स्वामी, हे परमेश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन माझी आठवण चांगल्याकरितां तुझ्या गौरवाच्या आसनापुढें चढो; आणि माझे कष्ट पहा, कारण तुझ्या कोपामुळें माझ्या अंगीं कांहीं अरोग्य नाहीं, माझ्या पापांमुळें माझ्या हाडांत कांहीं स्वस्थता नाहीं. तर आतां हे क्षमाशील देवा, तुझी दया मजकडे लाव, आणि आपल्या सेवकाबरोबर न्यायांत येऊं नको. आणि जर माझ्या मरणाच्या शिक्षेचा वेळ जवळ आला असला, तर माझ्या मुखांतून तुझें एकत्व कधींच न जावो; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, हे इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे. त्याच्या राज्याण्या गौरवाचें नाम सर्वकाळ धन्य असो.

हे परमेश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, हे ईश्वरा, सर्व मांसमयांच्या आत्म्यांच्या देवा, मी असें कबूल करितों कीं, माझी अरोग्यता तुझ्या हातीं आहे व माझें मरणहि तुझ्या हातीं आहे. ह्मणून तुझी प्रसन्नता होऊन तूं मला पूर्ण अरोग्यता दे; आणि माझी आठवण व माझी प्रार्थना हिजकिया राजानें रोगी असतां केलेल्या प्रार्थनेप्रमाणें तुजपुढें चढूं दे; आणि जर माझ्या मरणाच्या शिक्षेचा वेळ जवळ आला असला तर मी या पृथ्वीवर आल्या दिवसापासून या वेळेपर्यंत जीं पापें मी केलीं असतील, जे अपराध मी केले असतील, व जीं उल्लंघनें मीं केली असतील, त्या माझ्या सर्व पापांकरितां, सर्व अपराधांकरितां व सर्व उल्लंघनांकरितां माझ्या मरणाकडून प्रायश्चित्त होवो. आणि मला एदेन बागीं वतन दे,

מִיּוֹם הֱיוֹתִי עַל הָאֲדָמָה עַד הַשָּׁעָה הַזֹּאת וְתֵן חֶלְקִי בְּגַן עֵדֶן וְזַכֵּנִי לְעוֹלָם הַבָּא הַצָּפוּן לַצַּדִּיקִים וְתוֹרִיעֵנִי אֹרַח חַיִּים שְׂבַע שְׂמָחוֹת אֶת־פָּנֶיךָ נְעִימוֹת בִּימִינְךָ נֶצַח · בָּרוּךְ שׁוֹמֵעַ תְּפִלָּה :

(ואומרים אנא בכח וכו׳ ואחר כך ויהי נועם וכו׳)

וַיְהִי בִּשְׁלֹשִׁים שָׁנָה בָּרְבִיעִי בַּחֲמִשָּׁה לַחֹדֶשׁ וַאֲנִי בְתוֹךְ הַגּוֹלָה עַל־נְהַר־כְּבָר נִפְתְּחוּ הַשָּׁמַיִם וָאֶרְאֶה מַרְאוֹת אֱלֹהִים : בְּשָׁנַת מוֹת הַמֶּלֶךְ עֻזִּיָּהוּ וָאֶרְאֶה אֶת־אֲדֹנָי יוֹשֵׁב עַל־כִּסֵּא רָם וְנִשָּׂא וְשׁוּלָיו מְלֵאִים אֶת הַהֵיכָל : שְׂרָפִים עֹמְדִים מִמַּעַל לוֹ שֵׁשׁ כְּנָפַיִם שֵׁשׁ כְּנָפַיִם לְאֶחָד בִּשְׁתַּיִם יְכַסֶּה פָּנָיו וּבִשְׁתַּיִם יְכַסֶּה רַגְלָיו וּבִשְׁתַּיִם יְעוֹפֵף : וְקָרָא זֶה אֶל־זֶה וְאָמַר קָדוֹשׁ קָדוֹשׁ קָדוֹשׁ יְהוָה צְבָאוֹת מְלֹא כָל־הָאָרֶץ כְּבוֹדוֹ : שְׁמַע יִשְׂרָאֵל יְהוָה אֱלֹהֵינוּ יְהוָה אֶחָד : יְהוָה הוּא הָאֱלֹהִים יְהוָה הוּא הָאֱלֹהִים : יְהוָה מֶלֶךְ יְהוָה מָלַךְ יְהוָה יִמְלֹךְ לְעוֹלָם וָעֶד : מֹשֶׁה אֱמֶת וְתוֹרָתוֹ אֱמֶת : לִישׁוּעָתְךָ קִוִּיתִי יְהוָה : שַׁמַּח נֶפֶשׁ עַבְדְּךָ כִּי־אֵלֶיךָ אֲדֹנָי נַפְשִׁי אֶשָּׂא : בְּיָדְךָ אַפְקִיד רוּחִי פָּדִיתָה אוֹתִי יְהוָה אֵל אֱמֶת : יְהִיוּ לְרָצוֹן אִמְרֵי־פִי וְהֶגְיוֹן לִבִּי לְפָנֶיךָ יְהוָה צוּרִי וְגֹאֲלִי :

תפלה לחולים

(המנהג לאומרה קודם קדיש תתקבל · והש״ץ אומר הפסוק והקהל חוזר אותו)

בְּקָרְאִי עֲנֵנִי אֱלֹהֵי צִדְקִי בַּצַּר הִרְחַבְתָּ־לִּי חָנֵּנִי וּשְׁמַע תְּפִלָּתִי : בַּצַּר לִי אֶקְרָא יְהוָה וְאֶל־אֱלֹהַי אַשַּׁוֵּעַ

व पुढील जग जें सात्विकांकरितां राखून ठेविलें आहे त्यास योग्य होण्याची योग्यता माझ्या अंगीं दे. आणि जीवनाचा मार्ग मला कळीव; तुजसमोर हर्षाची पूर्ति आहे; तुझ्या उजव्या हाताकडे सर्वकाळ आनंद आहे; हे प्रार्थना ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[या नंतर אנא בכח (पृष्ठ ४७) व ויהי נעם (पृष्ठ १९६ ओळ ९) पासून पुढील भागाच्या शेवट पर्यंत म्हणतात.]

आणि असें झालें कीं, तिसाव्या वर्षांत चौथ्या महिन्यांत, महिन्याच्या पांचव्या दिवशीं मी खेबार नदी जवळ पाडाव प्रवास्यांमध्यें असतांना आकाशें उघडलीं, तेव्हां म्या देवाचे दृष्टांत पाहिले. ज्या वर्षी उजीया राजा मरण पावला त्यावर्षी म्या प्रभुला आसनावर बसलेलें उंच व थोरावलेलें पाहिलें, आणि त्याच्या पोषाकाच्या सोग्याने मंदीर भरलें. त्यावर सेराफीन उभे होते, त्यांतल्या प्रत्येकाला सहा सहा पंख होते ; दोहोंनी तो आपलें मुख झाकी, दोहोंनी आपले पाय झाकी व दोहोंनी तो उडे. आणि ते एकमेकांला मोठ्याने बोलत म्हणाले, पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे. हे इस्राएला, ऐक ; परमेश्वर आमचा देव आहे ; परमेश्वर एकच आहे. परमेश्वर हाच देव आहे ; परमेश्वर हाच देव आहे. परमेश्वर राज्य करितो ; परमेश्वरानें राज्य केलें ; परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. मोशे सत्य आहे ; व त्याचें शास्त्रहि सत्यच आहे. हे परमेश्वरा ! मी तुझ्या तारणाची वाट पहात आहे. हे प्रभू, मी आपलें चित्त तुजकडे लावितों, म्हणून तूं आपले सेवकाचा जीव हर्षित कर. हे परमेश्वरा सत्य देवा, त्वां मला उद्धरिलें आहे, म्हणून तुझ्या हातीं मी आपला आत्मा सोपितों. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

रोग्यांसाठीं प्रार्थना.

(हीं पुढील वाक्यें קדיש תתקבל पूर्वी बोलण्याची चाल आहे व ती अशी कीं हाज्जानानें एक वाक्य म्हणावें व तेंच पुनः मंडळीनेंहि म्हणावें.)

हे माझ्या न्यायी देवा, मी हाक मारितों तेव्हां मला उत्तर दे ; मी संकटांत होतों तेव्हां त्वां मला मुक्त केलें; मजवर दया करून माझी प्रार्थना ऐक. मी

יִשְׁמַע מֵהֵיכָלוֹ קוֹלִי וְשַׁוְעָתִי לְפָנָיו תָּבֹא בְאָזְנָיו׃ וַאֲנִי
תְּפִלָּתִי לְךָ ׀ יְהוָה עֵת רָצוֹן אֱלֹהִים בְּרָב־חַסְדֶּךָ ׀ עֲנֵנִי בֶּאֱמֶת
יִשְׁעֶךָ׃ הְפִלָּה לְדָוִד שִׁמְעָה יְהוָה׀ צֶדֶק הַקְשִׁיבָה רִנָּתִי
הַאֲזִינָה תְּפִלָּתִי בְּלֹא שִׂפְתֵי מִרְמָה׃ הְפִלָּה לְעָנִי כִּי יַעֲטֹף
וְלִפְנֵי יְהוָה יִשְׁפֹּךְ שִׂיחוֹ׃ שִׁמְעָה תְּפִלָּתִי יְהוָה וְשַׁוְעָתִי
הַאֲזִינָה אֶל־דִּמְעָתִי אַל־תֶּחֱרַשׁ כִּי גֵר אָנֹכִי עִמָּךְ תוֹשָׁב
כְּכָל־אֲבוֹתָי׃ כִּי לֹא־בָזָה וְלֹא שִׁקַּץ עֱנוּת עָנִי וְלֹא־הִסְתִּיר
פָּנָיו מִמֶּנּוּ וּבְשַׁוְּעוֹ אֵלָיו שָׁמֵעַ׃ יְהוָה׀ שָׁמַעְתִּי שִׁמְעֶךָ
יָרֵאתִי יְהוָה פָּעָלְךָ בְּקֶרֶב שָׁנִים חַיֵּהוּ בְּקֶרֶב שָׁנִים תּוֹדִיעַ
בְּרֹגֶז רַחֵם תִּזְכּוֹר׃ כִּי שֹׁמֵעַ אֶל אֶבְיוֹנִים יְהוָה וְאֶת־אֲסִירָיו
לֹא בָזָה׃ יֵחָיֵנוּ מִיּוֹמַיִם בַּיּוֹם הַשְּׁלִישִׁי יְקִימֵנוּ וְנִחְיֶה
לְפָנָיו׃ אֲנִי אָמַרְתִּי יְהוָה חָנֵּנִי רְפָאָה נַפְשִׁי כִּי חָטָאתִי לָךְ׃
שְׁמַע קוֹל תַּחֲנוּנַי בְּשַׁוְּעִי אֵלֶיךָ בְּנָשְׂאִי יָדַי אֶל־דְּבִיר
קָדְשֶׁךָ׃ יְהוָה יִסְעָדֵנוּ עַל עֶרֶשׂ־דְּוָי כָּל־מִשְׁכָּבוֹ הָפַכְתָּ
בְּחָלְיוֹ׃ מִן הַמֵּצַר קָרָאתִי יָהּ עָנָנִי בַמֶּרְחָב יָהּ׃ כִּי עִמְּךָ
מְקוֹר חַיִּים בְּאוֹרְךָ נִרְאֶה אוֹר׃ כִּי אֵין בַּמָּוֶת זִכְרֶךָ בִּשְׁאוֹל
מִי יוֹדֶה לָךְ׃ לֹא הַמֵּתִים יְהַלְלוּ יָהּ וְלֹא כָּל־יוֹרְדֵי דוּמָה׃
לֹא־אָמוּת כִּי־אֶחְיֶה וַאֲסַפֵּר מַעֲשֵׂי יָהּ׃ וַאֲנִי קָרָאתִיךָ כִּי
תַעֲנֵנִי אֵל הַט־אָזְנְךָ לִי שְׁמַע אִמְרָתִי׃

(פסוקים לאשה)

הַסְלֵחַ לְכָל־עֲוֹנֹתַי הָרֹפֵא לְכָל־תַּחֲלוּאָיכִי׃ הַגּוֹאֵל
מִשַּׁחַת חַיָּיכִי הַמְעַטְּרֵכִי חֶסֶד וְרַחֲמִים׃ הַמַּשְׂבִּיעַ
בַּטּוֹב עֶדְיֵךְ תִּתְחַדֵּשׁ כַּנֶּשֶׁר נְעוּרָיְכִי׃ יְהוָה יִשְׁמַע
בְּקָרְאִי אֵלָיו׃ כִּי לֹא עַל צְדָקוֹתֵינוּ אֲנַחְנוּ מַפִּילִים

आपल्या संकटांत परमेश्वराला हाक मारिली, माझ्या देवाकडे मी ओरडलों, तेव्हां त्यानें आपल्या मंदिरांतून माझी वाणी ऐकिली, माझी अरोळी त्यापुढें येऊन त्याच्या कानीं गेली. हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळीं तुजपुढें माझी प्रार्थना आहे; हे देवा, तूं आपल्या परम कृपेनें आपल्या उद्धारक सत्यतेनें मला उत्तर दे. दावीदाची प्रार्थना; हे परमेश्वरा, जें न्यायी तें ऐक, माझ्या आरोळीकडे मन लाव, माझ्या प्रार्थनेस कान दे; ती कपटी ओंठानी उच्चारलेली नाहीं. दीनाची प्रार्थना, तो व्याकुळ असतां व ईश्वरासमोर आपला विलाप करितांना, करितो ती. हे परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक व माझ्या आरोळीकडे कान लाव, माझ्या रडण्याविषयीं उगा राहूं नको; कां तर मी आपल्या सर्व वडिलांप्रमाणें तुजपाशीं प्रवासी व विदेशीं आहे. कारण त्यानें कष्टयांचे कष्ट तुच्छ मानले नाहींत, व वीट मानले नाहींत; त्यानें आपलें मुख त्यापासून लपविलें नाहीं; परंतु त्यानें त्यास आरोळी केली, तेव्हां त्यानें त्याचें ऐकलें. हे परमेश्वरा, तुझी कीर्ती ऐकून मी भयभीत झालों आहे; हे परमेश्वरा, तूं आपलें कार्य वर्षाच्यामध्यें स्थापन कर, वर्षाच्या मध्यें विज्ञापन कर, कोपाच्या समयीं दया स्मर. दोहों दिवसांनीं तो आम्हास जीवंत करील, आणि तिसऱ्या दिवशीं तो आम्हास उठवील. मी म्हणालों, हे परमेश्वरा, मजवर दया कर, माझ्या जीवाला बरें कर, कारण म्या तुजविरुद्ध पाप केलें आहे. जेव्हां तुला मी आरोळी करितों, आणि तुझ्या गाभाऱ्याकडे मी आपले हात उभारितों तेव्हां माझ्या काकुळतीचा शब्द ऐक. रोगाच्या खाटेवर परमेश्वर त्याला आराम देईल, आणि त्याच्या विकृतींत त्याचें प्रत्येक अंथरूण तूं पालटशील. संकटांत मी परमेश्वरास आरोळी केली, तेव्हां प्रशस्त स्थानांत त्यानें मला उत्तर दिलें. कां कीं, तुजपाशीं जीवनाचा उगम आहे. तुझ्या प्रकाशानें आम्ही प्रकाश पाहतों. कारण कीं मरणांत तुझें कांहीं स्मरण नाहीं; अधो लोकीं तुझी स्तुति कोण करील ? जे मेलेले व जे कोणी शांत स्थलीं उतरतात त्यांस परमेश्वराचें स्तवन करवत नाहीं. मी मरणार नाहीं, तर वांचेन, आणि परमेश्वराची कर्मे कथीन. हे देवा, त्वां मला उत्तर द्यावें ह्मणून म्या तुझी प्रार्थना केली आहे, मजकडे तूं आपला कान लाव.

(स्त्रीकरितां हीं पुढील वाक्यें म्हणतो.)

तो तुझे सर्व अन्याय क्षमा करितो व तुझे सर्व रोग बरे करितो. तो तुझें आयुष्य नाशांतून उद्धरतो, आणि दयेचा व करुणेचा मुगुट तुजवर घालतो. तो तुझें दीर्घ आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करितो, गरुडासारखें तुझें तरुणपण नवें होतें. मी त्याला हाक मारीन, तेव्हां परमेश्वर ऐकेल. कारण आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आम्ही आपल्या विनंत्या तुजपुढें

תַּחֲנוּנֵינוּ לְפָנֶיךָ כִּי עַל רַחֲמֶיךָ הָרַבִּים : אֲדֹנָי שְׁמָעָה
אֲדֹנָי סְלָחָה אֲדֹנָי הַקְשִׁיבָה וַעֲשֵׂה אַל תְּאַחַר לְמַעַנְךָ אֱלֹהַי
כִּי שִׁמְךָ נִקְרָא עַל עִירְךָ וְעַל עַמֶּךָ : הַשִּׁיבֵנוּ יְהוָה אֵלֶיךָ
וְנָשׁוּבָה חַדֵּשׁ יָמֵינוּ כְּקֶדֶם :

(ואחר כך השליח צבור אומר בדמעה ובתחנונים)

מְצַלְּאִין אֲנַחְנָא וְתַבְעִין רַחֲמֵי מִן קֳדָם אֱלָהָנָא מָרֵיהּ
שְׁמַיָּא וְאַרְעָא בְּחֶלַת עֶשֶׂר מְכִילָן דְּרַחֲמֵי
דִּכְתִיבִין בְּסִפְרָא דְּאוֹרַיְתָא דְּמשֶׁה נְבִיאָה כְּדִכְתִיב וַיַּעֲבֹר
יְהוָה עַל פָּנָיו וַיִּקְרָא יְהוָה יְהוָה אֵל רַחוּם וְחַנּוּן אֶרֶךְ
אַפַּיִם וְרַב חֶסֶד וֶאֱמֶת : נֹצֵר חֶסֶד לָאֲלָפִים נֹשֵׂא עָוֹן וָפֶשַׁע
וְחַטָּאָה וְנַקֵּה : וְנַקֵּה לַשָּׁבִים · אֶרֶךְ אַפַּיִם לַשּׁוֹבָבִים ·
לַשּׁוֹכְנִין בֵּין חַיּוֹת הַקֹּדֶשׁ וּכְרוּבִים · הָעוֹנֶה בְּעֵת צָרוֹת ·
הָאֵל הַפּוֹעֵל גְּבוּרוֹת · הָעוֹנֶה לְהוֹלְכֵי מִדְבָּרוֹת · הָאֵל
הַפּוֹדֶה וּמַצִּיל · הַמַּפְלִיא חֲסָדָיו לְהוֹעִיל · הָאֵל אֶחָד
וְאֵין זוּלָתוֹ · וּמוֹשִׁיעַ אֵין בִּלְתּוֹ · הָאֵל הַקָּרוֹב לְכָל
קוֹרְאָיו · הָעוֹנֶה בַּצָּרָה אֶל יִרְאָיו הוּא יִתְמַלֵּי רַחֲמִין
טָבִין וְקָרְבִין עֲלָנָא וְעַל כָּל יִשְׂרָאֵל אָחָנָא וְעַל כָּל מִי
שֶׁהוּא שָׂרוּי בְּצַעַר וּבְשִׁבְיָה בֵּין בַּיָּם בֵּין בַּיַּבָּשָׁה · וְעַל
כָּל מִי שֶׁהוּא חָבוּשׁ בְּבֵית הָאֲסוּרִים בְּאֵימַת מֶלֶךְ וְשָׂרִים ·
וְעַל כָּל מִי שֶׁהוּא חוֹלֶה · וּבִכְלָלָם יַעֲלֶה רְפוּאוֹת תְּעָלָה
אֶל תַּחֲלוּאֵי (פלוני) הַמּוּטָל עַל עֶרֶשׂ דָּוָי :

(ואומר מלך מלכי המלכים וכו׳ · ואם עושיב שנוי
השם אומר :)

וְיִקָּרֵא שְׁמוֹ בְּיִשְׂרָאֵל (פלוני) כְּמוֹ שֶׁכָּתוּב וְלֹא יִקָּרֵא
עוֹד אֶת שִׁמְךָ אַבְרָם וְהָיָה שִׁמְךָ אַבְרָהָם כִּי אָב

ओतितों. हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमा कर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणांकरितां असें कर; कां कीं तुझ्या नगरास आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव म्हणजे आम्हीं फिरूं; पूर्वी प्रमाणें आमचे दिवस नवे कर.

(मग हाज्जान अश्रुपाताने व काकळूतीने हें पुढील ह्मणतो.)

आम्ही प्रार्थना करून ईश्वर जो आकाश व पृथ्वींचा स्वामी, जो मोशे भविष्यवादि याच्या शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तेव्हां परमेश्वर त्याजपुढें जवळून जाऊन मोठ्याने असें बोलला, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध व फार दयेचा व सत्यतेचा, हजारांवर दया राखणारा," अन्याय व अपराध व पाप यांची क्षमा करणारा आणि निर्दोष ठरविणारा या दयेच्या तेरा गुणांचा, जो आपणाकडे फिरणारास निर्दोष ठरविणारा, जो पश्चात्ताप करणारांसीं मंदक्रोधानें वागणारा, जो पवित्र हाय्योथ व केरूबीम या दूतांमध्यें वस्ती करणारा, जो संकटसमयीं उत्तर देणारा, जो पराक्रमाचीं कामें करणारा देव, जो रानांतून जाणारांस उत्तर देणारा, जो उद्धारणारा व मुक्ता करणारा देव, जो लाभकारक दयेचीं आश्चर्य कर्में करणारा, जो एकच देव व ज्या वांचून कोणी नाहीं, ज्या शिवाय कोणी तारणारा नाहीं, जे, आपणास हाक मारणारांच्या जवळ असणारा देव, जो आपल्या भिणारांस संकटीं उत्तर देणारा, याजपासून असी दया मागतों कीं, त्याने आम्हावर, आमच्या सर्व इस्राएल बांधवांवर, जे कोणी समुद्रीं किंवा जमीनीवर दुःखाने व पाडावपणाने गांजले असतील त्या सर्वांवर, जे कोणी राजाच्या व सरदारांच्या त्रासामुळें बंदी शाळेंत कैद असतील त्या सर्वांवर, आणि जे कोणीं रोगी असतील त्या सर्वांवर दया करून त्याने त्यांसीं चांगल्या प्रकारें व जवळ असावें; आणि विशेषें करून (**अमुक**) जो रोगाच्या खाटेवर पडला आहे, त्याच्या रोगास त्याने आरोग्यतेचे उपचार करावे.

[यानंतर מלך מלכי המלכים इत्यादि पुढें लिहिल्याप्रमाणें म्हणावें. जर (त्या रोग्याचे) नांव पालटणें* असेल तर हें पुढील म्हणावें.]

(**जसें** शास्त्रांत लिहिलें आहे कीं,) यापुढें तुझें नांव आब्राम असें म्हटलें जाणार नाहीं, परंतु तुझें नांव आब्राहाम होईल; कां कीं, मी तुला

---

* टीका २०.

חֲמוֹן גּוֹיִם נְחַתִּיךְ · יִשְׁמַח הוּא בְּשִׁמּוֹ · וְיִתְקַיֵּם שְׁמוֹ בּוֹ
כְּדִכְתִיב וַאֲגַדְּלָה שִׁמֶךָ וֶהְיֵה בְּרָכָה : יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ
יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁיְּהֵא שִׁנּוּי שְׁמוֹ זֶה
לְבַטֵּל מֵעָלָיו כָּל־גְּזֵרוֹת קָשׁוֹת וְרָעוֹת וְלִקְרוֹעַ מֵעָלָיו כָּל־
רַע גְּזַר דִּין · וְאִם נִקְנָסָה מִיתָה עַל (פלוני) עַל (פלוני)
זֶה לֹא נִקְנָסָה · וְאִם נִגְזָרָה גְּזֵרָה עַל (פלוני) עַל
(פלוני) זֶה לֹא נִגְזָרָה · הֲרֵי הוּא כְּאִישׁ צָהֵר וּכְבִרְיָה
חֲדָשָׁה · וּכְקָטָן שֶׁנּוֹלַד לְחַיִּים טוֹבִים וַאֲרִיכוּת
שָׁנִים · וּלְמִלּוּאֵי יָמִים · וֶאֱמַר שָׁמַעְתִּי אֶת תְּפִלָּתֶךָ
רָאִיתִי אֶת דִּמְעָתֶךָ הִנְנִי רוֹפֵא לָךְ בַּיּוֹם הַשְּׁלִישִׁי תַּעֲלֶה
בֵּית יְהוָה · וּכְתִיב וְיַחֲיֵנוּ מִיּוֹמַיִם בַּיּוֹם הַשְּׁלִישִׁי יְקִימֵנוּ
וְנִחְיֶה לְפָנָיו : (ואומר מלך מלכי המלכים וגו׳)

שנוי השם לאשה

וְתִקָּרֵא שָׁמָהּ בְּיִשְׂרָאֵל (פלונית) כְּמוֹ שֶׁכָּתוּב שָׂרַי
אִשְׁתְּךָ לֹא־תִקְרָא אֶת שְׁמָהּ שָׂרַי כִּי שָׂרָה
שְׁמָהּ : יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ
שֶׁיְּהֵא שִׁנּוּי שְׁמָהּ זֶה לְבַטֵּל מֵעָלֶיהָ כָּל־גְּזֵרוֹת קָשׁוֹת
וְרָעוֹת · וְלִקְרוֹעַ מֵעָלֶיהָ כָּל רַע גְּזַר דִּין · וְאִם נִקְנָסָה
מִיתָה עַל (פלונית) עַל (פלונית) זוֹ לֹא נִקְנָסָה · וְאִם
נִגְזָרָה גְּזֵרָה עַל (פלונית) עַל זוֹ לֹא נִגְזָרָה · הֲרֵי הִיא
כְּאִשָּׁה אַחֶרֶת וּכְבִרְיָה חֲדָשָׁה · וְכַקְּטַנָּה שֶׁנּוֹלְדָה לְחַיִּים
טוֹבִים וַאֲרִיכוּת שָׁנִים · וּלְמִלּוּאֵי יָמִים · וֶאֱמַר שָׁמַעְתִּי
אֶת תְּפִלָּתֶךָ רָאִיתִי אֶת־דִּמְעָתֶךָ הִנְנִי רוֹפֵא לָךְ בַּיּוֹם
הַשְּׁלִישִׁי תַּעֲלֶה בֵּית יְהוָה · כְּדִכְתִיב וְיַחֲיֵנוּ מִיּוֹמַיִם בַּיּוֹם
הַשְּׁלִישִׁי יְקִימֵנוּ וְנִחְיֶה לְפָנָיו :

राष्ट्रांच्या समुदायाचा बाप असें केलें आहे; या लिहिल्याप्रमाणें त्याचें नांव इस्राएलांत (**अमुक**) असें म्हटलें जावो. तो आपल्या नांवीं हर्ष करो, आणि मी तुझें नांव मोठें करीन आणि तूं आशीर्वादित होशील, या लिहिण्याप्रमाणें त्याचें नांव त्याजवर स्थापित होवो. हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन हें त्याचें नांव पालटणें त्याजवरील सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द करण्याकरितां आणि त्याजवर झालेले शिक्षेचे वाईट हुकूमनामे फाडले जाण्याकरितां होवो. जर (**अमुकास**) मरणाची शिक्षा झाली असेल, तर ती या (**अमुकास**) लागू न होवो; आणि जर (**अमुकावर**) निवाडा झाला असेल, तर तो निवाडा या (**अमुकावर**) नसो. पहा, तो केवळ निराळाच मनुष्य, नवीन प्राणी व चांगल्या जीवनाकरितां, दीर्घ आयुष्याकरितां व पूर्ण वयाकरितां जन्मलेल्या लहान बाळासारखा आहे. जसें ह्मटलें आहे कीं तुझी प्रार्थना मी ऐकली आहे. तुझीं आसवे मी पाहिलीं आहेत. पहा, मी तुला बरें करितों; तिसऱ्या दिवशीं तूं परमेश्वराच्या मंदिरास चढून जाशील. आणखी असें लिहिलें आहे कीं, दोहो दिवसांनी तो आह्माला जीवंत करील, आणि तिसऱ्या दिवशीं तो आह्मास उठवील, आणि आम्ही त्यासमोर जीवंत राहूं.

[या मागून पुढे लिहिल्याप्रमाणे מלך מלכי המלכים इत्यादि बोलतो.]

स्त्रीचें नांव पालटणें.*

जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, तुझी बायको साराय इचें नांव साराय असें ह्मणूं नको, का कीं, तिचें नांव सारा होईल, या लिहिण्याप्रमाणें तिचें नांव इस्राएलामध्यें (**अमुक**) असें ह्मटलें जावो. हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन हें तिचें नांव पालटणें तिजवरील सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द करण्याकरितां आणि तिजवर झालेले शिक्षेचे वाईट हुकूमनामे फाडले जाण्याकरितां होवो. जर (**अमुकीस**) मरणाची शिक्षा झाली असेल, तर ती या (**अमुकीस**) लागू न होवो; आणि जर (**अमुकीवर**) निवाडा झाला असेल तर तो निवाडा या (**अमुकीवर**) नसो. पहा ती केवळ निराळीच स्त्री, नवीन प्राणी व चांगल्या जीवनाकरितां, दीर्घ आयुष्याकरितां व पूर्ण वयाकरितां जन्मलेल्या लहान बाळासारिखी आहे. जसें म्हटलें आहे कीं, तुझी प्रार्थना मी ऐकिली आहे. तुझीं आंसवें मी पाहिलीं आहेत; पहा, मी तुला बरें करितों, तिसऱ्या दिवशीं तूं परमेश्वराच्या मंदिरात चढून जाशील, आणखी असें लिहिलें आहे कीं, दोहों दिवसांनी तो आह्माला जीवंत करील. आणि तिसऱ्या दिवशीं तो आम्हांस उठवील, आणि आम्हीं त्यासमोर जीवंत राहूं.

* टीका २०.

(ואחר כך אומר)

מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים בְּרַחֲמָיו יְרַפֵּאֵהוּ וְרִפּוּאָה שְׁלֵמָה וְיָקוּם בּוֹ קָרָא דְּכְתִיב וְרָפָאנִי יְהוָה וְאֵרָפֵא הוֹשִׁיעֵנִי וְאִוָּשֵׁעָה כִּי תְהִלָּתִי אָתָּה · מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים בְּרַחֲמָיו יַחֲלִימֵהוּ וְיַחֲיֵיהוּ · מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים יִשְׁלַח לוֹ מִמְּרוֹמָיו מַרְפֵּא וַאֲרוּכָה · מַרְפֵּא בְּרָכָה · מַרְפֵּא רָצוֹן וּנְדָבָה · מַרְפֵּא חֶסֶד וְאַהֲבָה · מַרְפֵּא תְּעָלָה וּתְרוּפָה · מַרְפֵּא חֻמְלָה וַחֲנִינָה · מַרְפֵּא רַחֲמִים יְרוּעִים וּגְלוּיִים · מַרְפֵּא שָׁלוֹם וְחַיִּים · מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים בְּרַחֲמָיו יַעֲנֵהוּ בְּעֵת צָרָה כְּדִכְתִיב יַעַנְךָ יְהוָה בְּיוֹם צָרָה : (וגומר המזמור)

(ונודר צדקה לב"ח הכנ ולעניי ארץ ישראל תובב"א ולפדיון שבוים · ויתן צדקה לעניי עירו ·)

סדר אבלים

(ברכת קריעה)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם דַּיַּן הָאֱמֶת :

רחיצת המת

(קודם רחיצת המת אומרים זה הרחצנים ויועיל גם כן לחבירים הקברנים)

אָנָּא הַשֵּׁם אֱלֹהֵי הַחֶסֶד וְהָרַחֲמִים אֲשֶׁר כָּל אוֹרְחוֹתֶיךָ חֶסֶד וֶאֱמֶת וְתוֹרָתְךָ כֻּלָּהּ חֶסֶד וֶאֱמֶת וּבָרָאתָ הָעוֹלָם בְּחֶסֶד וֶאֱמֶת וְצִוָּנוּ לְהִתְעַסֵּק בַּמֵּתִים בְּחֶסֶד וֶאֱמֶת וְלִקְבוֹר הַמֵּתִים בְּחֶסֶד וֶאֱמֶת דִּכְתִיב כִּי קָבוֹר תִּקְבְּרֶנּוּ · וּבְכֵן יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ הַשֵּׁם אֱלֹהֵינוּ שֶׁתְּאַמְּצֵנוּ וּתְחַזְּקֵנוּ לַעֲשׂוֹת מִלַּאכְתֵּנוּ מְלֶאכֶת שָׁמַיִם לִהְיוֹת עֲסָקֵינוּ בַּמֵּתִים

(मग हें बोलतो.)

राजांचा महाराजा त्यास पूर्णपणें निरोगी करो. आणि " हे परमेश्वरा, मला निरोगी कर, म्हणजे मी निरोगी होईन; मला तार, म्हणजे मी तारण पावेन, कां तूं माझें स्तुतिपात्र आहेस, " हें शास्त्रांत लिहिलेलें वाक्य त्यामध्यें स्थापित करो; राजांचा महाराजा त्यास गुण देऊन जीवंत राखो; राजांचा महाराजा, त्याजकरितां वरून अरोग्यता व उपचार म्हणजे आशिर्वादरूप अरोग्यता, प्रसन्नतेची व उदारपणाची अरोग्यता, मायेची व प्रीतीची अरोग्यता, परिहाराची व रोगमोचनाची अरोग्यता, कृपेची व करुणेची अरोग्यता, उघड व प्रत्यक्ष दयेची अरोग्यता, सुखाची व जीवनाची अरोग्यता पाठवो; राजांचा महाराजा आपल्या दयेनें संकटाच्या वेळीं त्यास उत्तर देवो; जसें म्हटलें आहे कीं, संकटाच्या दिवशीं परमेश्वरानें तुझे ऐकावें [**इत्यादि गीत २० वें पूर्ण म्हणतो.**]

[**असें केल्यावर प्रार्थना मंदिरास, इस्राएलांच्या देशांतील गरीबांस व पाडावांच्या मुक्ततेकरितां देणगी देण्याचा नवस (रोग्यानें) करावा; व आपले शहरांतील गरीबांस दानधर्म करावा.**]

सुतक्यांची रीति.

(वस्त्र फाडतांना करावयाचा धन्यवाद.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, सत्य न्यायाधीशा, तूं धन्य आहेस.

प्रेत क्रिया.

(प्रेतास धुण्या अगोदर धुणारे हें म्हणतां; आणि त्यांच्या संगतीचे जे पुरणारे असतात त्यांसहि हें उपयोगीं पडतें.)

हे ईश्वरा, दयेच्या व कृपेच्या देवा, ज्याचे सर्व मार्ग दयेचे व सत्यतेचे आहेत, ज्याचें सर्व शास्त्र दयेचें व सत्यतेचें आहे, ज्यानें हें जग दयेनें व सत्यतेनें उत्पन्न केलें, त्या त्वां आम्हास मेलेल्यांकरितां दयेनें व सत्यतेनें श्रम करण्यास आणि त्यास पूर असें लिहिल्याप्रमाणें दयेनें व सत्यतेनें मेलेल्यास पुरावयास आज्ञा दिलीस. यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन हें आमचें ईश्वरी नामाचें काम मेलेल्यांस शुद्ध करितांना, वस्त्रें पांघरवितांना आणि पुरतांना करितों तें करावयास तूं आम्हास धीट कर व धीर दे. आणि जरी त्या कामांचा स्वार्थ जाणून आम्ही

בְּמַהֲרָתָם וּבְלִבְישָׁתָם וּבְקִבּוּרָתָם וְאַף שֶׁלֹּא יָדַעְנוּ בַּוָּנָתָם
לְכַוֵּין בָּהֶם יִהְיוּ בְּאִלּוּ נִתְכַּוַּנּוּ בָּהֶם וְתִשְׁמְרֵנוּ שֶׁלֹּא
נִכָּשֵׁל בְּמַעֲשֶׂה יָדֵינוּ וְיִתְקַיֵּם בָּנוּ לֹא יֵאָנֶה לַצַּדִּיק כָּל־
אָוֶן כִּי שְׁגִיאוֹת מִי יָבִין וְתִשְׁמְרֵנוּ מִכָּל נֶזֶק וּתְקָלָה לְקַיֵּם
בָּנוּ מִקְרָא שֶׁכָּתוּב שׁוֹמֵר מִצְוָה לֹא יֵדַע דָּבָר רָע וְתַעֲמוֹד
לָנוּ זְכוּת מִצְוַת גְּמִילוּת חֶסֶד וֶאֱמֶת וּלְכָל בְּנֵי בָתֵּינוּ
לְמַלְאוֹת יָמֵינוּ בַּטּוֹב וּבַנְּעִימִים בְּשֵׂיבָה טוֹבָה וְאַף טוֹב
וָחֶסֶד יִרְדְּפוּנִי כָּל־יְמֵי חַיַּי וְשַׁבְתִּי בְּבֵית יְהוָה לְאֹרֶךְ יָמִים׃

(ויהי נועם וגו׳)

(רחיצת המת לאיש חסיד מהר״ר הלל ז״ל)

(נותנין את המת על הלוח כדי לרחצו אחר רחיצת הלוח
נוטלין אותו ואומרים בנטילתן)

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ הַשֵּׁם אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁתְּרַחֵם עַל
הַמֵּת הַזֶּה שֶׁהוּא בֶּן אַבְרָהָם יִצְחָק וְיַעֲקֹב עַבְדֶּיךָ
וְתָנוּחַ נַפְשׁוֹ עִם הַצַּדִּיקִים בְּגַן עֵדֶן ׀ בָּרוּךְ מְחַיֶּה
הַמֵּתִים וּמֵמִית הַחַיִּים׃

(וזורקין עליו מים חיים לא חמין ולא קרים אלא
פושרין ומתחילין לרחוץ הראש תחלה שבעה
רחיצות בז׳ כלים ראשונה במים ׀ שניה
בנתר ׀ שלישית בבורית ואומרים)

רְאֵשֶׁךָ עָלַיִךְ כַּכַּרְמֶל וְדַלַת רֹאשֵׁךְ כָּאַרְגָּמָן מֶלֶךְ אָסוּר
בָּרְהָטִים ׃ בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם הָאֵל הַגָּדוֹל הַגִּבּוֹר
וְהַנּוֹרָא מוֹחֵל וְסוֹלֵחַ לַחַטָּאִים וְלַעֲוֹנוֹת מִמֶּתִי עַמְּךָ
יִשְׂרָאֵל בְּתַחֲנוּנִים ׃

ती करीत नाहीं, तरी तीं स्वार्थ जाणून केल्यासारिखी होवोत; आणि आमच्या हाताच्या कामाकडून आम्ही गळून पडूं नये म्हणून आम्हास तूं सांभाळ; आणि "न्यायीला काहीं विपत्ति लागणार नाहीं" (हें शास्त्रांतील वाक्य) आम्हामध्यें स्थापित कर कारण चुकी कोण जाणतो ? आणि "जो आज्ञा पाळितो, तो कांहीं वाईट अनुभवणार नाहीं" हें शास्त्रांतील वाक्य आम्हामध्यें स्थापित करण्याकरितां आम्हास सर्व उपद्रव व नीचपणा यांपासून राख. आणि आमचे दिवस सुखानें ब आनंदानें ब चांगल्या म्हातारपणानें पूर्ण व्हावें, म्हणून दया व सत्यता करण्याची आज्ञा पूर्ण करण्यांची पुण्याई आम्हासाठीं व आमच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांसांठीं उभी राहूं दे; म्हणजे निश्चयें माझ्या आयुष्याच्या सर्व दिवसांत मजवर बरेंपणा व दया होतील, आणि चिरकाल मी परमेश्वराच्या घरीं राहीन.

[या नंतर ויהי נעם (पृष्ट १९६ ओळ ९) पासून पुढी भागाच्या शेवट पर्यंत ह्मणतात.]

[रिब्बी हिल्लेल याने धार्मिक मनुष्यांचें प्रेत धुण्याची लावून दिलेली रीति.]

(प्रेत फळीवर ठेवून घुवावें, परंतु पहिल्याने फळी धुवून मग प्रेत धुवावे आणि तें धुताना हें म्हणावें.)

हे ईश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन तूं या मेलेल्यावर दया कर. कारण तो तुझे सेवक आब्राहाम, इसहाक, व याआकोब यांचा पुत्र आहे; आणि त्याच्या जीवास सात्विकी बरोबर एदेन बागीं विश्रांति दे. मेलेल्यांस जीवंत करणारा व जीवंतास मारणारा धन्य असो.

(मग न उष्ण न थंड परंतु सुमसुमें असें वाहातें (गोडें) पाणी त्याजवर शिंपडून डोकें धुण्यास आरंभ करावा. यावेळीं सात घड्यांनीं सात वेळां धुवावे, म्हणजे पहिलें पाण्यानें, दुसरे क्षारानें आणि तिसरें साबणानें डोक धुता वेळीं हे बोलतात.)

तुजवर तुझें डोकें कर्मेला सारखें आहे, आणि तुझ्या डोईचे केश किरमीज रंगाच्या रेशमा सारखे आहेत, त्यांच्या कुरुळांनीं राजा अटकला आहे. हे ईश्वरा ! मोठ्या पराक्रमी, भयंकरा, आणि इस्राएलांच्या मनुष्यास काकळुतीमुळें त्यांची पापें व अपराध क्षमा व माफ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(ברחיצה רביעית וחמישית רוחצים במים נקיים ובששית
בעלי חדס ואומרים)

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ הַשֵּׁם אֱלֹהֵי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁתְּסַבֵּב
מַלְאָכֵי רַחֲמִים לְפָנַי הַמֵּת הַזֶּה שֶׁהוּא עַבְדְּךָ בֶּן
אֲמָתֶךָ וְאַתָּה הַשֵּׁם אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ מַשְׁפִּיל אֶל
דָּל מַלְטֵהוּ מִכָּל צָרָה וּמִיּוֹם רָעָה וּמִדִּינַהּ שֶׁל גֵּיהִנָּם ׃
בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם גְּדוֹל הָעֵצָה וּבַעַל הָרַחֲמִים ׃

(ברחיצה שביעית רוחצין את הראש במים קרים ואומרים)

יָבֹא שָׁלוֹם יָנוּחוּ עַל מִשְׁכְּבוֹתָם ׃ בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם
עוֹשֶׂה שָׁלוֹם בִּמְרוֹמָיו לַעֲבָדָיו וּלְיִרְאֵי שְׁמוֹ ׃

(ואחר כך חזקן ג׳ רחיצות בג׳ כלים)

א הַשֵּׁם מָה־אָדָם וַתֵּדָעֵהוּ בֶּן־אֱנוֹשׁ וַתְּחַשְּׁבֵהוּ ׃
ב וַתְּחַסְּרֵהוּ מְעַט מֵאֱלֹהִים וְכָבוֹד וְהָדָר תְּעַטְּרֵהוּ ׃
ג לַשֵּׁם אֱלֹהֵינוּ הָרַחֲמִים וְהַסְּלִיחוֹת כִּי חָטָאנוּ לוֹ ׃

(ואחר כך רוחץ הלב והבטן והכתפות בב׳ כלים ואחר
כך זרוע הימנית מלפנים והשמאלית מאחרונה
בב׳ כלים הימנית מלמעלה והשמאלית
מלמטה ואומר ׃)

בָּרוּךְ הַפּוֹדֶה עַמּוֹ יִשְׂרָאֵל מִמִּינֵי פּוּרְעָנִיּוֹת בְּרַחֲמִים ׃

(ואחר כך רוחץ את החלצים וחמוקי ירכים בכלי אחד
ואחר כך רוחץ מבושיו של פנים ושל אחריו במים אחרים
בכלי אחר ובבורית ואומרים)

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ הַשֵּׁם אֱלֹהַי וֵאלֹהֵי אֲבוֹתַי שֶׁתִּזְכּוֹר
זְכוּת בְּרִית קֹדֶשׁ שֶׁבְּבְשָׂרֵנוּ וְיִהְיֶה לוֹ פְּדְיוֹן מִשְׁרַפַת
גֵּיהִנָּם וְתַחֲלָצֵהוּ ׃ בָּרוּךְ כּוֹרֵת הַבְּרִית בְּרַחֲמִים ׃

(चौथे व पांचवे वेळीं शुद्ध पाण्यानें धुवावें, आणि सहाव्या वेळीं मटलीच्या पानांनीं धुतांना हें म्हणतात.)

हे ईश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन हा मेलेला जो तुझ्या दासीचा पुत्र त्या सभोवतें दयेचे दूत असूं दे; हे ईश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं दरिद्र्याची चिंता करणारा, आणि त्यास दुःखापासून, वाईट दिवसापासून, नरकाच्या दंडापासून सोडवितोस. हे ईश्वरा, मोठ्या संकल्पाच्या व दयेच्या स्वामि, तूं धन्य आहेस.

(सातव्या वेळीं थंड पाण्यानें डोकें धुतात आणि हें म्हणतात.)

तो सुखपरूपणें जावो, ते आपल्या अंथरुणावर समाधान पावोत. हे ईश्वरा, उंच (आकाशीं) आपल्या सेवकांचें व आपल्या नामास भिणारांचे कुशल करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(मग तीन घड्यांनीं ३ वेळ दाढी धुतांना हीं पुढील तीन वाक्यें म्हणावीं)

१. हे ईश्वरा, मनुष्य काय, कीं तूं त्यास आठवितोस; मनुष्य संतान काय कीं तूं त्याची भेट घेतोस.

२. त्वां त्यांस दूतापेक्षां कांहींसे थाकटें केलें आहे; गौरवानें व वैभवानें त्वां त्यास वेष्टिलें आहे.

३. प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरी आम्ही पाप केलें, तरी त्याला दया आणि क्षमा आहे.

(मग छाती, पोट, व खांदे दोन घड्यांनी धुवावें; त्यानंतर उजवा हात समोरून वरून खालीं धूत आणावा, आणि डावा हात मागून खालून वर धूत न्यावा आणि हें म्हणावें)

जो आपल्या इस्राएल लोकांस निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षेपासून दयेनें सोडवितो, तो धन्य असो.

(मग कमर व मांड्यांचे सांधे दुसऱ्या घडयानें धुवावे. त्यानंतर पुढील व मागील लज्जांगें दुसऱ्या घडयांत दुसरें पाणी घेऊन साबणानें धुवावीं आणि हें म्हणावें)

हे ईश्वरा, माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन आमच्या शरीरीं जो पवित्र करार आहे, त्याची पुण्याई तूं आठीव. आणि तो त्यास नरकांतील जळण्यापासून सोडविण्याकरितां त्याची खंडणी असा होऊं दे; आणि तूं त्यास मुक्त कर. जो दयेनें करार करणारा तो धन्य असो.

(ויוסיף ויאמר)

בְּרַחֲמִים הַסְתֵּר וְהַעֲלֵם פִּשְׁעֵי הַמֵּת הַזֶּה עַבְדֶּךָ
וּמִשְׂרֵפַת הָאֵשׁ תַּחֲלִיצֵהוּ כִּי הוּא צָרִיךְ
לְרַחֲמֶיךָ הָרַבִּים וְאַתָּה הַשֵּׁם אֱלֹהֵינוּ טוֹב וְסַלַּח לְכָל
קוֹרְאֶיךָ · בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם גְּדוֹל הָעֵצָה וְרַב
הָעֲלִילִיָּה בְּרַחֲמִים :

(ואחר כך רוחץ את הארכובות ואת השוקים ואת כפות
הרגלים במים אחרים ואומרים)

רַגְלֵי צַדִּיקִים בְּגַן עֵדֶן רְכוּבוֹת כִּי מְקוֹם יְשָׁרִים הוּא
רַגְלֵי חֲסִידָיו יִשְׁמוֹר · בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם הַמַּצְדִּיק
צַדִּיק וְסוֹלֵחַ לַעֲוֹנוֹת חֵטְא עַמּוֹ יִשְׂרָאֵל בְּרַחֲמִים :

(ואחר כך רוחץ פניו של מת ואומר)

פָּנִים בְּפָנִים דִּבֶּר הַשֵּׁם עִמָּכֶם בָּהָר מִתּוֹךְ הָאֵשׁ :
אָנֹכִי עֹמֵד בֵּין הַשֵּׁם וּבֵינֵיכֶם בָּעֵת הַהִיא : יִשָּׂא :
הַשֵּׁם פָּנָיו אֵלֶיךָ וְיָשֵׂם לְךָ שָׁלוֹם :

(וכשרוחץ את פיו אומר)

פֶּה אֶל פֶּה אֲדַבֵּר בּוֹ וּמַרְאֶה וְלֹא בְחִידוֹת

(ומתחיל בקצה אצבעותיו ואומר)

בְּיָדְךָ אַפְקִיד רוּחִי פָּדִיתָה אוֹתִי הַשֵּׁם אֵל אֱמֶת :

(ורוחץ העינים ואומר)

וַיַּרְא רֵאשִׁית לוֹ כִּי־שָׁם חֶלְקַת מְחֹקֵק סָפוּן : עֵינָיו
כְּיוֹנִים עַל־אֲפִיקֵי־מָיִם : בָּרוּךְ אַתָּה הַשֵּׁם הַמֵּאִיר
לִמְתֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל בְּמִדַּת הָרַחֲמִים :

[आणखी हें ह्मणतो.]

हा मेलेला तुझा सेवक याची उल्लंघनें तूं दयेने झांक व लपवून टाक, आणि अग्नीनें जळण्यापासून त्यास मुक्त कर; कारण त्यास तुझ्या दयेचें अगत्य आहे; आणि हे ईश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या हाक मारणारांसीं चांगला व क्षमा करणारा असा आहेस. हे ईश्वरा, दयेनें मोठे संकल्प व समर्थ कर्में करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(मग गुढगे, पाय व पायांचे तळवे दुसऱ्या पाण्यानें धुतानां हें ह्मणावें.)

सात्विकांचे चरण एदेन बागीं चढोत, कारण तें सरळांचें ठिकाण आहे. तो आपल्या भक्तांचे पाय सांभाळतो. हे ईश्वरा, सात्विकांस सात्विक ठरविणाऱ्या, आणि आपल्या इस्राएल लोकांच्या पापाचे अपराध दयेनें क्षमा करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(मग मेलेल्याचें तोंड धुतांना हें ह्मणावें.)

ईश्वर डोंगरावर अग्नींतून तुम्हांसी तोंडोतोंड बोलला; त्यावेळेस मी ईश्वराच्या व तुमच्यामध्यें उभा राहिलों. ईश्वर आपली दृष्टि तुजवर लावो, आणि तुला शांति देवो.

(मुख धुतांना हें ह्मणावें)

मी तोंडोतोंड दर्शन देऊन त्यासीं बोलन जाईन, कूट वाक्याने नाहीं.

(बोटांचे शेवट धुवावयास आरंभ करतांनां हें ह्मणावें)

हे परमेश्वरा, सत्य देवा, त्वां मला उद्धरलें आहे, म्हणून तुझ्या हातीं मी आपला आत्मा सोपितों.

(डोळे धुतानां हें ह्मणावे.)

त्याने आपणांसाठीं प्रथम भाग पाहिला, कीं तेथें नेम कर्त्याचा वांटा राखला होता. त्याचे डोळे जलांच्या ओघांजवळच्या कपोतांचेसे आहेत. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांच्या मनुष्यांस आपल्या दयेच्या गुणानें प्रकाशित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(ורוחץ אפיו ואומר)

אַפֵּךְ כְּמִגְדַּל הַלְּבָנוֹן : בָּרוּךְ הַנּוֹתֵן רַחֲמִים גְּדוֹלִים בְּרוֹב
חֲנִינָיו לְמֵתֵי עַמּוֹ יִשְׂרָאֵל :
(ואח״ך יאמר פסוק זה ז״ פעמים)

וְהָיָה פִּי־רֹאשׁוֹ בְּתוֹכוֹ שָׂפָה יִהְיֶה לְפִיו סָבִיב מַעֲשֵׂה
אֹרֶג כְּפִי תַּחְרָא יִהְיֶה־לּוֹ לֹא יִקָּרַע :
(ואח״כ אומר פסוק זה ז׳ פעמים)

הֵן עַם לְבָדָד יִשְׁכֹּן וּבַגּוֹיִם לֹא יִתְחַשָּׁב :
(כשמסירין מעליו הסדין שרחצו אותו בו אומרים)

וַיַּעַן וַיֹּאמֶר אֶל הָעֹמְדִים לְפָנָיו לֵאמֹר הָסִירוּ הַבְּגָדִים
הַצוֹאִים מֵעָלָיו וַיֹּאמֶר אֵלָיו רְאֵה הֶעֱבַרְתִּי מֵעָלֶיךָ
עֲוֹנֶךָ וְהַלְבֵּשׁ אוֹתְךָ מַחֲלָצוֹת :
(ומשיבין אותו וזורקין על כל גופו מים הרבה ביחד ואומרים)

וְזָרַקְתִּי עֲלֵיכֶם מַיִם טְהוֹרִים וּטְהַרְתֶּם מִכֹּל טֻמְאוֹתֵיכֶם
וּמִכָּל־גִּלּוּלֵיכֶם אֲטַהֵר אֶתְכֶם : וְנֶאֱמַר כִּי בַיּוֹם
הַזֶּה יְכַפֵּר עֲלֵיכֶם לְטַהֵר אֶתְכֶם מִכֹּל חַטֹּאתֵיכֶם לִפְנֵי יְהוָה
תִּטְהָרוּ : וְנֶאֱמַר וְסַר עֲוֹנֶךָ וְחַטָּאתְךָ תְּכֻפָּר :
(ומלבישין אותו החלוק התחתון והמכנסים ואח״ך
החלוק העליון • ואח״ך הציניף ואח״ך מכסין
את ראשו ואת פניו ואחך״ מלבישין אותו
הטלית וכשמלבישין אותו אומרים)

שׂוֹשׂ אָשִׂישׂ בַּיהוָה תָּגֵל נַפְשִׁי בֵּאלֹהַי כִּי הִלְבִּישַׁנִי
בִּגְדֵי יֶשַׁע מְעִיל צְדָקָה יְעָטָנִי כֶּחָתָן יְכַהֵן פְּאֵר
וְכַכַּלָּה תַּעֲדֶה כֵּלֶיהָ : וְאָמַר יָשִׂימוּ צָנִיף טָהוֹר עַל רֹאשׁוֹ

(नाक धुतांना हें म्हणावें.)

तुझें नाक लेबानोनाचे दुर्गासारखें आहे; मोठ्या काकुळतीनें आपल्या इस्राएल लोकांच्या मनुष्यांवर मोठाल्या दया करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(मग हें वाक्य सात वेळां म्हणावें.)

आणि गळ्यांत घालावयास वरील भागीं तोंड असावें; तो (झगा) फाटूं नये म्हणून तोंडा भोवतें विणीव गोट असावा, चिलखताच्या तोंड-सारखा असावा.

(मग हें वाक्य सात वेळां म्हणावें.)

पाहा, ते लोक वेगळे राहतील; राष्ट्रामध्यें त्यांस मोजणार नाहींत.

(जो सरपोस अंगावर घालून त्यास धुतलें, तो काढतांना हें म्हणतात.)

आणि जे त्यासमोर उभे राहिले होते त्यांस त्यानें उत्तर दिलें कीं, तुम्ही त्याच्या आंगांतून तीं मलीन वस्त्रें काढा; मग त्यानें त्याला म्हटलें, पहा, म्या तुझा अन्याय तुजपासून दूर केला आहे. आणि मी तुझ्या आंगांत शुभ्र वस्त्रें घालणार आहे.

(मग त्यास बसला करून एकदांच पुष्कळ पाणी त्याच्या सर्व आंगांवर ओततांना हें म्हणतात.)

आणि मी तुम्हावर स्वच्छ पाणी शिंपीन, मग तुम्ही स्वच्छ व्हाल; मी तुम्हास तुमच्या सर्व विटाळापासून व तुमच्या सर्व मुर्तीपासून निर्मळ करीन. आणि असें म्हटलें आहे कीं, त्याच दिवशीं तुम्हास शुद्ध करावयास तुम्हांविषयीं तो प्रायश्चित करील, तुम्ही आपल्या सर्व पापांपासून परमेश्वरासमोर शुद्ध व्हावें म्हणून. आणि तुझ्या पापाची क्षमा झाली आहे.

(मग पहिल्यानें त्यास आंतला झगा व इजार पांघरवितात. त्यानंतर वरला झगा व त्यानंतर फेटा पांघरवितात, मग त्याचें डोकें तोंड झांकतात व तालिथ पांघरवितात. आणि ती तालिथ पांघरवितांना हें म्हणतात.)

मी परमेश्वराविषयीं फार आनंदेन, माझ्या देवाविषयीं माझा जीव उल्लासेल. कारण त्यानें मला तारणाची वस्त्रें नेसविलीं आहेत, न्यायाच्या झग्यानें मला आच्छादलें आहे, जसा नवरा आपलें बाशिंग सुशोभित करतो व नवरी जशी आपलीं भुषणें लेती तसें. आणि मी म्हणालों, ते त्याच्या डोक्यांत स्वच्छ

וַיָּשִׂימוּ הַצָּנִיף הַטָּהוֹר עַל רֹאשׁוֹ וַיַּלְבִּישֻׁהוּ בְּגָדִים וּמַלְאַךְ
יְהוָה עֹמֵד׃ כִּי כָאָרֶץ תּוֹצִיא צִמְחָהּ וּכְגַנָּה זְרוּעֶיהָ תַּצְמִיחַ
כֵּן אֲדֹנָי יֱהוִה יַצְמִיחַ צְדָקָה וּתְהִלָּה נֶגֶד כָּל הַגּוֹיִם׃
וְנָחֲךָ יְהוָה תָּמִיד וְהִשְׂבִּיעַ בְּצַחֲצָחוֹת נַפְשֶׁךָ וְעַצְמוֹתֶיךָ
יַחֲלִיץ וְהָיִיתָ כְּגַן רָוֶה וּכְמוֹצָא מַיִם אֲשֶׁר לֹא יְכַזְּבוּ מֵימָיו׃

(ונושאין את המת מבית רחיצתו למטתו וקורין)

וּמֹשֶׁה עָלָה אֶל הָאֱלֹהִים וַיִּקְרָא אֵלָיו יְהוָה מִן הָהָר
לֵאמֹר כֹּה תֹאמַר לְבֵית יַעֲקֹב וְתַגִּיד לִבְנֵי יִשְׂרָאֵל׃
אַתֶּם רְאִיתֶם אֲשֶׁר עָשִׂיתִי לְמִצְרַיִם וָאֶשָּׂא אֶתְכֶם עַל כַּנְפֵי
נְשָׁרִים וָאָבִיא אֶתְכֶם אֵלָי׃ וְאַתֶּם תִּהְיוּ לִי מַמְלֶכֶת כֹּהֲנִים
וְגוֹי קָדוֹשׁ אֵלֶּה הַדְּבָרִים אֲשֶׁר תְּדַבֵּר אֶל בְּנֵי יִשְׂרָאֵל׃
וַיְצַוֵּנוּ יְהוָה לַעֲשׂוֹת אֶת כָּל הַחֻקִּים הָאֵלֶּה לְיִרְאָה אֶת יְהוָה
אֱלֹהֵינוּ לְטוֹב לָנוּ כָּל הַיָּמִים לְחַיּוֹתֵנוּ כְּהַיּוֹם הַזֶּה׃ וְאַתֶּם
הַדְּבֵקִים בַּיהוָה אֱלֹהֵיכֶם חַיִּים כֻּלְּכֶם הַיּוֹם׃ לֹא אָמוּת כִּי
אֶחְיֶה וַאֲסַפֵּר מַעֲשֵׂה יָהּ׃

הַנְשָׁמָה לְךָ וְהַגּוּף פָּעָלֶךָ · צוּר עָשֶׂר אֵין דּוֹמֶה לָךְ ·
חוּסָה עַל עֲמָלֶךָ׃

שְׁמַר עָלַי בְּעֵרִים וְקִנְיָן · לְשַׁלֵּם מָחֳרַת הַמְּנָיָן · וְהָיָה
יְהוָה לְרָיָן׃ אֲזַי בְּחָשְׁבִי מֶרְחוֹק · בָּכִיתִי לִבְלִי
חֹק · עֵת לִבְכּוֹת וְעֵת לִשְׂחוֹק׃ נָפְלָה עָלַי חֲרָדָה ·
בְּזִכְרִי יוֹם הַקַּפְדָּה · פַּחַד קָרָאנִי וּרְעָדָה׃ יַעַן בְּשִׁרְיוֹת
לְבָבִי · דָּאֲגָתִי בְּמַחֲשָׁבִי · כִּי אֵיךְ אֶעֱלֶה אֶל־אָבִי׃
(הנשמה) שׁוּר לְמִי רַב זְרוֹנֵהוּ · לְיוֹם יְבַקֵּשׁ עַוֹנֵהוּ ·
וְחִשַּׁב עִם קוֹנֵהוּ׃ לְיוֹם לֹא יִשָּׂא פְּנֵי שָׂר · בְּהִתְנַגֵּשׁ

सुंदर पागोटें घालोत. मग त्यांनीं स्वच्छ सुंदर पागोटें त्याच्या डोक्यास घातलें, आणि वस्त्रें त्याच्या अंगावर घातलीं, आणि परमेश्वराचा दूत जवळ उभा राहिला होता. तर जशी भुमी आपला कोंब निघे असें करिते, आणि जसा मळा आपले पेरलेले पदार्थ उगवत असें करिते, तसा परमेश्वर सर्व राष्ट्रांच्या देखतां न्याय व प्रशंसा उगवत असें करील. आणि परमेश्वर तुला सर्वदा सांभाळील व रुक्षस्थानांत तुझ्या जीवास तृप्त करील, व तुझीं हाडें बळावत करील, तेव्हां तूं शिंपलेल्या मळया: सारखा व ज्या झऱ्यांचीं जलें आटत नाहींत त्यासारखा होशील.

(जेव्हां प्रेतास धुण्याच्या कोठडींतून पुनः त्याचे खाटेवर आणितात तेव्हां हें म्हणतात.)

तेव्हां मोशे देवाजवळ डोंगरावर चढला, आणि परमेश्वरानें डोंगरावरून त्याला हाक मारून म्हटलें, याआकोबाचे घराण्यासीं बोलून इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं, जे म्या मिसऱ्यांस केलें तें, आणि म्या तुम्हास गरुडांच्या पंखांवर उचलून घेऊन माझ्या जवळ आणलें हें तुम्ही पाहिलें आहे. आणि तुम्ही याजकांचें राज्य व पवित्र राष्ट्र असे मला व्हाल; ज्या गोष्टी तूं इस्राएलांच्या संतानास सांगाव्या त्या ह्याच आहेत. आणि सर्वकाळ आमचे हीत व्हावें; याचप्रमाणें त्यानें आम्हांस वांचवावें, म्हणून आम्ही हे सर्व नेम पाळून आमचा देव परमेश्वर याचें भय धरावें, अशी आज्ञा परमेश्वरानें आम्हास दिली आहे. आणि जें तुम्ही तुमचा देव परमेश्वर यास लगटून राहिला, ते तुम्ही सर्व आजपर्यंत जिवंत आहां. मी मरणार नाहीं, तर वांचेन आणि परमेश्वराची कर्में कथीन.

हे खडकरूप आश्रया ! तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर.

उद्या जेव्हां परमेश्वर न्यायाधीश होईल, तेव्हां मजवर साक्षीनिशी निघालेल्या (कर्ज) रोख्याची फेड करणें आहे; परंतु जेव्हां (त्याविषयीं) मी दुरून विचार केला, तेव्हां मी अतिशय रडलो; कारण रडण्याची वेळ आहे, आणि हासण्याचीहि वेळ आहे; जेव्हां न्यायाचा दिवस मला आठवला, तेव्हां मला कंप सुटला, भय आणि त्रास यांनी मला व्यापिलें; यास्तव मी आपल्या हृदयाच्या हट्टामुळें आपल्या मनीं खेद पावलों, कीं मी आपल्या बाबाकडे कसा चढेन ? ज्याचे अपराध पुष्कळ आहेत, ज्याच्या पापाची झडती त्या दिवशीं होईल, आणि ज्यास आपल्या धन्यास हिशेब द्यावा लागेल, त्याजकडे पाहा; त्या दिवशीं जेव्हां तो (देव) शरीरासहित आत्म्यास शासन करण्यास येईल, तेव्हां तो सरदाराचीहि

לַמּוּסָר · הַנֶּפֶשׁ עִם הַבָּשָׂר : מִשְׁפְּטֵיהֶם וְדִינֵיהֶם · עַד הָאֵל
אֲדֹנֵיהֶם · יָבֹא דְבַר שְׁנֵיהֶם : הַנֶּפֶשׁ תְּמַהֵר תְּשׁוּבָה · אֵין
עָלַי חַטָּאת כְּתוּבָה · צָדְקָה נַפְשָׁהּ מְשׁוּבָה : (הנשמה)
הַדְפֵּנִי וְעָזְבֵנִי · הַלָּרִיב תַּצִּיבֵנִי · הוֹדִיעֵנִי עַל מַה תְּרִיבֵנִי :
קְדוֹשִׁי לֹא אֲהֵבָנִי · כִּי בְּמַסְגֵּר הֱבִיאָנִי · בְּמַחֲשַׁכִּים
הוֹשִׁיבַנִי : טֶנֶף גּוּף טוֹרַחַת · וּמִנְּבֵלָה סוֹרַחַת · אָנֹכִי
בּוֹרַחַת : נִלְאֵתִי מְאֹד כַלְכֵּל · כִּי הַגּוּף הַנּוֹכֵל · הִשִּׁיאֲנִי
וָאוֹכֵל : (הנשמה) בְּכָל חֵטְא יִתְגַּלֵּעַ · וְאוֹתִי לְכַף קוֹלֵעַ ·
לֹא הֵשִׁיב יָדוֹ מִבַּלֵּעַ : חֶעֱצָנִי הֱנִיאָנִי · וְלַשַּׁחַת קְרָאָנִי ·
אַךְ עַתָּה הֶלְאָנִי : בְּכָל תַּאֲוָה הוּא נֶאֱסָר · וּמִמַּאֲכָל
וּמַשְׁקֶה לֹא סָר · וּבֶטֶן רְשָׁעִים תָּחְסָר : יָגוּף לְטַמֵּא
עַצְמוֹ · יַעַן כִּי הוּא כִשְׁמוֹ · נָבָל הוּא וּנְבָלָה עִמּוֹ :
(הנשמה) יְצוּרֵנִי פּוֹתֵעַ · וְהוּא בְתִתּוֹ מַלְתֵּעַ · וְהָיִיתִי
בְּעֵינָיו כִּמְתַעְתֵּעַ : הֵן חֶטְאוֹ לֹא יְסֻפַּר · לָכֵן יוּכְלָם
וְיוּחְפָּר · כְּדֵי רִשְׁעָתוֹ בְמִסְפָּר : וּמִמֶּנִּי אַל תִּפְרַע · וּמוּסָר
גֵּו אַל תִּגְרַע · כִּי כֻלּוֹ חָנֵף מֵרַע : דִּבֵּר הַגּוּף לְהִוָּשַׁע ·
חֲדַל מִמֶּנִּי וְהָשַׁע · זָךְ אֲנִי בְּלִי פֶשַׁע : הֵן כָּאֶבֶן מַעֲמָסוֹת ·
אֲנִי מָלֵא בוּז וְקַלָּסוֹת · וּמַה יָכֹלְתִּי עֲשׂוֹת : (הנשמה)
גַּם אֲנִי נִשְׁכַּל שָׁכוֹל · דּוֹמֶה לְעֵץ הָאֶשְׁכּוֹל · אֲשֶׁר לֹא
יִצְלַח לַכֹּל : בְּלִי נֶפֶשׁ אֶחָשֵׁב · כְּבַיִת מִבְּלִי יוֹשֵׁב · וְאֵין
עוֹנֶה וְאֵין קָשֶׁב : יַעַן אַשְׁכִּים וְאַמִּישׁ · מֻשְׁלָךְ כְּמוֹ חַלָּמִישׁ ·
מִמְּקוֹמוֹ לֹא יָמִישׁ : רְאֵה הַפְּקוּדָה כֻּלָּה · עַל נֶפֶשׁ
וּמַעֲלָלָהּ · שִׁלְּמוּ לָהּ מִפְעָלָהּ : וּשְׂאִי נַפְשִׁי מֶרְיֵךְ ·
וְאִכְלִי אֶת פִּרְיֵךְ · וְשַׁלְּמִי אֶת נִשְׁיֵךְ : לְכָל רַע לֹא

तोंड ओळख धरणार नाहीं; त्या दोघांचा न्याय व वाद देव त्यांचा स्वामी याजकडे येईल; आत्म्यानें त्वरेनें उत्तर केलें कीं, मजवर कांहींच पाप लिहिलेलें नाहीं, याप्रमाणें त्यानें आपल्या फिरण्याविषयीं आपणास न्यायी दाखविलें. मला जाऊं दे, मला सोड, मजशीं वाद करावयास मला थांबवितोस काय ? तूं मजशीं कां वाद करितोस हें मला कळीव; माझा पवित्र मजवर प्रीती करीत नाहीं, कारण त्यानें मला बेड्या घालून आणून अंधार (कोठडींत) घातलें आहे; अमंगल देह मला त्रास देतो, त्या कुजट प्रेतापासून मी पळत आहे, मी थकलों व अतिशय जर्जर झालों; कारण त्या ठक देहानें मला ठकविलें म्हणून मी खाल्लें (पाप केलें.) सर्व प्रकारच्या पापांत तो निमग्न आहे, जसा गोफणीत धोंडा फिरवितात तसा तो मला फिरवितो, अनर्थ करण्यापासून तो आपला हात आवरीत नाहीं; त्याने मला मसलत देवून थांबविलें, आणि नाशाप्रत पोहोंचाविलें, निश्चयें, आतां त्यानें मला म्लान केलें; सर्व प्रकारच्या लोभांत तो गुंतला आहे, खाण्यापिण्यापासून तो वळत नाहीं, असो, परंतु दुष्टाचें पोट रितें राहील; तो आपल्या स्वतःस विटाळावयास लपून राहतो, कारण तो आपल्या नावाप्रमाणें आहे, म्हणजे तो मूर्ख असून त्याजबरोबरहि मूर्खत्व आहे. क्षणांत तो मला फांसांत धरून आपल्या दांतां खालीं धरितो, मी त्याच्या दिसण्यांत ठकविणाऱ्या प्रमाणें आहे; पहा, त्याचीं पापें अवर्णनीय आहेत, यास्तव आपल्या दुष्टाईच्या परिणामाप्रमाणें तो लाजतो व संकोचित होतो; त्याचा सूड मजवर उगवूं नको, आणि देहाची शिक्षा उणी करूं नको, कारण तो पूर्ण ढोंगी व दुष्कर्मी आहे. तेव्हां देह आपला बचाव करण्यासाठीं म्हणाला, मला सोड, मला असूं दे, मी शुद्ध व निष्पाप आहे; पहा, (मजवर) दगडाप्रमाणें ओझीं आहेत. मी लाजेनें व धिक्कारानें भरलों आहे, तर मी काय करूं शकेन ? निश्चयें मी निष्फलहि आहें, जी द्राक्षाची डाहाळी कांहींच फल देत नाहीं तिजसारिखा मी आहे; जीव नसल्यास, ज्या घरांत कोणी राहणारा, उत्तर देणारा किंवा ऐकणारा नसतो, त्या सारिखा मी आपल्या स्वतःस मानितो; यास्तव सकाळपासून संध्याकाळपर्यंत जो आपल्या जागेवरून हालत नाहीं, त्या दगडा प्रमाणें मी टाकलेला आहे; पहा, सर्व झडती जीवावर व त्याच्या दुष्ट कृत्यांवर आहे, त्याच्या कर्मा प्रमाणें तूं त्याची फेड कर; हे माझ्या जीवा, तुझ्या फितुरीचें दुःख तूंच सोस, आपलें फल खा, आणि आपलें ऋण फेड. सर्व (कोणत्याहि) वाईटाकरितां मी तान्हेला नव्हतो,

צָמֵאתִי · אֲבָל אֲנִי בָּךְ נִדְמֵיתִי · אֵיךְ תֹּאמְרִי לֹא נִטְמֵאתִי :
(הנשמה) מַחְשְׁבוֹתֵיךְ הֵבִינוּ · וְיָדֵיךְ הֵכִינוּ · וְנַחֲנוּ מַה
כִּי תַלִּינוּ : אֲמֵלִים אֲשֶׁר רָגְשׁוּ · וְצָרֵק לֹא פָגְשׁוּ · אֶחָד
בְּאֶחָד יָגְשׁוּ : לֵב דּוֹרֵשׁ וּמַעֲבָדָיו · יַחְבִּיר שְׁנֵיהֶם עֵדָיו ·
וּבָעֲרוּ שְׁנֵיהֶם יַחְדָּיו : קִלְקוּל עָוֹנָם יוֹסֵר · וְלֹא יִכְבַּד
הַמּוֹסָר · בְּשַׁגָּם הוּא בָשָׂר : יָחִיד שְׁרִירוּת יַחְמוֹד · אִם
כְּפָעָלוֹ תָּמוֹד · יֵי מִי יַעֲמֹד : חֲשׁוֹךְ זָעַם אִמָּתֵךְ · וְאַל
תִּיסַּר בַּחֲמָתֵךְ · וְיַנָּפֵשׁ בֵּן אֲמָתֵךְ : קָרֵב נָא לְהַרְוִיחֵנִי ·
וְיוֹם לָדִין תְּקָחֵנִי · אַל בְּאַפְּךָ תוֹכִיחֵנִי :
יָהּ שְׁמַע אֶבְיוֹנֶךָ · הַמְחַלִּים פָּנֶיךָ · אָבִינוּ לְבָנֶיךָ · אַל
תַּעְלֵם אָזְנֶךָ : (יה) יָהּ עַם מְמַעֲמָקִים · יִקְרָאוּ מֵרוֹב
מְצוּקִים · אַל נָא תְּשִׁיבֵם רֵקִים · הַיּוֹם מִלְּפָנֶיךָ : (יה)
הַוּוֹתָם וַעֲוֹנָם · מְחֵה וְרֹבִי זְרוֹנָם · אִם לֹא תַּעֲשֶׂה לְמַעֲנָם ·
עֲשֵׂה צוּרִי לְמַעֲנֶךָ : (יה) וּמְחֵה הַיּוֹם חוֹבָם · וּרְצֵה כְּמוֹ
שַׁי נִיבָם · וּלְךָ תָּכִין לִבָּם · וְגַם תַּקְשִׁיב אָזְנֶךָ : (יה)
דִּמְעַת פְּנֵיהֶם תִּשְׁעֶה · וְחֶאֱסֹף עֵדֶר תּוֹעֶה · וְחָקִים לֶךְ
רוֹעֶה · וּפְקוֹד בְּטוּב צֹאנֶךָ : (יה) הוֹלְכֵי בְּדַרְכֶךָ נְכוֹחָה ·
תְּבַשְּׂרֵם הַיּוֹם סְלִיחָה · וּבְתִפְלַת הַפְּלִיטָה · הַמְצִיאֵם
חָנֶךָ : (יה)
(וכמשימין אותו בארון אומרים ג׳ פעמים)
וְלֹא יָבוֹאוּ לִרְאוֹת כְּבַלַּע אֶת הַקֹּדֶשׁ וָמֵתוּ :
(ואחר שכמו הארון אומרים)
הִנֵּה מִטָּתוֹ שֶׁלִּשְׁלֹמֹה שִׁשִּׁים גִּבֹּרִים סָבִיב לָהּ מִגִּבֹּרֵי
יִשְׂרָאֵל : כֻּלָּם אֲחֻזֵי חֶרֶב מְלֻמְּדֵי מִלְחָמָה אִישׁ

तुजमध्यें मी अगदी मुका होतो, मग मी विटाळलो नाहीं, असे तूं (आपणाविषयीं) कसें म्हणतोस ? तुझे विचार (देवास) कळले आहेत, आणि तुझ्याच हातानें सर्व केलें आहे; मग मी काय कीं तूं मजवर कुरकुर करतोस ?* ते (उभयतां) गलबल करून थकले, परंतु त्यांस यथार्थता सांपडली नाहीं, शेवटीं ते एक प्रत्येकास जडले. मग विचार करणारें मन व त्याचीं कृत्यें एकमताचीं होऊन हे दोघे साक्ष झाल्यावर, ते दोघे ‡ एकदाच स्तब्ध राहिले; परंतु त्यांच्या दोषांचा अनर्थ दूर होवो, आणि त्यांची शिक्षा भारी न होवो, कारण निश्चये तो मांसमय आहे; एकाद्यानें हट्टाची आवड धरली म्हणून हे दयावंता, जर तूं त्याच्या कर्माप्रमाणें, (त्याच्या पदरीं) मोजून देशील, तर (तुजपुढें) कोण उभा राहिल ? तूं आपला पेटलेला क्रोध शांत कर, आपल्या रागानें शिक्षा करूं नको; परंतु आपल्या दासीच्या पुत्रास विसावा दे; आतां मला मुक्ति व्हावी म्हणून आपणाजवळ घे, आणि ज्या दिवशीं तूं मला न्यायांत आणशील, तेव्हां तूं आपल्या रागानें मला धमकावूं नको.

हे अनंता, तुझ्या मुखदर्शनाची वाट पाहणाऱ्या दरिद्र्यांचें ऐक; हे आमच्या बापा, तूं आपल्या लेकरांपासून आपला कान लपवूं नको. हे अनंता ! जे लोक अत्यंत दुःखामुळें खोल स्थानांतून ओरडतात, त्यांस आज तूं आपणापुढून रिकामे परतवूं नको; त्यांची दुष्टाई, त्यांची पापें आणि त्यांचा अतिशय गर्व तूं पुसून टाक. आणि हे माझ्या खडकरूप आश्रया ! जर तूं त्यांकरितां तसें करीत नाहींस तर तूं आपणाकरितां तसें कर. त्यांची ऋणें आज पुसून टाक, आणि त्यांच्या (तोंडच्या) वचनास (तुजपुढें आणलेल्या) भेटीप्रमाणें प्रसन्न हो; त्यांचीं मनें तूं आपणाकडे वळीव आणि (त्यांकडे) आपला कानहि लाव. त्यांच्या तोंडावरील अश्रूं तूं पुसून टाक आणि बहकलेलीं मेंढरें एकवट करून तूं आपणाकरितां मेंढपाळ $ उठीव; आणि चांगुलपणानें आपल्या शेरडांस दर्शन दे. सरळ मार्गानें चालणारांस तूं क्षमेचें शुभवर्तमान ऐकीव; आणि ही क्षमेसाठीं प्रार्थना करितांना त्यांस तुझी कृपा सांपडूं दे.

(त्यास डोल्हाऱ्यांत ठेवतांना हें म्हणतात.)

परंतु पवित्र वस्तु झांकतांना त्यांनीं पाहावयास येऊं नये, आले तर मरतील.

(डोल्हारा झांकताना हें म्हणतात.)

पाहा, त्याचा पलंग जो शेलोमोचा आहे, त्या भोवतें इस्राएलाच्या वीरांतले साठ वीर असतात; ते सर्व तरवार धरणारे लढावयास शिकलेले आहेत.

---

* इ. आम्ही काय कीं तुम्ही आम्हावर कुरकुर करिता. ‡ देह व जीव. $ माशीयाह.

חַרְבוֹ עַל יֶרְכוֹ מְפֻאַד בַּלֵּילוֹת : וְבָרֶכְךָ יְהוָה וְיִשְׁמְרֶךָ :
יָאֵר יְהוָה פָּנָיו אֵלֶיךָ וִיחֻנֶּךָּ : יִשָּׂא יְהוָה פָּנָיו אֵלֶיךָ
וְיָשֵׂם לְךָ שָׁלוֹם : יֵלְכוּ וְנִקְוֹתָיו וְיהִי בַּגַּת הוֹדוֹ וְרִיחַ
לוֹ בַּלְּבָנוֹן : רָאִיתִי וְהִנֵּה מְנוֹרַת זָהָב כֻּלָּהּ וְגֻלָּהּ עַל־
רֹאשָׁהּ וְשִׁבְעָה נֵרֹתֶיהָ עָלֶיהָ שִׁבְעָה וְשִׁבְעָה מוּצָקוֹת
לַנֵּרוֹת אֲשֶׁר עַל־רֹאשָׁהּ : וּשְׁנַיִם זֵיתִים עָלֶיהָ אֶחָד
מִימִין הַגֻּלָּה וְאֶחָד עַל־שְׂמֹאלָהּ :
(וכשנושאין אותו אומרים)

וּבִנְסֹעַ הַמִּשְׁכָּן יוֹרִידוּ אוֹתוֹ הַלְוִיִּם וַהֲקִמֹת הַמִּשְׁכָּן
יָקִימוּ אֹתוֹ הַלְוִיִּם וְזָר הַקָּרֵב יוּמָת : וַיְהִי
בִּנְסֹעַ הָאָרֹן וַיֹּאמֶר מֹשֶׁה קוּמָה יְהוָה וְיָפֻצוּ אוֹיְבֶיךָ וְיָנֻסוּ
מְשַׂנְאֶיךָ מִפָּנֶיךָ : כִּי מַלְאָכָיו יְצַוֶּה־לָּךְ לִשְׁמָרְךָ בְּכָל־
דְּרָכֶיךָ : עַל־כַּפַּיִם יִשָּׂאוּנְךָ פֶּן־תִּגֹּף בָּאֶבֶן רַגְלֶךָ : לֹא־
תְאֻנֶּה אֵלֶיךָ רָעָה וְנֶגַע לֹא־יִקְרַב בְּאָהֳלֶךָ : יְדֹוָה אִישׁ
מִלְחָמָה יְהוָה שְׁמוֹ : יְהוָה יִלָּחֶם לָכֶם וְאַתֶּם תַּחֲרִישׁוּן :
(הקפות שעושין למת קודם שיקבר לאיש ולא לאשה)
א רַחֵם נָא עָלָיו אֵל אֱלֹהִים חַיִּים · וּמֶלֶךְ עוֹלָם · כִּי
עִמְּךָ מְקוֹר חַיִּים · וְהָמִיד יְרַחֵל בְּצַרְצוֹת הַחַיִּים ·
וְתָנוּחַ נַפְשׁוֹ בִּצְרוֹר הַחַיִּים : (ותנוח)
ב חַנּוּן בְּרוֹב רַחֲמָיו יְכַפֵּר אֶת־עֲוֹנָיו · וּמַעֲשָׂיו
הַטּוֹבִים יִהְיוּ לְנֶגֶד עֵינָיו · וְיִהְיֶה לְעֶמְתּוֹ עִם כָּל־
נֶאֱמָנָיו · וְיִתְהַלֵּךְ לְפָנָיו בְּצַרְצוֹת הַחַיִּים : (ותנוח)
ג זְכָרוֹן טוֹב יִהְיֶה לוֹ לִפְנֵי צוּרוֹ · לְהַנְחִיל חַיִל יוֹצְרוֹ
לְהַגִּיהַּ אוֹרוֹ · לַקָּיֵם הֶזְיוֹנוֹ וְהֶגְיוֹן מַצְמָרוֹ · כִּי בְרִיתִי
הָיְתָה אִתּוֹ הַשָּׁלוֹם וְהַחַיִּים : (ותנוח)

रात्रीच्या भयामुळें प्रत्येकाची तरवार त्याच्या मांडीस असते. परमेश्वर तुला आशीर्वाद देवो. आणि तुझें रक्षण करो. परमेश्वर आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडो; आणि तुजवर कृपा करो. परमेश्वर आपली दृष्टी तुजवर लावो, आणि तुला शांति देवो. त्याच्या फांद्या पसरतील आणि त्याची शोभा जाईच्या झाडा सारखी व त्याचा सुवास लबानोना सारखा होईल. म्या पाहिलें आहे व पाहा सुवर्णमय समई व तिचा कटोरा तिच्या शिरावर आहे, आणि तिजवरती. तिचीं सात चाडीं आहेत आणि जीं सात चाडीं तिच्या शिरावरतीं आहेत, त्यांस सात नळ्या आहेत; आणि तिच्या जवळ दोन जाईत झाडे आहेत, एक कटोऱ्याच्या उजव्या बाजूस, एक त्याच्या डाव्या बाजूस.

(त्यास उचलतांना हें ह्मणतात.)

आणि मंडप पुढें न्यावयाचा तेव्हां लेव्यानीं तो खालीं काढावा, आणि मंडप घालावयाचा तेव्हां लेव्यानीं तो उभारावा, आणि कोणी परका जवळ आला तर त्याला जिवें मारावें. आणि कोश निघे तेव्हां असे होई की, मोशे ह्मणे, हे परमेश्वरा, ऊठ,तुझ्या शत्रुंची दाणादाण होवो. आणि तुझें द्वेषी तुजपुढून पळोत. कारण तुझ्या सर्व मार्गांत तुला राखावयास तो आपल्या दूतांस आज्ञा देईल. धोंड्याशीं तुझ्या पायाला ठेंच लागूं नये. ह्मणून ते आपल्या हातानें उचलून धरतील. अरिष्ट तुजजवळ येणार नाहीं व उपद्रव तुझ्या वस्तीस लागणार नाहीं. परमेश्वर रणवीर आहे; त्याचें नाम परमेश्वर. परमेश्वर तुम्हासाठीं लढाई करील; आणि तुम्ही उगेच राहाल.

(पुरूषाचें प्रेत पुरल्या अगोदर त्या भोवतें प्रदक्षणा घालतांना हें पुढील ह्मणतात. [स्त्री असल्यास असें करीत नाहींत.])

१. हे ईश्वरा, जीवनाच्या देवा, जगताच्या राजा, आतां त्याजवर दया कर; कारण तुजजवळ जीवनाचा उगम आहे, जीवंतांच्या भुमींत तो सदा राहो.* आणि जीवंतांच्या जुटींत त्याचा जीव विश्रांति पावो.

२. कृपावंत आपल्या पुष्कळ दयेनें त्याचा अपराध क्षमा करो, सत्कर्में त्याच्या दृष्टी-समोर असोत, आणि विश्वासू जनासंगती तो त्या समोर असो, आणि तो त्या समोर जीवंतांच्या भुमीवर राहो.

३. त्याने आपल्या घडणाराच्या संपत्तिचें वतन पावावें आणि त्याचा प्रकाश चमकावा आणि त्याचा दृष्टांत त्याचे वजनाचें ध्यान स्थापित व्हावे, म्हणून त्याच्या खडकरूप आश्रया पुढें चांगल्या विषयीं त्याची आठवण होवो; कारण त्यासीं त्याचा शांतीचा व जीवनाचा करार आहे.

---

* इ. चालो.

ד שַׁעֲרֵי שָׁעַיִם תִּמְצָא נִפְתָּחִים · וְעִיר שָׁלוֹם תֶּחֱזֶה
וּמִשְׁכְּנוֹת מִבְטָחִים · וּמַלְאֲכֵי הַשָּׁלוֹם לִקְרָאתְךָ שְׂמֵחִים ·
וְכֹהֵן הַגָּדוֹל לְקַבֶּלְךָ יַעֲמוֹד · וְאַתָּה לֵךְ לַקֵּץ וְתָנוּחַ
וְתַעֲמוֹד : (ותנוח)

ה נִשְׁמָתְךָ תֵּלֵךְ לִמְעָרַת הַמַּכְפֵּלָה · וּמִשָּׁם לַכְּרוּבִים שָׁם
אֵל יִרְעֶה לָהּ · וְשָׁם פְּנֵקֶס תְּקַבֵּל לְנַן עֵרֶן שְׁבִילָהּ ·
וְשָׁם תֶּחֱזֶה עַמּוּד מָשׁוּךְ מִלְמַעְלָה · וְשָׁם תַּעֲלֶה לַמָּרוֹם
וְלֹא בַחוּץ תַּעְמוֹד·וְאַתָּה לֵךְ לַקֵּץ וְתָנוּחַ וְתַעֲמוֹד: (ותנוח)

ו שַׁעֲרֵי הַמִּקְדָּשׁ יִפְתַּח מִיכָאֵל · וְיַקְרִיב נִשְׁמָתְךָ לְקָרְבָּן
לְפָנֵי אֵל · וְיִתְחַבֵּר עִמְּךָ הַמַּלְאָךְ הַגּוֹאֵל · עַד שַׁעֲרֵי
עַרָבוֹת אֲשֶׁר שָׁם יִשְׂרָאֵל · בְּנוֹעַם מְקוֹם זֶה תִּהְיֶה
זוֹכֶה לַעֲמוֹד · וְאַתָּה לֵךְ לַקֵּץ וְתָנוּחַ וְתַעֲמוֹד : (ותנוח)

ז תְּהִי נַפְשְׁךָ צְרוּרָה בִּצְרוֹר הַחַיִּים · עִם רָאשֵׁי יְשִׁיבוֹת
וְרָאשֵׁי גָלְיוֹת · עִם יִשְׂרָאֵלִים וְכֹהֲנִים וּלְוִיִּם · וְעִם
שֶׁבַע כִּיתוֹת שֶׁל צַדִּיקִים וַחֲסִידִים · וּבְנַן עֵדֶן תָּנוּחַ
וְתַעֲמוֹד · וְאַתָּה לֵךְ לַקֵּץ וְתָנוּחַ וְתַעֲמוֹד : (ותנוח)

צדוק הדין

צַדִּיק אַתָּה יְהוָה וְיָשָׁר מִשְׁפָּטֶיךָ : צַדִּיק יְהוָה בְּכָל דְּרָכָיו
וְחָסִיד בְּכָל מַעֲשָׂיו: צְדָקָתְךָ צֶדֶק לְעוֹלָם וְתוֹרָתְךָ
אֱמֶת : מִשְׁפְּטֵי יְהוָה אֱמֶת צָדְקוּ יַחְדָּיו : בַּאֲשֶׁר דִּבֶּר מֶלֶךְ
שְׁלֹמוֹן וּמִי יְאמַר־לוֹ מַה תַּעֲשֶׂה : וְהוּא בְּאֶחָד וּמִי יְשִׁיבֶנּוּ
וְנַפְשׁוֹ אִוְּתָה וַיַּעַשׂ : קָטוֹן וְגָדוֹל שָׁם הוּא וְעֶבֶד חָפְשִׁי
מֵאֲדוֹנָיו : הֵן בַּעֲבָדָיו לֹא יַאֲמִין וּבְמַלְאָכָיו יָשִׂים תְּהִלָּה :
אַף כִּי אֱנוֹשׁ רִמָּה וּבֶן אָדָם תּוֹלֵעָה : הַצּוּר תָּמִים פָּעֳלוֹ

४. आकाशाचे दरवाजे तुजकरितां उघडले जावोत; शांतिचे नगर आणि निर्भय वस्तीस्थान तूं पाहा, आणि शांतीचे दूत तुला भेटावयास हर्षाने येवोत, तुझा अंगिकार करण्यास मुख्य याजक* उभा असो. आणि अंता पावेतों तूं जा, आणि विश्रांति पाव, आणि (दिवसाच्या अंतास तूं आपला विभाग पावायास) उभा राहा.

५. तुझा आत्मा मखपेला गुहेस जावो, ‡ आणि तेथून केरूबीम दूतांकडे जावो ईश्वर तेथें त्याचें मेढवलन करो, आणि तेथें त्यास एदेन बागाच्या मार्गी लागण्याचा पट मिळो, तेथें तूं वरून निघालेला खांब पहा, व तेथें तूं वर चाड, आणि बाहेर उभा राहूं नको; आणि अंता पावेतों तूं जा, आणि विश्रांति पाव, आणि (दिवसांच्या अंतास तूं आपला विभाग पावायास) उभा राहा.

६. मीखएल दूत तुजकरितां पवित्र स्थानाची द्वारें उघडो, आणि ईश्वरापुढें तुझा आत्मा होमासारिखा अर्पण करो, खंडून घेणारा दूत तुज बरोबर जेथें इस्राएल असतात तेथें आकाशाच्या दारापर्यंत संगतीस असो, या ठिकाणच्या रमणीय भागीं राहाण्याची पुण्याई तुझे अंगी असो, आणि अंता पावेतों तूं जा, आणि विश्रांति पाव, आणि (दिवसांच्या अंतास तूं आपला विभाग पावायास) उभा राहा.

७. तुझा जीव जिवंतांच्या जुटींत, पाठशाळांच्या मुख्य गुरूच्या, पाडावपणांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या, इस्राएलाच्या, कोहेनांच्या, लेव्यांच्या बरोबर आणि सात्विकांच्या धार्मिकांच्या सात पंक्ति बरोबर बांधलेला असो. आणि एदेन बागीं तूं विश्रांति पाऊन उभा राहा. आणि अंतापावेतों तूं जा, आणि विश्रांति पाव, आणि (दिवसांच्या अंतास तूं आपला विभाग पावायास) उभा राहा.

ईश्वरी न्यायाची यथार्थता दर्शविणें.

हे परमेश्वरा, तूं नीतिमान आहेस आणि तुझे न्याय यथार्थ आहेत. परमेश्वर आपल्या सर्व मार्गांत न्यायी व आपल्या सर्व कार्यांत दयाळू आहे. तुझे न्यायीपण सर्व काळचें न्यायीपण आहे; आणि तुझें शास्त्र सत्यच आहे. परमेश्वराचे न्याय सत्य आहेत, ते सर्वथा नीतिवंत आहेत. जेथें राजाचें वचन आहे, तेथें सामर्थ्य आहे, तूं काय करतोस असें त्यास कोण म्हणेल ? आणि त्याचा संकल्प एकच आहे, तर त्याला कोण फिरवील ? आणि त्याच्या जिवानें इच्छिलें तेंच तो करितो. लहान थोर तेथें आहेत, आणि दास आपल्या धन्यापासून मुक्त आहे. पाहा तो आपल्या सेवकावर विश्वासत नाहीं, आणि आपल्या दूतांस मुर्खपण लावतो; तर मनुष्य जो किडा व मनुष्य संतान जो कृमि तो स्वच्छ कसा निघेल ? जो खडकरूप आश्रय, त्याचे काम पूर्ण आहे; का कीं त्याचे सर्व

---

* पुढील भाग ६ मध्यें लिहिलेल्या प्रमाणें मिखाएल दूत.

‡ जेथें अब्राहाम, इसहाक, याआकोब, सारा, रिबका व लेआ पूरली आहेत तेथें.

כִּי כָל־דְּרָכָיו מִשְׁפָּט · אֵל אֱמוּנָה וְאֵין עָוֶל צַדִּיק וְיָשָׁר
הוּא: דַּיָּן הָאֱמֶת · שׁוֹפֵט צֶדֶק וֶאֱמֶת · בָּרוּךְ דַּיָּן הָאֱמֶת ·
כִּי כָל־מִשְׁפָּטָיו צֶדֶק וֶאֱמֶת:

השכבה לאיש

(לאדם גדול אומרים קודם ההשכבה: פסוקים אלו)

וְהַחָכְמָה מֵאַיִן תִּמָּצֵא וְאֵיזֶה מְקוֹם בִּינָה: אַשְׁרֵי אָדָם
מָצָא חָכְמָה וְאָדָם יָפִיק תְּבוּנָה: מָה רַב טוּבְךָ
אֲשֶׁר צָפַנְתָּ לִירֵאֶיךָ פָּעַלְתָּ לַחוֹסִים בָּךְ נֶגֶד בְּנֵי אָדָם:
מַה יָּקָר חַסְדְּךָ אֱלֹהִים וּבְנֵי אָדָם בְּצֵל כְּנָפֶיךָ יֶחֱסָיוּן
יִרְוְיוּן מִדֶּשֶׁן בֵּיתֶךָ וְנַחַל עֲדָנֶיךָ תַּשְׁקֵם:

טוֹב שֵׁם מִשֶּׁמֶן טוֹב וְיוֹם הַמָּוֶת מִיּוֹם הִוָּלְדוֹ: סוֹף
דָּבָר הַכֹּל נִשְׁמַע אֶת הָאֱלֹהִים יְרָא וְאֶת מִצְוֹתָיו
שְׁמוֹר כִּי זֶה כָּל־הָאָדָם: יַעְלְזוּ חֲסִידִים בְּכָבוֹד יְרַנְּנוּ
עַל מִשְׁכְּבוֹתָם:

מְנוּחָה נְכוֹנָה בִּישִׁיבָה עֶלְיוֹנָה · תַּחַת כַּנְפֵי הַשְּׁכִינָה ·
בְּמַעֲלַת קְדוֹשִׁים וּטְהוֹרִים · כְּזֹהַר הָרָקִיעַ ·
מְאִירִים וּמַזְהִירִים · וְחִלּוּץ עֲצָמִים · וְכַפָּרַת אֲשָׁמִים ·
וְהֲיָתַקְת פֶּשַׁע · וְהַקְרָבַת יֶשַׁע וְחֶמְלָה · וַחֲנִינָה · מִלִּפְנֵי
שׁוֹכֵן מְעוֹנָה - וְחֶלְקָא טָבָא · לְחַיֵּי הָעוֹלָם הַבָּא · שָׁם
תְּהֵא מְנַת וּמְחִיצַת וִישִׁיבַת נֶפֶשׁ הַשֵּׁם הַטּוֹב (פלוני)
רוּחַ יְהוָה תְּנִיחֶנּוּ בְּגַן עֵדֶן · דְּאִתְפְּטַר מִן עָלְמָא הָדֵין
כִּרְעוּת אֱלָהָא מָרֵא שְׁמַיָּא וְאַרְעָא · מֶלֶךְ מַלְכֵי הַמְּלָכִים
בְּרַחֲמָיו יְרַחֵם עָלָיו · וְיָחוֹס וְיַחְמוֹל עָלָיו · מֶלֶךְ מַלְכֵי
הַמְּלָכִים בְּרַחֲמָיו יַסְתִּירֵהוּ בְּצֵל כְּנָפָיו וּבְסִתֶר אָהֳלוֹ לַחֲזוֹת

मार्ग न्यायाचे आहेत. तो सात्विक देव अन्यायी नाहीं, परंतु नीतिमान व सरळ आहे. हा न्यायाधीश सत्य आहे; हा न्यायकर्ता यथार्थ व सत्य आहे, हा सत्य न्यायाधीश सुवंदित असो; कारण त्याचे सर्व न्याय यथार्थ व सत्य आहेत.

मरण आलेल्या पुरुषाकरितां प्रार्थना.

(मोठ्या मनुष्याकरितां या प्रार्थनेपूर्वी हीं पुढील वाक्यें म्हणतात.)

ज्ञान कोठें सांपडेल ? आणि बुद्धीची जागा कोठें आहे ? ज्या मनुष्यास ज्ञान सांपडलें, व जो मनुष्य विवेक पावला तो धन्य. तुझें भय धरणाऱ्यांसाठीं जें तुझें चांगलेपण त्वां ठेविलें आहे, जें मनुष्याच्या देखतां तुझा आश्रय धरणाऱ्यांस त्वां केले आहे, तेंहि किती मोठें आहे ! हे देवा, तुझी दया किती मोलाची आहे ? म्हणून मनुष्यें तुझ्या पंखछायेचा आश्रय धरितात. तुझ्या घराच्या मेदें करून तीं तृप्त होतील, तूं आपल्या आनंदाच्या ओघांतून त्यांस पिऊं देशील.

कीर्ति उत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या जन्म दिवसापेक्षां त्याचा मरण दिवस उत्तम आहे. सर्व गोष्टीचा शेवट आपण ऐकूं या; देवाचे भय धर आणि त्याच्या आज्ञा पाळ; कां कीं मनुष्याचें सर्वस्व हेंच आहे. भक्त गौरवांत उल्लासोंत, ते आपल्या गाद्यांवर उंच स्वराने गावोत.

स्वर्गवासी, ईश्वरी साक्षात्काराच्या आश्रया खालीं, * जे पवित्र व शुद्ध जन अंतराळांतील प्रकाशासारखे प्रकाशतात व चमकतात त्यांच्या उंच पदवीच्या ठिकाणी जेथें विश्रांति नेमिलेली आहे, हाडांस बळकटी येते, अतिक्रमाचें प्रायश्चित होते, उल्लंघन दूर जाते, तारण जवळ असतें, आणि आकाशांत वास करणाऱ्या कडून दया व अनुग्रह व पुढील जगाच्या जीवनाकरितां चांगला विभाग प्राप्त होतो, तेथें (अमुक) कीर्तिमान गृहस्थ याचा वंत, विभाग व वास होवो. हा जो या जगांतून गेला, त्यास देव जो आकाश व पृथ्वीचा स्वामि याच्या इच्छे प्रमाणे ईश्वराचा आत्मा त्यास एदेन बागीं नेवो. राजांचा महाराजा आपल्या दयेने त्याजवर दया करो, त्याजवर कृपा व माया करो. राजांचा महाराजा आपल्या दयेनें आपल्या पंखाच्या छायेखाली व आपल्या राहुटीच्या झांकणा खालीं परमेश्वराची प्रसन्नता पाहावयास व त्याच्या मंदिरांत ध्यान करावयास त्यास आश्रय देवो. दिवसाच्या शेवटीं तो त्यास

---

* इ. पंखाखालीं.

בְּנֹעַם יְהוָה וּלְבַקֵּר בְּהֵיכָלוֹ · וּלְקֵץ הַיָּמִין יַעֲמִידֵהוּ ·
וּמְנַחַל עֲדָנָיו יַשְׁקֵהוּ · וְיִצְרוֹר בִּצְרוֹר הַחַיִּים נִשְׁמָתוֹ ·
וַיָּשִׂים כָּבוֹד מְנוּחָתוֹ · יְהוָה הוּא נַחֲלָתוֹ · וְיָלוֶה אֵלָיו
הַשָּׁלוֹם · וְעַל מִשְׁכָּבוֹ יִהְיֶה שָׁלוֹם · כְּדִכְתִיב יָבֹא שָׁלוֹם
יָנוּחוּ עַל מִשְׁכְּבוֹתָם הוֹלֵךְ נְכוֹחוֹ · הוּא וְכָל־בְּנֵי יִשְׂרָאֵל
הַשּׁוֹכְבִים עִמּוֹ בְּכָלַל הָרַחֲמִים וְהַסְּלִיחוֹת וְכֵן יְהִי רָצוֹן

וְנֹאמַר אָמֵן:

השכבה לאשה

(קודם ההשכבה יאמר פסוקים אלו)

אֵשֶׁת חַיִל מִי יִמְצָא וְרָחֹק מִפְּנִינִים מִכְרָהּ: שֶׁקֶר

חֵן וְהֶבֶל הַיֹּפִי אִשָּׁה יִרְאַת־יְהוָה הִיא תִתְהַלָּל:

תְּנוּ־לָהּ מִפְּרִי יָדֶיהָ וְיַהַלְלוּהָ בַּשְּׁעָרִים מַעֲשֶׂיהָ:

רַחֲמָנָא דְּרַחֲמָנְתָא דִּי לֵיהּ הִיא וּבְמֵימְרֵיהּ אִתְבְּרִיאוּ

עָלְמַיָּא עָלְמָא הָדֵין וְעָלְמָא דְּאָתֵי וּגְנַז בֵּיהּ
צַדָּקָנְיוֹת וְחַסְדָּנְיוֹת דְּעַבְדָן רְעוּתֵיהּ וּבְמֵימְרֵיהּ וּבְיִקְרֵיהּ
וּבְתֻקְפֵּיהּ יֵאמַר לְמֵיעַל קָדָמוֹהִי דְּכַרְן נַפְשׁ הָאִשָּׁה
הַכְּבוּדָה וְהַצְּנוּעָה וְהַנִּכְבֶּדֶת מָרַת (פלונית) רוּחַ יְהוָה
תְּנִיחֶנָּה בְּגַן עֵדֶן דְּאִתְפְּטָרַת מִן עָלְמָא הָדֵין כִּרְעוּת אֱלָהָא
מָרֵא שְׁמַיָּא וְאַרְעָא · הַמֶּלֶךְ בְּרַחֲמָיו יָחוֹס וְיָחְמוֹל עָלֶיהָ ·
וְיָלוֶה אֵלֶיהָ הַשָּׁלוֹם וְעַל מִשְׁכָּבָהּ יִהְיֶה שָׁלוֹם · כְּדִכְתִיב
יָבֹא שָׁלוֹם יָנוּחוּ עַל מִשְׁכְּבוֹתָם הוֹלֵךְ נְכוֹחוֹ · הִיא וְכָל־
בְּנוֹת יִשְׂרָאֵל הַשּׁוֹכְבוֹת עִמָּהּ בְּכָלַל הָרַחֲמִים וְהַסְּלִיחוֹת

וְכֵן יְהִי רָצוֹן וְנֹאמַר אָמֵן:

पुनः सजीव करो.* तो आपल्या आनंदाच्या ओघांतून त्यास पाजो, त्याचा आत्मा जिवंताच्या जुटींत जडलेला जावो,‡ त्याचा विसावा गौरवाचा करो, परमेश्वर त्याचे वतन होवो, तो त्यास शांति देवो, त्याची विश्रांति शांतीची होवो.$ जसें लिहिलें आहे कीं तो समाधानांत येईल, ते आपल्या गाद्यांवर सुखरूप बसतील, प्रत्येक जो आपल्या यथार्थतेनें चालतो तो. या प्रमाणें त्यास आणि त्याजसारिखे निजणारे सर्व इस्राएलाचे पुत्र यांस पूर्ण दया व क्षमा प्राप्त होवो आणि अशी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणू.

मरण पावलेल्या स्त्री करितां प्रार्थना.

(ही प्रार्थना करण्यापूर्वी हीं वाक्यें म्हणावीं.)

सद्गुणी स्त्री कोणास सांपडेल ! तिचें मोल मोत्यांपेक्षां थोर आहे: सुंदरपणा कपटी आणि सुरुपता व्यर्थ आहे; परंतु जी स्त्री परमेश्वराचे भय धरिती तिची प्रशंसा होईल. तिच्या हाताचें फल तिला द्या, आणि वेशींत तिचीं कर्में तिला स्तवोत.

दयावंत, ज्यास मात्र दया शोभते, ज्याच्या शब्दें करून जगतें, म्हणजे हें जग व पुढील जग उत्पन्न झालीं, (ज्या पुढील जगीं) त्याची इच्छा पूर्ण करणाऱ्या सात्विक व धार्मिक बायांचे आत्मे राखून ठेवलेले असतात, त्याच्या वचनाकडून व सामर्थ्या कडून या (अमुक) सन्माननीय पतिव्रता आणि सद्गुणी बाईची आठवण त्यापुढें चढण्याची आज्ञा होवो. ही जी या जगांतून गेली तिजला देव जो आकाशाचा व पृथ्वीचा स्वामि याच्या इच्छे प्रमाणें ईश्वराचा आत्मा एदेन बागीं नेवो, राजा आपल्या दयेनें तिजवर कृपा व माया करो, तो तिजला शांति देवो, तिची विश्रांति शांतिची होवो.$ जसें लिहिलें आहे कीं, ती समाधानांत येईल, त्या आपल्या गाद्यांवर सुखरूप बसतील, प्रत्येक जी आपल्या यथार्थतेनें चालते ती¶. याप्रमाणें तिजसारिख्या निजणाऱ्या सर्व इस्राएलांच्या कन्या यांजला पूर्ण दया व क्षमा प्राप्त होवो. आणि अशी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणू.

---

* इ. उभा करो. ‡ इ. बांधला जावो. $ इ. त्याचे किंवा तिचे बिछान्यावर शांति असो, ¶ हें यशाया अ० ५७ ओ० २ एथील वाक्य पुल्लिंगांत आहे; परंतु एथें तें स्त्रीच्या संबंधानें योजिलें आहे म्हणून एथें तें स्त्रीलिंगांत घेतलें आहे.

(ובפני האבלים אומרים פסוקים אלו אחר ההשכבה)

רַחֵל מֵתָה לָנֶצַח וּמָחָה יְהוָה אֱלֹהִים דִּמְעָה מֵעַל כָּל-
פָּנִים וְחֶרְפַּת עַמּוֹ יָסִיר מֵעַל כָּל-הָאָרֶץ כִּי יְהוָה
דִּבֵּר : יְחִיוּ מֵתֶיךָ נְבֵלָתִי יְקוּמוּן הָקִיצוּ וְרַנְּנוּ שֹׁכְנֵי
עָפָר כִּי טַל אוֹרוֹת טַלֶּךָ וָאָרֶץ רְפָאִים תַּפִּיל : וְהוּא
רַחוּם יְכַפֵּר עָוֹן וְלֹא יַשְׁחִית וְהִרְבָּה לְהָשִׁיב אַפּוֹ וְלֹא
יָעִיר כָּל-חֲמָתוֹ : יְהוָה הוֹשִׁיעָה הַמֶּלֶךְ יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ :

(ואחר אך אומרים מכתם לדוד)

(ביום צאתו מהאבלות אומרים לו)

לֹא־יָבֹא עוֹד שִׁמְשֶׁךָ וְיָרֵחֲךָ לֹא יֵאָסֵף כִּי יְהוָה יִהְיֶה-לְּךָ
לְאוֹר עוֹלָם וְשָׁלְמוּ יְמֵי אֶבְלֶךָ : וּכְתִיב בְּאִישׁ
אֲשֶׁר אִמּוֹ תְּנַחֲמֶנּוּ כֵּן אָנֹכִי אֲנַחֶמְכֶם וּבִירוּשָׁלַם תְּנוּחָמוּ :

יִתְגַּדַּל וְיִתְקַדַּשׁ שְׁמֵיהּ רַבָּא · דְּהוּא עָתִיד לְהַחֲיָא
עָלְמָא · וּלְאַהֲדָרָה מֵתַיָּא וּלְשַׁכְלָלָא הֵיכָלָא ·
וּלְמִפְרַק חַיָּיָא · וּלְמִבְנֵא קַרְתָּא דִּירוּשְׁלֵם · וּלְמֶעְקַר פּוּלְחָנָא
דַּאֲלִילַיָּא מֵאַרְעָא וּלְאָתָבָא פּוּלְחָנָא יַקִּירָא דִּשְׁמַיָּא לְהַדְרֵיהּ
וְזִוּהּ וְיִקְרֵיהּ · בְּחַיֵּיכוֹן וּבְיוֹמֵיכוֹן וּבְחַיֵּי דְּכָל בֵּית
יִשְׂרָאֵל בַּעֲגָלָא וּבִזְמַן קָרִיב וְאִמְרוּ אָמֵן : יְהֵי שְׁמֵיהּ
רַבָּא מְבָרַךְ לְעָלַם לְעָלְמֵי עָלְמַיָּא יִתְבָּרַךְ · וְיִשְׁתַּבַּח ·
וְיִתְפָּאַר · וְיִתְרוֹמַם · וְיִתְנַשֵּׂא · וְיִתְהַדַּר · וְיִתְעַלֶּה ·
וְיִתְהַלַּל · שְׁמֵיהּ דְּקוּדְשָׁא בְּרִיךְ הוּא · לְעֵלָּא מִן כָּל-
בִּרְכָתָא · שִׁירָתָא · תֻּשְׁבְּחָתָא · וְנֶחֱמָתָא · דַּאֲמִירָן בְּעָלְמָא ·
וְאִמְרוּ אָמֵן :

תִּתְכַּלִּי חַרְבָּא וְכַפָּנָא · וּמוֹתָנָא · וּמַרְעִין בִּישִׁין · יַעְדִּי
מִנָּנָא וּמִנְּכוֹן וּמֵעַל עַמֵּיהּ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן

(वरील प्रार्थना केल्यावर सुतक्यां पुढें हीं पुढील वाक्यें ह्मणावीं.)

तो जयाने मरणाला गिळून टाकील, आणि प्रभु परमेश्वर सर्व मुखांवरील आसवें पुशील, आणि आपल्या लोकांची निंदा सर्व पृथ्वीवरून दूर करील. तुझें मेलेले जीवंत होतील, माझ्या प्रेतासहित उठतील; अहो धुळींतल्या बसणारांनो, जागे होऊन उत्सव करा; कारण तुझें दहिंवर हिरवळींच्या दहिंवरासारखें आहे, आणि पृथ्वी प्रेतांस बाहेर पाडील. तो ममताळू आहे; यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करित नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो, आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हाक मारितों त्या दिवशीं राजाने आम्हांस उत्तर द्यावें.

[या नंतर २७० पृष्ठावरील מכתם לדוד म्हणतात.]

(ज्या दिवशीं त्याचें सुतक सरतें त्या दिवशीं त्यास हें म्हणतात.)

तुझा सूर्य पुनः मावळणार नाहीं, व तुझ्या चंद्राचा क्षय होणार नाहीं; कां कीं परमेश्वर तुझी सनातन प्रभा होईल, आणि तुझ्या शोकाचे दिवस समाप्त होतील. जशी कोणेकाची आई त्याचें शांतवन करिती, तसा मी तुमचे शांतवन करीन; आणि येरुशलेमेंत तुम्हीं शांतवन पावाल.

जो ही पृथ्वी पुढें नवी करणार, मेलेल्यास पुनः सजीव करणार, पवित्र मंदिर सुशोभित करणार, जीवंतांस सोडविणार, येरूशालेम नगर (पुनः) बांधणारा मुर्तीचें पूजन जगांतून काढून टाकणार आणि ईश्वराचे * अपूर्व पूजन आपल्या गौरवा करितां, महत्वा करितां व वैभवा करितां पुनः स्थापन करणार त्याचें मोठें नाम, तुमच्या आयुष्यांत, तुमच्या दिवसांत आणि सर्व इस्राएलांच्या घराण्यांच्या आयुष्याच्या दिवसांत, लवकर व थोडक्यांच वेळांत उंचावलें व पवित्र मानिलें जावो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जी सिद्धि जगांत गाजविली जाते, त्यासर्वां पेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरव युक्त, उंचावलें, वाखाणिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

तरवार, दुष्काळ, मरण आणि वाईट रोग नाहिसें होऊन आम्हापासून, तुम्हापासून आणि सर्व इस्राएल लोकांपासून दूर होवोत; आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

---

* इ. आकाशाचे.

יְהֵא שְׁלָמָא רַבָּא מִן שְׁמַיָּא · חַיִּים וְשָׂבָע וִישׁוּעָה וְנֶחָמָא
וְשֵׁיזָבָא וּרְפוּאָה וּגְאוּלָה וּסְלִיחָה וְכַפָּרָה וְרֶוַח
וְהַצָּלָה · לָנוּ וּלְכָל עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן : עוֹשֶׂה שָׁלוֹם
בִּמְרוֹמָיו הוּא בְּרַחֲמָיו יַעֲשֶׂה שָׁלוֹם עָלֵינוּ וְעַל כָּל עַמּוֹ
יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן :

ברכת המזון לאבלים

(אם הם שלשה אומרים)

נְבָרֵךְ מְנַחֵם אֲבֵלִים : (ועונין) בָּרוּךְ מְנַחֵם אֲבֵלִים
שֶׁאָכַלְנוּ מִשֶּׁלּוֹ וּבְטוּבוֹ הַגָּדוֹל חָיִינוּ : (וגם
המברך חוזר ואומר כן)

(ואומר ברכת המזון עד על הארץ ועל המזון
ואחר כך אומר)

נַחֵם יְהוָה אֱלֹהֵינוּ אֶת־אֲבֵלֵי צִיּוֹן וְאֶת־אֲבֵלֵי יְרוּשָׁלָם
וְאֶת־הָאֲבֵלִים הַמִּתְאַבְּלִים בָּאֵבֶל הַזֶּה נַחֵמֵם מֵאֵבְלָם
וְשַׂמְּחֵם מִיגוֹנָם כָּאָמוּר כְּאִישׁ אֲשֶׁר אִמּוֹ תְּנַחֲמֶנּוּ כֵּן
אָנֹכִי אֲנַחֶמְכֶם וּבִירוּשָׁלַם תְּנוּחָמוּ · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה
מְנַחֵם אֲבֵלִים וּבוֹנֵה יְרוּשָׁלַם בְּמְהֵרָה בְיָמֵינוּ אָמֵן :
בְּחַיֵּינוּ וּבְחַיֵּי כָּל קְהַל בֵּית יִשְׂרָאֵל תִּבָּנֶה עִיר צִיּוֹן
וְתִכּוֹן הָעֲבוֹדָה בִּירוּשָׁלַם · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ
מֶלֶךְ הָעוֹלָם הָאֵל אָבִינוּ מַלְכֵּנוּ אַדִּירֵנוּ בּוֹרְאֵנוּ גְּאֻלָּנוּ
קְדוֹשֵׁנוּ קְדוֹשׁ יַעֲקֹב הַמֶּלֶךְ הַחַי הַטּוֹב וְהַמֵּטִיב אֵל אֱמֶת
דַּיָּן אֱמֶת שׁוֹפֵט בְּצֶדֶק לוֹקֵחַ נְפָשׁוֹת שַׁלִּיט בְּעוֹלָמוֹ
לַעֲשׂוֹת כִּרְצוֹנוֹ וַאֲנַחְנוּ עַמּוֹ וַעֲבָדָיו וְעַל־הַכֹּל אֲנוּ
חַיָּבִים לְהוֹדוֹת לוֹ וּלְבָרְכוֹ גּוֹדֵר פְּרָצוֹת הוּא יִגְדּוֹר אֶת־

आणि आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्ही तथास्तु म्हणा. जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

सुतक्यांकरितां जवणानंतरचा धन्यवाद.

(जर तिघे असले तर हें पुढील बोलतात.)

ज्या सुतक्यांच्या शांतवन करणारांचें (अन्न) आपण खाल्लें, त्यांचें सुवंदन आपण करूं या. (**यास उत्तर**) ज्या सुतक्याच्या शांतवन करणारांचें (अन्न) आपण खाल्लें तो सुवंदित असो. [**धन्यवाद करणारा हें वाक्य पुनः बोलतो.**]

(मग पृष्ठ १८८ एथें लिहिल्याप्रमाणे על האדץ ועל המזון पर्यंत बोलून पुढें हें ह्मणतो.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, सीयोनें करितां शोक करणारांचे, येरूशालेमेकरितां शोक करणारांचें आणि या सुतकांमध्यें शोक करणारांचें शांतवन कर. त्यांच्या शोकांत त्यांचे शांतवन कर, त्यांच्या दुःखांत त्यांस हर्षित कर. जसें म्हटलें आहे कीं जशी कोणेकाची आई त्याचे शांतवन करिती, तसा मी तुमेंच शांतवन करीन, आणि येरूशालेमेंत तुम्ही शांतवन पावाल. हे परमेश्वरा, शोक करणाराचें शांतवन करणाऱ्या, आणि लवकर आमचे दिवसांत येरूशालेम बांधणाऱ्या, तूं धन्य आहेस. तथास्तु. आमच्या आयुष्याच्या दिवसांत आणि इस्राएलांच्या घराण्याच्या सर्व मंडळीच्या दिवसांत सीयोन नगर बांधलें जावो. आणि येरूशालेमेंत पूजन स्थापन होवो. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, जो आमचा देव, आमचा बाप, आमचा राजा, आमचे सामर्थ्य, आमचा उत्पन्न कर्ता, आमचा उद्धारक, आमचा पवित्र, याआकोबाचा पवित्र, जिवंत राजा, चांगला व दया करणारा, सत्य देव, सत्य न्यायाधीश, यथार्थतेने न्याय करणारा, जीव काढून घेणारा, आपल्या इच्छेप्रमाणें करण्याकरितां जगावर अधिकार चालविणारा, तो तूं धन्य आहेस. आम्ही त्याचे लोक व त्याचे सेवक आहों, आणि या सर्व गोष्टींवरून त्याची स्तुति करणे व त्यास सुवंदन आम्हास योग्य आहे. जो हानि भरून देणारा, तो दयेनें आम्हाकरितां व

הַפְּרָצָה הַזֹּאת מֵעָלֵינוּ וּמֵעַל כָּל עַמּוֹ יִשְׂרָאֵל בְּרַחֲמִים ׃
עוֹשֶׂה שָׁלוֹם בִּמְרוֹמָיו הוּא בְרַחֲמָיו יַעֲשֶׂה שָׁלוֹם עָלֵינוּ
וְעַל כָּל־עַמּוֹ יִשְׂרָאֵל וְאִמְרוּ אָמֵן ׃

(מזמור שאומרים בבית האבל קודם ערבית ובשחרית קודם קוה)

לַמְנַצֵּחַ לִבְנֵי־קֹרַח מִזְמוֹר ׃ שִׁמְעוּ־זֹאת כָּל־הָעַמִּים
הַאֲזִינוּ כָּל־יֹשְׁבֵי חָלֶד ׃ גַּם־בְּנֵי אָדָם גַּם־
בְּנֵי־אִישׁ יַחַד עָשִׁיר וְאֶבְיוֹן ׃ פִּי יְדַבֵּר חָכְמוֹת וְהָגוּת
לִבִּי תְבוּנוֹת ׃ אַטֶּה לְמָשָׁל אָזְנִי אֶפְתַּח בְּכִנּוֹר חִידָתִי ׃
לָמָּה אִירָא בִּימֵי רָע עֲוֹן עֲקֵבַי יְסוֹבֵבֵנִי ׃ הַבֹּטְחִים עַל־חֵילָם
וּבְרֹב עָשְׁרָם יִתְהַלָּלוּ ׃ אָח לֹא־פָדֹה יִפְדֶּה אִישׁ לֹא־יִתֵּן
לֵאלֹהִים כָּפְרוֹ ׃ וְיֵקַר פִּדְיוֹן נַפְשָׁם וְחָדַל לְעוֹלָם ׃ וְיִחִי־
עוֹד לָנֶצַח לֹא יִרְאֶה הַשָּׁחַת ׃ כִּי יִרְאֶה חֲכָמִים יָמוּתוּ
יַחַד כְּסִיל וָבַעַר יֹאבֵדוּ וְעָזְבוּ לַאֲחֵרִים חֵילָם קִרְבָּם
בָּתֵּימוֹ לְעוֹלָם מִשְׁכְּנוֹתָם לְדוֹר וָדוֹר קָרְאוּ בִשְׁמוֹתָם
עֲלֵי אֲדָמוֹת ׃ וְאָדָם בִּיקָר בַּל־יָלִין נִמְשַׁל כַּבְּהֵמוֹת
נִדְמוּ ׃ זֶה דַרְכָּם כֶּסֶל לָמוֹ וְאַחֲרֵיהֶם בְּפִיהֶם יִרְצוּ סֶלָה ׃
כַּצֹּאן לִשְׁאוֹל שַׁתּוּ מָוֶת יִרְעֵם וַיִּרְדּוּ בָם יְשָׁרִים לַבֹּקֶר
וְצוּרָם לְבַלּוֹת שְׁאוֹל מִזְּבֻל לוֹ ׃ אַךְ־אֱלֹהִים יִפְדֶּה־נַפְשִׁי
מִיַּד שְׁאוֹל כִּי יִקָּחֵנִי סֶלָה ׃ אַל־תִּירָא כִּי־יַעֲשִׁיר אִישׁ
כִּי־יִרְבֶּה כְּבוֹד בֵּיתוֹ ׃ כִּי לֹא בְמוֹתוֹ יִקַּח הַכֹּל לֹא־
יֵרֵד אַחֲרָיו כְּבוֹדוֹ ׃ כִּי־נַפְשׁוֹ בְחַיָּיו יְבָרֵךְ וְיוֹדֶךָּ כִּי־תֵיטִיב
לָךְ ׃ תָּבֹא עַד־דּוֹר אֲבוֹתָיו עַד־נֶצַח לֹא יִרְאוּ־אוֹר ׃
אָדָם בִּיקָר וְלֹא יָבִין נִמְשַׁל כַּבְּהֵמוֹת נִדְמוּ ׃ וּתְשׁוּעַת

आपल्या सर्व इस्राएल लोकांकरितां ही हानि भरून देवो.* जो उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व आपल्या सर्व इस्राएल लोकांस शांति देवो; आणि तुम्ही तथास्तु ह्मणा.

(सुतक्याच्या घरीं हें पुढील गीत संध्याकाळच्या प्रार्थने पूर्वी आणि पाहांटेच्या प्रार्थनेंत קוה אל ה' חזק **(पृष्ठ १०८) या पूर्वी बोलतात.)**

मुख्य वाजंत्र्याला; कोराहाच्या पुत्रांसाठीं गीत. अहो सगळे लोकहो, तुझी हें ऐका अहो इहलोकचे सर्व राहणारे, तुम्ही कान लावा. अहो उंच व निच, अहे धनवान व दरिद्री, तुह्मी एकत्र ऐका. माझें तोंड ज्ञान बोलेल, आणि माझ्या हृदयांतला विचार बुद्धीचा होईल. मी आपला कान दाखल्याकडे लावीन; तंतुवाद्यावर आपलें गूढ फोडीन. वाईटाच्या दिवसांत माझ्या टपणाऱ्यांचा अन्याय मला वेढितो, तेव्हां म्या कां भ्यावें ? जे आपल्या पराक्रमावर भरंवसा ठेवितात; आणि आपल्या फार धनाविषयीं नावाजून घेतात. त्यांतील कोणाच्याने भावाला खंडून सोडवतच नाहीं; त्याविषयीं क्षमासाधन देवाजवळ देववत नाहीं. त्यांच्या जिवाची खंडणी तर मोलवान आहे, आणि कधींहि व्हावयाची नाहीं. त्याने निरंतर बांचावें व क्षय कधीं न अनुभवावा ह्मणून. कां तर असें दिसतें कीं ज्ञानी मरतात; मूर्ख व पशुरूपीं यांसुद्धां सरसकट नाश पावतात, आणि आपापल्या सत्तेचें आपल्या मागल्यांसाठीं ठेवितात. त्यांचें मन असें आहे कीं, आपलीं घरें सर्वकाल, आपल्या वर त्या पिढींपिढीं राहतील; ते आपलीं नावें आपल्या भूमीवर ठेवितात. परंतु माणूस उत्तमपणांत राहत नाहीं; तो नाश पावणाऱ्या पशूंच्यासारिखा आहे; त्यांची ही चाल त्यांच्या मुर्खपणाची आहे; तथापि त्यांची संतानें त्यांच्या सम्मतावर संतुष्ट आहेत. सेलाह. जसें मेंढरांस तसें त्यांस कबरेंत ठेवितात; मरण त्यांस चरून खातें; सकाळीं सरळ लोक त्यांवर धनीपण करितील, कां कीं त्यांचें रूप त्यांच्या वस्तींतून कबरांतल्या नाशासाठीं आहे. परंतु देव माझ्या जिवाला कबरेच्या शक्तींतून खंडून काढील, कां तर तो मला घेईल. सेलाह. जेव्हां कोणी धनवान होतो, आणि त्याच्या घरांतला संसार वाढतो, तेव्हां तूं भिऊं नको. कारण कीं तो आपल्या मरणाच्या वेळेस कांहींच घेऊन जाणार नाहीं; त्याचें गौरव त्याच्यामागें उतरणार नाहीं. जरी त्याने आपल्या आयुष्यांत आपल्या जिवाला धन्य ह्मटलें; कीं त्वां आपल्यासाठीं बरें

---

* इ. जो भगाड भरणारा तो दयेने आह्मावरून व आपल्या सर्व इस्राएल लोकांवरून हें भगाड भरून टाको.

צַדִּיקִים מֵיְהוָה מָעוּזָּם בְּעֵת צָרָה : וַיַּעְזְרֵם יְהוָה וַיְפַלְּטֵם
יְפַלְּטֵם מֵרְשָׁעִים וְיוֹשִׁיעֵם כִּי חָסוּ בוֹ : חִזְקוּ וְיַאֲמֵץ
לְבַבְכֶם כָּל־הַמְיַחֲלִים לַיהוָה :

ברכת הנהנין

(תנו רבנן אסור לאדם ליהנות מן העולם הזה בלא ברכה
והנהנה מן העולם הזה בלא ברכה מעל ולפיכך תקנו
ברכה על כל דבר ודבר :)

(האוכל פת מאחת מחמשת המינין שחייבת בחלה ואלו הן
מטה ושעורה וכוסמת ושבולת שועל ושיפון מברך תחלה
המוציא ולבסוף מברך ברכת המזון ככתוב בליל שבת .)

(האוכל תבשיל מאחת מהמשת המינין שחייבת בחלה
מברך)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם בּוֹרֵא מִינֵי מְזוֹנוֹת :

(ולבסוף מברך)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם עַל הַמִּחְיָה
וְעַל הַכַּלְכָּלָה וְעַל תְּנוּבַת הַשָּׂדֶה וְעַל אֶרֶץ
חֶמְדָּה טוֹבָה וּרְחָבָה שֶׁרָצִיתָ וְהִנְחַלְתָּ לַאֲבוֹתֵינוּ · לֶאֱכוֹל
מִפִּרְיָהּ וְלִשְׂבּוֹעַ מִטּוּבָהּ · רַחֵם יְהוָה אֱלֹהֵינוּ עָלֵינוּ
וְעַל יִשְׂרָאֵל עַמֶּךָ וְעַל יְרוּשָׁלַם עִירֶךָ וְעַל הַר צִיּוֹן
מִשְׁכַּן כְּבוֹדֶךָ · וְעַל מִזְבָּחֶךָ · וְעַל הֵיכָלֶךָ · וּבְנֵה
יְרוּשָׁלַם עִיר הַקֹּדֶשׁ בִּמְהֵרָה בְיָמֵינוּ · וְהַעֲלֵנוּ לְתוֹכָהּ ·
וְשַׂמְּחֵנוּ בְּבִנְיָנָהּ · (בשבת וַנַּחֲמֵנוּ בְּיוֹם הַשַּׁבָּת הַזֶּה ·)
(בראש חדש וְזָכְרֵנוּ לְטוֹבָה בְּיוֹם רֹאשׁ הַחֹדֶשׁ הַזֶּה ·)
(ביום טוב וְשַׂמְּחֵנוּ בְּיוֹם) (בפסח חַג הַמַּצּוֹת הַזֶּה)
(בשבועות חַג הַשָּׁבוּעוֹת הַזֶּה (בסכות חַג הַסֻּכּוֹת הַזֶּה)

केलं आहे; म्हणून लोक तुझी स्तुति करतील. तरी त्याचे जे पूर्वज प्रकाश कधी पहात नाहींत त्यांच्या आयुष्यास त्याचा जीव पोंचेल. जो माणूस उत्तमपणांत असतां समजत नाहीं तो नाश पावणाऱ्या पशूसरिखा आहे.

उपयोगाच्या निरनिराळ्या गोष्टीवरून करावयाचे धन्यवाद.

[आमच्या गुरूजतांनी आह्मास असें सांगितलें आहे कीं, या जगांतील कोणत्याहि पदार्थांचाउपयोग धन्यवादावांचून करणे अयोग्य आहे; या जगांतील कोणत्याहि पदार्थाचा उपयोग धन्यवादावांचून करणें हें पाप आहे; या कारणास्तव त्यांनीं प्रत्येक गोष्टी करितां धन्यवाद लावून दिला आहे.]

[ज्यांचा प्रथम उंडा काढावा लागतो, अशा पांच प्रकारचीं धान्यें म्हणजे गहूं, जोंधळें, कुरसेमेथ, शिब्बोलेथशूआल, आणि शीफोन, यांची भाकर जो खातो, त्यानें पहिल्याने पृष्ठ १८३ एथें सांगितलेला המוציא हा धन्यवाद करावा, आणि मागाहून शाब्बाथाच्या रात्रीच्या प्रकरणांत पृष्ठ १८५ एथें लिहिल्या प्रमाणें ברכת המזון हा धन्यवाद करावा.]

(ज्या पांच प्रकारच्या धान्याचा प्रथम उंडा काढावा लागतो, त्या धान्यांतून एखादें शिजवून खाल्लें तर हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, (अनेक) प्रकारचें अन्न उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(खाल्लया नंतर हा पुढील धन्य वाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, उपजीवनावरून व पोषणावरून व शेताच्या उत्पन्नावरून, आणि जो प्रिय, चांगला व विस्तीर्ण देश, त्याचें आम्ही फळ खावें व त्याच्या उत्तम उत्पन्नाकडून तृप्त व्हावें म्हणून प्रसन्न होऊन तूं त्याचें वतन आमच्या पूर्वजांस दिलेस यावरून, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा आमच्या देवा, आम्हांवर, तुझ्या इस्राएल लोकांवर, तुझ्या येरूशालेम नगरावर, तुझ्या गौरवाचें वस्तीस्थान जो सीयोन डोंगर त्यावर, तुझ्या स्थंडिलावर, आणि तुझ्या मंदिरावर दया कर. आणि लवकर आमचे दिवसांत पवित्र येरूशालेम नगर बांध; आम्हांस त्याजमध्यें ने; आणि त्याच्या बांधण्याकडून आम्हास हर्षित कर. म्हणजे त्याकरितां आम्ही पवित्रतेनें व शुद्धतेनें तुझें सुवंदन करूं. (**शाब्बाथ दिवशीं**—आणि या शाब्बाथ दिवशीं आम्हांस विश्रांती दे.) (**प्रतिपदेच्या दिवशीं**—आणि या प्रतिपदेच्या दिवशीं चांगल्या करितां आमची आठवण कर.) (**पेसाहमध्यें**—या न फुगलेल्या भाकरीच्या सणाच्या दिवशीं) (**शबुओथमध्यें**-या सप्तकांच्या सणाच्या दिवशीं) (**सुक्कोथमध्यें**-या मंडपाच्या

(בשמיני עצרת שְׂמֵינִי חַג עֲצֶרֶת הַזֶּה · בְּיוֹם (* טוֹב) מִקְרָא
קֹדֶשׁ הַזֶּה · כִּי אַתָּה טוֹב וּמֵטִיב לַכֹּל · וְנוֹרָה לְךָ
עַל הָאָרֶץ עַל הַמִּחְיָה וְעַל הַכַּלְכָּלָה · בָּרוּךְ אַתָּה יְהוָה
עַל הָאָרֶץ עַל הַמִּחְיָה וְעַל הַכַּלְכָּלָה :

(האוכל פרי העץ יברך עליו בתחלה)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם בּוֹרֵא פְּרִי הָעֵץ :

(ולבסוף מברך וגו חוץ מוהשכר קאפי)

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם בּוֹרֵא נְפָשׁוֹת
רַבּוֹת וְחֶסְרוֹנָן עַל־כָּל־מַה־שֶּׁבָּרָאתָ לְהַחֲיוֹת בָּהֶם
נֶפֶשׁ כָּל־חַי · בָּרוּךְ חֵי הָעוֹלָמִים :

(ואם הוא מחמשת המינים שנשתבחה בהם א"י מברך)

בָּא"י אֶמ"ָה עַל הָעֵץ וְעַל פְּרִי הָעֵץ וְעַל תְּנוּבַת הַשָּׂדֶה
(וכו' וחותם) בָּרוּךְ אַתָּה יְהוָה עַל הָאָרֶץ וְעַל הַפֵּרוֹת :

(על דבר שאין גדולו מן הארץ כגון בשר
וגבינה ודגים חלב חמאה ודבש
שכר מים ושאר המשקין חוץ מן היין מברך תחלה)

בָּא"י אֶמ"ָה שֶׁהַכֹּל נִהְיָה בִּדְבָרוֹ :

(ולבסוף מברך בורא נפשות)

(האוכל מחמשת חמינים בלא אפייה ובלא בישול
מברך תחלה)

בָּא"י אֶמ"ָה בּוֹרֵא פְּרִי הָאֲדָמָה : (ולבסוף מברך בורא נפשות)

* सणाच्या व्यवहारिक दिवसांत טוֹב बोलत नाहींत.

सणाच्या दिवशीं) (**शेमीनी आसेरेथमध्यें**—या सभा मिळण्याचे सणाच्या आठव्या दिवशीं) (**सणाच्या दिवशीं**—या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदिनीं) (**सणामधील व्यवहारिक दिवशीं**—या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं आम्हांस हर्षांत कर;) कारण तूं सर्वांसीं चांगला असून सर्वांचें चांगलें करितोस. यास्तव आम्ही तुला त्या देशावरून, उपजीवनावरून व पोषणावरून स्तवितों. हे परमेश्वरा, त्या देशावरून व उपजीवनावरून व पोषणावरून तूं धन्य आहेस.

(एखादे झाडाचें फळ खाण्यापूर्वी हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, झाडाचे फल उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(तें खाल्ल्यावर हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, असंख्य जीव उत्पन्न करून जे कांहीं तूं उत्पन्न केलें आहेस त्यांतील प्रत्येक प्राण्याचा जीव वांचविण्याकरितां त्यांस अगत्याचे पदार्थ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. जगतांचा जीवात्मा (देव, धन्य असो.

(ज्या पांच प्रकारच्या फलांवरून इस्राएलांचा देश वाखाणिलेला आहे, त्यांतलें एखादें फल खाल्लें असल्यास मागाहून हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, झाडावरून व त्या झाडाच्या फलावरून व शेताच्या उत्पन्नावरून (**इत्यादि पृष्ठ १९३ एथील द्राक्षारस प्याल्यानंतरच्या धन्यवादा प्रमाणें करावा. परंतु शेवटीं हे पुढील म्हणावें.**) यास्तव आम्ही तुला त्या देशावरून, त्या झाडावरून व त्या झाडाच्या फलांवरून स्तवितो. हे परमेश्वरा, त्या देशावरून व त्या फलांवरून तूं धन्य आहेस.

(जे पदार्थ भुमींतून वाढत नाहींत म्हणजे गुराचें पशूचें व पक्षाचें मांस, पनीर, मासे, दूध, दही आणि मध, जो खातो अथवा द्राक्षरस खेरीज करून मद्य; पाणी किंवा कोणताहि पीण्याचा पदार्थ पितो त्यानें हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्याच्या शब्देंकरून सर्व अस्तीत्वांस आलें. तो तूं धन्य आहेस.

[प्याल्यानंतर בורא נפשות हा धन्यवाद करावा.]

(वर सांगितलेले पांच प्रकारचे धान्याची भाकर भाजल्यावांचून किंवा शिजविल्या वांचून जो तें खातो त्याने पहिल्यानें हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, भुमीचें फल उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. [**खाल्ल्यावर בורא נפשות हा धन्यवाद करावा.**]

(על ריח פירות כגון אתרוג וחפוח מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה הַנּוֹתֵן רֵיחַ טוֹב בַּפֵּירוֹת:

(על ריח עץ או מין עץ מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה בּוֹרֵא עֲצֵי בְשָׂמִים:

(על ריח עשב או מין עשב מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה בּוֹרֵא עִשְׂבֵי בְשָׂמִים:

(על המוסקיו ועל האנבר וכל מיני בושם מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה בּוֹרֵא מִינֵי בְשָׂמִים:

(על שמן בשמים כגון שמן אפרסמון מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה בּוֹרֵא שֶׁמֶן עָרֵב:

(הרואה בימי ניסן אילנות כשמוציאין פרחים מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה שֶׁלֹּא חִסַּר בְּעוֹלָמוֹ כְּלוּם וּבָרָא בּוֹ בְּרִיוֹת טוֹבוֹת וְאִילָנוֹת טוֹבוֹת וְנֶאוֹת לְהֵנוֹת בָּהֶן בְּנֵי אָדָם:

(הרואה בתי כנסיות בישובן מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה מַצִּיב גְּבוּל אַלְמָנָה:

(ובחורבנן מברך)

בָּאַ"י אֶמ"ָה דַּיַּן הָאֱמֶת:

(माहाळूंग, सफरदळ या सारख्या फलांच्या सुवासावरून
हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा आमच्या देवा, जगताच्या राजा, फलांत सुवास देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(एखाद्या प्रकारच्या सुवासीक झाडावरून हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, सुगंधी झाडें उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(एखाद्या प्रकारच्या सुवासिक हिरवळीवरून हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, सुगंधी हिरवळ उत्पन्न करणाऱ्या तूं धन्य आहेस.

(कस्तुरी, अंबर इत्यादि सुगंधी पदार्थांवरून हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, प्रकार प्रकारचे सुगंध उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(अत्तरासारख्या सुगंधी तेलावरून हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, मधूर तेल उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(नीसान म्हणजे चैत्र महिन्यांत फुलें उमलेलीं झाडें पाहिल्यावरून
हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्यानें आपल्या जगीं काहींच उणें केलें नाहीं, आणि मानवी प्राण्याच्या उपयोगी पडावे म्हणून चांगले पदार्थ व चांगली व सुंदर झाडें उत्पन्न केलीं तो, तूं धन्य आहेस.

(चालू असलेलें प्रार्थना मंदीर पहाणारानें हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, विधवेची * सीमा स्थापणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(तें पडलेलें असल्यास हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, सत्य न्यायाधीशा, तूं धन्य आहेस.

---

* एथें विधवा ही उपमा येरूशालेमेस दिली आहे.

(הרואה מקום שנעשו בו נסים לאבותינו מברך)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁעָשָׂה נִסִּים לַאֲבוֹתֵינוּ בַּמָּקוֹם הַזֶּה :

(הרואה הקשת אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת זוֹכֵר הַבְּרִית נֶאֱמָן בִּבְרִיתוֹ וְקַיָּם בְּמַאֲמָרוֹ :

(הרואה מלכי ישראל אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁחָלַק מִכְּבוֹדוֹ לִירֵאָיו :

(הרואה מלכי אומות העולם אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁנָּתַן מִכְּבוֹדוֹ לְבָשָׂר וָדָם :

(הרואה חכמי ישראל אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁחָלַק מֵחָכְמָתוֹ לִירֵאָיו :

(הרואה חכמי אומות העולם אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁנָּתַן מֵחָכְמָתוֹ לְבָשָׂר וָדָם :

(הרואה את חביריו לאחר שלשים יום אומר שהחיינו ·
ואחר י"ב חדש אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת מְחַיֶּה הַמֵּתִים :

(לחולה שנתרפא מחוליו אומר)

בְּרִיךְ רַחֲמָנָא דְּיַהֲבָךְ לָן וְלָא יְהָבָךְ לְעַפְרָא :

(הרואה את הכושי והגיחור הפסח והננס וכיוצא בהם מברך)

בָּאַ"י אֱמֶ"ת מְשַׁנֶּה אֶת הַבְּרִיּוֹת :

(ज्या ठिकाणीं आपल्या पूर्वजांकरितां चमत्कार झाले, तें ठिकाण पहाणारानें हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्यानें या ठिकाणीं आमच्या पूर्वजांकरितां चमत्कार केले तो तूं धन्य आहेस.

(धनुष्य पहाणारानें हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, करार* आठविणाऱ्या, आपला करार विश्वासूपणें राखणाऱ्या, आणि आपलें वचन स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(इस्राएलांचे राजे पहाणारानें हें म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या गौरवांतून कांहीं अंश आपल्या भिणाऱ्यास देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(अन्य जातीचे राजे पहाणारानें हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या गौरवांतून कांहीं अंश मनुष्यमात्रास देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(इस्राएलांतील ज्ञानी जन पहाणारानें हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या ज्ञानांतून कांहीं अंश आपल्या भिणाऱ्यांस देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(अन्य जातीचे ज्ञानी जन पहाणारानें हें पुढील म्हणावें)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या ज्ञानांतून कांहीं मनुष्य मात्रास देणाऱ्या तूं धन्य आहेस.

(आपल्या एखाद्या मित्रास तीस दिवसां नंतर पाहिल्यास שהחיינו हा धन्यवाद करावा; परंतु बारा महिन्यानंतर पाहिल्यास हें म्हणावें.)

हे परमेश्वरा. आमच्यां देवा, जगताच्या राजा, मेलेल्यास जीवंत करणाऱ्या तूं धन्य आहेस.

(बरा झालेल्या रोग्यावरून हें पुढील म्हणावें)

ज्या दयावंतानें तुजला परत आमच्या हातीं दिलें परंतु धुळीस दिलें नाहीं तो धन्य असो.

(सिधी किंवा अगदीं लाल किंवा लंगडा किंवा ठेंगणा किंवा यासारखा एखादा मनुष्य पाहिल्यास हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, निराळ्या प्रकारचे प्राणी (निर्माण) करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

---

* उत्पत्ति अ. ९ ओ. ११–१७ एथें लिहिल्याप्रमाणें नोव्हा बरोबर केलेला करार.

(הרואה בריות טובות ואילנות טובות מברך)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁכָּכָה לוֹ בְּעוֹלָמוֹ :

(על חזיקים וזועות ורוחות וברקים מברך)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁכֹּחוֹ וּגְבוּרָתוֹ מָלֵא עוֹלָם :

(הרואה את הים הגדול אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת שֶׁעָשָׂה אֶת הַיָּם הַגָּדוֹל :

(הרואה הרים וגבעות הגדולים אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת עוֹשֶׂה מַעֲשֵׂה בְרֵאשִׁית :

(על שמועות רעות מברך)

בָּאַ"י אֱמֶ"ת דַּיָּן הָאֱמֶת :

(על הנשמים ועל בשורות טובות אומר)

בָּאַ"י אֱמֶ"ת הַטּוֹב וְהַמֵּטִיב :

לזכר הבת

יוֹנָתִי בְּחַגְוֵי הַסֶּלַע בְּסֵתֶר הַמַּדְרֵגָה הַרְאִינִי אֶת מַרְאַיִךְ
הַשְׁמִיעִינִי אֶת קוֹלֵךְ כִּי־קוֹלֵךְ עָרֵב וּמַרְאַיִךְ נָאוֶה :

(ואם היא בת ראשונה יאמר

אַחַת הִיא יוֹנָתִי תַּמָּתִי אַחַת הִיא לְאִמָּהּ בָּרָה הִיא
לְיוֹלַדְתָּהּ רָאוּהָ בָנוֹת וַיְאַשְּׁרוּהָ מְלָכוֹת וּפִילַגְשִׁים
וַיְהַלְלוּהָ :)

נֹפֶת תִּטֹּפְנָה שִׂפְתוֹתַיִךְ כַּלָּה דְּבַשׁ וְחָלָב תַּחַת לְשׁוֹנֵךְ וְרֵיחַ
שַׂלְמֹתַיִךְ כְּרֵיחַ לְבָנוֹן

מִי שֶׁבֵּרַךְ אִמּוֹתֵינוּ שָׂרָה וְרִבְקָה רָחֵל וְלֵאָה וּמִרְיָם הַנְּבִיאָה
וַאֲבִיגַיִל וְאֶסְתֵּר הַמַּלְכָּה בַּת אֲבִיחַיִל הוּא יְבָרֵךְ אֶת
הַיַּלְדָּה הַנַּעִימָה הַזֹּאת וְיִקָּרֵא שְׁמָהּ (פלונית) בְּמַזַּל טוֹב

(चांगले प्राणी व चांगलीं झाडें पहाणारानें हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्याच्या जगामध्यें असें आहे तो, तूं धन्य आहेस.

(वीज, गडगडाट, किंवा मोठा वारा पहाणारानें हा धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्याच्या सामर्थ्यानें व पराक्रमानें जग भरलें आहे तो, तूं धन्य आहेस.

(महासागर पहाणारानें हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्यानें महासागर केला तो, तूं धन्य आहेस.

(मोठे पर्वत व डोंगर पहाणारानें हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, प्रारंभींचीं कृत्यें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

(वाईट वर्तमानावरून हा पुढील धन्यवाद करावा.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, सत्य न्यायाधीशा, तूं धन्य आहेस.

(पावसावरून व चांगल्या वर्तमानावरून हें पुढील म्हणावें.)

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, चांगल्या व चांगलें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

कन्यारत्न लाभ.

अगे माझ्या कपोते, जी तूं खडकाच्या कड्यांत चढणीच्या गुप्त स्थलांत आहेस, तीं तूं आपलें मुख मला दाखीव, आपला शब्द मला ऐकीव; कां कीं, तुझा शब्द मंजुळ व तुझें मुख सुंदर आहे.

माझी कपोती, माझी निर्दोष एकली आहे,ती आपल्या आईची एकुलती, आपल्या प्रसवणाराची आवडती आहे, कन्या तिला पाहून धन्य म्हणोत, राण्या व उपपत्न्या तिला पाहून स्तवोत.]

ज्यानें आमच्या माता सारा, रिबका, राहेल, लेआ, मिर्याम भविष्यवादीन, आबीगाईल, आणि आबीहाइलाची कन्या एस्तेर राणी यांस आशीर्वाद दिला तो या सुंदर मुलीला आशीर्वाद देवो; आणि सुभाग्यानें व शुभ वेळीं तिचें नांव इस्राएलांमध्यें (अमुक) म्हटलें जावो. आणि तिची प्रकृति चांगली व सुखाची राखून तो तिला वाढवो, आणि तिच्या बापास व तिच्या आईस तिचा

וּבְשַׁעַת בְּרָכָה וְיַגְדִּילָהּ בִּבְרִיאוּת שָׁלוֹם וּמְנוּחָה וְיִזְכֶּה
לְאָבִיהָ וּלְאִמָּהּ לִרְאוֹת בְּשִׂמְחָתָהּ וּבְחֻפָּתָהּ בְּבָנִים זְכָרִים
עֶשֶׂר וְכָבוֹד דְּשִׁיִּים וְרַעֲנַנִּים יְנוּבוּן בְּשִׁיבָה וְכֵן יְהִי
רָצוֹן וְנֹאמַר אָמֵן׃

סדר ספירת העומר

לְשֵׁם יִחוּד קוּדְשָׁא בְּרִיךְ הוּא וּשְׁכִינְתֵּיהּ בְּדָחִילוּ וּרְחִימוּ
וּרְחִימוּ וּדְחִילוּ לְיַחֲדָא שֵׁם י״ה בְּיִחוּדָא שְׁלִים
בְּשֵׁם כָּל יִשְׂרָאֵל הִנְנִיבָא לְמֵיהַב מִצְוַת סְפִירַת הָעוֹמֶר לְתַקֵּן
אֶת שָׁרְשָׁהּ בִּמְקוֹם עֶלְיוֹן׃ וִיהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְהוָה אֱלֹהֵינוּ
וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ שֶׁיְּהֵא עַתָּה עֵת רָצוֹן לִהְיוֹת עוֹלֶה לְפָנֶיךָ
סְפִירַת הָעוֹמֶר כְּאִלּוּ הִשַּׁנְתָּנוּ כָּל־הַסּוּרוֹת הַנִּפְלָאִים וְהַנּוֹרָאִים
אֲשֶׁר הֵם חֲתוּמִים בָּהּ׃ וְתַעֲלֶה לְפָנֶיךָ עִם כַּוָּנַת בְּנֵי יְדִידֶךָ
הַיּוֹרְעִים וְהַמְכַוָּנִים כָּל כַּוָּנוֹת שְׁמוֹתֶיךָ הַקְּדוֹשִׁים הֲרָאוּיִים
לָבֹא בַּסְּפִירָה הַזֹּאת וַאֲשֶׁר עֲרוּמִים יַכְתִּירוּ דַּעַת׃ וְעַתָּה
יְגַדַּל נָא כֹּחַ יְהוָה בְּלֹחַ סְגוּלַת הַסְּפִירָה הַזֹּאת בִּשְׁנֵי
הַמְּאוֹרוֹת הַגְּדוֹלִים עִם הַקְּמַנִּים וּבְדַעַת חֲדָרִים יִמָּלְאוּ
וְיִתְבּוֹנְנוּ חַסְדֵי יְהוָה׃ וְתִרְבֶּה הַדַּעַת לְעֶזְרַת יְהוָה בַּגִּבּוֹרִים
וְגַם יְהוָה יִתֵּן הַטּוֹב וְאַרְצֵנוּ תִּתֵּן יְבוּלָהּ׃

וִיהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ שֶׁיְּחוֹנְנֵךְ בְּסִפִּירָתֵנוּ זֹאת אֶת אֲשֶׁר
פָּנַמְנוּ בְּמִדּוֹת הָעֶלְיוֹנוֹת הַגְּדוּלָה וְהַגְּבוּרָה
וְהַתִּפְאֶרֶת וְהַנֶּצַח וְהַהוֹד כִּי כָל בַּשָּׂמַיִם וּבָאָרֶץ לְךָ
יְהוָה הַמַּמְלָכָה׃ אַחַת לְאַחַת בְּשִׁבְעָה שָׁבוּעוֹת תְּמִימוֹת
אֵלֶּה עַל אֵבֶן אַחַת שִׁבְעָה עֵינַיִם וְתִמָּחוֹל וְתִסְלַח אֶת־כָּל
חַטֹּאתֵינוּ עֲוֹנוֹתֵינוּ וּפִשָּׁעֵינוּ אֲשֶׁר פָּנַמְנוּ מִנְּעוּרֵינוּ עַד הַיּוֹם
הַזֶּה׃ וְכֵשֵׁם שֶׁטִּהַרְתָּ נְפָשׁוֹת עַמְּךָ בֵּית יִשְׂרָאֵל מִזּוּהֲמַת
הַנָּחָשׁ טוּמְאַת מִצְרַיִם בְּכֹחַ מִצְוַת סְפִירַת הָעוֹמֶר בְּצֵאת

हर्ष, तिचें लग्न, आणि तिचें पुत्र संतान, श्रीमंत, प्रतिष्ठित, पुष्ट व टवटवीत, आणि वृद्धत्वांत असूनहि फळ देतांना पहाण्याची पुण्याई देवो. आणि अशी त्याची प्रसन्नता होवो; आणि आपण तथास्तु म्हणूं.

ओमेर * मोजण्याची रिती

पवित्र परमेश्वर जो एक, त्याच्या नामानें, व वैभवानें, व त्याच्या भितीनें, व त्याच्या प्रीतीनें ज्याच्या प्रीती व भितीपासून योद-हेच्या संगाती वाव हे एकत्र करून सर्व इस्राएलाच्या नामाकारितां पूर्ण केलें आहे, तो धन्य असो.

ओमेर मोजण्याचा विधी पूर्ण करण्याकरीतां ऐथें मी आलों आहे. याप्रमाणें वरील जागेंत त्याचा उगम पूर्ण होवो. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होवो कीं, आतां ही वेळ प्रसन्नतेची आहे. ती ओमेर मोजण्याची व तुझ्या समोर वर येण्याची आहे ज्याप्रमाणें ओमेर मोजण्यांत सर्व गुप्त अद्भूत कृत्यें व भयंकर कामें आहेत, त्याप्रमाणें समजावें कीं आपण हें काम पुरें केलें; व जें तुझें ओमेर मोजणें जाणणारे भितीचे लोक, व तुझ्या पवित्र नामाचा भक्तिभाव पुरे करणारे लोक, व ज्या गरीब लोकांनीं परमेश्वरासाठीं अकलेनें मुगूट बनविला, या संगाती आमची ही प्रार्थना तुझ्यासमोर कबुल केली जावो. ह्या ओमेर मोजण्याच्या शक्तींत, व मोठी व लहान ह्या दोन ज्योतींत परमेश्वराची शक्ती आतां मोठी होईल. व चांगल्या अकलेनें आपणावर परमेश्वराची मेहेरबानी कशी आहे, हें समजूं शकतों. आपली अक्कल परमेश्वराच्या मदतीनें व शक्तीनें जास्ती होवो. ब परमेश्वर आपणांस चांगल्या उत्पन्नाची जमीन देवो.

परमेश्वरासमोर अशी प्रसन्नता होवो, हें आपलें ओमेर मोजणें आहे तें सुधारलें जावें. ज्यांत आपण वरील परमेश्वरच्या नामास व त्याच्या मोठेपणास, व पराक्रम व तेज व जय व मान ही तुझीं, कारण कीं जे आकाशांत व पृथ्वींत हें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य तुझें; ह्यास आपण डाग लाविला. एकावर एक अशी ही सात सप्तके जी आपण ओमेर मोजून पुरी करितों; ह्या बद्दल आमचीं सर्व पापें क्षमा कर; आमच्या सर्व अपराधाचे प्रायश्चित्त कर, आमचीं सर्व उल्लंघनें क्षमा व माफ कर. जीं पापें आपण लहानपणापासून आजदिवस पर्यंत करून डाग लाविला.

ज्याप्रमाणें इस्राएल लोकांचे प्राण सर्पाकरितां व मिसरी लोकांत राहिल्यामुळें अशुद्ध झालेले होते ते मिसरांतून निघाल्यावर जेव्हां रानांत ओमेर मोजिले, तेव्हां त्या ओमेर मोजण्याच्या मिसण्याच्या शक्तीनें शुद्ध झाले. त्याप्रमाणें तुझ्या अधिक

---

* ओमेरविषयीं लेवी अ. २३ ओ. १५--२२ पहा.

יִשְׂרָאֵל מִמִּצְרַיִם בֵּן בְּרַחֲמֶיךָ וַחֲסָדֶיךָ הָרַבִּים תְּטַהֵר אֶת נַפְשׁוֹתֵינוּ מִכָּל טוּמְאָה וְהַלְאָה שֶׁנִּרְבַּק בָּהּ · וְנִטָּהֵר וְנִתְקַדֵּשׁ בִּקְרוּשָׁה שֶׁל מַעְלָה וּכְשֵׁם שֶׁעָמַד לָהֶם לְיִשְׂרָאֵל מִצַּת הָעוֹמֶר לְמָגֵן וְצִנָּה בִּימֵי גִּדְעוֹן · וּבִימֵי יְחֶזְקֵאל · וּבִימֵי מָרְדְּכַי וְאֶסְתֵּר · לְהַכְנִיעַ אֶת אוֹיְבֵיהֶם וּתְנוּפָה נִלְחַם בָּם · כֵּן יַעֲמוֹד לָנוּ לְהַכְנִיעַ אֶת כָּל אוֹיְבֵי נַפְשֵׁנוּ וּמְבַקְשֵׁי רָעָתֵנוּ · הַפְּלֵה חַסְדֶּיךָ מוֹשִׁיעַ חוֹסִים מִמְּתַקְוְמִים בִּימִינֶךָ · עוֹרְרָה אֶת גְּבוּרָתְךָ וּלְכָה לִישׁוּעָתָה לָנוּ אָמֵן כֵּן יְהִי רָצוֹן · וַאֲעֻבּוֹר עָלַיִךְ וְאֶרְאֵךְ מִתְבּוֹסֶסֶת בְּדָמַיִךְ וָאוֹמַר לָךְ בְּדָמַיִךְ חֲיִי וָאוֹמַר לָךְ בְּדָמַיִךְ חֲיִי · בָּרְכִי נַפְשִׁי אֶת יְהוָה יְהוָה אֱלֹהַי גָּדַלְתָּ מְאֹד הוֹד וְהָדָר לָבַשְׁתָּ עוֹטֶה אוֹר כַּשַּׂלְמָה נוֹטֶה שָׁמַיִם כַּיְרִיעָה · וִיהִי נֹעַם אֲדֹנָי אֱלֹהֵינוּ עָלֵינוּ וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנָה עָלֵינוּ וּמַעֲשֵׂה יָדֵינוּ כּוֹנְנֵהוּ :

בָּרוּךְ אַתָּה יְהוָה אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם אֲשֶׁר קִדְּשָׁנוּ בְּמִצְוֹתָיו וְצִוָּנוּ עַל סְפִירַת הָעוֹמֶר : הַיּוֹם

א יוֹם אֶחָד לָעוֹמֶר : ב שְׁנֵי יָמִים לָעוֹמֶר :

ג שְׁלֹשָׁה יָמִים לָעוֹמֶר : ד אַרְבָּעָה יָמִים לָעוֹמֶר :

ה חֲמִשָּׁה יָמִים לָעוֹמֶר : ו שִׁשָּׁה יָמִים לָעוֹמֶר :

ז שִׁבְעָה יָמִים לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד :

ח שְׁמוֹנָה יָמִים לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וְיוֹם אֶחָד :

ט תִּשְׁעָה יָמִים לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וּשְׁנֵי יָמִים :

י עֲשָׂרָה יָמִים לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וּשְׁלֹשָׁה יָמִים :

יא אַחַד עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וְאַרְבָּעָה יָמִים :

יב שְׁנֵים עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וַחֲמִשָּׁה יָמִים :

יג שְׁלֹשָׁה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שָׁבוּעַ אֶחָד וְשִׁשָּׁה יָמִים :

יד אַרְבָּעָה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת :

טו חֲמִשָּׁה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וְיוֹם אֶחָד :

दयेनें व मेहेरबानीनें, जेवढ्या अशुद्धता आमच्या जिवास चिकटलेल्या आहेत, त्या आमच्या जिवास शुद्ध बनीव, व तुझ्या वरील पवित्रतेनें पवित्र कर. ज्याप्रमाणें गीदयोनच्यावेळीं, व हिज्कीयाच्या वेळांत, वयेहेजकेलच्या वेळीं, व मार्देखाय व एस्तेरच्या वेळांत ओमेर मोजण्याच्या मिसण्याच्या शक्तीनें इस्राएलांस मदत होऊन शत्रू पासून वांचविलें, या सर्वांप्रमाणें आपणा सर्व लोकांस शत्रू पासून व जे आपले वाईट पाहतात त्यांपासून आमचा जीव वांचीव तुझ्याठायीं आश्रय घेणाऱ्यास, जो तूं आपल्या उजव्या हातानें जे त्यांजबर उठतात त्यांपासून तारतोस, तो तूं आपली आश्चर्यकारक प्रेम व दया दाखीव. "तुझ्या सामर्थ्यास जागृत कर व आमचें तारण कर. परमेश्वराची मर्जी होवो अमेन." "मग मी तुजकडून जातांना तुला तुझ्या रक्तांत लोळतांना पाहिलें; तेव्हां तूं आपल्या रक्तामध्यें असतांही म्यां तुला म्हटलें, वांच; होय तूं आपल्या रक्तामध्यें असतांही म्या तुला म्हटले, वांच." "हे माझ्या जीवा, देवाचा धन्यवाद कर, हे परमेश्वरा माझ्या देवा, तूं अत्यंत थोर आहेस. तूं महिमा व प्रताप पांघरलेला आहेस. वस्त्रांनीं जसें, तसें प्रकाशानें तूं आपणाला आच्छादितोस, पडद्याप्रमाणें तूं आकाशें पसरितोस आणि प्रभू आमचा देव याची प्रसन्नता आम्हावर असो, आणि तूं आमच्या हातांचें काम आम्हावर स्थापित कर. होय, आमच्या हातांचें काम तूंच स्थापित कर."

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास आपल्या आज्ञांकडून पवित्र करणाऱ्या, आणि ओमेर मोजण्याची आज्ञा लावून देणाऱ्या, तूं धन्य आहेस. आजः—

१ एक दिवस झाला. २ दोन दिवस झाले.
३ तीन दिवस झाले. ४ चार दिवस झाले.
५ पांच दिवस झाले. ६ सहा दिवस झाले.
७ सात दिवस म्हणजे एक सप्तक झाला.
८ आठ दिवस म्हणजे एक सप्तक व एक दिवस झाला.
९ नऊ दिवस म्हणजे एक सप्तक व दोन दिवस झाले.
१० दहा दिवस म्हणजे एक सप्तक व तीन दिवस झाले.
११ अकरा दिवस म्हणजे एक सप्तक व चार दिवस झाले.
१२ बारा दिवस म्हणजे एक सप्तक व पांच दिवस झाले.
१३ तेरा दिवस म्हणजे एक सप्तक व सहा दिवस झाले.
१४ चौदा दिवस म्हणजे दोन सप्तक झाले.
१५ पंधरा दिवस म्हणजे दोन सप्तक व एक दिवस झाला.

מז שִׁשָּׁה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וּשְׁנֵי יָמִים׃

יז שִׁבְעָה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וּשְׁלֹשָׁה יָמִים׃

יח שְׁמוֹנָה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וְאַרְבָּעָה יָמִים׃

יט תִּשְׁעָה עָשָׂר יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וַחֲמִשָּׁה יָמִים׃

כ עֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁנֵי שָׁבוּעוֹת וְשִׁשָּׁה יָמִים׃

כא אֶחָד וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת׃

כב שְׁנַיִם וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וְיוֹם אֶחָד׃

כג שְׁלֹשָׁה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וּשְׁנֵי יָמִים׃

כד אַרְבָּעָה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וּשְׁלֹשָׁה יָמִים׃

כה חֲמִשָּׁה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וַאַרְבָּעָה יָמִים׃

כו שִׁשָּׁה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וַחֲמִשָּׁה יָמִים׃

כז שִׁבְעָה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שְׁלֹשָׁה שָׁבוּעוֹת וְשִׁשָּׁה יָמִים׃

כח שְׁמוֹנָה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת׃

כט תִּשְׁעָה וְעֶשְׂרִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וְיוֹם אֶחָד׃

ל שְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וּשְׁנֵי יָמִים׃

१६ सोळा दिवस म्हणजे दोन सप्तक व दोन दिवस झाले.

१७ सतरा दिवस म्हणजे दोन सप्तक व तीन दिवस झाले.

१८ अठरा दिवस म्हणजे दोन सप्तक व चार दिवस झाले.

१९ एकुणीस दिवस म्हणजे दोन सप्तक व पांच दिवस झाले.

२० वीस दिवस म्हणजे दोन सप्तक व सहा दिवस झाले.

२१ एकवीस दिवस म्हणजे तीन सप्तक झाले.

२२ बेवीस दिवस म्हणजे तीन सप्तक व एक दिवस झाला.

२३ तेवीस दिवस म्हणजे तीन सप्तक व दोन दिवस झाले.

२४ चोवीस दिवस म्हणजे तीन सप्तक व तीन दिवस झाले.

२५ पंचवीस दिवस म्हणजे तीन सप्तक व चार दिवस झाले.

२६ सव्वीस दिवस म्हणजे तीन सप्तक व पांच दिवस झाले.

२७ सत्तावीस दिवस म्हणजे तीन सप्तक व सहा दिवस झाले.

२८ अठ्ठावीस दिवस म्हणजे चार सप्तक झाले.

२९ एकुणतीस दिवस म्हणजे चार सप्तक व एक दिवस झाला.

३० तीस दिवस म्हणजे चार सप्तक व दोन दिवस झाले.

לא אֶחָד וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וּשְׁלֹשָׁה יָמִים׃

לב שְׁנַיִם וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וְאַרְבָּעָה יָמִים׃

לג שְׁלֹשָׁה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וַחֲמִשָּׁה יָמִים׃

לד אַרְבָּעָה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם אַרְבָּעָה שָׁבוּעוֹת וְשִׁשָּׁה יָמִים׃

לה חֲמִשָּׁה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת׃

לו שִׁשָּׁה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וְיוֹם אֶחָד׃

לז שִׁבְעָה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וּשְׁנֵי יָמִים׃

לח שְׁמוֹנָה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וּשְׁלֹשָׁה יָמִים׃

לט תִּשְׁעָה וּשְׁלֹשִׁים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וְאַרְבָּעָה יָמִים׃

מ אַרְבָּעִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וַחֲמִשָּׁה יָמִים׃

מא אֶחָד וְאַרְבָּעִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם חֲמִשָּׁה שָׁבוּעוֹת וְשִׁשָּׁה יָמִים׃

מב שְׁנַיִם וְאַרְבָּעִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שִׁשָּׁה שָׁבוּעוֹת׃

מג שְׁלֹשָׁה וְאַרְבָּעִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שִׁשָּׁה שָׁבוּעוֹת וְיוֹם אֶחָד׃

מד אַרְבָּעָה וְאַרְבָּעִים יוֹם לָעוֹמֶר שֶׁהֵם שִׁשָּׁה שָׁבוּעוֹת וּשְׁנֵי יָמִים׃

३१ एकतीस दिवस ह्मणजे चार सप्तक व तीन दिवस झाले.

३२ बत्तीस दिवस ह्मणजे चार सप्तक व चार दिवस झाले.

३३ तेहतीस दिवस ह्मणजे चार सप्तक व पांच दिवस झाले.

३४ चौतीस दिवस ह्मणजे चार सप्तक व सहा दिसव झाले.

३५ पसतीस दिवस ह्मणजे पांच सप्तक झाले.

३६ छत्तीस दिवस ह्मणजे पांच सप्तक व एक दिवस झाला.

३७ सदतीस दिवस ह्मणजे पांच सप्तक व दोन दिवस झाले.

३८ अडतीस दिवस ह्मणजे पांच सप्तक व तीन दिवस झाले.

३९ एकूणचाळीस दिवस ह्मणजे पांच सप्तक व चार दिवस झाले.

४० चाळिस दिवस ह्मणजे पांच सप्तक व पांच दिवस झाले.

४१ एकेचाळीस दिवस ह्मणजे पांच सप्तक व सहा दिवस झाले.

४२ बेचाळीस दिवस ह्मणजे सहा सप्तक झाले

४३ त्रेचाळीस दिवस ह्मणजे सहा सप्तक व एक दिवस झाला.

४४ चवेचाळीस दिवस ह्मणजे सहा सप्तक व दोन दिवस झाले

משיהנו ביום ד׳ ב״ ימים לחדש ניסן בשנת התשי״נ :)

כִּי שֶׁמֶשׁ וּמָגֵן יְיָ אֱלֹהִים חֵן וְכָבוֹד יִתֵּן יְיָ לֹא יִמְנַע טוֹב לַהֹלְכִים בְּתָמִים :

יְיָ צְבָאוֹת אַשְׁרֵי אָדָם בֹּטֵחַ בָּךְ :

יְיָ הוֹשִׁיעָה הַמֶּלֶךְ יַעֲנֵנוּ בְיוֹם קָרְאֵנוּ :

לַיְהוּדִים הָיְתָה אוֹרָה וְשִׂמְחָה וְשָׂשׂוֹן וִיקָר כֵּן תִּהְיֶה לַיְהוּדִים :

לַמְנַצֵּחַ לִבְנֵי קֹרַח מִזְמוֹר שִׁירוּ לֵאלֹהִים זַמְּרוּ כְּבוֹד שְׁמוֹ שְׂאוּ זַמֵּר לָרוֹכֵב בָּעֲרָבוֹת בְּיָהּ שְׂישׂוּ לְפָנָיו :

אֲבִיר יַעֲקֹב אֲשֶׁר בָּחַר לָנוּ אֶת נַחֲלָתֵנוּ אֶת גְּאוֹן יַעֲקֹב אֲשֶׁר אָהֵב סֶלָה :

אֲדֹנָי יְיָ אֲדֹנֵינוּ מָה אַדִּיר שִׁמְךָ בְּכָל הָאָרֶץ אֲשֶׁר תְּנָה הוֹדְךָ עַל הַשָּׁמָיִם :

מִפִּי עוֹלְלִים וְיוֹנְקִים יִסַּדְתָּ עֹז לְמַעַן צוֹרְרֶיךָ לְהַשְׁבִּית אוֹיֵב וּמִתְנַקֵּם :

כִּי אֶרְאֶה שָׁמֶיךָ מַעֲשֵׂי אֶצְבְּעֹתֶיךָ יָרֵחַ וְכוֹכָבִים אֲשֶׁר כּוֹנָנְתָּה :

מָה אֱנוֹשׁ כִּי תִזְכְּרֶנּוּ וּבֶן אָדָם כִּי תִפְקְדֶנּוּ :

וַתְּחַסְּרֵהוּ מְעַט מֵאֱלֹהִים וְכָבוֹד וְהָדָר תְּעַטְּרֵהוּ :

תַּמְשִׁילֵהוּ בְּמַעֲשֵׂי יָדֶיךָ כֹּל שַׁתָּה תַּחַת רַגְלָיו :

צֹאן וּבָקָר כֻּלָּם וְגַם בַּהֲמוֹת שָׂדָי :

צִפּוֹר שָׁמַיִם וְדָגֵי הַיָּם עֹבֵר אָרְחוֹת יַמִּים :

יְיָ אֲדֹנֵינוּ מָה אַדִּיר שִׁמְךָ בְּכָל הָאָרֶץ :

הַלְלוּיָהּ הַלְלוּ אֶת יְהוָה מִן הַשָּׁמַיִם הַלְלוּהוּ בַּמְּרוֹמִים :

הַלְלוּהוּ כָּל מַלְאָכָיו הַלְלוּהוּ כָּל צְבָאָיו : הַלְלוּהוּ שֶׁמֶשׁ וְיָרֵחַ הַלְלוּהוּ כָּל כּוֹכְבֵי אוֹר : הַלְלוּהוּ שְׁמֵי הַשָּׁמָיִם וְהַמַּיִם אֲשֶׁר מֵעַל הַשָּׁמָיִם : יְהַלְלוּ אֶת שֵׁם יְהוָה כִּי הוּא צִוָּה וְנִבְרָאוּ : וַיַּעֲמִידֵם לָעַד לְעוֹלָם חָק־נָתַן וְלֹא יַעֲבוֹר :

בָּרוּךְ אַתָּה יְיָ אֱלֹהֵינוּ מֶלֶךְ הָעוֹלָם עוֹשֶׂה מַעֲשֵׂה בְרֵאשִׁית :

(ואומר למנצח מזמור לדוד השמים מספרים ·

ושיר למעלות אשא עיני ואחכ״א)

תָּנוּ רַבָּנָן תָּרוֹאָה תַּמָּה בְּתִקוּפָתָהּ אוֹמֵר בָּרוּךְ עוֹשֶׂה מַעֲשֵׂה בְרֵאשִׁית וְאֵימַת חֲוֵי אָמַר אַבַּיֵי כָּל כ׳ ח שְׁנִין וַהֲדַר מַחֲזוֹר וְנָפְלָה תְּקוּפַת נִיסָן בְּשַׁבְּתָאֵי בְּאוּרְתָּא דְּתִלְתָּא נָגְהֵי אַרְבַּע :

सूर्य व चंद्र टिकत पर्यंत (लोक) पिढ्यानपिढीं तुझें भय धरतील.

हे देवा, तुझें नाम जवळ आहे, म्हणून आम्ही तुला कृतज्ञता निवेदितों; आम्ही उपकार मानून स्तुती करितों, मनुष्यें तुझीं आश्चर्यकर्में कथोत.

परंतु जे तुम्ही माझ्या नामाचें भय धरितां, त्या तुम्हांसाठीं न्यायीपणाचा सूर्य उगवेल आणि त्याच्या पंखांत निरोगी करण्याचा उपाय होईल मग तुम्ही बाहेर जाऊन गोठणींतल्या वासरांप्रमें उल्लास कराल.

आकाशाने त्याची नीति प्रगट केली आहे, आणि सर्व लोकानीं त्याचें गौरव पाहिलें आहे.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; अहो आकाशांतले, तुह्मी परमेश्वराला स्तवा; उंच ठिकाणा मध्यें त्याचें स्तवन करा. अहो त्याचे सर्व दूत, तुम्ही त्याला स्तवा; अहो त्याची सैन्यें तुम्ही त्याला स्तवा. हे सूर्या व चंद्रा तुह्मी त्याला स्तवा; अहो प्रकाशमान सर्व तारे तुम्ही त्याला स्तवा; आकाशांच्या आकाशांहो आणि आकाशांवरलें पाणी तुम्हीं त्याला स्तवा. त्यानीं परमेश्वराच्या नावाला स्तववें; कारण कीं त्यानें आज्ञा देतांच तीं उत्पन्न झालीं. आणि त्यानें त्यांस सदांसर्वकाळपर्यंत स्थापिलें; त्यानें नेम लाविला आणि तो टळत नाहीं.

हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, प्रारंभींचीं कृत्यें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

[**नंतर** למנצח מזמור לדוד השמים מספרים पृष्ठ ५६ **वरील गीत आणि** שיר למעלות אשא עיני पृष्ठ १९७ **वरील गीत बोलावें.**

आपल्या गुरुनीं असें सांगितलें आहे कीं. जो कोणी सूर्यास त्याच्या फेरीस पुनः आरंभ होतांनां पहातो. त्यानें 'प्रारंभीचीं कृत्यें करणारा धन्य असो.' असें ह्मणावें. तर हें कधीं होतें ? आवड्ये ह्मणतो, प्रत्येक अठ्ठावीस वर्षांनीं, जेव्हां सूर्याच्या फेरीला पुनः आरंभ होताना नीसान महिन्यांतील वसंत ऋतूचा योग शनि बरोबर मंगळवार दिवशीं व बुधवार रात्रीं जमतो तेव्हां.

आकाशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें ह्मणतो कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें ह्मणून शास्त्र व आज्ञा वाढवाव्या अशी ईश्वरी इच्छा झाली. जसें ह्मटलें आहे कीं, त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेम शास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील.

רַבִּי חֲנַנְיָה בֶּן עֲקַשְׁיָא אוֹמֵר רָצָה הַקָּדוֹשׁ בָּרוּךְ הוּא לְזַכּוֹת אֶת יִשְׂרָאֵל · לְפִיכָךְ הִרְבָּה לָהֶם תּוֹרָה וּמִצְוֹת · שֶׁנֶּאֱמַר יְהוָה חָפֵץ לְמַעַן צִדְקוֹ יַגְדִּיל תּוֹרָה וְיַאְדִּיר :

(ואחכ"א קדיש על ישראל דף נ"א)

יְהִי רָצוֹן מִלְּפָנֶיךָ יְיָ אֱלֹהֵינוּ וֵאלֹהֵי אֲבוֹתֵינוּ כְּמוֹ שֶׁהֶחֱיִיתָנוּ וְקִיַּמְתָּנוּ וְהִגַּעְתָּנוּ לַזְּמַן הַזֶּה לְבָרֵךְ בְּרָכָה זוֹ כֵּן תְּחַיֵּינוּ וּתְקַיְּמֵנוּ וּתְזַכֵּנוּ לְבָרְכָהּ בְּחִקּוּפוֹת אֲחֵרוֹת הַבָּאוֹת עָלֵינוּ לְשָׁלוֹם שְׂמֵחִים בִּבְנְיַן עִירֶךָ וְשָׂשִׂים בַּעֲבוֹדָתֶךָ וּתְזַכֵּנוּ לִרְאוֹת פְּנֵי מְשִׁיחֶךָ וּתְקַיִּים בָּנוּ מִקְרָא שֶׁכָּתוּב עַל יְדֵי נְבִיאֶךָ כָּאָמוּר וְהָיָה אוֹר הַלְּבָנָה כְּאוֹר הַחַמָּה וְאוֹר הַחַמָּה יִהְיֶה שִׁבְעָתַיִם כְּאוֹר שִׁבְעַת הַיָּמִים בְּיוֹם חֲבוֹשׁ יְהוָה אֶת שֶׁבֶר עַמּוֹ וּמַחַץ מַכַּתּוֹ יִרְפָּא בְּמִהֲרָה בְיָמֵינוּ אָמֵן סֶלָה :

תם ונשלם העתקת תפלת ההדש ·
שבח לאל אשר עזרני במלאכת הקדש .
והוא אשר גדול העצה ונאזר בגבורה ·
ברוב הסדיו עוד יהיה לי לעזרה :

[ह्या नंतर קדיש על ישראל म्हणावा. पृष्ठ ५१]

हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन हा धन्यवाद आम्ही करावा म्हणून ज्याप्रमाणें तूं आम्हास या वेळपर्यंत जीवंत राखिलेंस, रक्षिलेंस व पोहोंचविलेंस, त्याप्रमाणें सूर्याच्या आणखी फेऱ्या आम्हांवर शांतीनें येऊन आम्ही हा धन्यवाद करावा. तुझें नगर बांधलें जाऊन आम्ही आनंद करावा, आणि तुझ्या सेवेंत आम्हो हर्ष करावा, म्हणून आम्हास जीवंत राख, आमचें संरक्षण कर आणि आमचे अंगीं योग्यता दे; आणि तुझ्या अभिषिक्ताचें मुख पहाण्याची योग्यताहि आमचे अंगीं दे. आणि तुझ्या भविष्यवाद्याच्या हातून जें वाक्य लिहिलें आहे, तें वाक्य आम्हावर स्थापन कर. जसें म्हटलें आहे कीं, जेव्हां परमेश्वर आपल्या लोकांचा भंग नीट बांधील, आणि त्यांच्या क्षताचा व्रण बरा करील, तेव्हां चंद्राचा प्रकाश सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें होईल, आणि सूर्याचा प्रकाश सातपट जसा सात दिवसांचा प्रकाश तसा होईल. याप्रमाणें लवकर आमच्या दिवसांत होवो. तथास्तु. सेलाह.



टीका २०. (पृष्ठ ३५३)

नाम पालटणें.

ही नांव पालटण्याची रीति विशेषें करून आब्राहाम व सारा यांजवरून निघाली. तीं उभयतां ईश्वराच्या सांगण्याप्रमाणें आपला देश सोडून दुसऱ्या देशीं राहावयास गेलीं, म्हणजे त्यांनीं स्थलांतर केलें, आब्राहामाचें पहिलें नांव आब्राम पालटून त्यास आब्राहाम असें नांव मिळालें, आणि साराचें पहिलें नांव साराय पालटून तिजला सारा हें नांव मिळालें, याप्रमाणें त्यांचें नामांतर झालें; आणि त्या उभयतांनीं ईश्वरावर प्रीति करून व त्याचें भय धरून मुर्तीपुजन व दुराचरण सोडिले आणि सदाचरणानें वर्तू लागलीं म्हणजे त्यांनीं कर्मांतर केलें. यामुळें त्यांचें भाग्य पालटलें आणि अनेक संकटांतून मुक्त होऊंनं तीं ईश्वर दयेस पात्र झालीं. यावरून सुज्ञजनानीं असें सिद्ध केलें आहे कीं, स्थलांतर किंवा नामांतर किंवा कर्मांतर केल्यानें सकटांतून मुक्तता व ईश्वरी कृपा होते. या शिवाय गीत १०७ ओ. ६, १३, १९ व २८ एथें लिहिल्याप्रमाणें प्रार्थना केल्यास सकटांतून मुक्तता होते. आणि नीति अ. १० ओ. २ व अ. ११ ओ. ४ एथें लिहिल्याप्रमाणें "न्यायत्व" अथवा राब्बी लोकांच्या मत्ता प्रमाणें "दानधर्म मरणापासून मुक्त करिते." (गेमारा रोशहाश्शाना पृष्ठ १६ ब.)

(पृष्ठ १९ ओ. २९ एथील राहिलेली टीका.)

मारा.

इस्त्राएल लोक मिसरांतून निघाल्यावर जेव्हां ते मारा एथे आले, तेव्हां त्यांनीं अन्ना करितां कुरकुर केली. यावरून ईश्वर त्यास आकाशांतून 'मान' देऊं लागला. हे मान शाब्बाथ दिवशीं पडत नसे. आणि ईश्वरी आज्ञेप्रमाणें सातव्या दिवशीं गोळा न करतां साहाव्या दिवशीं त्यानी दोन दिवसापूर्ते जरी गोळा केलें तरी तें नासत नसे. याप्रमाणेही शाब्बाथाची आज्ञा सीनाय पर्वतावर दाहा आज्ञा मिळण्यापूर्वी मारा एथें लावून दिलेली आहे. निर्गम अध्याय १६ पहा.

हा त्याचा आवेश शास्त्रांत लिहिलेल्या त्याच्या चरित्रांतील अनेक गोष्टींवरून स्पष्ट दिसून येतो.

टीका १६. (पृष्ठ २८१)

एकूथीएल.

एकूथीएल हा मोशे. हें नांव त्याच्या आईनें मी ईश्वरावर आशा ठेवितें, असें म्हणून त्यास दिलें.

टीका १७. (पृष्ठ २८१)

शित्तिमांत केलेलें प्रायश्चित.

इस्राएल शित्तिमांत असतां मोआबाच्या कन्यांशी व्यभिचार करून "बाआल पेओरासीं" ते जडले, तेव्हां सालुचा पुत्र जिम्री व सुराची कन्या कोसबी या उभयतांस पिनहासानें भाल्यानें भोंसकून मारिलें आणि ईश्वराचा राग शमविला. गणना अ० २५.

टीका १८. (पृष्ठ २८१.)

एलीयाहू भविष्यवाद्याने पाहिलेल्या बारा पिढ्या.

मोशेचे दिवसांपासून आहाब राजाचा पुत्र आहाजिया राजा याचे दुसऱ्या वर्षी एलिया वावटळींतून चढून जाईपर्यंत बारा पिढ्या झाल्या.

टीका १९. (पृष्ठ ३४६.)

"योहाख" नामे देवदूत.

एथें भाषांतर करितांना "परमेश्वराचा दूत मला रक्षील" इत्यादि लिहिलें आहे; परंतु इब्रीप्रमाणें יוהך "मला रक्षील" असें आहे. יוהך हें त्या दुताचें नाम आहे. हें नाम כי מלאכיו יצוה לך म्हणजे "(तुला तुझ्या सर्वमार्गीं रक्षिण्या करितां) तो आपल्या दुतांस आज्ञा करील" या इब्री चार शब्दाच्या शेवटच्या चार अक्षरांकडून होतें.

ह्याप्रमाणें ही भविष्य कथानांतील भाग वाचण्याची चाल पडली आहे. आणि ह्या संकटाची व त्यांतून ईश्वराच्या दयेकरून मुक्त होण्याची सर्वांनी आठवण ठेवावी ह्मणून ती चाल अजून चालू शास्त्र नंतर त्याच विषयासंबधीं भाग भविष्य कथानांतून वाचितात.

टीका १४ (पृष्ठ २८१.)

एलीयाहु भविष्यवादि.

या गीतांतील पहिलें व दुसरें वाक्य एलीया भविष्यवादि हाच एलआझार याजकाचा पुत्र पिनहास असें समजून लिहिलें आहे. गणना अ० २५ ओ० ११ एथें ईश्वर स्वतः म्हणतो कीं, पिनहास याने माझा आवेश धरून माझा कोप त्यावरून (इस्राएलांवरून) फिरविला; आणि १ राजे अ० १९ ओ० १० व १४ एथे लिहिल्या प्रमाणे एलीयाहु भविष्यवादि हा होरेब डोंगरावर असतां परमेश्वराचें वचन त्याजकडे येऊन जेव्हां ह्मणाले कीं, एलीया तुझें एथें काय ? तेव्हां त्यानें म्हटलें "सैन्याचा देव परमेश्वर याचा मी मोठा आवेश धरीत आलों." या सारखेपणावरून, आणि गणना अ० २५ ओ० १२ एथें लिहिल्याप्रमाणें परमेश्वराने पिनहास बरोबर आपला शांतीचा करार केला. आणि मलआखी अ० ३ ओ० २४ एथें लिहिल्याप्रमाणें एलीया भविष्यवादी हा "बापाचें हृदय लेंकरांकडे आणि लेंकरांचे हृदय त्यांच्या बापाकडे" फिरवून त्यांमध्यें शांति करण्यास नेमिलेला आहे यावरून आणि पिनहासाचा मृत्यु शास्त्रांत कोठेंच लिहिलेला सांपडत नाहीं या व दुसऱ्या कांहीं कारणावरून कित्येक टीकाकार पिनाहास हाच एलीया भविष्यवादी असें मानितात.

टीका १५ (पृष्ठ २८१.)

एलिया भविष्यवाद्याचा ईश्वरी नामाचा आवेश.

पाहिले राजे अ० १९ ओ० १० व १४ एथें लिहिल्याप्रमाणे एलीया भविष्यवाद्याने सैन्याचा देव परमेश्वर ह्याचा मोठा आवेश धरिलां होता.

"घडिलें" या शब्दाप्रमाणें धरून "सदांसर्वकाळ परमेश्वरावर भाव ठेवा काकीं प्रभु जो परमेश्वर याने יה या अक्षरांच्या योगेकरून जगतें उत्पन्न केलीं." म्हणजे ה या अक्षराच्या योगें करून हें जग व ו या अक्षराच्या योगें करून पुढील जग उत्पन्न केलें. याप्रमाणें शास्त्रांतील वाक्यांचा अर्थ बहुदा कब्बाला म्हणजे इस्राएलांची योग साधन विद्या इजमध्यें केलेला आढळतो.

टीका १३. (पृष्ठ २२९)

हाफतारा ह्मणजे भविष्य कथनांतील भाग वाचण्याचे कारण.

शास्त्र वाचल्यानंतर भविष्य कथनांतून जो भाग वाचितात, त्यास הפטרה म्हणजे शेवट असें म्हणतात. आणि तो वाचण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वीपासून शाब्बाथ दिवशीं व सणाच्या दिवशीं शास्त्रांतील भाग अनुक्रमानें वाचण्याची रीत आहे. परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराचा संस्कार झाल्यावर ३४९ व्या वर्षीं आरामाचा राजा अनतिओकोस याने येरूशालेमेवर स्वारी करून तिच्या सभोंवतें तळ धरिला आणि शाब्बाथ दिवशीं सर्व इस्राएल ईश्वरी भजनांत व धर्मकृत्यांत गुन्तलेले पाहून त्यानें हल्ला केला आणि नगरास आग लाऊन व लुटून लोकांचा वध केला या शिवाय त्याने अशी आज्ञा केली कीं, कोणी इस्राएलानें सुंता करूं नये, शाब्बाथ दिवस पाळूं नये आणि शास्त्र वाचूं नये; त्याच्याच देवाचें मात्र भजन करावें. यद्यपी बहुतेक पुरुषांनीं व स्त्रियांनीं त्या आज्ञा मानिल्या नाहींत आणि आपल्या धर्मावरील दृढ विश्वास दाखविल्या वरून तीं आपल्या जिवास मुकलीं. त्या दुष्टाच्या हातीं ज्या शास्त्राच्या प्रति सांपडल्या त्या सर्व त्यानें फाडून व जाळून टाकिल्या. असें झाल्यावरून इस्राएलांस शाब्बाथ दिवशीं शास्त्र वाचावयास न सांपडेल असें झाले; ह्मणून त्यानीं असें ठरविलें कीं, शाब्बाथ दिवशीं शास्त्राचा जो भाग वाचावयाचा असेल त्यांतील विषयाप्रमाणेंच भविष्य कथनांत जो भाग असेल तो वाचावा. हा जुलूम सहन होत नाहीं म्हणुन मतातया मुख्य आचार्य व त्याचे पांच पुत्र यांनीं ईश्वरी नामाचा आवेश धरून त्याशीं लढले व त्याचा पराजय केला.

अडचण न पडावी, यासाठीं दिव्यांत कशाची वात लावावी आणि कोणतें तेल घालावें हें व शाब्बाथास आरंभ झाल्या अगोदर कोणत्या गोष्टी करणें अवश्य आहे हेंही त्यांत सांगितलें आहे.

टीका ११. (पृष्ठ १८३)

סברי מרנן

द्राक्षरसाच्या प्याल्यावर धन्यवाद करितांना हाज्जान סברי מרנן ह्मणजे " आमच्या गुरूच्या मताप्रमाणें " असें ह्मणतो. व मंडळी त्यास उत्तर करून לחיים ह्मणजे "जीवनाकरितां" असें ह्मणते. हें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वी अपराधी मनुष्यास जेव्हां धोंडमार करावयास नेत, तेव्हां त्याला शुद्धी न रहावी म्हणून त्याला एक द्राक्षारसाचा प्याला प्यावयास व थोडा उद श्वास घेण्यास देत असत. त्या साारखा हा प्याला मरणाचा नव्हे; तर जीवनाचा आहे, असा भेद दाखविण्याकरितां असें म्हणतात.

टीका १२. (पृष्ठ १८३)

ईश्वरी יה नावांतील अक्षरांच्या सामर्थ्यानें जगताची उत्पति.

पृथ्वी व आकाश यांस उत्पन्न करतांना (देवानें) त्यांस आपल्या नामांतील " ה " या अक्षराच्या सामर्थानें उत्पन्न केलें असें जें लिहिलें आहे तें यशाया अ. २६ ओ. ४ בטחו בי עדי עד כי ביה יי צור עולמים या वाक्याच्या आधारानें लिहिलें आहे. या वाक्याचा अर्थ साधारण रीतीनें केला असतां "सदांसर्वकाळ परमेश्वरावर भाव ठेवा; कांकीं प्रभु जो परमेश्वर याच्याठायीं सर्व काळचा आश्रय आहे." असा होतो, परंतु गेमारा मेनाहोथ पृष्ठ २९ ब. एथे दोन राब्बी लोकांच्या मताप्रमाणें निरानिराळे अर्थ केले आहेत. एकानें עולמים या शब्दाचा अर्थ " जगतें " असा धरून "सदासर्वकाळ परमेश्वरावर भाव ठेवा; कांकीं प्रभु जो परमेश्वर याच्याठायीं या जगीं व पुढल्या जगींहि आश्रय आहे" आणि दुसऱ्याने ביה या शब्दांतील ב उपसर्गाचा अर्थ "योगें करून" आणि צור या शब्दाचा अर्थ יצר म्हणजे

असें कीं, " माझ्या हातानें पृथ्वीचा पाया घातला आणि माझ्या उजव्या हातानें आकाशें विस्तारिलीं. " ह्मणजे आकाश आणि पृथ्वी हीं एकदांच उत्पन्न झालीं.

टीका ९. (पृष्ठ ८३)

विनवणी न करावयाचे दिवस.

ज्या दिवशीं पाहांटेच्या व तिसऱ्या प्रहरच्याहि प्रार्थनेत विनवणी करीत नाहींत ते हे:—शाब्बाथ, प्रतिपदा, अवघा नीसान महिना, सीवान महिन्यात प्रतिपदे पासून तेराव्या तारखे पर्यंत, वर्ष प्रतिपदेचा आदला दिवस, प्रायश्चित्ताच्या आदल्या दिवसापासून त्या महिन्याच्या शेवट पर्यंत, हानुक्का पुरीम, पहिल्या आदार महिन्याची चौदावी व पंधरावी तारीख, वनस्पतीची वर्ष प्रतिपदा, लागलाओमेर ह्मणजे पेसाहचा पहिला दिवस सोडून तेहेतीसावा दिवस, तिशआबेआब, आणि आब महिन्याची तारीख १५.

ज्या दिवशीं तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेत मात्र विनवणी करीत नाहींत ते हे:—शुक्रवार, प्रतिपदेचा आदला दिवस, तिशआबेआबचा आदला दिवस. आणि हानूक्क्याचे व पुरीमचे आदले दिवस.

जर सुंता असली अथवा नवरा प्रार्थनेचे वेळीं हजर असला तर, आणि सुतक्याचे घरीं सात दिवस विनवणी करीत नाहींत.

जर मंडळीच्या उपासाच्या दिवशीं सुंता असली तर विनवणीतील बहुतेक भाग वाचून शेवटीं והואरחום पासून जो भाग आहे तो सोडतात.

ज्या दिवशीं विनवणी वाचयाची नसते किंवा त्यातील शेवटला भाग सोडायाचा असतो, त्या दिवशीं त्या बद्दल पृष्ठ १४४ मधील יהוה מבורך יהי שם हीं तीन वाक्यें बोलतात.

टीका १०. (पृष्ठ १६३

במה מדליקין

हा मिशनांतील एक अध्याय आहे. शास्त्रांत सांगितल्या प्रमाणें शाब्बाथ दिवशीं अग्नि पेटवूं नये; ह्मणून त्या रात्रीं दिवा विझून

ओवींत तिजविषयीं उघडपणें सांगितल्या वरून ती पुनः मोहोगम पदांत मोजली जाते; ह्मणजे ती विधवा झाली असतां, अथवा तिला नवऱ्यानें घालविली असतां, आपल्या बापाच्या घरीं राहते, तर तिनें अर्पणांतून खावें.

१२ הלמד מענינו ומסופו मूळ विषयावरून आणि शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणें.

मूळ विषयावरून अनुमान करणें. उदाहरण. लेवीय २१ : १२, " आणि या (उपाध्यानें) पवित्रस्थानांतून जाऊं नये. " या वाक्यावरून असा अर्थ होतो कीं, उपाध्यानें पवित्रस्थान सोडून कोठें जाऊं नये. परतुं या वाक्याचा मूळ विषय ११ व्या ओवींत सांगितला आहे; ह्मणजे त्यानें कोणतेहि मेलेल्याचे शरिराजवळ जाऊं नये. आपला बाप किंवा आपली आई यांचेहि त्यानें विटाळ घेऊं नये. यावरून असें अनुमान होतें कीं त्यानें मात्र कोणाचा विटाळ घेण्यासाठीं पवित्र स्थानांतून जाऊं नये.

शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून करणें. उदाहरण. लेवीय १८ :६- " तुह्मांतील कोणी एकानें आपल्या नातलगाचें गुह्य उघडे करावयास जवळ जाऊं नये." (म्हणजे कोणत्याहि नातलगांबरोबर लग्न करूं नये.) परंतु मागाहून ज्या ज्या नातलगांबरोबर लग्न करूं नये. त्यांची नावें स्पष्ट सांगितलीं आहेत ह्मणून त्या खेरीज दुसऱ्या नातलगांबरोबर लग्न करायास अडथळा नाहीं.

१३ ושני כתובים המכחשים जर दोन वाक्यांचा अर्थ एक प्रत्येका विरुद्ध असला तर तिसरे वाक्या वरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा. उदाहरण. उत्पत्ती १ : १ " प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी यांस उत्पन्न केलें. " या वाक्यावरून पहिल्यानें आकाश व मागाहून पृथ्वी उत्पन्न झाली असें अनुमान होतें; आणि उत्पत्ती २ : ५, " ज्या काळीं परमेश्वर देव याने पृथ्वी व आकाश यांस उत्पन्न केलें, इ० " या वाक्यावरून पहिल्यानें पृथ्वी व मागाहून आकाश उत्पन्न झालें असें अनुमान होतें. या दोन वाक्यांचा अर्थ एक प्रत्येका विरुद्ध आहे; ह्मणून यशाया ४८. १३ या तिसऱ्या वाक्यावरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा; तें वाक्य

१०. ו׳ל׳ט אחר שלא כענינו जें कांहीं मोहोगम पदांत असून त्यापासून निराळा सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो. उदाहरण. निर्गम २१ : २, "जर तूं इब्री चाकर (ह्मणजे पुरुष किंवा स्त्री) विकत घेतोस, तर त्यानें सहा वर्षें चाकरी करावी, परंतु सातव्या वर्षीं तो फुकट मोकळा व्हावा." परंतु त्याच अध्यायाच्या सातव्या ओवींत असें आहे कीं, "जेव्हां कोणी आपली कन्या चाकरीण होण्यास विकितो, तेंव्हां जसे चाकर निघतात तसें तिनें न निघावें. "यांतील पहिले वाक्यांत चाकर व चाकरीण या दोहो विषयीं "चाकर" हें मोहोगम पद आहे. कारण अनुवाद १५ : १२ एथेंहि त्या दोघांविषयीं उघडपणें तसेंच सांगितलें आहे कीं, "जर तुझा भाऊ इब्री किंवा इब्रीण तुला विकली जाते, तर तशानें तुझी चाकरी सहा वर्षें करावी, मग सातव्या वर्षीं तूं त्याला मोकळें करून आपणाजवळून सोड." असें असतां निर्गम २१ : ७ या वाक्यांत चाकरीणाविषयीं मात्र निराळा सिद्धांत ठरविला आहे. यावरून त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो, ह्मणजे जर तिचा स्वामी मरण पावला, तर ती सहा वर्षें भरल्या अगोदरहि सुटूं शकतें परंतु ती तारूण्यावस्थेंत आल्यावर तिचा स्वामी तिला जाऊं न देतां तिजशीं लग्नहि करूं शकेल.

११. ויצא לרון ברבר חרש जें कांहीं मोहोगम पदांत असून नवी गोष्ट ठरविण्या करितां पुन्हां निराळेंच दाखविलें असतें, त्याविषयीं उघडपणें सांगितल्यावांचून तें पुनः मोहोगम पदांत मोजले जात नाहीं. उदाहरण. लेवीय २२ : ११, "जर याजक कोणाला विकत घेतो, तर तो त्याच्या पैक्याचा माल आहे; आणि त्यानें तें (पवित्र पदार्थ) खावें, आणि त्याच्या घरीं जन्मलेले यांनींही त्याचें अन्न खावें." या वाक्यांत "घरीं जन्मलेले" असें आहे. ह्मणून त्याच्या कन्येचें लग्न झालें नसतां व असतांहि तें खावें असा अर्थ होतो. आणि त्याच अध्यायाच्या १२ व्या ओवींत अशी नवी गोष्ट ठरविली आहे कीं, याजकाची कन्या जर परक्यांतल्या नवऱ्याला दिलेली आहे तर तिनें पवित्र अर्पणांतून खाऊं नये; ह्मणजे लग्नानंतर कधींच खाऊं नये. परंतु या नियमांत सांगितल्याप्रमाणें १२ व्या

आहे, कारण त्या वाक्यावरून असें समजलें पाहिजें कीं, कोणत्याहि दोन जातीची श्वापदें एकत्र लावून नांगरूं नये.

८. יצא מן הכלל ללמד जें कांहीं मोहोगम पदांत असून विशेष-पदांत निराळेंच दाखविलेलें असतें, त्या विशेष पदाविषयीं जें सांगितलेलें असतें, तें त्या विशेष पदाविषयीं मात्र नसतें; परंतु मोहोगम पदासहि तें लागू होते. उदाहरण. लेवीय २२ : २, "जो कोणी आपलें कांहीं संतान मोलेखाला देईल, त्याला मारावेंच मारावें, देशांतल्या लोकांनीं त्याला धोंड-मार करावा." जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्यां विषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांतील हें एक आहे. परंतु "मोलेखाला देईल" हें विशेष पद निराळेंच दाखविलें असून त्या विषयीं "धोंडमार करावा" असें सांगितलें आहे. या वरून धोंडमार करणें हा शिक्षेचा प्रकार, जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्यां विषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांसहि लागू होतो.

९. יצא לטעון טעון जें कांहीं मोहोगम पदांत असून पुनः त्या विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविण्या करितां निराळे दाखविलें असतें, त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो, उदाहरण. लेवीय २४: २१, "जो मनुष्याला मारील, त्याला मारावेंच मारावें" परंतु अनुवाद १९ : ५, एथें पुनः त्याच विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाख-विलें आहे. तें असें कीं, जर कोणी लाकडे कापायास आपल्या शेजाऱ्या-संगती जातो, आणि लाकूड तोडायास आपल्या हातानें कुऱ्हाड मारितांना लोखंड दांड्यातून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, तर तशानें (आश्रयाच्या) एका नगरांत पळून जाऊन जगावें." पहिलें वाक्य मोहोगम असल्यामुळें जाणून किंवा न जाणून खून करणारा मरावा असा अर्थ होते[1]. परंतु मागल्या वाक्यांत "लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, ह्मणजे न जाणून तो मरतो" हा त्या विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविला अहे; ह्मणून त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो, ह्मणजे तो न मरावा परंतु त्यानें आश्रयाच्या एका नगरांत पळून जाऊन जगावें.

६. כלל ופרט וכלל पहिल्यानें मोहोगम पद, मग विशेष पद आणि पुनः मोहोगम पद असल्यास, विशेष पदाप्रमाणें त्याचा अर्थ करावा. उदाहरण. निर्गम २२:८, "प्रत्येक अपराधाच्या गोष्टीविषयीं, गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं, कांहीं हरपलेल्याविषयी, हें आपलें असें कोणी म्हणतो, तर त्याविषयीं दोघांचा वाद न्यायाधिशाजवळ जावा; ज्यास न्यायाधिश अन्यायी ठरवितील, त्याने आपले शेजाऱ्याला दुप्पट मोल भरून द्यावें." या वाक्यांत पहिल्यानें "प्रत्येक अपराधाच्या गोष्टीविषयीं" हें मोहोगम पद मग "गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं" हीं विशेष पदें आहेत; आणि "कांहीं हरपलेल्यांविषयीं" हें पुन्हा मोहोगम पद आलें; यावरून गुरूं, गाढव, शेरडूं, पांघरूण इत्यादिक जे हरपण्या जोगे पदार्थ आहेत, त्यांविषयीं मात्र न्यायाधिशांनी चौकशी करावी; ज्यास न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्यानें आपल्या शेजाऱ्याला दुप्पट मोल भरून द्यावें. हा निवाडा जमीन, चाकर इत्यादिक न हरपण्यासारिखे पदार्थ आहेत त्यांस लागू नाहीं, आणि लेख यांसहि लागू नाहीं; कारण तें प्रमाणासाठीं मात्र असतात.

७. כלל שהוא צריך לפרט ज्या मोहोगम पदाच्या विशेष पदाचें अगत्य आहे. उदाहरण. निर्गम १३:२, "तूं प्रत्येक ज्येष्ठ मजसाठीं पवित्र कर" या इब्री वाक्यांत ज्येष्ठ एवढेंच मात्र आहे. या वरून ज्येष्ठ पुत्र अथवा ज्येष्ठ कन्या असल्यासहि देवासाठीं पवित्र करावी असा अर्थ होईल; परंतु तेथें विशेष पदाचें अगत्य आहे, कारण तें ज्येष्ठ पुत्रांविषयीं मात्र झटलें आहे.

८. ומפרט שהוא צריך לכלל ज्या विशेष पदाच्या मोहोगम पदाचें अगत्य आहे. उदाहरण. अनुवाद २२:१० "बैल व गाढव एकत्र लावून तूं नांगरूं नको." या वाक्यांत बैल व गाढव हीं विशेष पदें आहेत; म्हणून मात्र बैल गाढव या दोन जातीचीं जनावरें एकत्र लावूं नये असा अर्थ होईल; परंतु तेथें मोहोगम पदाचें अगत्य

३. מבנין אב וכתוב אחר एका वाक्यांतील मूळ विषय दुसऱ्यास लागू करणें. उदाहरण निर्गम १२:१६. "आणि तुम्हास पहिल्या दिवशीं पवित्र मेळा व सातव्या दिवशीं पवित्र मेळा व्हावा; त्यां मध्यें कांहीं काम करावयाचें नाहीं, केवळ जें प्रत्येक मनुष्यानें खावें तें मात्र तुम्ही करावें." परंतु जरी जेवणाचें काम करावयास या एका वाक्यांतच आणि पेसाच्या सणाविषयीं मात्र सांगितलें आहे, तरी हा मूळ विषय दुसऱ्या सणाच्या दिवसांसही लागू आहे.

מבנין אב ושני כתובים दोन वाक्यांतील मूळ विषय एक प्रत्येकांस लागू करणें. उदाहरण. लेवीय २१:१८–२०, येथें उपाध्यांस ज्या खोडी नसाव्या त्या सांगितल्या आहेत. आणि २२:२२, एथें अर्पणाच्या गुरांस अथवा शेरडांस ज्या खोडी नसाव्या त्या सांगितल्या आहेत. यांतील ज्या उपाध्यांच्या खोडी गुरांविषयीं किंवा शेरडांविषयीं सांगितल्या नाहींत, आणि ज्या गुरांच्या किंवा शेरडांच्या खोडी उपाध्यांविषयीं सांगितल्या नाहींत, त्या या नियमावरून एक प्रत्येकांस लागू आहेत.

४. כלל ופרט पहिल्यानें मोहोगम पद असून मग विशेष पद असलें, तर विशेष पदाचा मात्र अर्थ धरावा. उदाहरण. लेवीय १:२, "जर तुमच्यांतला माणूस परमेश्वराला पशूंतल्याचें अर्पण करील, तर तुम्ही अर्पलें अर्पण गुरांचें किंवा शेरडांचें करा." या वाक्यांत पहिल्यानें "पशू" हें मोहोगम पद असून मागाहून "गुरें आणि शेरडें" हीं विशेष पदें आहेत; म्हणून "गुरें आणि शेरडें" हींच अर्पावीं असा अर्थ होतो.

५. כלל ופרט जर पहिल्यानें विशेष पद आणि मागाहून मोहोगम पद असलें, तर मोहोगम पदाचा अर्थ धरावा. उदाहरण अनुवाद २२:३ "आणि त्याच्या गाढवांविषयीं तसें कर; त्याच्या वस्त्रांविषयीं तसें कर; आणि तुझ्या भावाचें जें कांहीं हरवलेलें म्हणजे त्यापासून गाहाळलेलें असतां तुला सांपडतें, त्याविषयीं तसें कर." या वाक्यांत पहिल्यानें "गाढव आणि वस्त्र" हीं विशेष पदें आहेत. आणि मागाहून जें कांहीं हरवलेलें हें मोहोगम पद आहे, म्हणून सर्व पदार्थांविषयीं तसें करावें; म्हणजे ज्याचें त्यास परत करावें असा अर्थ होतो.

टीका ८. (पृष्ठ ५०.)

शास्त्राचा अर्थ करण्याचे रिब्बी इश्माएलाने लावून दिलेले तेरा नियम.

१. קל וחומר लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टी विषयीं; आणि मोठ्या गोष्टी वरून लहान गोष्टी विषयीं अनुमान करणे. लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टी विषयीं अनुमान करणे. उदाहरण. गणना अ० १२, ओ० १४. "तिचा बाप तिच्या तोंडावर थुंकलाच (रागें भरला) असता, तर ती सात दिवस न लाजती कीं काय ? तिला सात दिवस छावणी बाहेर घालून प्रतिबंध व्हावा आणि मग तिला घ्यावे." यावरून जर बापाच्या रागामुळें सात दिवस छावणी बाहेर राहावें लागतें, तर ईश्वराचा राग झाला असतां खचितच सर्व काळपर्यंत त्याच्या लोकांबाहेर राहावें लागेल, असें अनुमान करितां येतें.

मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टी विषयीं अनुमान करणें. उदाहरण. उत्पत्ति ४४:८ "जो पैका आह्मांस आमच्या गोणीच्या तोंडी सांपडला, तो आह्मी खनान देशाहून परत आणिला; तर तुझ्या धन्याच्या घरांतून रुपें अथवा सोनें आह्मी कसें चोरूं ?" जर त्यांनी मोठ्या लाभावर दृष्टी दिली नाहीं, तर खचितच त्यानीं अल्प लाभावर दृष्टी दिली नसेल असें अनुमान होतें.

२. גזרה שוה सारखेपणावरून अनुमान करणें. उदाहरण. लेवीय २१:५, "त्यांनी आपल्या डोक्यावर टक्कल करूं नये;" आणि अनुवाद १४:१, (तुम्ही) "मेलेल्यामुळें फांसण्या करून घेऊं नका, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका." या वाक्यांतील पहिलें उपाध्या-विषयीं मात्र, आणि दुसरें सर्व इस्राएल लोकांविषयीं आहे. या दोहीं वाक्यांमध्यें "टक्कल करूं नये" हा सारखेपणा असल्यामुळें, असें अनुमान होतें कीं, जरी इस्राएलांस "दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" असें मात्र सांगितलें आहे, तरीं त्यांनीं सर्व डोक्यावर टक्कल करूं नये असें अनुमान होतें. आणखी जरी इस्राएलांस मात्र सांगितलें आहे कीं, (तुह्मी) "मेलेल्यामुळें आपल्या दोहीं डोळ्याच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" तरी त्या वाक्यांच्या सारखेपणावरून असें अनुमान होतें कीं, उपाध्यानींही मेलेल्यामुळें फांसण्या करून घेऊं नये आणि आपल्या दोहीं डोळ्याच्या मध्यभागीं टक्कल करूं नये.

קציעה तज; या पदार्थामध्यें व दालचिनीमध्यें फारसा भेद नाहीं; कित्येक हे दोन्ही पदार्थ एकच असें मानितात; परंतु तज हा दालचिनी पेक्षां जाड असून सुवासही थोडा निराळा आहे.

שבלת נרד जटांमांशी; या पदार्थाच्या नांवावरून असा कांहीं भास होतो कीं, हा पदार्थ केंसाच्या जटांसारिखा असावा, आणि तो कांहींसा तसा दिसतो. हें एक प्रकारचें सुगंधी गवत आहे.

כרכם केशर.

קשט कोष्ट; या पदार्थाचें नांव इब्री, इंग्लिश व मराठी या तिन्ही भाषेंत सारखेंच आहे. इंग्लिश भाषेंत त्यास कास्टस असें ह्मणतात.

קלופה या पदार्थाची अलिकडे पूर्ण माहीती नाहीं. या अकरा सुगंधाचा प्रकार משנה मधील כריתות या अध्यायांत सांपडतो. याजवर टिका करणारांची या קלופה पदार्थाविषयीं निरनिराळीं मतें आहेत. परंतु त्याच्या इब्री नांवावरून असें समजून येतें कीं, ती एका सुगंधी झाडाची साल असावी. हा पदार्थ आगरू आहे असेंहि कित्येक मानितात.

קנמון दालचीनी; या पदार्थाविषयीं तज या पदार्थावर केलेल्या टिकेंत सांगितलें आहे.

टीका. ७ (पृष्ठ ४६)

מי רגלים

מי רגלים या शब्दाचा अर्थ मूत्र असाही होतो; परंतु एथें हा अर्थ लागत नाहीं. एथें "मे रगलाइम" झऱ्याचें पाणी असा अर्थ होतो. हा झरा दोन डोंगराच्यामधील खिंडींतून वाहात होता, ह्मणून त्यास 'मे रगलाइम' म्हणजे मूत्र झरा असें नांव दिलें होतें. या झऱ्याचें पाणी सुगंधी द्रव्यें तयार करण्याच्या कामास उपयोगी होते. परंतु त्या झऱ्यास मूत्र झरा असें नांव होतें ह्मणून या अमंगळ नांवावरून तें पाणी पवित्र मंदिरांत आणित नसत.

टीका ५. (पृष्ठ २०.)

शाब्बाथ दिवशीं मना केलेलीं मुख्य एकुणचाळीस कामें.

मिशना शाब्बाथ अ. ७ एथें शाब्बाथ दिवशीं न करावयाचीं ३९ मुख्य कामें सांगितलीं आहेत तीं येणें प्रमाणें:—पेरणें, नांगरणें, कापणी करणें, पेंढया सांठविणें, मळणी काढणें, झडपणें, चाळणें, दळणें, पीठ चाळणें, पीठ मळणें, भागणें, लोंकर कांतरणें, लोंकर धुणें, पिंजणें, रंगविणें, सूत कांतणें, गुंडाळणें, दोन कांड्या करणें, दोन तंतु विणणें, दोन तंतु तोडणें, गांठ मारणें, गांठ सोडणें, दोन टाचें मारणें, दोन टांचे मारण्यासाठीं फाडणें, हरणाची पारध करणें, तें कापणें, त्याचें कातडें काढणें, कातडें खारविणें, कातडें हुरपळणें, तें रंगाविणें, तें फाडणें, दोन अक्षरें लिहिणें, दोन अक्षरें लिहिण्याकरितां खरडून काढणें, बांधकाम करणें, पाडणें, विस्तू विझविणें, विस्तू पेटविणें, हातोडीनें ठोकणें, व कांहीं एक पदार्थ एका हद्दींतून दुसऱ्या हद्दींत नेणें.

टीका ६. (पृष्ठ ४१.)

सुगंधाचा प्रकार.

צרי या पदार्थास נטף असेंही आणखी इब्री नाम आहे. हा पदार्थ या देशांत उत्पन्न होत नाहीं; ह्मणून त्यास मराठी नांम सांपडत नाहीं. त्यास "रोगानें बलासान" या अरबी नांवावरून ओळखतात. बलासान या नांवाचे आणखीही पदार्थ आहेत, परंतु हा पदार्थ मात्र अरबस्थानाच्या उत्तर प्रांतांकडून येतो.

צפורן या पदार्थास שחלת असेंही आणखी इब्री नाम आहे; त्यास मराठींत नखी असें म्हणतात, परंतु तो समुद्रांत उत्पन्न होतो; तो शिंपी सारिखा आहे.

חלבנה यास गंधा बेरोजो असें म्हणतात. हा पदार्थ फार करून राळे सारखा दिसतो; आणि तो राळेचाच एक प्रकार आहे.

לבונה शास्त्रांत निर्मळ ऊद असें लिहिलें आहे म्हणून कवडया ऊद असावा.

מור बोळ; म्हणजे तांबडा बोळ.

हारामबाम याने पवित्र मंदिरांतील पात्रांचें, व त्या मंदिरीं पूजन करणाऱ्या याजकांच्या वस्त्रांचें जें वर्णन केलें आहे, त्याच्या ९ व्या अध्यायांत असें आहे कीं, ऊरपट आणि ऊरीम व थूमीम हे एकच; आणि याच कारणास्तव त्यास न्याय ठरण्याचा ऊरपट असें नाम होतें. परंतु याआकोबाच्या बारा पुत्रांच्या नामांत इब्री भाषेंतील सर्व मुळाक्षरें नाहींत, म्हणजे ק, צ, ט, ח हीं अक्षरें उणी आहेत तीं अक्षरें उणी असल्यावरून एखाद्या प्रश्नाचें उत्तर मिळण्यास कदाचित् अडचण पडेल, ती न पडावी, या कारणावरून त्या ऊरपटावर आब्राहाम, इसहाक व याआकोब यांचीं नांवें असून שבטי יה असे शब्दही त्याजवर असत. शास्त्रांत ह्या ऊरपटांवर एस्राएलांच्या पुत्रांचीं नांवें मात्र होतीं असें लिहिलें आहे; परंतु हारामबामने १२२ व्या गीतांतील שבטייה "अनंताचे वंश" या शब्दांतील יה या शब्दाच्या अक्षरांची संख्या धरून आब्राहाम, इसहाक, याआकोब व याआकोबचे बारा पुत्र, असे अनंताचे पंधरा वंश होते, असें सिद्ध केलें आहे. या मतें त्यावर नांवें कोरलेली असत तीं येणें प्रमाणें:—

आरक्तक אברהם יצחק יעקב ראובן	पीतमणी שמעון	माणिक לוי
पांच יהורה	नील	हिरा נפתלי
पन्नग גד	विचित्रक אשר	याकूत יששכר
लसणा זבולן	गोमेद יוסף	मणिरत्न בנימן שבטי יה

चांगला पाऊस पडूं लागला. असे त्याचे शिष्य तृप्त झाल्यावर तो त्या कुंडलीतून बाहेर निघाला.

टीका ४. (पृष्ठ १६.)

पवित्र देश.

अनुवाद अ० ११ ओ० ११-१२ एथें लिहिल्याप्रमाणें ईश्वराकडून पवित्र देशाचा नेहमीं प्रतिपाल व्हावा व त्याचें लक्ष नेहमीं त्यावर असावें. परंतु इस्राएलांच्या पापामुळें हल्लीं त्यावर त्याची अवकृपा झाली आहे. तरी पुढें ईश्वर आपले वचनाप्रमाणें जेव्हां इस्राएलांवर कृपा करील, तेव्हां त्या देशास येशाया अ० ६२ ओ० १२ एथें लिहिल्या प्रमाणें "देरूशा" ह्मणजे प्रतिपाल केलेला देश असें नांव पुनः मिळेल.

टीका ४ (पृष्ठ १६.)

ऊरीम व थूमीम.

मुख्य याजकाच्या ऊरपटाच्या आंतल्या बाजूस जें अस्तर असे त्याला एक पिशवी असे; या पिशवींत אוּרִים ऊरीम व תֻּמִּים थूमीम असत या नांवाचा अर्थ प्रकाश व यार्थार्थता असा होतो; परंतु त्यांजकडून ईश्वरी इच्छा कळून येत असे. हे ऊरीम व थूमीम तीन रत्नें होतीं, आणि त्यांतील एकावर ן ह्मणजे तसेंच किंवा होय; दुसऱ्यावर לֹא ह्मणजे नाहीं असे शब्द कोरलेले होते; आणि तिसऱ्यावर कांहींच नव्हतें ज्या कोणास आपल्या कामाविषयी ईश्वरी मत घ्यावयाचें असे, तो मुख्य याजका जवळ जाऊन विचारीत असे. मग तो मुख्य याजक ऊरपटाच्या आंत हात घालून त्या तिहींतून एक रत्न काढी. जर होय असें निघालें, तर त्यानें समजावें की तें काम सफल होईल; जर नाहीं ह्मणून निघालें, तर तें काम सफल होणार नाही असे समजावें; परंतु ज्यावर कांहींच नसे तें निघालें तर त्या प्रश्नास कांहींच उत्तर नाहीं, तो प्रश्न पुनः दुसऱ्या वेळीं पहावा असें समजावें या प्रमाणें कित्येकांचें मत आहे. दुसऱ्यांचें असें मत आहे कीं त्या पिशवींत एकच रत्न असे, त्या रत्नावर ईश्वराचें न उच्चारायाचें नाम कोरलेलें असे. प्रश्न पाहतां वेळीं तीं अक्षरें जर चमकलीं तर "होय" असे उत्तर; परंतु जर न चमकलीं तर "नाहीं" असें उत्तर समजावें.

टीका १ (पृष्ठ. १०.)

ईश्वरानें मोश्यास सीनाय पर्वतावर दिलेलें उत्तर आणि कळविलेलें शुभवर्त्तमान

मोशे सीनाय पर्वतावर शास्त्र आणायास गेला होता, तेव्हां त्यास फार दिवस झाल्यावरून इस्राएल लोकांनीं ओतीव वासरूं केलें. हें ईश्वरानें मोशेला तो पर्वतावर असतांच सांगितलें; आणि या पापाकरितां त्यांचा समूळ नाश करणार असें दर्शविलें. हें पाहून मोश्यानें त्यांसाठीं प्रार्थना करून क्षमा मागितली व ती ईश्वरानें मान्य केली; निर्गम अ० ३२ यापुर्वी मोशे इथरोच्या घरीं असतां जेव्हां तो होरेब डोंगरावर शेरडें राखीत होता, तेव्हां ईश्वरानें त्यास दर्शन देऊन इस्राएलांच्या मुक्ततेचें शुभवर्त्तमान कळवून त्यास इस्राएलांस सोडवायास जाण्याविषयीं आज्ञा केली. होरेब व सीनाय हे एकच. होरेब हें त्या सर्व पर्वतांचें नांव असून सीनाय हा त्याचा एक शिखर आहे हें निर्गम अ० ३ ओ० १२ यावरून उघड दिसून येतें.

टीका २. (पृष्ठ ११.)

होनी हाम्मागेल.

" एन इस्राएल " नांवाच्या एका ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं. होनी हा कोणी सात्विक मनुष्य होता; तो ज्या देशांत राहत असे, त्या देशांत ईश्वरी अवकृपेमुळें पर्जन्य पडला नाहीं. तेव्हां तेथील सर्व लोकांनीं त्याजवळ येऊन अशी विनंती केली कीं, आपण देवा जवळ काकळूत करून पर्जन्य मागावा. मग त्यानें आपणा भोंवतें कुंडली करून अशी शपथ वाहिली कीं, ईश्वर ह्या देशावर पर्जन्य पाडील तेव्हांच मी या कुंडलींतून बाहेर पडेन. अशी शपथ करून तो तेथें ईश्वरास विनवीत बसला असतां, पर्जन्याची शिडशीडी आली; परंतु त्याचे शिष्य त्यास ह्मणाले कीं, त्वां शपथी पासून मोकळें व्हावें ह्मणूनच ती शिडशीडी आली, तेणेंकरून देशांत चांगलें पीक होणार नाहीं. असें ऐकून तो आणखी प्रार्थना करूं लागल्यावर पावसाची झोड लागली. तेव्हां त्याचे शिष्य त्यास ह्मणाले कीं, अशा पर्जन्यानें आमची अधीक नासाडी मात्र होते. मग तिसऱ्या वेळीं त्यानें प्रार्थना केल्यावर

आपल्याच अंगीं न्यूनता असल्यामुळें दुर्लक्ष व तिचा अपमान न करतां, आपल्या त्या भाषेचा आवेश व ईश्वरदत्त शास्त्राचा व धर्माचा अभिमान धरून आपणामध्यें तिचा अभ्यास वाढवून त्या भाषेंत प्रार्थना करावी, हें इस्राएल ह्मणविणारास योग्य आहे. असें केल्यानें त्या प्रार्थनेच्या रचनेंत जे विशेष गुण आहेत, ते कळून येतील, व तिजकडे आपलें लक्ष लागेल एवढेंच नाहीं; तर या भाषेंतील ग्रंथांत जें अपूर्व ज्ञान भरलें आहे, तें आपणास कळून येईल; आणि आपल्या मृत झालेल्या भाषेचें पुनः सजिवन होईल.

आतां, या ग्रंथाच्या संबंधानें झटलें असतां, हें भाषांतर सर्वांस समजण्यास सुलभ व्हावें ह्मणून त्याच्या स्पष्टीकरणाकरितां पृष्ठांखालीं व ग्रंथाच्या शेवटीं पुष्कळ टीका दिल्या आहेत तरी हें भाषांतर करणें व तें छापताना शुद्धाशुद्ध पहाणें मज एकट्यावर असल्यामुळें माझी नजर चूक होऊन कांहीं चुका राहिल्या असतील, त्याकडे सुज्ञजनांनी लक्ष न देतां, त्यांतील गुण मात्र घ्यावे परंतु अर्थात कांहीं अंतर असल्यास, त्यांनी कृपा करून मला कळवावें ह्मणजे मी त्यांचा मोठा आभारी होईन.

इब्रीचें शुद्धाशुद्ध पहाण्यांत अ० शालोम याकोब दिवेकर यांकडून मला बरेंच सहाय्य झालें हें लिहिण्यास मला आनंद वाटतो.

जो हेतु मी आपल्या मनीं धरून हें भाषांतर केलें आहे, त्याप्रमाणें माझ्या प्रीय इस्राएल बांधवांचे मनीं ईश्वरभक्तीचा प्रेम व भाव उत्पन्न होऊन त्यांनीं केलेली प्रार्थना ईश्वरानें मान्य करून त्यांजवर व सर्व इस्राएल बांधवावर कृपा करावी; आणि त्यांच्या मनीं आपल्या पवित्र भाषेचा अभ्यास करण्याची ईर्षा उत्पन्न होऊन व त्यांकडून चांगल्या प्रकारें अभ्यास होऊन आपल्या शास्त्राचा खरा अर्थ त्यांस कळून यावा व त्याप्रमाणें त्यांनीं ईश्वराशीं व परस्परांशीं वर्तून त्यांच्या उत्कर्षाचा वेळ समीप यावा, अशी ईश्वरापाशीं माझी प्रार्थना आहे. असें झाल्यानें माझ्या श्रमाचें पुर्तें फळ मला मिळालें असें मी समजेन, आणि ईश्वरी सहाय्यानें अशा प्रकारें आपल्या बांधवांची आणखी सेवा करण्यास मला उत्तेजन येईल.

योसेफ येहेजकेल राजपूरकर.

मुंबई ता० १५ माहे मे सन १८८९.

भाषांतर कर्त्याची प्रस्तावना.

ज्या सर्व समर्थ देवाने हें सर्व जग व त्यांतील सर्व पदार्थ यांस उत्पन्न केलें; ज्याची कृपा सर्व मानवी प्राणी सर्वदां अनुभवतात; जो आपल्या दयेनें त्यांस जीवन देतो, त्यांस सर्व पुरवितो आणि संकटांतून सोडवितो; त्याच्या अशा परम कृपेवरून सर्वांनीं त्याचेच उपकार मानावे, त्याचीच स्तुति करावी, आणि संकट-समयीं त्यासच शरण जाऊन त्याचेंच सहाय्य मागण्याकरितां त्याचीच प्रार्थना करावी हें योग्य आहे मग ज्या इस्राएलांकरितां त्यानें अनेक चमत्कार करून त्यांजवरील आपली दया स्पष्टपणें दाखवून, त्याबरोबरचीं दुसरीं पुरातन राष्ट्रें नष्ट होत असतां, त्यांस अद्याप जगांत राखिलें आहे; आणि त्यांस शास्त्र देवून त्यांचें व त्यांजकडून सर्व जगाचें कल्याण होण्याचा मार्ग त्यांस दाखविला; त्यांनीं तर आपला सर्व जीवात्मा त्याच्या स्तुतिकडे व भाक्तकडे लाविला पाहिजे. परंतु कदाचित सर्वांकडून यथायोग्य रीतीनें देवाची स्तुति होणार नाहीं व अगत्याच्या समयीं प्रार्थना करण्याकरीतां योग्य विचार सुचणार नाहींत, असें जाणून दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळच्या 'केनेसेथ हाग्गेदोला' या मोठ्या पवित्र मंडळीनें व तिजमागून आपल्या दुसऱ्या कांहीं गुरुजनांनीं ईश्वराची स्तुति करण्याची व त्याकडून सहाय्य मागण्याकरितां प्रार्थना करण्याच्या रीति लावून दिल्या आहेत; त्या या ग्रंथीं आहे. आणि हीच रीति आजपर्यंत शेंकडों वर्षें सर्व जगांतील इस्राएलांमध्यें चालत आल्या आहेत. परंतु त्या स्तुतीचा व प्रार्थनेचा अर्थ समजला असतां, आम्हास प्रार्थना समजत नाहीं मग आम्ही व्यर्थ प्रार्थना मंदिरीं कां जावें, असें म्हणणारांस निमित्त मिळूं नये; परंतु त्यांचा भक्तिभाव व धर्मावरील त्यांची श्रद्धाही वाढावी म्हणून हें भाषांतर केलें आहे. तरी आपल्या इब्री भाषेंत रचिलेल्या त्या स्तुतीचे व प्रार्थनेचे अनेक सुंदर गुण या भाषांत्तरांत दाखवितां येत नाहींत. यास्तव आपल्या पवित्र शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें जी भाषा देवानें, देवदुतांनी, व भविष्यवाद्यांनीं उच्चारिली; आणि ईश्वराची अपार कृपा व इच्छा व मनुष्याच्या तारणाचें मार्ग दर्शविण्याकरितां ज्या भाषेचा उपयोग केलेला आहे; आणि ज्या भाषेच्या अंगीं असणाऱ्या अशा अनेक सुंदर गुणांवरून अन्य जातीच्या अनेक विद्वज्जनांनीहि तिची प्रशंसा केलेली आहे, त्या आपल्या पवित्र व गुणसंपन्न भाषेकडे,

68